# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## अभ्यासपत्रिका – IV

## आंतरराष्ट्रीय संबंध

# जागतिक राजकारण

## विषय कोड : 97019

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

**लेखक** : **प्रा.सागर कांबळे**
सहायक प्राध्यापक
सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे.

: **डॉ. श्रीकांत देविदास महादाने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
डॉ. पतंगराव कदम कला आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण

: **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

**सप्टेंबर २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संकल्पना आणि दृष्टिकोन | १ |
| २ | विश्वरचना | ४१ |
| ३ | संघर्ष, शांतता, आणि सुरक्षा | ६१ |
| ४ | आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थशास्त्र | ७३ |

तृतीय वर्ष कला

सत्र - V (CBCS)

अभ्यासपत्रिका – IV

आंतरराष्ट्रीय संबंध

# जागतिक राजकारण

## अभ्यासक्रम

**Module 1: Concepts and approaches**

1.1 International Relations, International Politics – Definition, Scope

1.2 Approaches: Realism and Liberalism

1.3 Concepts: Power, National Interest and Balance of Power

**Module 2: World Order**

2.1 Cold War: Bipolarity

2.2 Post-Cold War: Unipolarity, Multipolarity and Non-Polarity

**Module 3: Conflict, Peace and Security**

3.1 Types of Conflict and changing nature of Conflict

3.2 Approaches to Peace: Arms Control, Disarmament and Collectiv

3.3 Changing Idea of Security: National Security and Human Securit

**Module 4: International Political Economy**

4.1 Bretton Woods Institutions: IMF, World Bank and WTO

4.2 Regional Economic Integration: European Union

4.3 Globalisation

# १

# संकल्पना आणि दृष्टिकोन

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण

१.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी दृष्टिकोन

१.५ नववास्तववाद

१.६ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा उदारमतवादी दृष्टिकोन

१.७ सत्तेची संकल्पना

१.८ राष्ट्रीय हित

१.९ सत्तासंतुलन / सत्तासमतोल

१.१० विद्यापीठीय प्रश्न

## १.१ उद्दिष्टे

१) आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यातील फरक, स्वरूप, व्याप्ती समजून घेणे.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे प्रमुख दृष्टिकोन (वास्तववाद - नववास्तववाद, उदारमतवाद - नवउदारमतवाद) समजून घेणे

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाला आकार देणाऱ्या, त्यावर प्रभाव पाडणाऱ्या प्रमुख संकल्पनांचा अभ्यास करणे.

## १.२ प्रस्तावना

विश्व हे व्यापक आणि गुंतागुंतीचे आहे. यात राष्ट्रांमध्ये अनेक प्रकारच्या आणि विविध पातळ्यांवर क्रिया-प्रतिक्रिया चालू असतात, या क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये होतो. आंतरराष्ट्रीय संबंध हे जगातील लोकांशी व त्यांच्या संस्कृतीशी संबंधित आहे. राष्ट्रांमधील संबंधाची प्रक्रिया गुंतागुंतीची आणि परस्परपूरक असते. हे संबंध केवळ इतर राष्ट्रांशीच नसून आंतरराष्ट्रीय संघटना, बहुराष्ट्रीय संस्था, व्यक्तिशी असल्याने व आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पातळीवर असल्याने अधिक गुंतागुंतीची बनली आहे. आज २१ व्या शतकातही आंतरराष्ट्रीय समुदायातील सार्वभौम राष्ट्रांची संख्या सतत वाढत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य असणाऱ्या सार्वभौम राष्ट्राची संख्या १८० हून अधिक आहे. बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्रांमधील परस्पर संबंध, आंतरराष्ट्रीय प्रश्न,

समस्यांचे स्वरूपही बदलत आहे. आंतरराष्ट्रीय समुदायात काढणे कोणतेही राष्ट्र स्वयंपूर्ण नाही. राष्ट्रांना आपल्या गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. वैश्विकरणाच्या प्रक्रियेबरोबरच राष्ट्रा-राष्ट्रांतील परस्परावलंबित्व अधिक वाढले आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचे महत्त्वदेखील वाढले आहे.

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचा संबंध केवळ शासनाशी किंवा परराष्ट्र धोरणनिर्मिती प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या घटकांशी नाही. हा विषय आपल्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे. युद्धांचे नकारात्मक परिणाम सामान्य व्यक्तिला भोगावे लागतात. तसेच शांततेचे अनेक फायदेही आपल्याला मिळतात.

## १.३ आंतरराष्ट्रीय संबंध : अर्थ आणि व्याप्ती

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचा अर्थ स्पष्ट करणे ही एक कठीण गोष्ट आहे. हा एक आंतरशाखीय विषय (Interdisciplinary Subject) असून, याचा संबंध राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र तसेच इतर काही सामाजिक शास्त्रांशी आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाला भारतात आणि भारताबाहेरही बहुतांश विदयापीठांमधून राज्यशास्त्र या विषयाचा एक भाग म्हणूनच गृहित धरले जाते.

राष्ट्रांमधील संबंधात अनेक गोष्टींचा समावेश होतो. उदा. युद्ध, राजनय, युती, व्यापार, आंतरराष्ट्रीय संघटनांचे सदस्यत्व, सांस्कृतिक क्षेत्रातील देवाणघेवाण या गोष्टींशी संबंधित अनेक मुद्दे असतात.

उदा. - सीमावाद, एखादया भौगोलिक क्षेत्रावर मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष भारत आणि चीनमधील सीमावाद, भारत आणि पाकिस्तानमध्ये काश्मीर प्रश्नावरून असलेला संघर्ष, इस्त्रायल आणि पॅलेस्टाइनमध्ये जेरूसलेम या शहराच्या विभागणीवरून चाललेला संघर्ष हे आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासविषय आहेत..

### १.३.१ आंतरराष्ट्रीय संबंध- व्याख्या-

**१) पेडेल फोर्ड आणि लिंकन –**

“बदलत्या सत्ता संबंधांच्या समीकरणात राष्ट्रांमधील क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध होय.”

या क्रिया-प्रतिक्रियांचा प्रमुख उद्देश राष्ट्रीय हितसंबंधांची पूर्तता हा असतो.

**२) मॉर्गेन्थ्यू -**

“आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्रांमध्ये चाललेला संघर्ष.”

**३) फ्रँकेल –**

“आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण, राष्ट्रांमधील परस्पर तसेच आंतरराष्ट्रीय व्यवस्था, संघटनांबरोबरच्या क्रिया-प्रतिक्रिया, आंतरराष्ट्रीय व्यवस्थेची कार्यप्रणाली, राष्ट्रांमधील अंतर्गत राजकारण यांचा अभ्यास होय.”

**४) मार्गारेट स्प्राउट –**

“आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे सार्वभौम, राजकीय समुदायामधील क्रिया-प्रतिक्रियांच्या अशा घटकांचा अभ्यास ज्यात राष्ट्रीय हितसंबंधांमधील संघर्ष अंतर्भूत आहे.”

**५) पामर आणि पार्किन्स-**

“आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रा-राष्ट्रांमधील विविध पातळ्यांवरील बदलत्या संबंधांचा (Transitional Relations) अभ्यास केला जातो.”

विविध विचारवंतांच्या वरील व्याख्यांवरून या विषयाची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) आंतरराष्ट्रीय संबंध हा एक आंतरशाखीय विषय असून याचा संबंध इतर सामाजिक शास्त्रांशी आहे.

२) यामध्ये सार्वभौम राष्ट्रांमधील सर्व प्रकारच्या संबंधांचा, क्रिया-प्रक्रियांचा परस्परांविषयी राष्ट्रांनी घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास केला जातो.

३) आंतरराष्ट्रीय व्यवस्था, तिचे घटक, स्वरूप, कार्यप्रणालीचा अभ्यास या विषयात केला जातो.

४) सार्वभौम राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय संघटना यांच्यातील परस्पर संबंध आणि परिणामांचा विचार यात होतो.

५) राष्ट्रांमधील केवळ अस्तित्वात असणाऱ्याच नाही, तर बदलत्या संबंधांचादेखील अभ्यास या विषयाअंतर्गत केला जातो.

६) सत्ता हा आंतरराष्ट्रीय संबंधांचा केंद्रबिंदू आहे. सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्रांमध्ये सदैव चढाओढ, स्पर्धा असते. या स्पर्धेचा अभ्यास, आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

७) राष्ट्रीय हितसंबंधांच्या पूर्ती व वृद्धीसाठी सत्तेचा वापर होत असतो. हितसंबंध साधण्यामध्ये संघर्ष अटळ आहे. राष्ट्रे आपले परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा वापर हितसंबंध साधण्यासाठी करत असतात.

८) राष्ट्रांमधील संघर्षामुळे हितसंबंधांच्या पूर्ततेत अडथळा निर्माण होऊन संघर्ष टाळून शांतता निर्मितीसाठी जे प्रयत्न होतात त्यांचा विचार आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो.

९) राष्ट्रांमधील संबंध कायमस्वरूपी नसतात, तर त्यात सतत बदल होत असून बदलत्या संबंधांचा अभ्यास या संबंधात होतो.

### १.३.२ आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप –

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या स्वरूप व व्याप्तीत अनेक बदल घडून आले आहेत. ते खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतात.

**१) स्वतंत्र संघटित ज्ञानशाखा -**

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाला एक स्वतंत्र परिपूर्ण आणि संघटित ज्ञानशाखा म्हणावे की नाही याविषयी विचारवंतांमध्ये मतभेद आहेत.

**२) वर्तनवादी दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय घटनांचे विश्लेषण**

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडींचे वर्तनवादी दृष्टिकोनातून विश्लेषण केले जाते. एखादया राष्ट्राने इतर राष्ट्रांसंबंधी घेतलेला विशिष्ट निर्णय कोणत्या परिस्थितीमध्ये घेतला गेला, निर्णय निर्मितीच्या प्रक्रियेत समाविष्ट होणाऱ्या घटकांची मानसिकता यांचे विश्लेषण आंतरराष्ट्रीय संबंधात केले जाते. विशिष्ट परिस्थितीला राष्ट्रांनी दिलेल्या प्रतिसादाचा वर्तनवादी दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास भविष्यात ते धोरण कसे असेल याचा अंदाज लावणे शक्य आहे.

आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या वर्तनाचे अध्ययन आंतरराष्ट्रीय संबंधात होते. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी आवश्यक परिस्थितीचा विकास किंवा निर्मिती कशी केली जावी याचा विचार आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

**३) स्वतंत्र आणि वेगळे अस्तित्व**

आंतरराष्ट्रीय संबंधाची निर्मिती आणि विकास हा इतिहास व राज्यशास्त्र या दोन सामाजिक शास्त्रांतून झाला आहे. या दोन्ही सामाजिक शास्त्रांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय संबंधावर होता. झिमरन, वेबस्टर, इ. एच. कार इ. इतिहासकारांनी आंतरराष्ट्रीय संबंधांचे अस्तित्व भूतकाळातील राजनयीक घडामोडींचे वर्णन एवढयापुरतेच मर्यादित मानले. विविध सामाजिक शास्त्रांच्या प्रभावाने आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप आंतरशाखीय बनले.

इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांच्या अभ्यासासाठी जे दृष्टिकोन वापरले जायचे त्यांचाच अवलंब आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनासाठी केला जात असे.

दुसऱ्या महायुद्धानंतर सन १९५०-१९६० च्या दशकातील वर्तनवादी क्रांतीनंतर या परिस्थितीत बदल घडून आला. आधुनिक तंत्रावर आधारित नवीन शास्त्रशुद्ध पद्धती व दृष्टिकोनाचा अवलंब आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनासाठी केला गेला. एक स्वतंत्र व इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा वेगळे अस्तित्व असणारा विषय म्हणून हा विषय पुढे आला. इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा भिन्न आशय, तंत्रे व कौशल्याच्या आधारावर आंतरराष्ट्रीय संबंधाने वेगळी ओळख बनवली आहे.

**४) भविष्यातील घटनांविषयी अंदाज बांधण्याच्या क्षमतेचा विकास-**

आकडेवारी व परिस्थितीचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करून भविष्यात घडणाऱ्या घटनांविषयी अंदाज बांधण्याची क्षमता मर्यादित स्वरूपात आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विकसीत झाली.

राष्ट्रांच्या वर्तमानकाळातील धोरण व निर्णयांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. अभ्यासकांनी भविष्यातील घटनांविषयी बांधलेला अंदाज चुकीचे ठरतात. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत यामध्ये होणाऱ्या बदलांमुळे भविष्यकथन करणारी एखादी शास्त्रशुद्ध चौकट किंवा तंत्र आंतरराष्ट्रीय संबंधात अद्याप विकसीत होऊ शकलेले नाही.

### १.३.३ आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील फरक

आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पनांचा एकाच अर्थाने होत असलेला वापर यामुळे हा विषय, अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. या दोन्ही संकल्पनांचा अर्थ भिन्न आहे.

या संकल्पना परस्पर निगडित असल्या तरी त्यांच्यात मूलभूत फरक आहे.

ते खालील मुद्दयांद्वारे स्पष्ट करता येईल.

१) आंतरराष्ट्रीय राजकारण या संकल्पनेचा वापर मर्यादित अर्थाने केला जातो. या संकल्पनेचा संबंध आंतरराष्ट्रीय समुदायाच्या राजकारणाशी असून यात राजनय, राष्ट्रांतील परस्पर संबंधांच्या अभ्यासावर भर दिला जातो.

   आंतरराष्ट्रीय संबंध या संकल्पनेचा वापर व्यापक अर्थाने करून राष्ट्रांच्या, जनतेच्या, आंतराष्ट्रीय संघटना, संस्थांच्या पातळीवरील परस्पर संबंधांचा अभ्यास केला जातो.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे उद्दिष्टय राष्ट्रांमधील राजकीय संबंधाचा अभ्यास करणे हा आहे तर आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रांमधील केवळ राजकीय संबंधांचाच नाही तर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, विज्ञान तंत्रज्ञान इ. विविध पातळ्यांवरील संबंधांचा अभ्यास होतो.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात दोन राष्ट्रांतील शासनाच्या अधिकृत संबंधांचा अभ्यास होतो. या संबंधात शासनाबरोबर राष्ट्रांतील इतर संस्था व लोकांमधील अनधिकृत खाजगी, अनौपचारिक संबंधांचादेखील अभ्यास होतो.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती मर्यादित आहे. तर आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती व्यापक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांमधील युद्ध, तह, करार, राजनय शांतता इ. गोष्टींच्या अभ्यासावर भर दिला जातो. आंतरराष्ट्रीय संबंधात राजकीय संबंधांबरोबरच, अराजकीय संबंधांवर, आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था, बिगर शासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय व्यवस्था राज्यके इ. गोष्टींच्या अभ्यासावर तसेच राष्ट्रे व त्यांच्यातील परस्पर संबंधांवर भर दिला जातो.

५) आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध या दोन्हीं संकल्पनांच्या अध्ययन पद्धतीत देखील फरक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनासाठी ऐतिहासीक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब केला जातो, तर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनासाठी आधुनिक व शास्त्रीय दृष्टिकोनांचा अवलंब केला जातो. यामध्ये वर्तनवादी, निर्णय निर्मिती प्रक्रिया, कायदा दृष्टिकोनांचा समावेश होतो.

६) आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांमधील संघर्षाचा व विरोधात्मक संबंधांच्या अभ्यासावर भर दिला जातो तर आंतरराष्ट्रीय संबंधांत राष्ट्रांतील सहकार्यात्मक संबंधांवर भर दिला जातो.

### १.३.४ आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याप्ती

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यासात खालील प्रमुख गोष्टींचा समावेश होतो.

**१) सार्वभौम राष्ट्रांतील विविध पातळ्यांवरील संबंधांचा अभ्यास**

आंतरराष्ट्रीय संबंधांत १७ व्या शतकापासून सार्वभौम राष्ट्रांतील संबंधांचा अभ्यास केला जातो. सुरुवातीला राष्ट्रांतील राजकीय संबंधांना प्राधान्य होते. दुसऱ्या महायुद्धानंतर राजकीय संबंधांबरोबरच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संबंधांच्या अभ्यासाला महत्व प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय समुदायात सर्व राष्ट्रे एक प्रकारची नसून भौगोलिक रचना, आर्थिक, लष्करी सामर्थ्य यांच्या आधारावर राष्ट्रांमध्ये भेद आहेत. अमेरिका हे लष्करी व भौगोलिकदृष्ट्या मोठे राष्ट्र आहे. तर जपान हे आाकाराने लहान राष्ट्र आहे. १९५० पासून दोन्ही देशांमधें आर्थिक, संरक्षण विषयक संबंध आहेत.

राष्ट्रांमध्ये सहकार्याचे, संघर्षांचे संबंध असतात.

उदा - भारत, पाकिस्तान या दोन शेजारी राष्ट्रांच्या निर्मितीपासून विविध कारणांवरून संघर्षांचे संबंध अहेत. दुसरीकडे भारत आणि सोविएट रशियाचे संबंध सहकार्याचे आहेत.

**२) राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास -**

सार्वभौम राष्ट्रे हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी परराष्ट्र धोरणाचा साधन म्हणून वापर करतात. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रे इतर राष्ट्रांबरोबर संबंध प्रस्थापित करतात. राष्ट्रांमधील क्रिया-प्रतिक्रिया सहकार्यात्मक व विरोधात्मक संबंध परराष्ट्र धोरणात प्रतिबिंबित होतात. परराष्ट्र धोरणाचाच नाही, तर परराष्ट्र धोरण निर्णय निर्मिती प्रक्रियेत सहभागी घटकांचा देखील अभ्यास होतो.

उदा. - भारतात परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रियेत पंतप्रधान, मंत्रिमंडळ, परराष्ट्र मंत्रालय, विरोधी पक्ष, गुप्तहेर संघटना, दबावगट, प्रसार माध्यमे, लोकमत इ. घटकांचा समावेश असतो. २००४ ला भारताने इराकमध्ये अमेरिकेच्या मदतीसाठी शांतिसैन्य पाठवावे की नाही याविषयी संसदेत चर्चा झाली. विरोधी पक्षांच्या विरोधाने भारताने शांतिसैन्य पाठविण्यास नकार दिला.

अमेरिका इस्त्रायल-पॅलेस्टिनी संघर्षात इस्त्रायलला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत करत आहे. इस्त्रायलविषयी अमेरिकेच्या सकारात्मक धोरणामागे अमेरिकेच्या देशांतर्गत राजकारणातील ज्यू लोकांच्या दबावगटाचा प्रभाव कारणीभूत आहे.

परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रियेचे नेपोलियन बोनापार्टपासून सद्दाम हुसेनपर्यंत लष्करी हुकूमशहांच्या आक्रमक व युद्धखोर धोरणामागे प्रमुख कारण त्यांना वाटणारी मानसिक असुरक्षितता होती. या मानसिकतेचे विश्लेषण आंतरराष्ट्रीय संबंधात शासन प्रमुख निर्णय कसा घेतात, कोणत्या परिस्थितीत घेतात, याचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो.

### ३) राजनय, युद्ध आणि शांततेचा अभ्यास-

राजनय, युद्ध व शांततेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला या विषयावर इतिहासकारांचा प्रभाव असल्याने राष्ट्रांतील राजनयीक संबंध, युद्ध, लष्करी करार शांततेच्या निर्मितीसाठीचे प्रयत्न इ. गोष्टींच्या वर्णनाला महत्त्व होते. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्रांतील राजनयीक संबंधांचा इतिहास होय असाच अर्थ या विषयाला प्राप्त झाला.

दुसऱ्या महायुद्धामध्ये झालेल्या जीवित, वित्तहानीनंतर युद्ध व शांततेचा शास्त्रशुद्ध, पद्धतशीर अध्ययनावर भर दिला गेला. राष्ट्रे युद्धासाठी का प्रवृत्त होतात, युद्धखोर नेत्यांच्या मानसिकतेचे वर्तनवादी दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यात येऊन शांततानिर्मितीचे मार्ग शोधायचा प्रयत्न झाला. १९८० च्या दशकात शांतता अध्ययन कार्यक्रम ही एक नवी शाखा आंतरराष्ट्रीय संबंधात निर्माण झाली.

युद्ध आणि शांततेच्या अध्ययनासाठी आंतरराष्ट्रीय संबंधात आंतरशाखीय दृष्टिकोनाचा विश्लेषणाचा अवलंब होत आहे. शीतयुद्धाच्या काळात विकसित झालेल्या प्ररोधन युद्ध टाळण्याचा Detente शांतता निर्मितीच्या तंत्रांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

### ४) विचारसणीचे अध्ययन -

आंतरराष्ट्रीय संबंधाला राज्यशास्त्र विषयाचा एक भाग मानला जातो. ज्याप्रमाणे राज्यशास्त्रात विचारसरणींच्या देशांतर्गत राजकारणावरील प्रभावाचे अध्ययन केले जाते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रांच्या परस्पर संबंधांवर परिणाम करणाऱ्या विचारसरणींचा अभ्यास केला जातो.

२० व्या शतकात परस्परविरोधी विचारसरणींचा विकास घडून आला. उदा. साम्यवाद, भांडवलवाद, समाजवाद, उदारमतवाद, फॅसिवाद, नाझिवाद. या विचारसरणींनी आंतरराष्ट्रीय संबंधांना प्रभावित केले. २० व्या शतकातील विभागीय आंतराष्ट्रीय संघर्ष विशिष्ट विचारसरणीवर आधारित आहेत. महायुद्धानंतर अमेरिका, सोविएट रशियामधील शीतयुद्धाचे राजकारण साम्यवाद व भांडवलशाही दोन परस्परविरोधी विचारसरणींच्या संघर्षावर अवलंबून होते. पश्चिम व पूर्व यूरोपची विभागणी या दोन विचारसरणींच्या आधारावर झाली होती. १९९० च्या दशकात धार्मिक मूलतत्त्ववादाची विचारसरणी आंतरराष्ट्रीय संबंधांत प्रभावशाली बनली.

### ५) सत्ता आणि राष्ट्रीय हितसंबंधांचा अभ्यास-

सत्ता व राष्ट्रीय हितसंबंधांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधांच्या केंद्रस्थानी आहे. हॅन्स मॉर्गेन्थूसारखे वास्तववादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करणारे विचारवंत आंतरराष्ट्रीय संबंधांना राष्ट्रांमधील सत्तासंघर्ष म्हणून संबोधतात. राष्ट्रे सत्ताप्राप्तीसाठी व सत्ता वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. सत्ताप्राप्तीसाठी चाललेल्या या स्पर्धेत संघर्ष अटळ असतो. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी सत्तेवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. सत्ता समतोल, सामूहिक सुरक्षितता या सत्तेवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यवस्था आहे. या व्यवस्थांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. सत्तेप्रमाणेच राष्ट्रीय हितसंबंधांचादेखील विचार आंतरराष्ट्रीय संबंधात होतो. राष्ट्रांचे शत्रू किंवा मित्र कायमस्वरूपी नसतात, तर हितसंबंध कायमस्वरूपी असतात.

हार्टमनच्या मते, राष्ट्रे राष्ट्रीय उद्दिष्टये हितसंबंध साधण्यासाठी ज्या प्रक्रियांचा अवलंब करतात. त्याचा समावेश आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

### ६) आंतरराष्ट्रीय संघटना -

आंतरराष्ट्रीय संबंधात आंतरराष्ट्रीय-विभागीय संघटना, संस्था, बिनशासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या स्वरूपाचा, भूमिकेचा व राष्ट्रांवर होणाऱ्या त्यांच्या परिणामांचादेखील अभ्यास केला जातो.

दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेमुळे आंतरराष्ट्रीय संघटनांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका वाढली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध संस्था आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य, कामगार कल्याण, विज्ञान तंत्रज्ञान, निःशस्त्रीकरण इ. क्षेत्रांत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

शीतयुद्धाच्या काळात विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या आर्थिक स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय संस्था विभागीय स्वरूपाच्या संघटना निर्माण झाल्या. यात नाटो, वॉर्सा, पॉप सिराटो, सेन्टो सारख्या लष्करी संघटनांचा समावेश होतो.

### ७) आंतरराष्ट्रीय संघर्षाचे व्यवस्थापन आणि सोडवणूक –

विश्व राजकारणात संघर्ष हा अटळ आहे. राष्ट्रांना उद्दिष्टये साधण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेची आवश्यकता असते. परिणामी संघर्षावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न आंतरराष्ट्रीय राजकारणात सदैव चालू असतात. संघर्ष कायमस्वरूपी सोडवणे शक्य नसले तरी संघर्षाचे व्यवस्थापन करून त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य असते. संघर्षाचे व्यवस्थापन विविध मार्गाने केले जाते. या मार्गाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. आज अनेक आंतरराष्ट्रीय संघटना आणि शांतता निर्मितीसाठी कार्य करणाऱ्या संस्था संघर्षाचे नियंत्रण करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करीत आहेत. आंतराष्ट्रीय संबंधात वर्तनवादी दृष्टिकोनातून संघर्षाचे विश्लेषण केले जाते आणि त्याच्या व्यवस्थापनाच्या पद्धती शोधल्या जातात.

**८) शस्त्रास्त्र स्पर्धा, शस्त्रास्त्र नियंत्रण व निःशस्त्रीकरण –**

या तिन्ही संकल्पनांना आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनात महत्त्वाचे स्थान आहे. या संकल्पना परस्पर निगडित आहेत. राष्ट्रांतील परस्पर तणाव, अविश्वास व संशयाचे वातावरण शस्त्रास्त्र स्पर्धेला जन्म देते व या शस्त्रास्त्र स्पर्धेतून युद्ध होतात. शस्त्रास्त्र स्पर्धेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या निर्मितीवर बंधने घालण्यासाठी व शस्त्रास्त्रांना पूर्णपणे नष्ट करण्यासाठी शस्त्रास्त्र नियंत्रण व निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रिया वापरल्या जातात.

उदा - दुसऱ्या महायुद्धानंतर शस्त्रास्त्र नियंत्रण व निशस्त्रीकरणाची गरज वाढली. अमेरिका, सोवियत रशिया, इंग्लंड, संयुक्त राष्ट्र संघटना यांच्या पुढाकाराने अनेक द्विपक्षीय तसेच बहुपक्षीय निःशस्त्रीकरण करार गेल्या पन्नास वर्षांमध्ये करण्यात आले आहेत.

उदा - अण्वस्त्र प्रसारबंदी करार (Nuclear Non-proliferation Treaty - NPT), सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार (Comprehensive Test Ban treaty), डावपेचात्मक शस्त्रास्त्रांच्या संख्येवर मर्यादा व कपात करण्याविषयांचा करार (Strategic Arms Limitation/Reduction Talks - SALT, START).

**९) क्षेत्रीय अध्ययन**

क्षेत्रीय अध्ययन हा आंतरराष्ट्रीय संबंधांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. एकोणविसाव्या शतकापर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारण प्रामुख्याने युरोपपुरते मर्यादित होते. २० व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप व्यापक बनले आणि आशिया, आफ्रिका खंडांना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त झाले.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाची व्यापकता, निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेतून आशिया, आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रांना मिळालेले राजकीय स्वातंत्र्य, आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती व त्यांची वाढती सदस्य संख्या, शीतयुद्धाचे राजकारण, माहिती तंत्रज्ञानात घडून आलेली क्रांती, अलिप्ततावादी राष्ट्रांची चळवळ आशिया खंडातील राष्ट्रांची आर्थिक प्रगती, अण्वस्त्रांचा झालेला प्रसार इ. कारणांनी आशिया-आफ्रिका खंडातील विकसनशील राष्ट्रांचे महत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढले आहेत. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंधात गेल्या काही दशकांपासून क्षेत्रीय अध्ययनाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

उदा- अमेरिकन स्टडिज, युरोपियन स्टडिज, चायनीज स्टडिज, रशियन स्टडिज, आफ्रिकन स्टडिज, साउथ एशियन स्टडिज इ.

### १.३.५ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्व.

- आंतरराष्ट्रीय संबंधांमुळे आपले दैनंदिन जीवन प्रभावित होते. आपण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय संबंधांत सहभागी होत असतो.

- आंतरराष्ट्रीय संबंध ही राज्यशास्त्राची शाखा असून, या विषयाचा संबंध प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय सुरक्षा घडामोडी व आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थशास्त्र यांच्या राजकीय परिणामांचे स्पष्टीकरण करण्याशी आहे.
- राष्ट्रांशिवाय, आंतरराष्ट्रीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या, बिगर शासकीय संघटना, संस्था आंतरराष्ट्रीय संबंधांवर मोठा प्रभाव पाडतात.
- आंतरराष्ट्रीय संबंध, हा एक आंतरशाखीय विषय असून, त्याचा संबंध अनेक सामाजिक शास्त्रांशी आहे.
- या विषयाचा स्वतंत्र असा आशय आहे. विश्लेषणात्मक अध्ययन पद्धती आहेत. अध्ययनाचे स्वतंत्र तंत्र व कौशल्ये विकसित झाली आहेत. यामुळे भविष्यातील घटनांविषयी अंदाज बांधण्याची क्षमता या विषयात विकसित झाली आहे.
- आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पना परस्परांशी निगडित असल्या आणि अनेकदा या संकल्पनांचा वापर एकाच अर्थाने होत असला, तरी त्यांच्यात मूलभूत फरक आहे. आंतरराष्ट्रीय संबंध ही आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या विविध पैलूंचा सविस्तर अभ्यास करणारी एक प्रक्रिया आहे, तर आंतरराष्ट्रीय राजकारण या प्रक्रियेचा एक भाग आहे. ज्यात राष्ट्रांमधील राजकीय संबंधांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो.
- आंतरराष्ट्रीय संबंध हा एक सर्वसमावेशक विषय असून यात सार्वभौम राष्ट्रांमधील सर्व प्रकारच्या विविध पातळ्यांवरील संबंधांचा, राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा, राजनय, युद्ध व शांततेचा, विचारसरणींचा, सत्ता व राष्ट्रीय हितसंबंधांचा, आंतरराष्ट्रीय संघटनांचा, संघर्षाचे व्यवस्थापन आणि सोडवणुकीचा, शस्त्रास्त्र स्पर्धा, शस्त्रास्त्र नियंत्रण आणि निःशस्त्रीकरणाचा अभ्यास होतो.

## १.४ वास्तववाद

२० व्या शतकात आंतरराष्ट्रीय संबंधावरील पाश्चिमात्य निर्वचनाला (Interpreation) सर्वाधिक प्रभावित करणारा आणि आंतरराष्ट्रीय संबंधातील आधुनिक सिद्धांतांना व दृष्टिकोनांना जन्म देणारा सिद्धांत म्हणजे वास्तववाद होय. १९१४ ते १९४५ दरम्यान आंतरराष्ट्रीय राजकारणावर भाष्य करण्यासाठी तसेच शीतयुद्ध काळात अमेरिका सोवियत रशिया च्या परराष्ट्र धोरणांच्या समर्थनार्थ वास्तववादी दृष्टिकोन वापरला गेला. हा सिद्धांत जुना असून, त्याच्या पुनरुज्जीवनाचे श्रेय हॅन्स मॉर्गेन्थ्यू, ई. एच. कार, केनेथ थॉम्पसन, जॉर्ज केनन, हेन्री किसिंजर या विचारवंतांना दिले जाते.

राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंधात सत्ता हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. मॅकियाव्हॅली, थॉमस हॉब्ज यासारखे पाश्चात्य विचारवंत आणि कौटिल्यासारखा भारतीय विचारवंतही राजकारणातील सत्तेचे स्थान मान्य करतो.

आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले ध्येय साध्य करण्यासाठी आदर्श, स्वप्नांचा आधार न घेता वास्तवता लक्षात घेतली पाहिजे. त्यासाठी सत्तेचा, बळाचा वापर केला पाहिजे, असे या सिद्धांताचे मुख्य मुल्य आहे. म्हणून या दृष्टिकोनाला वास्तववादी / सत्तेचा किंवा शक्ति दृष्टिकोन म्हटले जाते.

हॅन्स मॉर्गेन्थ्यूने आपल्या 'Politics Among Nation' या ग्रंथात वास्तववादी दृष्टिकोनाचा पुरस्कार केला आहे.

**वास्तववादी सिद्धांत -**

वास्तववादी सिद्धांत हा सत्ता आणि सुरक्षा या घटकाशी निगडित आहे. परस्पर भीती व असुरक्षिततेमुळे व्यक्ती आणि राष्ट्रे सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्नशील असतात. सत्तेच्या या स्पर्धेत संघर्ष अपरिहार्य असतो. तो कायमस्वरूपी असून कोणत्यातरी स्वरुपात अस्तित्वात असतो. आंतरराष्ट्रीय संघटना किंवा कायदा यावर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ आहे. वास्तववादी दृष्टिकोनातून सत्तास्पर्धा ही सार्वत्रिक असून, ती शाश्वत असते. सत्ता ही साध्य व साधन ही असते. सत्तेच्या साधनाने राष्ट्रीय हित साध्य होते. यादृष्टीने सत्ता हे साध्य देखील ठरते. या गृहितकावर वास्तववादी सिद्धांत आधारित आहे. वास्तववादी नैतिक मूल्यांचे अस्तित्व पूर्णपणे अमान्य करीत नसले तरी त्यांचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावतात.

**वास्तववादी सिद्धांताची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१) वास्तववादात विचारांपेक्षा ऐतिहासिक घटनांवर अधिक भर दिला जातो. ऐतिहासिक घटनांच्याआधारे वास्तववादी आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेला केंद्र स्थानी मानतात.

२) वास्तववादात व्यक्ती आणि राष्ट्राचे वर्तन समान मानले जाते. ज्या प्रेरणा व्यक्तीच्या वर्तनाला प्रभावित करतात त्याच प्रेरणा राष्ट्राच्या वर्तनालाही प्रभावित करतात.

३) वास्तववादी सिद्धांत एकल विचार नसून, वैश्विक दृष्टिकोन आहे. तो परस्पर गृहितत्वांवर आधारित आहे. ही गृहितत्वे व्यक्तीचे वर्तन, व्यक्तीच्या प्रेरणा, व्यक्ति व सभोवतालची परिस्थिती यांच्यातील परस्पर संबंधांशी व्यक्तीच्या उत्तरजीवित्वाशी निगडित आहे.

४) आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही राष्ट्रकेंद्रित व्यवस्था असून, भविष्यातही ती तशीच राहील, असे वास्तववाद मानतो.

५) आंतराराष्ट्रीय राजकारणाच्या आखाड्यात अराजकता आणि संघर्षाची स्थिती कायमस्वरूपी असते, राष्ट्रे सत्ताप्राप्तीसाठी परस्परांशी संघर्ष करतात.

६) वास्तववादी विचारवंतांच्या मते, राष्ट्रांमध्ये सत्तास्थान आणि क्षमतेनुसार अधिकारश्रेणी असते.

७) सत्तेच्या आधारावर अधिकारश्रेणी असली तरी कायदयाच्या पातळीवर सर्व राष्ट्रे समान असतात. त्याला वास्तववादी सार्वभौम स्वातंत्र्य म्हणतात.

### १.४.१ वास्तववादी सिद्धांनाची मूलभूत तत्त्वे

वास्तववादी सिद्धांताची एकूण सहा मूलभूत तत्त्वे आहेत.

**१) सत्ता, उत्तरजीवित्व, सत्ता समतोलाला केंद्रस्थान-**

वास्तववादी सिद्धांतात सत्ता, सत्तासमतोल, व्यक्ती व राष्ट्राचे उत्तरजीवित्व या संकल्पना केंद्रस्थानी आहेत. वास्तववादी हष्टिकोन सत्तेला साध्य व साधन मानतात. सत्ता व्यक्ती आणि राष्ट्राच्या उत्तरजीवित्वासाठी आवश्यक असते. राष्ट्रांना वाटणाऱ्या असुरक्षिततेतून राष्ट्रे सत्ताप्राप्तीकडे वळतात. त्यासाठी कोणत्याही नैतिक-अनैतिक मार्गांचा वापर केला जातो. सत्तेसाठी चालणाऱ्या या स्पर्धेत संघर्ष अटळ आहे. संघर्ष नियंत्रणासाठी सत्ता संतुलनाचे मार्ग अवलंबले जातात. संघर्षात नैतिक मूल्यांना स्थान नाही.

**२) संघर्षाची अपरिहार्यता –**

सत्ता आणि सुरक्षा हा वास्तववादाचा आधार असून, या संघर्षाचे मूळ व्यक्ति - राष्ट्राला वाटणाऱ्या असुरक्षिततेत आहे. आत्मरक्षणासाठी राष्ट्रे सत्ताप्राप्ती व ती वाढवण्याचा प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय कायदा हा संघर्ष थांबवू शकत नाही.

मुत्सद्देगिरी आणि राजनयाच्या आधारे संघर्षावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे. त्यासाठी मॉर्गेन्थ्यूने तीन उपाय सांगितले आहे -

- सत्ता समतोल, सामूहिक सुरक्षितता, नि:शस्त्रीकरन
- राष्ट्रीय शासनाकडून आंतरराष्ट्रीय शासनाकडे सत्तेचे हस्तांतरण, म्हणजेच विश्व राज्याची निर्मिती
- मुत्सद्देगिरी आणि राजनयाच्या आधारे सत्तेच्या वापरावर मर्यादा.

**३) मानवी स्वभाव –**

मनुष्याच्या चांगुलपणावर वास्तववादयांचा विश्वास नाही. त्यांच्या मते, मनुष्य हा निसर्गत: स्वार्थी प्राणी असून, त्याला वाटणाऱ्या भीती, असुरक्षिततेने त्याला संशयी - अविश्वासी बनवले आहे. इतरांवर प्रभाव पाडून सत्ता गाजविण्याची नैसर्गिक वृत्ती मनुष्यात आहे. मानवाची हीच प्रवृत्ती संघर्षाला जन्म देते.

**४) राष्ट्रीय हितसंबंधांना सर्वोच्च प्राधान्य**

वास्तववादी विचारवंत राष्ट्रीय हितसंबंधांना आंतरराष्ट्रीय राजकारणात सर्वोच्च स्थान देतात. राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण- संवर्धन हे प्रत्येक राष्ट्राचे आद्य कर्तव्य

असून, त्यासाठी परराष्ट्र धोरण व राजनयाचा साधन म्हणून वापर केला जातो. राष्ट्रीय हितसंबंधांसाठी राष्ट्राराष्ट्रांत स्पर्धा असते. राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनासाठी राष्ट्रांनी नैतिक-अनैतिकतेचा विचार करू नये. म्हणूनच राष्ट्रीय हित साध्य करणे हेच देशाच्या परराष्ट्र धोरणाचे सार असले पाहिजे.

**५) राष्ट्रीय हितसंबंधातील बदल –**

राष्ट्रीय हितसंबंध आणि सत्ता ही वास्तववादाची मूळ तत्त्वे असली तरी बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्रीय हितसंबधात बदल आवश्यक ठरतो. राष्ट्रीय हितसंबंध कायमस्वरूपी सदासर्वकाळ असत नाही.

मॉर्गेन्थ्युच्या मते, राजकीय कृती निश्चित करणाऱ्या हितसंबंधांना आकार देण्यासाठी परिस्थितीचा प्रभाव महत्वाचा असतो.

**६) आंतरराष्ट्रीय नीतिमत्तेला महत्व नाही –**

वास्तववादात नीतिमत्ता आणि नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान नाही. राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण हे नैतिक मूल्यांच्या नाही, तर राष्ट्रीय हित संबंधाच्या आधारावर असावे या मताचा वास्तववादी पुरस्कार करतात. त्यांच्या मते, सत्ता हे एक नैतिक मूल्य असून, जेव्हा राष्ट्रे सत्ताप्राप्ती व ती वाढविण्यासाठी प्रयत्न करतात तेव्हा ते नैतिकतेला धरूनच केलेले कार्य असते.

### १.४.२ हॅन्स मॉर्गेन्थ्यूचा वास्तववाद –

२० व्या शतकात वास्तववादी सिद्धांताच्या पुनरुज्जीवनाचे श्रेय हॅन्स मॉर्गेन्थ्यू या अमेरिकन विचारवंताला जाते. ‘Politics Amang Nations’ या ग्रंथात त्याने वास्तववादाविषयी आपले विचार मांडले आहेत.

वास्तववादी सिद्धांताची तीन मूलतत्वे आहे. ती खालीलप्रमाणे

१) राष्ट्रीय हिताचा पाठपुरावा करण्याची राजकारण्यांची महत्वाकांक्षा असते.

२) प्रत्येक राष्ट्राला आपला प्रादेशिक राजकीय - सांस्कृतिक प्रभाव वाढवण्यात रस असतो.

३) आपले राष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक राष्ट्र सत्तेचा उपयोग करते.

मॉर्गेन्थ्यूचा वास्तववाद पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) व्यक्तिनिरपेक्ष नियम-**

मनुष्यस्वभाव हे राजकीय नियमांचे उगमस्थान आहे. या नियमांचे अस्तित्व कायमस्वरूपी असून त्यापासून व्यक्ती - राष्ट्राला मुक्तता नाही. जगात परस्परविरोधी हितसंबंध आहेत आणि त्यात संघर्ष होत असतो. स्वार्थ आणि सत्तेची लालसा हे

व्यक्तीला प्रभावित करणारे घटक राष्ट्रालाही प्रभावित करतात. म्हणूनच राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू सत्तेची लालसा आहे.

**२) राष्ट्रीय हितसंबंध –**

राष्ट्रीय हितसंबंध साधणे हे विश्व राजकारणातील प्रत्येक राष्ट्राचे सर्वोच्च ध्येय असते. त्यादृष्टीने राष्ट्रे आपल्या परराष्ट्र धोरण व राजकारणाची आखणी करतात. राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणजे सत्ता. परिणामी प्रत्येक राष्ट्र सत्तेचा व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार करते.

**३) राष्ट्रीय हितसंबंधाची गतिशीलता –**

राष्ट्रीय हितसंबंधांचे स्वरूप कायम नसते. स्थळ-काळ- परिस्थिती नुसार त्यात बदल होत असतात. एखादे अविकसित राष्ट्र विकसनशील राष्ट्रांच्या गटात सामील होते. किंवा एखादे विकसनशील राष्ट्र आपल्या आर्थिक प्रगतीच्या आधारावर विकसित राष्ट्रांच्या गटात सामील होते. राष्ट्रीय हितसंबंधांच्या परिवर्तनाबरोबरच राष्ट्रांच्या सत्ता स्थानामध्ये बदल होत असतात.

**४) आंतरराष्ट्रीय नैतिकता अवास्तविक –**

आदर्शवादी विचारवंतानी पुरस्कारलेले आंतरराष्ट्रीय नैतिकतेचे तत्व, मूल्ये मार्गेन्थ्यू अवास्तविक मानतो. त्याच्या मते, नैतिक मूल्ये राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा आधार बनू  शकत नाही. व्यक्तीच्या चांगुलपणावर वास्तववाद्यांचा विश्वास नाही. व्यक्तीचा स्वार्थ, भीती, उत्तरजीवित्वाची चिंता, सत्तेचे आकर्षण या व्यक्तीला प्रेरित करणाऱ्या प्रेरणा राष्ट्रालाही प्रभावित करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय हितसंबंधांचा बळी देणे शक्य नाही.

संघर्षानंतर शांतताप्रस्थापनेसाठी मॉर्गेन्थ्यूने तीन उपाय सुचवले आहेत.

१) नि:शस्त्रीकरण, सामूहिक सुरक्षा, आंतरराष्ट्रीय शासन, या मार्गाने सत्तेच्या वापरावर मर्यादा घालणे.

२) राजमर्यादा घालून शांतता निर्मिती

३) सत्तेचे राष्ट्रीय पातळीवरून आंत. पातळीवर हस्तांतरण

**५) वैश्विक नैतिक कायदे राष्ट्रांना लागू नाही**

वास्तववाद्यांच्या मते, वैश्विक नैतिक कायदे राष्ट्रांना लागू पडत नाही. राष्ट्रांची नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यात फरक आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नैतिक नियम, कायदे राष्ट्रीय वर्तनाला नियंत्रित करू शकत नाही. सार्वभौम राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्वायत्त घटक असून, सत्तेच्या आधारे राष्ट्रीय हितसंबंध, जोपासण्याचा प्रयत्न राष्ट्रांकडून होत असतो. राष्ट्राचे हे कृत्य राष्ट्रीय नैतिकतेला धरून आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नैतिकतेचे नियम त्यांच्यावर बंधनकारक नसतात.

**६) राजकीय क्षेत्राची स्वायत्तता –**

वास्तववादी राजकीय क्षेत्राला स्वायत्त क्षेत्र मानतात. राजकीय क्षेत्र हे शक्तीसामर्थ्यावर आधारित आहे. राजकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान नाही. राजकीय क्षेत्रात राष्ट्रीय हितसंबंधांना गृहित धरून निर्णय घेतले जातात.

### १.४.३ मॉर्गेन्थ्यूच्या वास्तववादी सिद्धांतावरील टीका –

१) वास्तववाद्यांच्या मते, सत्ता संघर्ष हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अटळ भाग आहे. परंतु राज्यांचे परस्पर सहकार्य, मैत्री, परस्परावलंबित्व हे महत्त्वाचे पैलू असून, मॉर्गेन्थ्यूने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

२) मॉर्गेन्थ्यूने वास्तववादात सत्तेला अनन्य साधारण महत्व दिले असून, समाजात सहभाग, समूहाचा विचार या प्रेरणाही महत्वाच्या असतात. सत्ता ही एकमेव मानवाची प्रेरणा असू शकत नाही. याकडे हा दृष्टिकोन दुर्लक्ष करतो.

३) स्टॅन्ले हॉफमनच्या मते, सत्तेशिवाय लोकमत, लोकांची अधिमान्यता, शासनाचे स्वरूप, नैतिक मूल्ये, राजकीय नेतृत्वाची प्रवृत्ती इ. घटकांचा मॉर्गेन्थ्यूने विचार केलेला नाही. त्याने वास्तववादी दृष्टिकोनाला सत्तेचा एकात्मवाद (Power monism) असे म्हटले आहे.

४) जरी सत्तेवर आधारित वास्तववादाचे विश्लेषण असले तरी बहुतेक राष्ट्रांना सत्तासंघर्षात स्वारस्य नाही. उदा. भारत, स्वित्झर्लण्डसारखी राष्ट्रे विश्व संघर्षापासून अलिप्त राहू इच्छितात.

५) मॉर्गेन्थ्यू व्यक्तीला स्वार्थी प्राणी म्हणतो. परंतु व्यक्तीत चांगले गुण असू शकतो याकडे तो दुर्लक्ष करतो.

६) मॉर्गेन्थ्यूने १८ व १९ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय संबंधाच्या आधारे आपला विचार मांडला. तुलनेने आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. म्हणूनच सत्तेच्या संदर्भातील राष्ट्रीय हितसंबंधाची कल्पना अस्पष्ट दिसते.

या दृष्टिकोनावर टीका करण्यात आली असली तरी आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारणाच्या अभ्यासात त्याचे महत्व उल्लेखनीय आहे. हॅन्स मॉर्गेन्थ्यूचे नाव या अभ्यासात प्रमुख सैद्धांतिक म्हणून मान्यता पावलेले आहे.

प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे तीन संप्रदायात विभाजन केले जाते.

१) २० व्या शतकाचा प्रारंभ ते १९४० पर्यंत आदर्शवाद्यांचा कालखंड

२) दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेला १९६० पर्यंत अस्तित्वातील वास्तववादी कालखंड

३) आधुनिक कालखंड → व्यवस्थावादी कालखंड.

मॉर्गेन्थ्यूने राजकारणात नैतिकतेचे अवास्तव महत्व सांगणाऱ्या आदर्शवाद्यांना वास्तवतेच्या पातळीवर आणण्याचे महत्वाचे कार्य केले. आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे आकलन व सोडवणूक नैतिक सिद्धांताची शिकवण देऊन होत नाही तर त्यासाठी आंतरराष्ट्रीय घटनाचे योग्य विश्लेषण आवश्यक आहे हे त्याने दाखवून दिले.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी विचार शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडण्याचे श्रेय त्याला जाते.

त्याच्या विचाराच्या आधारे व्यवस्थावादाचा नव्याने उदय झाला. त्याचा विचार आदर्शवाद आणि व्यवस्थावादाला जोडणारा दुवा आहे. म्हणूनच त्याच्या विचाराचे मूल्य आजही महत्वाचे आहे.

## १.५ नववास्तववाद

१९७९ मध्ये सोव्हियत रशियाने अफगणिस्तानवर हल्ला केला व शीतयुद्धाचे पुनरुज्जीवन झाले. त्याच सुमारास नववास्तववादाची मांडणी करणारे केनेथ वाल्डझ् यांचे 'Theory of International politics' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. हा सिद्धांत म्हणजे अभिजात वास्तववादावरील उदारमतवादी आणि वर्तनवादी आक्षेपांची दखल घेऊन केलेली वास्तववादाची मांडणी होती. त्यावर शास्त्रीय पद्धतीचा प्रभाव होता. १९८० च्या दशकात विश्व राजकारणावर नववास्तववादाचा प्रभाव पडला.

वास्तववादानुसार राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय हिताच्या संवर्धनावरून संघर्ष होतो. परंतु वॉल्ट्झ यांच्या मते, संघर्षाचे मूळ कारण म्हणजे सदोष आंतरराष्ट्रीय संरचना होय. वास्तववादानुसार, सत्तासंपादन हे राज्याचे कर्तव्य होय. वॉल्ट्झ यांच्या मते, सत्तेच्या / क्षमतेच्या निकषावर राष्ट्र राज्ये एकमेकांहून भिन्न असतात. सत्ता अथवा क्षमता हे अराजकी आंतरराष्ट्रीय संरचनेतून निर्माण होणाऱ्या असुरक्षेवर मात करण्याचे राष्ट्रांचे साधन असते. संरक्षनेतील असुरक्षेमुळे राष्ट्र-राज्ये आपल्या तौलनिक क्षमतेविषयी संवेदनशील असतात. संरचनेतील आपल्या स्थानाला धक्का लागणार नाही, याविषयी ते जागरुक असतात. नववास्तववादानुसार हेच राज्या-राज्यातील संघर्षाचे प्रमुख कारण आहे.

संघर्ष नियंत्रणाचे मुख्य कार्य सत्तासंतुलनामुळे शक्य होते. प्रतिस्पर्धी राज्याशी सत्तासमतोल राखल्यास आक्रमणाचा धोका कमी होतो, असे अभिजात वास्तववाद मानतो. मॉर्गेन्थ्यूच्या वास्तववादात बहुध्रुवीय सत्तासंतुलन ही आदर्श व्यवस्था असते. नववास्तववाद्यांच्या मते, द्विध्रुवीय सत्तासंतुलन हे अधिक स्थिर व सुरक्षित असते.

थॉमस शेलिंग यांनी सामरिक वास्तववाद मांडला आहे. त्यात लष्करी सामर्थ्याचा राजनयात उपयोग कसा करावा ? यावर ते भर देतात. बळाचा पाशवी वापर आणि दमनशक्तीचा चतुरपणे केलेला वापर यात ते फरक करतात. जे हवे ते बळकावून घेणे आणि दुसऱ्याला ते द्यायला भाग पाडणे यात फरक आहे. बळ वापरले तर यशस्वी होते तर हानी पोहोचवण्याची क्षमता राखून ठेवल्यास यशस्वी होते.

शेलिंग यांच्या मते, या सूक्ष्म फरकाचा राजनयात चतुरपणे वापर करता येतो. प्रत्यक्षात बळाचा वापर करणे हे प्रत्यक्षात कठीण अधिक धोकादायक व कमी उपयुक्त असते. त्याऐवजी दुसऱ्या

राष्ट्रास हानी पोहोचण्याची क्षमता बाळगणे परंतु ती प्रत्यक्षात न वापरता राखून ठेवणे, हे अधिक उपयुक्त ठरते. कारण त्यामुळे शत्रूला वाटाघाटींच्या टेबलावर आणता येते आणि आपल्याला जे हवे आहे ते शत्रूवर न लादल्यासारखे न वाटता करवून घेता येते. अर्थात हानी पोहोचण्याची धमकी वापरताना शत्रूराष्ट्रासमोर त्याला सुसह्य पर्याय असणे आवश्यक आहे. सर्वनाशाची धमकी शत्रूसमोरील शहाणपणाचे सर्व पर्याय बंद करून त्यालाच प्रथम हल्ला करण्यास भाग पाडू शकतो.

थोडक्यात, शेलिंग यांच्या मते, प्रत्यक्ष युद्धापेक्षा युद्धाच्या शक्यतेची भीती अधिक प्रभावी असते. लष्करी सामर्थ्य हे युद्ध करण्याकरिता नव्हे तर राजनय, वाटाघाटीना पाठबळ म्हणून बाळगणे अधिक शहाणपणाचे असते.

## १.६ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा उदारमतवादी दृष्टिकोन-

एक स्वतंत्र विषय म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास होऊ लागला त्याकाळात म्हणजेच पहिल्या महायुद्धानंतरच्या काही वर्षात उदारमतवादाचे प्राबल्य होते. मुख्यतः अमेरिका आणि ब्रिटनमध्ये या विद्याशाखेचा विकास होऊ लागल्याने तेथील उदारमतवादाचा प्रभाव जागतिक राजकारणावर पडलेला जाणवतो. १७ व्या शतकातील ब्रिटिश तत्वज्ञ जॉन लॉकच्या मानवी स्वभाव आणि निसर्गावस्था याविषयीच्या विचारांमध्ये उदारमतवादाची मुळे दडलेली आहेत. १८ व्या शतकाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेल्या जर्मन विचारवंत इम्युनल कांट यांच्या 'Perpetual Peace' या ग्रंथातील विचारांचाही त्यावर प्रभाव आहे.

मनुष्यप्राणी विवेकी असतो, आपल्या व इतरांच्याही भल्याबुऱ्याचा सारासार विचार तो करू शकतो. आपल्याप्रमाणेच इतरांचेही भले व्हावे यासाठी एकमेकांशी सहकार्य करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात असते. यामुळेच त्यांनी विविध सामाजिक संघटना निर्माण केल्या, राज्य व कायदा निर्माण केले आणि परस्परांच्या भल्यासाठी परस्पर सहकार्याने राहता येईल, अशी व्यवस्था निर्माण केली. अशाच तऱ्हेने कायदा आणि संघटना यावर आधारित जागतिक व्यवस्था निर्माण करणे शक्य आहे, हा उदारमतवादी विचारांचा गाभा आहे. उदारमतवादी सिद्धांत राष्ट्र-राज्ये नष्ट करू पाहत नाही, तर केवळ त्यांच्या वर्तनाचे कायद्याने नियमन करू पाहतो, या अर्थाने तो राज्यकेंद्री सिद्धांत आहे.

सुरुवातीच्या काळात मुख्यतः पहिल्या महायुद्धाच्या काळात अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन आणि नॉर्मन एंजेल्स यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाची उदारमतवादी मांडणी केली. व्हर्सायच्या तहाच्या वेळेस विल्सन यांनी शांततेच्या अजेंड्यावरील १४ मुद्दे यादृष्टीने महत्वाचे आहेत. या १४ मुद्द्यांना विल्सन यांची '१४ कलमी योजना' असेही म्हटले जाते. त्यातील काही महत्वाचे मुद्दे म्हणजे -

- गुप्त करार आणि गुप्त राजनयाची पद्धत बंद करणे
- मुक्त व्यापारावरील बंधने उठवणे
- सर्व राष्ट्रांना नौवहनाचे संपूर्ण स्वातंत्र्य देणे.
- सर्व राष्ट्रांनी शस्त्रकपात करून फक्त अंतर्गत सुरक्षेसाठी आवश्यक शस्त्रास्त्रे बाळगणे.

- वसाहतीचे प्रश्न आणि भौगोलिक सीमांचे वाद सोडविण्यासाठी स्वयंनिर्णयाच्या तत्वांचा वापर करणे. इ.

विल्सन यांच्या विचारातील दोन गोष्टींच्या पायावर उदारमतवादाची चौकट सर्वसाधारणपणे उभी आहे-

१) लोकशाहीचा प्रसार

२) सशक्त आंतरराष्ट्रीय संघटनांची गरज

विल्सन यांना लोकशाहीचा प्रसार अत्यंत महत्वाचा वाटतो कारण लोकशाही राष्ट्रे बहुतांशी शांतताप्रिय असतात आणि त्यांच्यात आपसात युद्धे क्वचितच होतात, असा त्यांचा विश्वास होता.

त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय संघटना आणि आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे जागतिक संबंधाचे नियमन करून राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष सोडविता येतात. सत्तासंतुलनापेक्षा संघटना व कायदा ही आंतरराष्ट्रीय सुरक्षेची अधिक विश्वसनीय साधने आहे. विल्सन यांच्या विचारांत 'उदारमतवादी आदर्शवाद' (Liberal Idealism) असेही म्हटले जाते.

२०व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात नॉर्मन एंजल यांचे 'The Great Illusion' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांनी असे म्हटले आहे की, युद्ध हे उपयुक्त असते आणि युद्धामुळे जेत्या राष्ट्रास भरपूर फायदा होतो ही मोठी गैरसमजूत आहे. आधुनिक काळात दुसऱ्या राष्ट्रांचा प्रदेश जिंकून घेण्याची जबर किंमत जेत्या राष्ट्रालाही मोजावी लागते. शिवाय युद्धामुळे आंतराराष्ट्रीय व्यापार उदिमावर विपरित परिणाम होऊन नुकसान होते.

एंजेल यांच्या या विचारांवरून पुढील काळातील उदारमतवाद्यांनी असा विचार मांडला की, राष्ट्राराष्ट्रांच्या वाढत्या आर्थिक व्यापारी परास्परावलंबित्वामुळे युद्धाची उपयुक्तता आपोआप कमी होत जाईल आणि आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे व संघटनांचे महत्व वाढेल.

या उदारमतवादी विचारातून १९२० च्या दशकातील सुधारणेचा आदर्शवादी कार्यक्रम तयार झाला. राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. राष्ट्रसंघाच्या माध्यमातून सामूहिक सुरक्षेच्या तत्वाचा पुरस्कार करण्यात आला. १९२१ मध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली. १९२८ च्या केलॉग- ब्रिआंद कराराने युद्ध बेकायदेशीर ठरविण्यात आले. स्वयंनिर्णयाच्या तत्वाच्या आधारे ऑटोमन, जर्मन, रशियन आणि ऑस्ट्रो- हंगेरियन साम्राज्यांतील प्रदेशांची पुनर्रचना करण्यात आली आणि नवीन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्यात आली. या राष्ट्रांमध्ये लोकशाही व्यवस्था राबविण्यात आली. १९३० च्या दशकातील घटनांमुळे हा अजेंडा मागे पडत गेला आणि हळूहळू युरोप पुन्हा शस्त्रस्पर्धा आणि सत्तासंतुलनाकडे वळला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंतप्रधान नेहरूंनी मुख्यत: उदारमतवादी तत्वांच्या आधारे भारतीय परराष्ट्र धोरणाची उभारणी केली. गटनिरपेक्ष घोरणांचा अवलंब असो की, आंतरराष्ट्रीय संघटनांना दिलेले महत्व असो, त्यामागे नेहरूंचा उदारमतवादी विचार होता.

**नवउदारमतवाद (New Liberalism):**

साठ आणि सत्तरच्या दशकात विशेषतः पाश्चात्य जगातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडींमुळे पुन्हा एकदा उदारमतवादी विश्लेषणास चालना मिळाली. उदारमतवादाच्या ज्या वेगवेगळ्या शाखा या काळात विकसित झाल्या, त्या सर्वांना एकत्रितयपणे नव-उदारमतवाद असे म्हटले जाते. या सिद्धांताचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते आदर्शवादी नव्हते. तसेच त्यांच्या अभ्यासपद्धतीवर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभाव पडलेला होता.

या काळातील पश्चिम युरोपातील क्षेत्रीय सहकार्याचा आणि आर्थिक एकात्मीकरणाचा कार्ल डॉईश आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैज्ञानिक अभ्यास केला. डॉईश यांनी असा विचार मांडला की, स्वतंत्र राष्ट्रांदरम्यान सातत्याने चालणाऱ्या विशेषतः आर्थिक-व्यापारी देवाण-घेवाणीमुळे त्या राष्ट्रांतील नागरिकांमध्ये सामायिक ओळख (Identity) आणि सामायिक मूल्यव्यवस्था विकसित होण्यास मदत होते. यामुळे शांतता आणि सहकार्य वाढीस लागते.

सर्वसाधारणपणे नव-उदारमतवादी सिद्धांताचा अभ्यास करताना खालील तीन सिद्धांताचा अभ्यास करावा लागतो-

१) उदारमतवादी परस्परावलंबित्वाचा सिद्धांत (रॉबर्ट कोहेन व जोजफ नाय)

२) नवउदारमतावादी संस्थावाद (ओरान यंग)


३) लोकशाहीजन्य शांततेचा सिद्धांत (मायकल डॉयल)

**१) उदारमतवादी परास्परावलंबित्वाचा सिद्धांत –**

रॉबर्ट कोहेन आणि जोजफ नाय यांच्या मतानुसार, पाश्चिमात्य जगातील देशांमध्ये गुंतागुंतीचे परस्परावलंबित्व निर्माण झाले आहे. परस्परावलंबित्व हे दोन देशांच्या शासनातील संबंधापुरतेच मर्यादित नसून, जनतेच्या पातळीवरील सामाजिक संबंध, उदयोगधंदयांचे सीमापार अस्तित्व आणि त्याअनुषंगाने येणारे संबंध असा त्याचा विस्तार झाला आहे. लष्करी सामर्थ्य हे परराष्ट्रधोरणाचे प्रमुख साधन राहिलेले नाही. यामुळे पाश्चिमात्य देशांदरम्यान संघर्षाची आणि युद्धाची शक्यता अगदीच नगण्य झाली आहे.

**२) नव-उदारमतवादी संस्थावाद (Neo-liberal institutionalism)**

विचारवंत ओरान यंग यांनी आंतरराष्ट्रीय संस्थांचे महत्व विशद केले. संस्था दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना (International organisations) आणि दुसरे म्हणजे आंतरराष्ट्रीय नियमव्यवस्था (International Regims).



संस्थांच्या वाढत्या जाळ्यांमुळे राजकीय आणि सामरिक नव्हे तर आर्थिक-सामाजिक विषयांवरील आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढले आहे. या सिद्धांताला नव-उदारमतवादी संस्थावाद असे म्हटले जाते.

**३) लोकशाहीजन्य शांततेचा सिद्धांत –**

मायकल डॉयल यांनी लोकशाहीजन्य शांततेची (Democratic peace) कल्पना मांडली. राष्ट्राराष्ट्रातील विवादांची शांततामय मार्गाने सोडवणूक, सामायिक मूल्यव्यवस्था आणि आर्थिक सहकार्य या तीन गोष्टींमुळे लोकशाही देशांदरम्यान युद्धे कमी होतात आणि शांतता नांदते, असे त्यांनी म्हटले आहे. या सिद्धांताच्या समर्थकांच्या म्हणण्यानुसार, जगात लोकशाहीचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशी युद्धाची शक्यता कमी होऊन शांततेचे क्षेत्र विस्तारत जाईल. शीतयुद्ध संपल्यानंतरच्या काळात नवउदारमतवादाचा प्रभाव पुन्हा एकदा वाढल्याचे दिसते. विशेषत: नवउदारमतवादी संस्थावाद आणि लोकशाहीजन्य शांततेचा सिद्धांत अभ्यासकांमध्ये अधिक लोकप्रिय बनले आहे.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही सार्वभौम राष्ट्र-राज्यांचीच व्यवस्था असली तरी त्यात संघर्ष अटळ नसून, राष्ट्र राज्यांचे एकमेकांशी सहकार्य शक्य असते, हे उदारमतवादाचे प्रमुख गृहितक आहे. ज्याप्रमाणे व्यक्ती विवेकाने विचार करून व्यवस्था आणि सुरक्षा प्रस्थापित करू शकते, त्याचप्रमाणे राष्ट्र-राज्येही व्यवस्था आणि सुरक्षा प्रस्थापित करू शकतात, असे उदारमतवाद मानतो. अभिजात उदारमतवादामध्ये सामूहिक सुरक्षेची कल्पना हे सुरक्षेचे प्रमुख साधन मानले आहे. नव-उदारमतवादी परास्परावलंबित्वाचा सिद्धांत आर्थिक तसेच इतर पातळ्यांवरील परास्परावलंबित्व जसे वाढते तशी परस्पर सहकार्याची प्रवृत्ती वाढते, असे मानतो. नव-उदारमतवादी संस्थावादामध्ये विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्य वाढते, असे मानले आहे तर लोकशाहीजन्य शांततेच्या सिद्धांतात लोकशाहीचा प्रचार-प्रसार हेच सुरक्षेचे आणि सहकार्य करण्याचे साधन मानले आहे.

## १.७ सत्ता

सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्रातील प्रमुख संकल्पना आहे. सत्ता हाच सर्व राजकीय घडामोडींचा केंद्रबिंदू आहे. राष्ट्रीय राजकारणापासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत सत्ता या संकल्पनेला महत्वाचे स्थान आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वास्तववादी दृष्टिकोनाचा केंद्रबिंदू सत्ता आहे. तसेच राष्ट्रीय सुरक्षा आणि हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणून सत्तेकडे पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राचा दर्जा हा त्या राष्ट्राच्या सामर्थ्यावर, सत्तेवर अवलंबून असतो. परिणामी प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता, सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्रा - राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरू असते. त्यावरच राष्ट्राचे अस्तित्त्व, राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण, राष्ट्रीय हितसंबंध अवलंबून असतात.

हॅन्स मॉर्गेन्थ्यूच्या मते, सत्तेसाठी चाललेला संघर्ष हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील निरपवाद आणि सर्वकालीन सत्य असून, राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण आणि राजनयाचे अंतिम उद्दिष्ट राष्ट्रीय सामर्थ्याच्या आधारावर आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करण्याचा असतो.

### १.७.१ सत्तेचा अर्थ आणि स्वरूप –

सत्ता ही एक गुंतागुंतीची संकल्पना असून, अनेक अभ्यासकांनी सत्तेच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्वसाधारणपणे सत्ता म्हणजे एकाची दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता होय. एखादी व्यक्ती, समूह, राज्य जी गोष्ट एरव्ही करणार नाही ती गोष्ट त्यास करायला लावण्याची दुसऱ्या व्यक्ती, समूह, राज्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.

सत्तेच्या व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) जॉर्ज श्वेन बर्जर –**

"आपली इच्छा दुसऱ्यावर थोपवण्यासाठी आणि इतरांनी विरोध केला तर तो विरोध मोडून काढून आपली इच्छा लादण्याची परिणामकारक शक्ती म्हणजे सत्ता होय."

**२) हॅन्स मॉर्गेन्थ्यू –**

"सत्ता म्हणजे एखाद्या व्यक्तीचे असलेले प्रभूत्व"

**३) रॉबर्ट ढाल –**

"सत्ता म्हणजे एखाद्यावर प्रभाव पाडून त्याच्याकडून काम करवून घेण्याची क्षमता असणे."

**४) ड्युचेक –**

"मला अपेक्षित अशी इतरांना वागण्यास लावण्यासाठी वापरलेली क्षमता म्हणजेच सत्ता"

सत्तेच्या वरील व्याख्यांवरून सत्तेची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील.

- सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू असून, आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्नशील असते. सामर्थ्यवान राष्ट्रे आपल्या सामर्थ्याच्या जोरावर दुर्बल कमकुवत राष्ट्रांवर दबाव टाकून आपली इच्छा लादण्याचा प्रयत्न करतात.
- प्रत्येक संस्था, संघटना, राष्ट्र इ. मध्ये तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ताप्राप्तीसाठी संघर्ष सुरू असतो. सत्ता साधन आणि साध्य म्हणूनही कार्य करते.
- राष्ट्राचे हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणजे सत्ता होय.

- सत्ता ही सापेक्ष आणि परिवर्तनीय संकल्पना आहे. स्थळ-काळ परिस्थितीनुसार सत्तेत बदल होत असतात.
- राष्ट्राच्या सत्तेतून राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रावर प्रभाव पडण्याची क्षमता व्यक्त होते त्यावरून त्या राष्ट्राच्या सामर्थ्याचा अंदाज लावता येतो.
- सत्ता अनेक परस्परावलंबी, परिवर्तनीय अशा घटकांवर अवलंबून असते, त्यामुळे सत्तेचे मोजमाप करणे अवघड आहे. सत्तेच्या काही घटकांचे परिणामीकरण उदा. देशात उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्ती, आर्थिक प्रगती, लष्करी सामर्थ्य इ. करता येते, तर काही घटकांचे परिमाणीकरण करता येत नाही उदा. राजकीय नेतृत्व, नोकरशाही, शासन प्रणाली इ.

### १.७.२ राष्ट्रीय सत्तेचे घटक –

सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा आणि प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण निर्मितीचा महत्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सर्वच राजकीय विचारवंतांनी सत्ता या घटकाला आपल्या विचारांमध्ये आणि साहित्यात केंद्रस्थान दिले आहे सत्ता या घटकाचा प्रभाव व्यक्ती, व्यक्तीसमूह, त्यांच्याशी निगडित राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच घटकांवर पडत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारण हे तर पूर्णपणे सत्तेभोवतीच फिरताना दिसते.

सत्तेचा अर्थ आणि स्वरुपाचा अभ्यास केल्यानंतर सत्तेच्या प्रमुख घटकांची माहिती आपण घेणार आहोत. सर्वसाधारणपणे एखाद्या राज्याची सत्ता म्हणजेच त्याचे लष्करी सामर्थ्य, असे समजले जाते. परंतु लष्करी सामर्थ्य हा सत्तेचा एक महत्वाचा घटक आहे. राज्याच्या सत्तेच्या घटकांची स्थायी / परिमाणीकरण करता येणारे घटक आणि अस्थायी / परिमाणीकरण करता न येणारे घटक अशा दोन घटकांत विभागणी केली जाते. हे दोन्ही गटातील घटक परस्परावलंबी आणि परिवर्तनीय आहेत. राष्ट्राचे भौगोलिक स्थान, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, तंत्रज्ञान, आर्थिक विकास, लष्करी सामर्थ्य हे स्थायी / परिमाणीकरण करता येणारे घटक आहे तर, राजकीय नेतृत्व, नोकरशाही, शासन प्रणाली, जनतेचे मनोबल हे अस्थायी / परिमाणीकरण करता न येणारे घटक आहेत.

### १) राष्ट्राचे भौगोलिक स्थान –

राष्ट्राचे सामर्थ्य त्याच्या भौगोलिक स्थानावर अवलंबून असते. राष्ट्राचे भौगोलिक स्थान, विस्तार, हवामान, क्षेत्रफळ, सीमारेषा यांचा आणि त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थान, राष्ट्रीय सामर्थ्य यांचा घनिष्ठ संबंध आहे.

राष्ट्रांचा भौगोलिक आकार, क्षेत्रफळ, विस्तार जितका मोठा तितके त्याचे सामर्थ्य अधिक समजले जाते. भारत आणि चीन या उभरत्या महासत्तांच्या बाबतीत हे तत्त्व पूर्णत: लागू पडते. या राष्ट्रांनी आपला सलग भूभाग, विशाल आणि खंडप्राय भूमीचा उपयोग आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्यासाठी केला आहे. राष्ट्राच्या भौगोलिक स्थानावरच राष्ट्राचे परराष्ट्र धोरण, राजनय, युद्धनीती या गोष्टी अवलंबून असतात.

एखाद्या राष्ट्राचे स्थान शत्रूराष्ट्रांदरम्यान असेल तर, त्या राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण ठरविताना काळजी घ्यावी लागते.

उदा. भारत. भारताचे स्थान पाकिस्तान आणि चीन या दोन शत्रूराष्ट्रांदरम्यान असल्याने भारताला आपले परराष्ट्र धोरण विचारपूर्वक आखावे लागते.

भौगोलिक स्थानाबरोबरच देशातील हवामान, खनिज संपत्ती या घटकांचाही राष्ट्राच्या सामर्थ्यावर परिणाम होत असतो. प्रतिकूल हवामानाचा राष्ट्रीय सामर्थ्यावर नकारात्मक परिणाम होतो, मध्यम हवामान असलेल्या राष्ट्रांचा विकास जलद गतीने झाला आहे.

सीमारेषा आणि सत्तेचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रांच्या सीमारेषांची आखणी व्यवास्थित केलेली असेल तर शेजारील राष्ट्रांबरोबर शांतता प्रस्थापित करण्यास मदत होते. परिणामी संरक्षणात्मक खर्च वाचतो. परंतु सीमारेखांवरून राष्ट्रांमध्ये संघर्ष असेल तर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते.

उदा. भारत-चीन सीमावाद

## २) लोकसंख्या

राष्ट्राची लोकसंख्या किंवा मनुष्यबळ हे राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. राष्ट्र उपलब्ध मानवी साधन संपत्तीचा उपयोग राष्ट्रविकासासाठी योग्य रीतीने करीत असेल तर जास्त लोकसंख्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने वरदान ठरते. परंतु अतिरिक्त लोकसंख्येमुळे राष्ट्रांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात.

राष्ट्राच्या लोकसंख्येइतकीच मनुष्य बळाची गुणवत्ता ही महत्वाची ठरते. लोकसंख्या आणि आर्थिक विकास यांचाही जवळचा संबंध आहे. उच्च गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ असलेल्या राष्ट्रांचा विकास लवकर घडून येतो.

उदा. जपानची लोकसंख्या भारत आणि चीनपेक्षा कितीतरी कमी आहे परंतु आज जपान हे जगातील एक श्रीमंत राष्ट्र म्हणून ओळखले जाते. जपानी माणूस हा कार्यक्षम, कष्टाळू म्हणून ओळखला जातो. परिणामी दुसऱ्या विश्वयुद्धातील प्रचंड संहारानंतरही जपानने आपला आर्थिक विकास साधला.

## ३) नैसर्गिक साधनसंपत्ती -

नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिजसंपत्ती हेही सत्तेचे प्रमुख घटक आहे. राष्ट्रात नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील राष्ट्र मोठी औद्योगिक व आर्थिक प्रगती साधू शकते. परंतु नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यासाठी राष्ट्राकडे आवश्यक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ, भांडवलाची आवश्यकता असते.

उदा. पश्चिम आशियामध्ये तेलासारख्या खनिजाच्या उपलब्धतेवर आखाती राष्ट्रे जगावर आपले वर्चस्व गाजवतात. परंतु या तेलखाणीतून खनिजतेल खणून वर काढण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान त्यांना पाश्चात्य राष्ट्रांकडून मिळवावे लागते. तंत्रज्ञान

आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची सांगड घातल्यानंतर तेल उत्पादन व निर्यात वाढली. त्याच्या आधारावर ही राष्ट्रे आज श्रीमंत व प्रभावशाली बनली आहेत.

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर आशियाई - आफ्रिका खंडातील राष्ट्रांनी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जोरावर आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

**४) आर्थिक विकास**

राष्ट्राची सत्ता आर्थिक विकासावरही अवलंबून असते. आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेले जपान, जर्मनी, अमेरिका सारखी प्रबळ राष्ट्रे आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर जगावर प्रभूत्व गाजविण्याचा प्रयत्न करतात. विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांना मदत करून आपल्या प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न करतात.

उदा. युरोपातील साम्राज्यवादापासून रोखण्यासाठी सोवियत रशियाने भारताला प्रचंड आर्थिक व तांत्रिक मदत केली.

**५) लष्करी सामर्थ्य -**

लष्करी सामर्थ्य हा राज्याच्या सत्तेचा प्रमुख घटक आहे. लष्करी सामर्थ्यत सैन्यातील लढाऊ सैनिकांची संख्या, शस्त्रांस्त्रांची संख्या आणि गुणवत्ता, अत्याधुनिक संरक्षणात्मक तंत्रज्ञान या घटकांचा समावेश होतो.

उदा. पहिल्या आणि दुसऱ्या विश्वयुद्धात आधुनिक शस्त्रास्त्रे आणि संरक्षण पद्धतीचा वापर करणारी, इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया सारखी राष्ट्रे विजयी झाले. १९४५ मध्ये जपानवर अमेरिकेने टाकलेल्या दोन अणुबॉम्ब नंतर जपानने तात्काळ शरणागती पत्करली.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका - सोवियत राशिया या महासत्तांनी शीतयुद्धात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्रे, बॉम्ब, लढाऊ विमाने, युद्धनौका, पाणबुड्या इ. ची साधनांची निर्मिती करून एकमेकांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला.

**६) जनतेचे मनोबल**

देशातील जनतेचे मनोबल हा राष्ट्रीय सत्तेच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. राष्ट्रीय मनोबल म्हणजे राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे नितांत प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थत्याग करण्याची, राष्ट्रासाठी कष्ट घेण्याची तयारी होय.

जनतेचे मनोबल ही एक अशी कार्यशक्ती आहे, जी नागरिकांना राष्ट्रीय प्रगती, उन्नतीसाठी कार्य करण्यास प्रवृत्त करते. संकटकालीन परिस्थितीमध्ये संघटित शक्ती बनून राज्याच्या पाठीशी उभी राहते. धर्म, जात, भाषा, प्रदेश इ.ची बंधने बाजूला सारून जनता राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवते.

दुसऱ्या महायुद्धात आर्थिक झळ सहन केलेल्या जपानने नागरिकांचा स्वार्थत्याग, परिश्रमातून आर्थिक प्रगती घडवून आणली.

### ७) राष्ट्रीय चरित्र –

वास्तववादी सिद्धांताचे पुरस्कर्ते राष्ट्रीय चरित्र्याला सत्तेचा महत्वाचा घटक मानतात. राष्ट्रीय चारित्र्य आणि राष्ट्रीय मनोबल या दोन्ही घटकांचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रीय चारित्र्य जनतेच्या मनोबलाचा महत्वाचा घटक आहे. मनोबल हे राष्ट्रीय चारित्र्यावर अवलंबून असते.

राष्ट्रीय चारित्र्याच्या आधारे विशिष्ट राष्ट्रामधील जनतेसंबंधी विशेषणे वापरतो. उदा जर्मन माणूस म्हणजे कणखर, शिस्तप्रिय, कार्यकुशल तर रशियन माणूस चिवट असतो.

राष्ट्रीय चरित्र्य हा घटक परिवर्तनीय आहे. विशिष्ट परिस्थिती मध्ये जनतेच्या प्रतिसादाचा राष्ट्रीय चारित्र्यात समावेश होतो. परिस्थिती बदलली की, प्रतिसादात बदल होऊ शकतो.

### ८) राजकीय नेतृत्व -

राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्यात देशाचे राजकीय नेतृत्व महत्वाची भूमिका बजावतो. राष्ट्राची प्रगती, प्रगतीला योग्य दिशा देण्याचे कार्य राष्ट्रीय नेतृत्व करीत असते. युद्धकालीन परिस्थितीत सूज्ञ, विचारी, कणखर, प्रभावी निर्णयक्षमता असलेले नेतृत्व राष्ट्राला विजय मिळवून देते. तसेच शांततेच्या काळात देशातील नैसर्गिक - मानवी साधनसंपत्तीचा विकासात्मक कार्यासाठी उपयोग करून घेण्यात राजकीय नेतृत्वाचा कार्यभाग महत्वाचा असतो.

उदा. तुर्कस्तानमधील मुस्तफा केमालपाशा, भारताच्या पंडित नेहरूंचे नेतृत्व, इजिप्तमधील कर्नल नासेरचे नेतृत्व इ. नेतृत्व कणखर, सकारात्मक होते. परंतु युरोपमध्ये पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी-इटलीत उदयाला आलेल्या हिटलर- व मुसोलिनीच्या आक्रमक नेतृत्वाने दोन्ही राष्ट्रांना युद्धाच्या खाईत लोटले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लंडमधील विस्टन चर्चिल, अमेरिकेचे रुझवेल्ट आणि सोवियत रशियाच्या स्टॅलिनच्या कणखर नेतृत्वाने दोस्त राष्ट्रांना विजय मिळवून दिला.

राजकीय नेतृत्वाकडून जनतेचे मनोबल वाढविण्याचे, त्यात सातत्य ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. त्यासाठी विचारधारा, प्रचारतंत्रे, प्रतिके इ. चा वापर केला जातो.

उदा. नाझी जर्मनीतील हिटलरचे नेतृत्व.

दिव्यवलयांकित नेतृत्वात जनतेत चैतन्य निर्माण करण्याची अलौकिक शक्ती असते. अशा नेतृत्वामुळे लोकांना प्रेरणा मिळून ते प्रभावित होतात.

उदा. महात्मा गांधींचे नेतृत्व.


## ९) नोकरशाही –

राज्यकर्त्याबरोबरच देशातील प्रशासकीय नेतृत्वही राष्ट्राचे सामर्थ्य वाढवण्यास कारणीभूत ठरते. नोकरशाहीच्या गुणवत्तेवर देशाचे सामर्थ्य अवलंबून असते. अचूक माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण, कार्यक्षमता यातून नोकरशाही राजकीय नेतृत्वाला पूरक कार्य करते.

राष्ट्राची सत्ता ही वरील घटकांवर अवलंबून असते. यातील कोणत्याही एका घटकांच्या परिस्थितीत बदल झाला की, देशाच्या सामर्थ्यावरही त्याचा कमी-अधिक प्रमाणात परिणाम होत असतो.

### १.७.३ सत्तेचे प्रकार

सत्तेचे खालील प्रकार पडतात.




## १. भौतिक सत्ता

भौतिक सत्ता ही राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यावर आधारित असते. लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान राष्ट्रांचा इतर राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याची क्षमता तुलनेने जास्त असते.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोवियत रशिया या दोन महासत्तांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला प्रभाव वाढवण्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर केला. लष्करी सामर्थ्य वाढवण्यातून शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली आणि त्यामुळे हजारो अण्वस्त्रांची निर्मिती करण्यात आली.

आजही विश्वातील अमेरिका, चीन, भारत, इस्त्राईल, पाकिस्तान यासारखी राष्ट्रे आपले भौतिक सामर्थ्य वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. असे असले तरी शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर भौतिक सामर्थ्यापेक्षा आर्थिक सामर्थ्य वाढविण्यावर राष्ट्र भर देत असल्याने सत्तेचा हा प्रकार मागे पडला आहे.

## २) मानसशास्त्रीय सत्ता

परराष्ट्रीय धोरणासाठी, महत्वाच्या आंतरराष्ट्रीय निर्णयासाठी राज्यकर्ते जनतेची अधिमान्यता मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशी अधिमान्यता मिळविण्यासाठी मानसशास्त्रीय सत्तेचा वापर केला जातो. त्यासाठी विविध प्रचारतंत्रांचा आधार घेतला जातो. प्रामुख्याने मानसशास्त्रीय सामर्थ्याचा वापर राष्ट्रांतर्गत आणि देशाबाहेरील जनमताला प्रभावित करण्यासाठी केला जातो.

देशाच्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करून जनतेमध्ये राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम जागृत केले जाते, हाही मानसशास्त्रीय सत्तेचाच वापर आहे.

जनतेत मानसशास्त्रीय सत्तेचा प्रभाव पाडण्यात प्रसारमाध्यमे महत्वाची भूमिका बजावतात.

उदा. अमेरिकेच्या धोरणांना अनुकूल जागतिक लोकमत बनावे म्हणून सीएनएन ही दूरचित्रवाहिनी, रेडिओ अमेरिका ही आकाशवाणी सतत प्रयत्नशील असतात.

**३) आर्थिक सत्ता-**

एखादे श्रीमंत, विकसित राष्ट्र आपल्या आर्थिक विकासाच्या बळावर इतर गरीब, विकसनशील राष्ट्रांवर प्रभाव पाडून आपली सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्याला आर्थिक सत्ता असे म्हणतात. कर्ज, आर्थिक मदत, आयात-निर्यात करांमध्ये सवलत, परकीय विकासनिधी ही सत्तेची प्रमुख साधने आहेत.

उदा. अमेरिकेसारखे श्रीमंत राष्ट्र आपल्या इच्छा विकसनशील, अविकसित राष्ट्रांवर लादण्याचा प्रयत्न करीत असते.

शीतयुद्धाच्या काळात राष्ट्रांच्या भौतिक सत्तेला महत्व होते. शीतयुद्धाच्या अंतानंतर भौतिक सत्तेची जागा आर्थिक सत्तेने घेतली आहे. त्यातून प्रादेशिक पातळीवर विविध व्यापार संघ निर्माण झाले आहे.

उदा. युरोपियन युनियन, आसियान. इ.

जपानसारखे लहान राष्ट्र आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर आंतरराष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव पाडत आहे. १९९७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्य पदासाठी झालेल्या निवडणुकीत जपानने भारताचा आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर पराभव केला.

### १.७.४ सत्तेची साधने किंवा सत्ता वापरण्याच्या पद्धती

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रे आपल्या सत्तेच्या जोरावर परस्परांवर प्रभाव पाडण्याचा, त्याद्वारे आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी विविध साधनांचा वापर केला जातो. सत्तेची साधने खालीलप्रमाणे –

**१) मन वळवणे / मताचा आग्रह किंवा पाठपुरावा**

सत्तेद्वारे प्रभाव पाडण्याचे हे महत्वाचे साधन असून त्याचा वापर दुसऱ्या राष्ट्राचे मन वळवून, आपल्या मताचा आग्रह धरून त्याच्या धोरणात अपेक्षित बदल घडवून आणता येतो. या साधनाचा वापर विविध विभागीय - आंतरराष्ट्रीय संघटनांच्या व्यासपीठावरील चर्चेच्या प्रसंगी केला जातो. यातून राष्ट्रांची सौदेबाजीची क्षमता व्यक्त होते.

उदा. काश्मीर प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तानने नेहमीच आपली बाजू योग्य कशी आहे हे UNO च्या व्यासपीठावरून आंतरराष्ट्रीय समुदायाला पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

शीतयुद्धाच्या काळात नवस्वतंत्र आशियाई-आफ्रिकी -राष्ट्रांच्या मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी नाम संघटनेने महत्वाची भूमिका पार पाडली.

**२) बक्षीस देणे-**

बक्षीस हे सत्तेचे दुसरे महत्वाचे साधन आहे. राष्ट्रांना आर्थिक मदत, कर्ज, निधी, लष्करी - संरक्षणात्मक मदत, राजकीय समर्थन अशा स्वरूपात दिले जाते. बक्षिसे देऊन राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याचा प्रयोग आंतरराष्ट्रीय राजकारणात पूर्वीपासून केला जातो.

बक्षीसाचे तीन प्रकार आहेत ते म्हणजे आर्थिक - राजकीय- लष्करी / संरक्षणात्मक

- आर्थिक प्रकार- यामध्ये राष्ट्रांना कर्ज, निधी आर्थिक मदत केली जाते.
- लष्करी प्रकार - सामर्थ्यवान राष्ट्र इतर राष्ट्रांना शस्त्रास्त्र – पुरवणे, शस्त्रास्त्र खरेदीसाठी मदत, शस्त्रास्त्र निर्मितीचे तंत्रज्ञान पुरवते
- राजकीय प्रकार- यात राजकीय मुद्दयांवर पाठिंबा दिला जातो. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका – सोवियत रशिया या महासत्तांनी राष्ट्रांना अशा प्रकारची मदत देऊन आपल्या गटात ओढण्याचा प्रयत्न केला होता.
- काश्मीर प्रश्नावरून अमेरिकेने पाकिस्तानला तर सोवियत रशियाने भारताला पाठींबा दिला.

**३) शिक्षा देणे-**

अनेकदा शिक्षा देऊन किंवा शिक्षेची भीती दाखवून सामर्थ्यवान राष्ट्र दुर्बल राष्ट्रांवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करते. अशी शिक्षा बक्षिसे नाकारून, आर्थिक बंधने लादून, आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडून, लष्करी करार अमान्य करून दिली जाते.

उदा. भारताने जेव्हा १९७४ व १९९८ मध्ये पोखरण अणुचाचण्या केल्या तेव्हा भारतावर अमेरिकेने आर्थिक निर्बंध लादले.

१९९१ मध्ये इराकने कुवैतवर आक्रमण केल्याबद्दल इराकला यूनोने आर्थिक नाकेबंदीची शिक्षा दिली.

**४) सक्ती किंवा प्रत्यक्ष बळाचा अथवा दमनाचा वापर-**

सक्ती किंवा प्रत्यक्ष बाळाचा वापर ही शिक्षेची पुढची पायरी असून तिचा वापर शेवटचा पर्याय म्हणून केला जातो. यामध्ये युद्ध किंवा लष्करी कारवाई या साधनांचा वापर केला जातो. बळाचा वापर प्रत्यक्षात केला नाही तरी तसे करण्याची धमकी देण्याचे तंत्र वापरले जाते.

उदा. २००१ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तानवर केलेली लष्करी कारवाई, २००३ मध्ये अमेरिकेने इराकमधील सद्दाम हुसेनची राजवट बरखास्त करण्यासाठी सक्तीचा वापर केला.

### १.७.५. सत्तेचा वापर किंवा उपयोग

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचा वापर राष्ट्रे विविध उद्दिष्टांसाठी करीत असतात.

**१) राष्ट्रीय सुरक्षा -**

राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे प्रत्येक राष्ट्राचे आद्य कर्तव्य मानले जाते. राष्ट्राची राष्ट्रीय सुरक्षा, हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते. त्यामुळे आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्यासाठी राष्ट्रे जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. त्यासाठी अण्वस्त्रे निर्मिती, लष्करी सामर्थ्यात वाढ, असे उपाय राष्ट्रांकडून योजिले जातात.

**२) प्रस्थापित व्यवस्थेचे संरक्षण**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रस्थापित सत्ता विभागणीची, सत्ता समतोलाची व्यवस्था टिकवणे आवश्यक असते. या व्यवस्थेच्या रक्षणासाठी सत्तेचा वापर केला जातो.

उदा. युरोपात वॉटर लूच्या युद्धात नेपोलियन बोनापार्टाच्या पाडावानंतर १८१५ मध्ये युरोपियन राष्ट्रांची व्हिएन्ना परिषद झाली. यावेळी झालेल्या करारातून निर्माण झालेल्या सत्ता समतोलाची व्यवस्थेच्या रक्षणासाठी इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांनी प्रयत्न केले.

पश्चिम आशियातील विभागीय सत्तासमतोल टिकविण्यासाठी २००३ मध्ये अमेरिकेने इराकवर लष्करी कारवाई करून सद्दाम हुसेनची हुकुमशाही नष्ट केली.

**३) प्रस्थापित व्यवस्थेत बदल घडवून आणणे-**

काही राष्ट्रे सत्तेचा वापर प्रस्थापित राजकीय व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी करतात. दोन परस्परविरोधी उद्दिष्टे असणाऱ्या राष्ट्रांच्या गटांतील संघर्षातून जगात युद्धे घडून येतात.

उदा. भारत-चीन या दोन राष्ट्रात गेल्या अनेक वर्षापासून सीमावाद सुरु आहे. भारताच्या अरुणाचल प्रदेश, सिक्कीम या दोन राज्यांवर चीन आपला हक्क सांगत आहे कारण चीनला प्रस्थापित व्यवस्थेत बदल हवा आहे. त्यासाठी चीनने लष्करी सामर्थ्याचा अवलंब करून भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. यातुनच १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले.

**४) आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा –**

अनेकदा राष्ट्रांकडून सत्तेचा वापर जागतिक राजकारणात आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी एक साधन म्हणून केला जातो. राष्ट्रे आपल्या आर्थिक- लष्करी सत्तेचे प्रदर्शन करून इतरांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर अण्वस्त्र संपन्नता प्राप्त करणे हे आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठेचे मानले जात.

२६ जानेवारीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळविण्याच्या दृष्टीने भारताकडून नवी दिल्ली येथे पार पडणाऱ्या संचलनात लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन केले जाते. मित्र आणि शेजारील राष्ट्रामध्ये आदर, शत्रू राष्ट्रांमध्ये भीती निर्माण व्हावी, हा या प्रदर्शनामागील उद्देश असतो. अशा प्रकारे सत्तेचा वापर विविध उदिष्टांसाठी केला जातो.

## १.८ राष्ट्रीय हित (National Interest)

आंतरराष्ट्रीय राजकारणात शत्रू किंवा मित्र कायम नसतात, परंतु राष्ट्रीय हित किंवा हितसंबंध कायम असतात. पूर्वीपासून हे तत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा मुख्य आधार आहे. कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा आणि राजनयाचा प्रमुख उद्देश राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे हा असतो.

राष्ट्रीय हितसंबंध ही व्यापक संकल्पना असून, प्रत्येक राष्ट्राची राष्ट्रीय हितसंबंधाची कल्पना वेगळी असू शकते ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर अवलंबून असू शकते. परिस्थिती बदलली की राष्ट्रीय हितसंबंध बदलतात.

हॅन्स मॉर्गेन्थ्यूने राष्ट्रीय हितासाठी वेगवेगळे शब्द वापरले आहे. जसे, सामूहिक हित, समान हित, प्राथमिक हित, दुय्यम हित, अल्पकालीन-दीर्घकालीन हित. राष्ट्रीय हित कोण ठरवते? यावरही त्याचा अर्थ-स्वरूप अवलंबून असते. निर्णय घेणाऱ्याचा / शासकाचा स्वभाव आणि शासनाचे स्वरूप यांचाही राष्ट्रीय हितसंबंधावर परिणाम होत असतो. म्हणजेच राष्ट्रीय हितसंबंधाचा अर्थ, स्वरूप सातत्याने बदलत असते.

### १.८.१. राष्ट्रीय हितसंबंधाच्या व्याख्या

राष्ट्रीय हितसंबंधाचा अर्थ स्पष्ट करणे कठीण असले तरी अभ्यासकांनी त्याच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहे.

**१) डाईक –**

"राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे असे हितसंबंध जे प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्रांच्या तुलनेत जोपासण्याचा प्रयत्न करीत असते."

**२) चार्लस लेर्च आणि अबूल सैद –**

"दीर्घ मुदतीचे आणि सातत्यपूर्ण सर्वसामान्य उदिष्टे जी राष्ट्रे आणि शासनाच्या दृष्टीने फायद्याची असतात आणि ज्याच्या जपणुकीसाठी राष्ट्रे प्रयत्नशील असतात. त्याला राष्ट्रीय हित असे म्हटले जाते."

**३) जोसेफ कँडेल –**

"कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा पाया म्हणजे राष्ट्रीय हितसंबंध होय."

वरील व्याख्यांवरून राष्ट्रीय हितसंबंधांची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील-

१) राष्ट्रीय हितसंबंध ही व्यापक आणि परिवर्तनीय संकल्पना असून, देशांतर्गत-आंतरराष्ट्रीय परिस्थितीत बदल घडून आला की, राष्ट्रीय हितसंबंधात बदल घडून येतो.

२) राष्ट्रीय हितसंबंधाची यादी बनवणे अवघड असले तरी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे रक्षण करणे, राष्ट्राची प्रगती साधणे, राष्ट्राची अखंडता टिकविणे हे सर्वसामान्य आणि कायमस्वरूपी हितसंबंध असतात.

३) परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा प्रमुख उद्देश म्हणजे राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे म्हणून हितसंबंध परराष्ट्र धोरणाचा पाया मानला जातो.

४) आंतरराष्ट्रीय संबंधात कोणत्याही दोन राष्ट्रांचे हितसंबंध समान नसतात.

५) राष्ट्रीय हितसंबंधामध्ये शासनकर्ता किंवा निर्णय घेणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव, राजकीय व्यवस्थेचे स्वरूप, जनमत इ. चे प्रतिबिंब पडत असते.

६) प्रामुख्याने अल्पमुदतीचे- दीर्घमुदतीचे, मूलभूत किंवा दुय्यम, राजकीय किंवा अराजकीय अशी राष्ट्रीय हितसंबधाची विभागणी करता येते.

### १.८.२ राष्ट्रीय हितसंबंधाचे प्रकार –

राष्ट्रीय हितसंबधाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी राष्ट्रीय हितसंबंधाचे प्रकार समजून घेणे आवश्यक आहे.

थॉमस रॉबिन्सन या अभ्यासकाने राष्ट्रीय हितसंबंधाचे एकूण सहा प्रकार सांगितले आहे.

१) प्राथमिक हितसंबंध

२) दुय्यम हितसंबंध

३) कायमस्वरूपी हितसंबंधी

४) परिस्थिती सापेक्ष हितसंबंध

५) सामान्य हितसंबंध

६) विशेष हितसंबंध

७) राष्ट्रीय हितसंबंध

**१) प्राथमिक हितसंबंध -**

राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण करणे, राष्ट्राची प्रादेशिक एकात्मता-अखंडत्व टिकविणे, राष्ट्राची प्रगती घडवून आणणे हे राष्ट्राची प्राथमिक हितसंबंध असतात. त्यासाठी राष्ट्रे प्रयत्नशील असतात.

**२) दुय्यम हितसंबंध –**

यात परदेशात वास्तव्य करणाऱ्या आपल्या देशातील नागरिक – राजदूतांची सुरक्षितता करणे यासाठी राष्ट्राकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा समावेश होतो.

**३) कायमस्वरूपी हितसंबंध –**

यात अशा स्वरुपाच्या हितसंबंधाचा समावेश होतो जे कायमस्वरूपी आहेत आणि ज्यात सातत्य आहे.

उदा. भारतातील काश्मीरबद्दलचे धोरण. काश्मीर राज्य भारतात कायदेशीररीत्या विलीन झाले असून, ते भारताचा अविभाज्य घटक आहे. भारताची ही भूमिका गेल्या ५० वर्षापासून कायम आहे. हा भारताच्या कायमस्वरूपी हितसंबंधाचा भाग आहे. गेल्या काही शतकांपासून समूद्धि मार्गाचे संरक्षण हा इंग्लंडच्या कायमस्वरूपी हितसंबंधाचा भाग होता.

**४) परिस्थितीसापेक्ष हितसंबंध –**

हे परिवर्तनीय हितसंबंध असतात. देशांतर्गत - आंतरराष्ट्रीय परिस्थितीत परिवर्तन घडून आले की असे हितसंबंध बदलतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत राशिया दरम्यान सुरू झालेल्या शीतयुद्धाच्या राजकारणात साम्यवादाच्या प्रसाराला आळा घालणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. पण सन १९९० च्या दशकात शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर हे उद्दिष्ट कालबाह्य झाले. आता अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधाच्या जपणुकीला प्राधान्य देण्यात आले आहे.

**५) सामान्य हितसंबंध-**

यात राष्ट्राची आर्थिक प्रगती व्हावी, व्यापार वाढावा, इतर राष्ट्रांना बाजारपेठेमध्ये प्रवेश मिळावा यासाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण करणे, त्यासाठी प्रयत्नशील राहणे, अशा उद्दिष्टांचा समावेश होतो. यासाठी मोठी राष्ट्रे सत्तासंतुलनाचे राजकारण खेळत असतात.

**६) विशेष हितसंबंध-**

परिस्थिती आणि वेळेनुसार असे हितसंबंध निर्धारित केले जातात. उदा. आंतरराष्ट्रीय दहशतवादाची समस्या आज अनेक लोकशाहीवादी राष्ट्रांना सतावत आहे. भारत, अमेरिका, रशिया, चीन सारख्या राष्ट्रांना दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. सप्टेंबर, ११, २००१ च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवादाचे निर्मूलन हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतानेही अमेरिका आणि रशियाच्या मदतीने दहशतवादविरोधी संयुक्त मोहीम उघडली आहे.

### १.८.३ राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनाचे मार्ग –

राष्ट्रीय हितसंबंधांच्या जपणुकीसाठी तसेच संवर्धनासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते. त्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला जातो. जसे जबरदस्तीचा मार्ग किंवा दमनशक्तीचा मार्ग (coercive measures), इतर राष्ट्रांशी युती करणे (Alliances), राजनयाचा मार्ग (Diplomacy), आर्थिक मदत आणि प्रचार, सामूहिक सुरक्षितता (Collective Security) अशा अनेक - मार्गाने राष्ट्रे आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करतात.

**१) जबरदस्ती किंवा दमनशक्तीचा मार्ग -**

जबरदस्ती किंवा दमनशक्तीच्या मार्गात प्रत्यक्ष लष्करी सामर्थ्याचा वापर, आर्थिक बहिष्कार, राजनैतिक संबंध तोडणे, विशिष्ट राष्ट्राला कोंडित पकडण्याचा प्रयत्न करणे, आक्रमणाचा प्रतिकार करणे या मार्गाचा समावेश होतो.

उदा. शीतयुद्धोत्तर राजकारणादरम्यान अमेरिकेचे इराक, उत्तर कोरिया, अफगाणिस्तान या राष्ट्रांविषयीचे धोरण. १९९१ च्या खाडी युद्धानंतर (इराक - कुवैत युद्ध) इराककडे अण्वस्त्रे, रासायनिक अस्त्रे असल्याच्या संशयावरून इराकवर आर्थिक बहिष्कार टाकण्यात आला. ११ सप्टें, २००१ च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सूत्रधार ओसामा-बिन-लादेनला अफगाणिस्तानातील तालिबान शासनाने आश्रय दिल्याच्या संशयावरून अफगाणिस्तानविरुद्ध केलेली लष्करी कारवाई.

सन, १९९८ मध्ये भारत पाकिस्तानने केलेल्या अणुचाचण्यानंतर अमेरिकने दोन्ही राष्ट्रविरोधी आर्थिक बंदीचे अस्त्र वापरले.

**२) दोन किंवा अधिक राष्ट्रांची युती –**

समान राष्ट्रीय हितसंबंधाच्या संरक्षणासाठी अनेकदा दोन किंवा अधिक राष्ट्रांच्या युती प्रस्थापित होतात. विशिष्ट उद्दिष्टपूर्ती हा अशा युतींचा आधार असतो. उद्दिष्टपूर्तीनंतर अशा युती लयाला जातात.

उदा. पहिल्या व दुसऱ्या विश्वयुद्धाच्या काळात अमेरिका - इंग्लंड- फ्रान्स- सोवियत रशिया या मित्र राष्ट्रांची युती तयार झाली. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर ही युती लोकशाही - भांडवलशाही आणि साम्यवादी राष्ट्रांमध्ये विभागली गेली.

इराकचा कुवैतवरील हल्ला परतवून लावण्यासाठी १९९१ मध्ये आणि २००१ मध्ये दहशतवादाच्या निर्मूलनासाठी अफगाणिस्तानमधील तालिबान शासनाविरुद्ध अमेरिका व मित्र राष्ट्रांची युती समान आर्थिक संबंधाच्या संरक्षणासाठी स्थापन झालेले आसियान, एपेक, युरोपियन युनियन यासारख्या विभागीय संघटनांची निर्मिती.

### ३) राजनय –

राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी राजनयाचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. हॅन्स मॉर्गेन्थ्यूसारखे वास्तववादी विचारवंत राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी राजनयाचा सर्वात महत्वाचा मार्ग मानतात. राजनयाचा दर्जा, गुणवत्ता इ. वर राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण-संवर्धन अवलंबून असते. संबंधित राष्ट्रांचे हितसंबंध परस्परपूरक असतात तेव्हाच राजनयाचा मार्ग (राजनैतिक वाटाघाटी) यशस्वी होतो.

उदा. भारत - पाकिस्तान, इस्त्राईल-पॅलेस्टाईन, श्रीलंका सरकार आणि लिट्टेसारखी श्रीलंकेतील तमिळांच्या संरक्षणासाठी लढणारी संघटना यांचे हितसंबंध परस्पर पूरक नसल्याने त्यांच्यात अनेकदा राजनैतिक चर्चा, वाटाघाटीचे प्रयत्न झाले; परंतु त्याला यश आले नाही.

### ४) विकसनशील राष्ट्रांना आर्थिक मदत –

विकसित - श्रीमंत राष्ट्रे अनेकदा गरीब, विकसनशील राष्ट्रांना आर्थिक मदत, निधी देऊन आपल्या हितसंबंधाचे संवर्धन करतात. अमेरिका या मार्गाचा वापर शीतयुद्धाच्या काळापासून करीत आहे. शीतयुद्धाच्या काळात साम्यवादाचा प्रचार-प्रसारापासून पश्चिम युरोपियन राष्ट्रांना वाचविण्यासाठी, अमेरिकेचा प्रभाव वाढविण्यासाठी मार्शल योजनेअंतर्गत अनेक राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यात आली.

शीतयुद्धोत्तर काळात लोकशाहीचा प्रचार-प्रसार, आर्थिक उदारीकरण, आयातीवरील बंधने दूर करून मुक्त बाजारपेठांचा अवलंब विकसनशील राष्ट्रांनी करावा यासाठी अमेरिका प्रयत्नशील आहे. त्यासाठी अमेरिका विश्वबँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांचा बुद्धिबळातील प्यादी म्हणून वापर करीत आहे.

## १.९ सत्तासंतुलन / सत्तासमतोल (Balance of power)

सत्ता समतोल ही आंतरराष्ट्रीय संबंधातील जुनी आणि संदिग्ध संकल्पना आहे. युद्ध टाळण्याचा किंवा युद्धाला नियंत्रित करण्याचा प्रभावी मार्ग म्हणून सत्तासमतोलाचा वापर केला जातो. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी सत्ता समतोलाची निर्मिती आणि त्याचे संरक्षण हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सत्तासमतोलाची व्यवस्था म्हणजे राष्ट्रांच्या राजकीय वर्तवणुकीला नियंत्रित करणारा वैश्विक कायदा होय. यात सत्तेचे समान वितरण करून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात, या संकल्पनेचा संबंध सत्ता आणि सत्तेच्या व्यवस्थापनाशी आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधात शांतता आणि सुरक्षिततेच्या निर्मितीला प्राधान्य असते. त्याकरिता राष्ट्रीय सत्ता व सामर्थ्यावर नियंत्रण ठेवणे, त्याला मर्यादा घालणे आवश्यक असते. राष्ट्रीय सत्तेचा वापर सकारात्मक (शांतता-सुरक्षिततेचे रक्षण) आणि नकारात्मक कार्यासाठी ही केला जातो. उदा. अनेकदा राष्ट्रे आपली इच्छा इतरांवर लादण्याचा प्रयत्न करतात. एखादे राष्ट्र अनियंत्रित सत्तेचा वापर करून आक्रमक धोरणाचा स्वीकार करते तेव्हा इतर राष्ट्रांकडून त्याचा सामूहिक प्रतिकार केला जातो. हेच सत्ता समतोलाचे प्रमुख तत्त्व आहे.

जेव्हा आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्षाचे वातावरण निर्माण होते तेव्हा दोन परस्परविरोधी गटांची निर्मिती होऊन सत्तासमतोल प्रस्थापित होतो. अशा परिस्थितीत दोन्ही गटांना परस्परांच्या क्षमतेची आणि युद्ध झाल्यास त्याच्या परिणामांची कल्पना असल्याने युद्धाचा धोका टळतो.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय सत्तेवर नियंत्रण आवश्यक असून, असे नियंत्रण प्रस्थापित करणारी व्यवस्था म्हणजे सत्ता समतोल होय.

**सत्ता समतोलाचा संक्षिप्त इतिहास –**

सतराव्या शतकांत राष्ट्र- राज्यांच्या निर्मितीबरोबरच सत्तासमतोलाची व्यवस्था संघटित आणि सूत्रबद्ध रुपात अस्तित्वात आली. १६४८ च्या वेस्ट फेलियाच्या कराराद्वारे राष्ट्र- राज्यांची निर्मिती झाली. त्यातूनच युरोपच्या राजकारणात शांतता आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी सत्ता समतोलाची सूत्रबद्ध, व्यापक व्यवस्था बनविण्यात आली. ती १९ व्या शतकापर्यंत टिकली.

पाश्चात्य राजकीय विचारवंत बर्नाडो रुसोलिएन आणि मॅकियाव्हॅली (१४६७-१५२७) यांनी राष्ट्रराज्यांची निर्मितीपूर्वी सत्ता नियंत्रणासाठी अशा व्यवस्थेच्या निर्मितीची आवश्यकता सांगितली

फ्रान्सच्या १४ व्या लुईने युरोपातील प्रस्थापित सतासमतोलाच्या व्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला तेव्हा इंग्लंड आणि नेदरलॅण्डच्या संयुक्त प्रयत्नाने लुईच्या महत्वाकांक्षेला नियंत्रित केले. १७१४ च्या युट्रेश तहाने सत्ता समतोलाची व्यवस्था अधिक बळकट केली गेली. म्हणूनच १८ व्या शतकाचा पूर्वार्ध हा सत्तासमतोलाच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टाने युरोपातील सत्तासमतोलाची व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इंग्लंडच्या नेतृत्वाखाली युरोपियन राष्ट्रांनी वॉटर्लूच्या युद्धात त्याचा पराभव केला. १८१५च्या व्हिएन्ना काँग्रेसमध्ये बहुपक्षीय करार करून सत्ता समतोलाची नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली.

१९ व्या शतकात सत्तासमतोलाची व्यवस्था युरोपपुरती मर्यादित न राहता तिला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. १७ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत युरोपातील सत्तासमतोलाची व्यवस्था टिकवण्यात इंग्लंडची भूमिका महत्वाची होती. इंग्लंडची आर्थिक – औद्योगिक प्रगती, जगभर पसरलेले साम्राज्यामुळे युरोपियन राजकारणाचे नेतृत्व इंग्लंडकडे आले. या काळातील इंग्लंडची भूमिका सत्तासमतोलकाची होती.

पहिल्या महायुद्धानंतर युरोपच्या राजकारणात नवा सत्तासमतोल आकाराला आला. अमेरिका, सोवियत रशियाचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रवेश व ब्रिटिश साम्राज्याला लागलेली उतरती कळा यामुळे नवीन सत्ता समतोलाच्या निर्मितीला चालना मिळाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर विश्व राजकारणाचे चित्र बदलले. अमेरिका आणि सोवियत रशियात शीतयुद्धाचे राजकारण पेटले. त्यामुळे जगातील राष्ट्रांचे ध्रुवीकरण होण्यास सुरुवात झाली. जगाची विभागणी दोन गटात झाली. त्यालाच द्विध्रुवीय सत्तासमतोल म्हणतात.

**१.९.१. सत्तासमतोल - अर्थ, स्वरूप, व्याख्या**

सत्तासमतोल ही संदिग्ध संकल्पना असून, तिची सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड आहे.

**१) पार्मर आणि पर्कीन्स**

"सत्ता समतोलात परस्परविरोधी दबावाची एक प्रक्रिया निर्माण केली जाते. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट राष्ट्राला किंवा राष्ट्रांच्या गटाला इतरांच्या तुलनेत शक्तिशाली बनवण्यापासून परावृत्त केले जाते."

**२) हार्टमन –**

"सत्ता समतोलामुळे गट – प्रतिगट निर्मितीची एक शृंखला तयार होते. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थिरता निर्माण होऊन युद्धाचा धोका टळतो.

**३) प्रा. क्विन्सी राईट –**

"सत्ता समतोल म्हणजे अशी व्यवस्था की, ज्यात राष्ट्रे सामूहिक प्रतिकाराच्या भीतीमुळे आक्रमक कृत्यापासून परावृत्त होतात."

थोडक्यात वरील व्याख्यांवरून सत्ता समतोलाचे स्वरूप स्पष्ट होते.

- सत्तासमतोल म्हणजे अशी परिस्थिती ज्यात राष्ट्रांमधील सत्तासंबंध सामान्यतः समान असतात, कोणतेही राष्ट्र आपली इच्छा इतरांवर लादण्याचा प्रयत्न करीत नाही.
- सत्ता समतोल ही सत्तेच्या समान विभागणीची आणि सत्तेत समतोल साधणारी व्यवस्था आहे.
- सत्ता समतोलामुळे राष्ट्रांमधील सत्ताप्राप्तीसाठीची व ती वाढविण्याची स्पर्धा कमी होते. सत्तेच्या नियंत्रणासाठी सत्तेचे समान वितरण आवश्यक आहे, ते सत्ता समतोलाद्वारे साधले जाते. सत्ता समतोलामुळे विश्वशांती व सुरक्षितता निर्माण होण्यास मदत होते.
- सत्तासमतोलामुळे कोणतेही राष्ट्र इतरावर आक्रमण करण्याचे धाडस करीत नाही. कारण त्याला दुसरे राष्ट्र किंवा गटाकडून होणाऱ्या प्रतिकाराची जाणीव असते.
- सत्तानियंत्रणाचा एक मार्ग म्हणजे सत्तासमतोल होय.

### १.९.२ सत्ता समतोलाची वैशिष्ट्ये

#### १) परिवर्तनीयता

सत्तासमतोल ही परिवर्तनीय अवस्था आहे. संतुलनाकडून असंतुलनाकडे आणि पुन्हा असंतुलनाकडून संतुलनाकडे असा बदल या व्यवस्थेत होत राहतात. त्यासाठी बहुपक्षीय पातळीवर करार केले जातात.

उदा. वेस्टफेलिया करारातून सत्तासंतुलनाची व्यवस्था निर्माण केली गेली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात नेपोलियनने तिला आव्हान दिले. त्यातून निर्माण झालेल्या असंतुलनातून युरोपात युद्धे घडून आली. नेपोलियनच्या पराभवानंतर १८१५ च्या व्हिएन्ना काँग्रेसद्वारे पुन्हा सत्तासंतुलनाचा प्रयत्न झाला. ते पहिल्या विश्वयुद्धापर्यंत टिकले. सत्ता असंतुलनातून दुसरे विश्वयुद्ध घडून आले. व्हर्सायच्या तहाद्वारे सत्तासंतुलन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अशा प्रकारे सत्ता समतोलाची शृंखला संतुलन आणि असंतुलनाच्या माध्यमातून अखंड सुरु असते.

#### २) कृत्रिम अवस्था –

सत्ता समतोलाची व्यवस्था राष्ट्रांच्या सक्रिय हस्तक्षेपातून निर्माण झालेली कृत्रिम व्यवस्था आहे. ती दैवी देणगी नसून, राष्ट्रांमध्ये झालेल्या बहुपक्षीय करारांचा परिणाम आहे. एखादे राष्ट्र जेव्हा सत्ता आणि बळाचा अधिक वापर करते तेव्हा इतर राष्ट्र त्याला सामूहिकरीत्या शह देण्याचा प्रयत्न करतात. आक्रमक राष्ट्रांविरुद्ध त्यांची युती प्रस्थापित होते.

उदा. १९९१ मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकविरुद्ध निर्माण करण्यात आलेली युती, तिने इराकचे कुवैतवरील आक्रमण परतवून लावले.

#### ३) स्थितीवादी व्यवस्था –

सत्तासमतोलाच्या व्यवस्थेत विश्व राजकारणातील जैसे थे परिस्थिती टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. प्रस्थापित रचना टिकवून धरण्यातच मोठ्या राष्ट्रांचे हितसंबंध गुंतलेले असतात. जुना सत्तासमतोल टिकविण्यात इंग्लंडचे योगदान महत्वाचे होते.

#### ४) खऱ्या स्वरुपाचा सत्तासमतोल अवघड –

खऱ्या सत्ता समतोलाची निर्मिती अवघड आहे. युद्ध ही सत्तासमतोलाची चाचणी असून, युद्ध टाळण्यात सत्तासमतोल यशस्वी झाल्यास खऱ्या स्वरुपाचा सत्तासमतोल अस्तित्वात येतो.

#### ५) मोठ्या राष्ट्रांचा खेळ –

सत्ता समतोलाची व्यवस्था हा मोठ्या राष्ट्रांचा खेळ असून, त्यात छोटया राष्ट्रांची भूमिका नगण्य असते. त्यांचा वापर मोठी राष्ट्रे बुद्धिबळातील प्याद्यांप्रमाणे करतात.

मोठी राष्ट्रे आपले श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी, हितसंबंध जोपासण्यासाठी, सत्ता वाढवण्यासाठी सत्ता समतोलाची व्यवस्था निर्माण करतात.

**६) सत्तासमतोलकाची भूमिका –**

सत्तासमतोलाची व्यवस्था यशस्वी होण्यासाठी एका सत्तासमतोलकाची आवश्यकता असते. सत्तासमतोलाच्या रक्षण आणि अंमलबजावणीसाठी सत्तासमतोलक महत्वाची भूमिका पार पाडतो.

जुन्या सत्तासमतोलात ही भूमिका इंग्लंडने पार पाडली. म्हणूनच हा समतोल एकेरी सत्तासमतोल म्हणून ओळखला जातो.

दुसऱ्या महायुद्धानंतर द्विध्रुवीय सत्तासमतोलामध्ये ही भूमिका अमेरिका – सोवियत रशियाने पार पाडली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर सत्तासमतोलकाची भूमिका अमेरिकेकडे आली आहे.

### १.९.३ सत्तासंतुलन साधण्याचे मार्ग / सत्तासमतोल निर्मितीचे तंत्र

सत्ता समतोल ही कृत्रिम व्यवस्था असून, ती व्यक्ती किंवा राष्ट्रांच्या सक्रिय हस्तक्षेपाद्वारे निर्माण करावी लागते. या व्यवस्थेच्या निर्मितीसाठी अनेक तंत्राचा वापर केला जातो.

**१) युती-प्रतियुतीची निर्मिती -**

सत्तासमतोलाची व्यवस्था निर्माण करण्याचे हे सर्वात जुने आणि प्रसिद्ध तंत्र आहे. युती म्हणजे विशिष्ट उद्देशपूर्तीसाठी राष्ट्रांनी एकत्र येऊन स्थापन केलेला गट किंवा संघ होय. प्रतिपक्षाविरुद्ध आपली बाजू बळकट करण्यासाठी राष्ट्रे मित्रराष्ट्रांच्या युती स्थापन करतात. हा सामूहिक प्रतिकाराचा मार्ग असून, एखादे राष्ट्र प्रबळ प्रतिपक्षाचा सामना करू शकत नाही तेव्हा आत्मरक्षणासाठी ते युतीत प्रवेश करते. उद्देश सफल झाल्यानंतर अशा युती अनेकदा तुटतात. युतीचे स्वरूप आक्रमक किंवा बचावात्मक असते. आक्रमक युती प्रस्थापित सत्तासमतोलाची व्यवस्था नष्ट करून आपल्या हितसंबंधांना सोईस्कर नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. तर बचावात्मक युती प्रस्थापित सत्तासमतोलाची व्यवस्था टिकविण्याचा प्रयत्न करतात. युती-प्रतियुतीतील शह-प्रतिशहाच्या राजकारणाचे रूपांतर युद्धात होऊ शकते.

**२) मोबदला –**

सत्ता समतोल टिकविण्यासाठी भूप्रदेशाची मोबदला म्हणून वाटणी करणे हे सत्तासमतोलाचे जुने तंत्र आहे. १९ व्या शतकात युरोपातील सत्तासमतोल टिकवण्यासाठी या तंत्राचा वापर केला गेला.

युद्धात पराभूत राष्ट्राच्या ताब्यातील प्रदेशाची विजयी राष्ट्रे विभागणी करून त्याची इतर राष्ट्रांमध्ये समान वाटणी केली जाते. त्यामुळे पराभूत राष्ट्राचे भौगोलिक खच्चीकरण होऊन सत्तासमतोलाला आव्हान देण्याचे धाडस करीत नाही.

उदा. पहिल्या महायुद्धानंतर विजयी राष्ट्रांनी जर्मनीविषयी या तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला.

### ३) फाळणी –

सत्तासमतोल टिकविण्याचे एक तंत्र म्हणून फाळणीचा वापर पूर्वीपासून केला जातो. यात युद्धखोर किंवा आक्रमक राष्ट्राची फाळणी अशाप्रकारे केली जाते की पुन्हा त्या राष्ट्राकडून युद्धाचे धाडस होणार नाही. या तंत्राचा वापर बऱ्याचदा युद्ध समाप्तीनंतर केला जातो. विजयी राष्ट्रांकडून सक्तीचा वापर करून ती पराभूत राष्ट्रांवर लादली जाते.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची करण्यात आलेली फाळणी, १८ व्या शतकात पोलंडची तीनदा फाळणी करण्यात आली. पोलंडचा भूप्रदेश प्रशिया, रशिया, हंगेरीने आपसात वाटून घेतला.

### ४) शस्त्रीकरण आणि नि:शस्त्रीकरण –

प्रत्येक राष्ट्राला आपल्या सुरक्षेसाठी शस्त्रास्त्रे बाळगण्याचा अधिकार आहे. राष्ट्र सुरक्षेसाठी भौतिक / लष्करी सामर्थ्य वाढविण्यावर भर देतात. यातूनच राष्ट्रा-राष्ट्रांमधे शस्त्रास्त्र स्पर्धा वाढीस लागते. राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यात संतुलन निर्माण होते तेव्हा समतोल साधला जातो.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका- सोवियत रशियात शस्त्रास्त्रस्पर्धा समतोल टिकविण्यास सहायक ठरते.

शस्त्रीकरणामुळे सत्ता समतोलाची व्यवस्था जशी टिकवली जाते, तशी ती नष्टही होऊ शकते. शस्त्रीकरणाप्रमाणे निःशस्त्रीकरण ही सत्तासमतोल टिकविण्यास कारणीभूत अथवा नष्ट करण्यास कारणीभूत ठरते. लष्करी समर्थ्यात संतुलन प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रे शस्त्रास्त्रनियंत्रण - निःशस्त्रीकरणासाठी तयार होतात. त्यासाठी विविध करार केले जातात.

उदा. SALT – १ व SALT- २ करार, अण्वस्त्र प्रसार बंदी करार

### ५) हस्तक्षेप आणि युद्ध –

सत्तासमतोल टिकविण्याचा अंतिम पर्याय म्हणून हस्तक्षेप व युद्ध या तंत्राचा वापर केला जातो. हस्तक्षेप तंत्रांतर्गत एखादे मोठे राष्ट्र लहान राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करून आपली इच्छा त्या राष्ट्रावर लादण्याचा प्रयत्न करते. बऱ्याचदा हस्तक्षेप युतीतील राष्ट्रे फुटुन बाहेर जाऊ नये म्हणूनही केले जातात.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका-सोवियत रशियाने राजकीय अस्थिरतेच्या नावाखाली अनेक राष्ट्रांच्या, कारभारात हस्तक्षेप केला. अमेरिकेने क्युबा, लेबनॉन,

लाओस मध्ये तर सोवियत रशियाने उत्तर कोरीया, उत्तर व्हिएतनाम, अफगाणिस्तानात हस्तक्षेप केले. या हस्तक्षेपातून युद्धेही घडून आली. उदा. १९५० चे कोरियन युद्ध, १९६५ चे व्हिएतनाम युद्ध.

१९८७ मध्ये मालदीव मधील बंड मोडण्यासाठी भारताने तेथे हस्तक्षेप केला. १९९१ मध्ये इराकने कुवैतवर आक्रमण केल्यानंतर अमेरिकेने हस्तक्षेप करून कुवैतला मुक्त केले आणि पश्चिम आशियातील बिघडलेले संतुलन दुरुस्त केले.

**६) फोडा आणि राज्य करा –**

सत्तासमतोलाच्या या तंत्रातंर्गत प्रतिपक्षाची भौगोलिक विभागणी करून त्याच्या सामर्थ्याचे खच्चीकरण केले जाते. मित्रराष्ट्रे जोडून स्वतःची ताकद वाढवून संतुलन साधता येते. तसेच प्रतिस्पर्धी राष्ट्रांचे मित्र पळवूनही संतुलन साधले जाते.

रोमन साम्राज्याने विखुरलेल्या साम्राज्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी या तंत्राचा अनेकदा वापर केला. फ्रान्सने जर्मनीला कमकुवत करण्यासाठी या तंत्राचा वापर पहिल्या महायुद्धापर्यंत केला.

अशाप्रकारे सत्तासमतोलामुळे शांतता, स्थिरता निर्माण होते. राष्ट्रांच्या एकाधिकारशाहीला आळा बसतो आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण होते.

## १.१० विद्यापीठीय प्रश्न

१) आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याख्या दया आणि त्यांची व्याप्ती विशद करा.

२) आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यातील फरक स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याख्या द्या आणि त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या वास्तववादी दृष्टिकोनाची चर्चा करा

५) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या उदारमतवादी दृष्टिकोनाची चर्चा करा.

६) सत्ता म्हणजे काय? सत्तेचे विविध घटक स्पष्ट करा.

७) राष्ट्रीय हित म्हणजे काय? ते सांगून राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनाचे मार्ग सांगा

८) सत्तासमतोल म्हणजे काय? सत्तासमतोल निर्मितीचे तंत्र स्पष्ट करा.

**संदर्भग्रंथ**

१) आंतरराष्ट्रीय संबंध-शैलेंद्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२) आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण - अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, ओरियंट ब्लॅकस्वान, ओरिएंट ब्लॅकस्वान प्रा. लि., मुंबई

❄❄❄❄❄❄❄

# २

# विश्वरचना

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टये

२.२ प्रस्तावना

२.३ शीतयुद्ध – अर्थ

२.४ शीतयुद्धाची पार्श्वभूमी

२.५ शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय विश्वरचना

२.६ शीतयुद्धोत्तर काळातील नवीन विश्वरचना – एकध्रुवीय विश्वरचना

२.७ बहुध्रुवीय विश्वरचना

२.८ विद्यापीठीय प्रश्न

## २.२ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धानंतरचा सन १९४५ ते १९९० हा कालखंड शीतयुद्धाचा काळ मानला जातो. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत रशियाचा महासत्ता म्हणून उदय झाला. महायुद्धानंतर जागतिक नेतृत्वासाठी अमेरिका- सोवियत रशिया यांच्यात तीव्र स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेतून निर्माण झालेले लष्करी गट – प्रतिगट, करार, शस्त्रास्त्रस्पर्धा, शह-प्रतिशहाचे राजकारण यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात तणाव निर्माण झाला. या तणावाचे वर्णन करण्यासाठी शीतयुद्ध (Cold War) ही संकल्पना वापरली जाते. शीतयुद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला मोठया प्रमाणात प्रभावित केले.

## २.३ शीतयुद्ध – अर्थ

शीतयुद्ध म्हणजे अशी स्थिती ज्यात पूर्णकालीन शांतीही नसते परंतु वास्तवात युद्धही होत नाही. शांती व युद्ध यामधील अस्थिरता असते. शीतयुद्ध म्हणजे अशी स्थिती, ज्यात युद्धाकरिता वातावरणनिर्मिती केली जाते.

वॉटर लिपमन यांनी शीतयुद्ध (Cold War) हा शब्द पहिल्यांदा वापरला.

ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार शीतयुद्ध म्हणजे हिंसेचा वापर न करता धमकी, अडवणूक व प्रसाराच्या माध्यमातून कटूता व कलहाची स्थिती उत्पन्न करणे होय.''

पं. जवाहरलाल नेहरू यांनी शीतयुद्ध म्हणजे असे युद्ध होय जे युद्धक्षेत्रात नव्हे तर मनुष्याच्या डोक्यात लढले जाते. शीतयुद्ध प्रत्यक्षात कधीच होत नाही तर विशिष्ट विचार मूल्ये, संस्कृती, जीवनपद्धती यावरून लढले जाते.

## २.४ शीतयुद्धाची पार्श्वभूमी

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका- सोवियत रशिया या महासत्तांचा उदय झाला. दोन्ही महासत्ता परस्परविरोधी विचारसरणीच्या (अमेरिका भांडवलशाही विचारधारेची, तर सोवियत रशिया साम्यवादी विचारधारा) पुरस्कर्त्या होत्या. त्यामुळे शीतयुद्धाला दोन भिन्न विचारसरणीतील संघर्ष म्हणूनही ओळखला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप व आशिया खंडामध्ये साम्यवादाचा वाढता प्रचार-प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने साम्यवादाच्या प्रतिरोधणाचे धोरण स्वीकारले. त्याअंतर्गत युरोप आणि आशिया खंडातील अनेक राष्ट्रांसमवेत लष्करी करार करून नाटो, सिएटो, सेन्टो सारख्या लष्करी संघटनांची निर्मिती केली गेली. या संघटनेच्या सदस्यांच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेने घेतली. सदस्यराष्ट्रांना साम्यवादाच्या विरोधासाठी लष्करी-आर्थिक मदत केली. सोवियत रशियाही या स्पर्धेत मागे नव्हता. पूर्व युरोपातील राष्ट्रांबरोबर सोवियत रशियाने 'वार्सा पॅक्ट' हा लष्करी करार करून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी उचलली. परिणामी जगाची विभागणी भांडवलशाही विरुद्ध साम्यवादी अशा दोन गटात झाली. म्हणूनच शीतयुद्धकालीन जग द्विध्रुवीय व्यवस्थेवर आधारित असल्याचे बोलले जाते.

लष्करी करारांमुळे महासत्तांना सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. त्यामुळे स्थानिक पातळीवरील छोटे-मोठे संघर्ष चिघळून त्यांना वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. उदा. काश्मीर प्रश्न, अफगाणिस्तानचा प्रश्न इ.

## २.५ शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय विश्वरचना (Bi – Polar System)

दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ (१९४५-१९९०) हा शीतयुद्धाचा काळ मानला जातो. या काळात जागतिक नेतृत्वासाठी अमेरिका-सोव्हियत रशियामध्ये तीव्र स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत निर्माण झालेले लष्करी गट – प्रतिगट, शह-प्रतिशहाच्या राजकारणातून विश्व राजकारणात मोठा तणाव निर्माण झाला. या तणावाच्या वर्णनासाठी शीतयुद्ध ही संकल्पना वापरली जाते. सोवियत रशियातील संघर्ष राजनयिक पातळीवरचा होता. या संघर्षात स्पर्धा, चढाओढ होती, परंतु संघर्षाचे रूपांतर प्रत्यस युद्धांत झाले नाही.

अमेरिका – सोवियत रशियातील शीतयुद्धाच्या राजकारणातर्गत काही संकल्पना – सिद्धांत आंतरराष्ट्रीय राजकारणात विकसित झाले.

१) प्ररोधन
२) दहशतीचा समतोल
३) परस्पर विनाशाची खात्री
४) तणाव शैथिल्य / देतांत
५) नव शीतुयद्ध
६) संरक्षणाची डावपेचात्मक योजना (Strategic Defence Initiative)


### २.५.१ द्विध्रुवीय विश्वरचना –

द्विध्रुवीय विश्वरचना ही दोन राष्ट्रांभोवती केंद्रित असणारी विश्वरचना आहे. यामध्ये सत्तेची केंद्रे दोन राष्ट्रे असून, जागतिक नेतृत्वाची धुरा त्या राष्ट्रांकडे असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता नेतृत्वासाठी त्या राष्ट्रांमध्ये स्पर्धा, चढाओढ असते. शह-प्रतिशहांचे राजकारण, गट-प्रतिगटांचे राजकारण यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात तणाव निर्माण होतो.

उदा. शीतयुद्ध कालीन विश्वरचना ही द्विध्रुवीय विश्वरचनेवर आधारित व्यवस्था होती.

**द्विध्रुवीय विश्वरचनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

**१) सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित व्यवस्था –**




१) द्विध्रुवीय विश्वरचना ही सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित व्यवस्था असते तसेच सत्ता ही दोन राष्ट्रांच्या किंवा राष्ट्रगटांच्या हातात असते.

उदा. शीतयुद्धाच्या काळात जगाची विभागणी अमेरिका आणि सोवियत रशिया या दोन महासत्तांमध्ये झाली.

**२) दोन्ही राष्ट्रे अधिक शक्तिशाली –**

द्विध्रुवीय विश्वरचनेत जगाचे नेतृत्व करणारे दोन्ही राष्ट्रे आर्थिक, भौतिक दृष्टया कमी-अधिक प्रमाणात शक्तिशाली असतात. एक राष्ट्राची कृती, दुसऱ्या राष्ट्राच्या प्रतिकृतीला जन्म देते.

उदा. शीतयुद्धात अमेरिका – सोवियत रशिया या दोन्ही महासत्ता आण्विक, भौतिकदृष्टया बलशाही होत्या.

**३) जागतिक नेतृत्वासाठी संघर्ष –**

द्विध्रुवीय विश्वरचनेत सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या दोन्ही राष्ट्रांमध्ये जागतिक नेतृत्वासाठी संघर्ष असतो. त्यासाठी दोन्ही राष्ट्र प्रयत्नशील असतात.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी अमेरिका प्रणित भांडवलशाही आणि सोवियत रशिया प्रणित साम्यवाद अशा दोन विचारधारांच्या आधारावर झाली. जागतिक नेतृत्वाच्या स्पर्धेतून शीतयुद्धाचा उदय झाला.

**४) युती-प्रतियुतीची निर्मिती –**

द्विध्रुवीय रचनेत दोन्ही राष्ट्रे जगातील इतर राष्ट्रांना आपापल्या गटात ओढण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याकरिता आपापल्या मित्र राष्ट्रांसमवेत करार करून युती-प्रतियुती निर्माण केल्या जातात.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोवियत रशियाने आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर लष्करी करार करून त्यांना लष्करी – आर्थिक मदत पुरवली. परिणामी स्थानिक विभागीय पातळीवर शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. अमेरिकेने NATO तर सोवियत रशियाने वॉर्सा पॅक्ट या लष्करी संघटनांची सामूहिक सुरक्षेच्या तत्वावर आधारित निर्मिती केली.

**५) दोन राष्ट्रांच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था –**

द्विध्रुवीय विश्वरचना ही दोन राष्ट्रांच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था असते.

उदा. शीतयुद्धाच्या राजकारणाने स्वरूप वैश्विक होते. त्यात युरोप, आशिया, आफ्रीका खंडातील बहुसंख्य राष्ट्रे ओढली गेली.

### २.५.२ द्विध्रुवीय विश्वरचनेच्या समर्थनार्थ मुद्दे –

सन १९४५ ते १९९१ हा शीतयुद्धाचा काळ मानला जातो. या काळातील प्रमुख घडामोडी खालीलप्रमाणे आहे.

**१) पॅरिस शांतता परिषद (१९४६)**

जर्मनी, इटली, जपानच्या पराभवानंतर १९४६ मध्ये दोस्त राष्ट्रांनी युद्धोत्तर युरोपच्या पुनर्रचनेसाठी पॅरिस येथे परिषद घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाचे पहिले पडसाद या परिषदेत उमटले. परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे अमेरिका–सोवियत रशिया मधील दरी वाढण्यास सुरूवात झाली.

**२) ट्रूमन तत्व (१९४७)**

दुसऱ्या महायुद्धाच्या आर्थिक दुष्परिणामांना बळी पडलेल्या युरोपातील राष्ट्रांना आर्थिक मदतीसाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रमन यांनी १२ मार्च, १९४७ रोजी एका योजनेची घोषणा केली. आर्थिक दुरावस्थेमुळे युरोपातील काही राष्ट्रांमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. या राजकीय अस्थिरतेचे भांडवल सोवियत रशिया साम्यवादाच्या प्रसारासाठी करेल, अशी भीती अमेरिकेला होती.

तेव्हा अशा राष्ट्रांना आर्थिक मदत देऊन त्या राष्ट्रांमधील लोकशाही व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद या योजनेत होती.

### ३) मार्शल योजना (१९४७)

अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जॉर्ज मार्शल यांनी ५ जून १९४७ ला युरोपीय राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यासाठी एका योजनेची घोषणा केली. त्यामागील हेतु दुसऱ्या महायुद्धानंतर विविध आर्थिक समस्यांशी झुंजणाऱ्या युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदत करण्याचा होता. १६ एप्रिल १९४८ ला स्थापन झालेली OECD – (Organisation for European Economic Co – Operation) संघटना मार्शल योजनेवर आधारित होती.

### ४) लष्करी संघटनांची निर्मिती –

सामूहिक सुरक्षेच्या तत्त्वावर आधारित लष्करी संघटनांची निर्मिती हे शीतयुद्धाचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. परस्पर दबाव वाढविण्यासाठी शीतयुद्धाच्या राजकारणाचा भाग म्हणून अमेरिका आणि सोवियत रशियाकडून आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर लष्करी करार केले. अमेरिकेने NATO, SEATO, CENTO या सारख्या लष्करी संघटना निर्माण केल्या. युरोप-आशियातील साम्यवादाच्या वाढत्या प्रसाराला आळा घालणे आणि सोवियत रशियापासून मित्र राष्ट्रांचे संरक्षण करणे हा अमेरिका प्रणीत लष्करी संघटनांचा उद्देश होता.

या लष्करी करारांमुळे शीतयुद्धांचे राजकारण वैश्विक बनले. शस्त्रास्त्रस्पर्धा वाढली. अमेरिका – सोवियत रशियाच्या सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारातील हस्तक्षेप, सदस्य राष्ट्रांना आर्थिक-लष्करी मदत यातून विभागीय सत्तासमतोल अस्थिर बनला.

### ५) इराणचा प्रश्न

दुसऱ्या विश्वयुद्धादरम्यान सोवियत रशियाचे सैन्य इराणमध्ये घुसले. हे सैन्य काढून घेण्यास सोवियत रशिया तयार नव्हता. त्याचबरोबर सोवियत रशियाचा इराणच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप वाढला. त्याविरूद्ध इराणने UNO कडे तक्रार केली. अमेरिकेने इराणची तक्रार उचलून धरली. सोवियत रशियाने आपले सैन्य इराणमधून काढून घ्यावे, असा ठराव सुरक्षा परिषदेने पास केला.

### ६) बर्लिनचा पेचप्रसंग

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर पूर्व जर्मनीवर सोवियत फौजांचा तर पश्चिम जर्मनीवर दोस्त राष्ट्रांच्या फौजांचा ताबा होता. सोवियत रशियाने १९४८ मध्ये वाहतुक व व्यापारावर कडक बंधने घालून दोस्त राष्ट्रांच्या फौजांची कोंडी केली. या कोंडीमुळे पश्चिम बर्लिन मध्ये जनतेसाठी जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. अमेरिका व मित्र राष्ट्रांनी पश्चिम जर्मनीला हवाई मार्गाने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला. पुढे UNOच्या हस्तक्षेपानंतर ही कोंडी सुटण्यास मदत झाली.

### ७) हंगेरीचा प्रश्न

१९५६ मध्ये हंगेरीतील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन सोवियत रशियाने आपल्या फौजा हंगेरीत घुसवल्या. रशियाचा हंगेरीतील लष्करी हस्तक्षेप आणि रशियन समर्थकांचे पाठिंबा असलेले साम्यवादी आंदोलनातून तेथे मूलभूत हक्कांची पायमल्ली होत असल्याचा आरोप अमेरिका व मित्र राष्ट्रांनी केला. 'हंगेरी वॉर्सा' कराराचा सदस्य असल्याने त्याला लष्करी मदत पुरवण्यासाठी सोवियत रशिया बांधील असल्याची भूमिका रशियाने घेतली.

### ८) क्युबातील क्षेपणास्त्र प्रसंग

अमेरिकेच्या दक्षिणेला १४५ किमी वर असलेले क्युबा हे छोटेसे राष्ट्र होय. १९६२ मध्ये सोवियत रशियाने क्युबामध्ये मध्यम पल्ल्याची अण्वस्त्रे ठेवण्याचा निर्णय घेतला. हे अमेरिकेच्या संरक्षणासाठी आव्हान होते. अमेरिकेने रशियाविरूद्ध लष्करी कारवाई करण्याची धमकी दिली. त्यावरून महासत्तांमध्ये तणाव निर्माण झाला. त्याचे रूपांतर अणुयुद्धांत होण्याची शक्यता होती. रशियाने क्युबात अण्वस्त्रे ठेवण्याचा निर्णय रद्द केल्याने क्युबाचा पेचप्रसंग सुटला.

### ९) देतांत –

शीतयुद्धाच्या काळातील १९६९ ते १९७९ आणि १९८५ ते १९९० हा काळ देतांत किंवा तणाव शैथिल्याचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात अमेरिका – सोवियत रशिया, अमेरिका, चीन यांच्यातील तणाव कमी झाला. अमेरिका – सोवियत रशियातील मैत्री व सहकार्य वाढले. दोन्ही राष्ट्रादरम्यान १९७३ मध्ये आर्थिक सहकार्य आणि व्यापारवृद्धीसाठी करार झाले. नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली. १९७२ च्या डावपेचात्मक शस्त्रास्त्र नियंत्रण करारावर महासत्तांनी स्वाक्षरी केली.

अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी फेब्रुवारी १९७२ मध्ये चीनला भेट दिली. या भेटीने अमेरिका – चीन देतांतची प्रक्रिया सुरू झाली. दोन्ही राष्ट्रांनी वादग्रस्त मुद्दे बाजुला ठेवून आर्थिक – व्यापारी – सांस्कृतिक संबंध सुधारण्याचे ठरविले. अमेरिकेने चीनला सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली. परिणामी चीनचा UNO तील प्रवेश सुकर झाला.

### १०) व्हिएतनाम युद्ध (१९६५ – ७०)

हा शीतयुद्धाच्या काळातील महत्वाचा संघर्ष होय. अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आणि अंतर्गत राजकारणात क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणारा हा संघर्ष होय. १९५४ पासून फ्रान्सने व्हिएतनाममधून लष्कर काढून घेण्यास सुरूवात केली. १९५४ नंतर व्हिएतनामची विभागणी सोवियत रशियाच्या आणि साम्यवादाच्या प्रभावाखालील उत्तर व्हिएतनाम आणि अमेरिकेच्या प्रभावाखालील दक्षिण व्हिएतनाम अशी झाली. १९६१ मध्ये उत्तर व्हिएतनामने दक्षिण व्हिएतनामवर आक्रमण केले. १९६५ पासून अमेरिकन सैन्य उत्तर व्हिएतनाम विरुद्ध प्रत्यक्ष युद्धात उतरले. राष्ट्राध्यक्ष जॉन्सन

यांच्या काळात सुरू झालेले युद्ध पाच वर्षे चालले. युद्धात अमेरिकेचा पराभव झाला. दक्षिण व्हिएतनामवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात यश मिळाले. १९६९ पासून अमेरिकेने दक्षिण व्हिएतनाममधील आपले सैन्य काढून घ्यायला सुरूवात झाली. युद्धात हजारो सैनिक मारले गेल. युद्धानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र आणि संरक्षणाविषयक धोरणात अमेरिकन काँग्रेसची भूमिका वाढली.

**११) अफगाणिस्तानमधील युद्ध –**

सोवियत रशियाच्या १९७९ मध्ये अफगाणिस्तान मधील लष्करी हस्तक्षेपाने शीतयुद्धातील तणाव शिथिलीकरणाची प्रक्रिया मागे पडून नवशीतयुद्धाला प्रारंभ झाला. १९७८ मध्ये अफगाणिस्तानात लष्करी उठाव होऊन साम्यवादी राजवट (Peoples Democratics Party of Afaganistan) प्रस्थापित झाली. सोवियत रशियाच्या हस्तक्षेपानंतर अफगाणिस्तान मध्ये रशियन सैन्याचे पाठबळ असणारे अफगाण सैन्य आणि पाकिस्तान – अमेरिकेचे पाठबळ असणारे अफगाण मुजाहिद्दीन बंडखोर यांच्यात युद्ध झाले. अशा प्रकारे अमेरिका–सोवियत रशिया पुन्हा समोरासमोर आले.

१९८९ मध्ये रशियाचे तत्कालीन अध्यक्ष मिखाईल ग्रोर्बाचेव्ह यांनी अफगणिस्तानमधील रशियन सैन्य काढून घेईपर्यंत हा संघर्ष सुरू होता.

शीतयुद्धाच्या काळात UNOच्या व्यासपीठावर नि:शस्त्रीकरणाच्या राजकारणात शीतयुद्धकालीन ध्रुवीकरण स्पष्टपणे जाणवत होते. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे अनेक स्थानिक प्रश्नांना गुंतागुंतीचे स्वरूप प्राप्त झाले. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतरही हे प्रश्न सुटलेले नाही.

उदा. काश्मीर प्रश्न, अरब-इस्त्राइल संघर्ष

## २.५.३ शीतयुद्धकालीन द्विध्रुवी विश्वरचनेच्या समाप्तीची कारणे

१९९० च्या दशकाच्या पूर्वार्धात सोवियत रशियाचे विघटन झाले. त्यामुळे शीतयुद्धाने निर्माण केलेली द्विध्रुवीकरणाची व्यवस्था कोलमडली. त्यामागील कारणे खालील प्रमाणे –

१) शीतयुद्धाने एका जीवघेण्या शस्त्रास्त्र स्पर्धेला जन्म दिला. ही शस्त्रास्त्र स्पर्धा प्रचंड खर्चिक होती. अमेरिका – सोवियत रशियाच्या अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण पडला. ही शस्त्रास्त्र स्पर्धा अधिक काळ टिकविणे दोन्ही महासत्तांसाठी अवघड बनले.

२) शीतयुद्धकालीन अमेरिका – सोवियत रशिया यांच्या परस्परांवर प्रभाव पाडण्याच्या आणि इतर राष्ट्रांना आपल्या गटात खेचण्याच्या तीव्र स्पर्धेमुळे तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांवर मोठा अन्याय झाला. राष्ट्रवादी भावनेची मोठी लाट शीतयुद्धाच्या राजकारणाची प्रतिक्रिया म्हणून काही राष्ट्रांमधून निर्माण झाली. त्याचे चटके महासत्तांना सोसावे लागले.

उदा. व्हिएतनाममध्ये अमेरिकेची झालेली कोंडी अफगाणिस्तानातील रशियाचा फसलेला डाव

३) शीतयुद्धाच्या राजकारणातील साम्यवादी आणि भांडवलशाही अशा दोन्ही स्पर्धक गटांमध्ये अंतर्गत फूट पडायला सुरुवात झाली. रशिया-चीन मतभेदामुळे साम्यवादी राष्ट्रांच्या एकतेला तडा गेला तर अमेरिका आणि तिच्या इतर पश्चिमी युरोपीय सहकारी राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या मतभेदांमुळे नाटो संघटनेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

४) शीतयुद्धाच्या काळात अमेरिका – सोवियत रशिया यांचा संरक्षण खर्च वाढत असताना दुसरीकडे जपान आणि काही अंशी आग्नेय आशियाई राष्ट्रांचा आर्थिक विकास घडून येत होता. जपान, सिंगापूर, थायलंड, मलेशिया यांच्या आर्थिक विकासामुळे शीतयुद्धाच्या राजकारणाचा निरर्थकपणा महासत्तांच्या लक्षात आला. परिणामी १९८० च्या दशकापासून दोन्ही महासत्तांनी आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य देण्यास सुरुवात केली.

५) १९८० च्या दशकातील नवशीतयुद्धाच्या राजकारणांतर्गत अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी सुरू केलेल्या शस्त्रास्त्रस्पर्धेत रशियाचा टिकाव लागला नाही.

६) रशियाचे कोलमडलेली अर्थव्यवस्था आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यात रशियातील प्रशासन अपयशी ठरले.

## २.६ शीतयुद्धानंतरच्या काळातील नवीन विश्वरचना

१९९१ मध्ये सोवियत रशियाच्या विघटनाबरोबरच अमेरिका सोवियत रशियातील शीतयुद्धाचे राजकारण संपुष्टात आले. द्विध्रुवीकरणावर आधारित शीतयुद्धकालीन सत्ता समतोलाची व्यवस्था कोसळली. सोवियत रशियाचे विघटन होऊन १५ स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रे निर्माण झाली. पूर्व युरोपमधील अनेक राष्ट्रांमधून साम्यवादी राजवटी कोसळून लोकशाही व्यवस्था निर्माण झाली. शीतयुद्धाच्या काळातील लष्करी गट, करार (नाटो वगळून) संपुष्टात आले. लष्करी गटाची जागा विभागीय व्यापार संघांनी घेतली शीतयुद्धाच्या अंताबरोबरच अमेरिका – सोवियत रशिया पश्चिम – पूर्व युरोपातील सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. विचारसरणीपेक्षा हितसंबंध महत्वाचे बनले. अमेरिका व युरोपीय राष्ट्रांनी परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य दिले.

पश्चिम – पूर्व जर्मनीचे एकीकरण झाले.उत्तर-दक्षिण कोरियाच्या एकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. रशियाने अफगाणिस्तानमधून आपले सैन्य काढून घेतले. इराक-इराण युद्धाचा शेवट होऊन आशिया खंडात तणाव शैथिल्याची प्रक्रिया सुरू झाली.

शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबरच UNO ची विश्व राजकारणातील भूमिका बदलली. शीतयुद्धाच्या काळात दोन्ही महासत्तांनी UNO च्या व्यासपीठाचा वापर संघर्षाकरिता केला. परंतु शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर UNO ने पर्यावरण संरक्षण, नि:शस्त्रीकरण मानवाधिकारांचे संरक्षण, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली.

शीतयुद्धोत्तर जग हे तणावमुक्त आहे असे नाही. महासत्तांमधील संघर्ष संपला तरी देशांतर्गत स्थानिक – विभागीय पातळीवरचे वांशिक, धार्मिक संघर्ष, धार्मिक मूलतत्ववाद, दहशतवाद यामुळे हिंसाचाराचे प्रमाण वाढत आहे. विकसीत राष्ट्राबरोबरच विकसनशील राष्ट्रांनाही दहशतवादाच्या भस्मासुराने ग्रासले आहे.

अशा प्रकारे शीतयुद्धोत्तर काळात एकीकडे शांतता, सहकार्य आणि लोकशाहीचा प्रसार घडून आला आहे तर दुसरीकडे विभागीय संघर्षाचेही अस्तित्व जाणवते. यातून परस्परविरोधी विषयांचे अस्तित्व असणारी एक नवीन विश्वरचना अस्तित्वात आली आहे.

### २.६.१ नवीन विश्वरचना : एकध्रुवी की बहुध्रुवी ?

१९९१ मध्ये शीतयुद्धांचा अस्त झाला. अमेरिका – सोवियत रशिया यांच्यातील संघर्ष मिटला. सोवियत रशियाच्या विघटनाबरोबरच द्विध्रुवी सत्तासमतोलावर आधारित विश्वरचना कोसळली आणि अमेरिकेचे वर्चस्व जगावर निर्माण झाले. अमेरिकेसारख्या महासत्तेला जगात तोडीस तोड अशी महासत्ता उरली नसल्याने अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एकध्रुवीय विश्वरचना आकाराला आली.


शीतयुद्धानंतरची आकाराला आलेल्या नवीन विश्वरचना एकध्रुवीय (Unipolar) आहे की बहुध्रुवी (Multipolar) याविषयी विचारवंतांमध्ये मतभेद आहे. वास्तविक पाहता या विश्वरचनेत एकध्रुवीय आणि बहुध्रुवीय व्यवस्थांचे सहअस्तित्व आहे. नवीन विश्वरचनेला पूर्णत: एकध्रुवीय आणि बहुध्रुवी म्हणणे चुकीचे असून, एकाच वेळी या दोन्ही व्यवस्थांची वैशिष्ट्ये नवीन विश्वरचनेत दिसून येतात.

### २.६.२ एकध्रुवीय विश्वरचना (Unipolar Wold Order)

एकध्रुवीय विश्वरचना ही एकाच राष्ट्राभोवती केंद्रित असणारी विश्वरचना असून जागतिक नेतृत्वाची धुरा त्या राष्ट्राकडे असते. विश्व राजकारणातील प्रमुख निर्णय त्या राष्ट्राच्या मर्जीने घेतले जातात. विश्वशांती आणि सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी त्या राष्ट्रावर असते. त्या राष्ट्राशी स्पर्धा करू शकेल किंवा त्यांच्या सत्तेला आव्हान देऊ शकेल अशी दूसरी सत्ता या विश्वरचनेत अस्तित्वात नसते.

शीतयुद्धोत्तर काळात अशी व्यवस्था अस्तित्वात आली असल्याचे अमेरिकन अभ्यासकांचे मत आहे ४५ वर्षे चाललेल्या स्पर्धेत अमेरिका आणि अमेरिका नेतृत्व करीत असलेल्या भांडवलशाही विचारसरणीचा स्पष्ट विजय झाला आहे.

**एकध्रुवीय विश्वरचनेची प्रमुख वैशिष्टये –**



**१) सत्तेच्या केंद्रिकरणावर आधारित**

एकध्रुवीय विश्वरचना सत्तेच्या केंद्रीकरणावर आधारित असून सत्ता ही एखादया विशिष्ट राष्ट्राच्या किंवा गटाच्या हातात केंद्रित असते.

**२) एक राष्ट्र इतरांपेक्षा अधिक शक्तिशाली –**

विशिष्ट राष्ट्रांचे किंवा राष्ट्रगटाचे आर्थिक, भौतिक सामर्थ्य हे इतर राष्ट्रांपेक्षा अधिक असते.

**३) एकाच राष्ट्राच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था**

एकध्रुवीय व्यवस्था एकाच राष्ट्राच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व सामूहिक स्वरूपाचे नसून ते एकीकृत स्वरूपाचे असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाची धुरा एका शक्तिशाली राष्ट्राकडे असते. हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या केंद्रस्थानी असते.

**४) एकाच राष्ट्राची एकाधिकारशाही**

या व्यवस्थेत एका राष्ट्राची एकाधिकारी किंवा हुकूमशाही निर्माण होण्याची शक्यता असते.

**५) शक्तिशाली राष्ट्रे सत्तासमतोलकाची भूमिका पार पाडते**

या व्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व करणारे राष्ट्र आंतरराष्ट्रीय तसेच विभागीय सत्तासमतोलात सत्तासमतोलकाची भूमिका पार पाडते.

**६) लोकशाहीविरोधी व्यवस्था –**

एकध्रुवीय व्यवस्था ही प्रामुख्याने लोकशाही विरोधी व्यवस्था असते. जगाचे नेतृत्व करणारे राष्ट्र बऱ्याचदा हुकूमशाही पद्धतीने वर्तन करते.

### २.६.३ एकध्रुवीय व्यवस्थेच्या समर्थनार्थ मुद्दे –

सोवियत रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेशी स्पर्धा करू शकेल. अशी दुसरी सत्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे नवीन विश्वरचनेवरील अमेरिकेची पकड निर्विवाद आहे.

१९९१ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनीअर) यांनी शीतयुद्धोत्तर काळातील नवीन विश्वरचनेची घोषणा केली. ही विश्वरचना अर्थातच अमेरिका केंद्रित आहे. नवीन विश्वरचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षण कर्त्यांची (Global Policeman) असेल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा सहभाग सक्रीय असेल. असा सूर या घोषणेत होता.

**जॉर्ज बुश यांची नवीन विश्वरचना ही पाच तत्वांवर आधारित होती –**

१) विश्व राजकारणाचे नेतृत्व, विश्वशांती आणि सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी अमेरिकेवर असेल.

२) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून शांतता आणि सुरक्षिततेचे उद्दिष्ट साधले जाईल.

३) विश्वरचनेत UNO ची भूमिका महत्वपूर्ण असेल.

४) आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्राविरूद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत कारवाई केली जाईल.

५) अणुचाचणी बंदी, अण्वस्त्र प्रसार बंदीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जातील.

**अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही –**

जॉर्ज बुश (सिनिअर) यांनी घोषीत केलेल्या नवीन विश्वरचनेच्या स्वरूपातून भविष्यातील अमेरिकेच्या भूमिकेची जगाला कल्पना आली. सन १९९१ ते २००९ या काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी पाहिल्या तर बुश यांनी घोषित केलेली नवीन विश्वरचना अमेरिका प्रत्यक्षात आणताना दिसते. या घडामोंडी मधून शीतयुद्धोत्तर विश्वरचना एकध्रुवी असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. या कालावधीत अमेरिकेची एकाधिकारशाही, दादागिरी वाढलेली दिसते. अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला थोपविण्यात UNOलाही अपयश आले आहे.

**१) १९९१ चे खाडी युद्ध**

सन १९९१ च्या खाडी युद्धादरम्यान अमेरिकेचा नेतृत्वाखाली UNO ने सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत इरकाविरूद्ध लष्करी कारवाई केली. त्यात अमेरिकेने दोन लाख सैन्य सौदी अरेबियात ठेवले. या लष्करी कारवाईनंतर इराकने कुवैतमधून माघार घेतली. तरीही अमेरिकेने सौदी अरेबियातून आपले सैन्य काढून घेण्यास नकार दिला.

**२) नाटोचे बॉम्बहल्ले –**

बोस्निया आणि सर्बिया राष्ट्रांमधील वांशिक हिंसाचार थांबविण्यासाठी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली NATO संघटनेने १९९५ व १९९६ मध्ये या राष्ट्रांवर हवाई हल्ले केले. या हल्ल्यांसाठी UNO च्या सुरक्षा परिषदेची सहमती नव्हती.

**३) शांतिसेनेतून माघार**

आफ्रिकेतील सोमालिया राष्ट्रातील वांशिक दंगली थांबविण्यासाठी युनोने पाठवलेल्या शांतिसेनेतून अमेरिकेने आपला सहभाग तडकाफडकी काढून घेतला. अमेरिकेचा हा निर्णय पूर्णत: एकतर्फी व युनोच्या नियमांचा भंग करणारा होता.

**४) अफगाणिस्तानवर लष्करी कारवाई**

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेचा न्यूयॉर्कमधील विश्व व्यापार केंद्र (WTC) व वॉशिंग्टन डी.सी.तील अमेरिकन संरक्षण विभाग (पेन्टागॉन) च्या कार्यालयावर दहशतवादी हल्ले झाले. या हल्ल्यात ५००० अमेरिकन नागरिक मारले गेले. हल्ल्याचा मुख्य सूत्रधार ओसामा-बिन- लादेनला अफगाणिस्तानमधील तत्कालीन तालिबान शासनाने आश्रय दिल्याचा संशय अमेरिकेला होता. त्यामुळे अमेरिकेने

तालिबान शासनाविरुद्ध लष्करी कारवाई केली. कारवाईत अफगाणिस्तानातील धार्मिक मूलतत्त्वावर आधारित तालिबानी शासन संपुष्टात आले. कारवाई दरम्यान अमेरिकेकडून युद्ध नियम धाब्यावर बसविण्यात आले. मोठ्या प्रमाणावर मानवाधिकारांचे उल्लंघन करण्यात आले.

### ५) आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध अमेरिकेचे युद्ध

सप्टेंबर ११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध युद्ध पुकारले. या युद्धात अमेरिका वापरत असलेल्या विविध तंत्रावरून अमेरिकेची एकाधिकारशाही स्पष्ट होते.

दहशतवादाच्या नावाखाली एखाद्या सार्वभौम राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणे, दहशतवादाला समर्थन देण्याच्या आरोपावरून काही राष्ट्रांविरूद्ध एकतर्फी आर्थिक बहिष्काराची – व्यापारी नाकेबंदीची घोषणा करणे. काही राष्ट्रांना दैत्य राष्ट्रे (Evil Nations) म्हणून संबोधून त्यांना विश्व राजकारणात वेगळे पाडण्याचा प्रयत्न करणे. मानवाधिकार, युद्धनियमांचे उल्लंघन करणे या तंत्रातून अमेरिकेची दादागिरी वाढत असल्याचे दिसते.

आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सामना करण्यासाठी अमेरिकेने काही राष्ट्रांबरोबर लष्करी करार केले. करारांतर्गत अमेरिका त्या राष्ट्रांना शस्त्रास्त्रपुरवठा करीत असते. यातून विभागीय पातळीवर शस्त्रास्त्र स्पर्धा जोर धरताना दिसते.

### ६) इराकविरूद्ध लष्करी कारवाई –

अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचा सर्वोच्च बिंदू म्हणजे २००४ मध्ये अमेरिकेने इराकवर लष्करी कारवाई केली. UNO च्या १५० पेक्षा जास्त सदस्य राष्ट्रांचा या कारवाईला विरोध असतानाही काही राष्ट्रांच्या सहकार्याने अमेरिकेने ही कारवाई पूर्णत्वाला नेली. अमेरिकेच्या युद्धपिपासू धोरणांना मुरड घालण्यास UNO ला आलेले हे सर्वात मोठे अपयश आहे.

इराकवरील लष्करी कारवाई दोन उद्दिष्टांसाठी करण्यात आली.

- इराकमध्ये सद्दाम हुसनेची राजवट बदलणे (Regione Change)
- नि:श्त्रीकरण

  इराकमध्ये तत्कालीन अध्यक्ष सद्दाम हुसैनच्या काळात आण्विक, रासायनिक, जैविक अस्त्रांचा विकास करण्यात आल्याचा संशय अमेरिकेला होता ही विध्वंसक शस्त्रास्त्रे (WMD – Weapons of Mass Destruction) भविष्यात दहशतवादी संघटनांकडून अमेरिके विरूद्ध वापरले जाण्याची भीती होती. या शस्त्रांचा गैरवापर होण्याअगोदरच ती नष्ट करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.

  भविष्यात शत्रूकडून काही धोक्याची शक्यता असल्यास योग्य कारवाई करून धोक्याची शक्यता नष्ट करण्याच्या धोरणाला Preemptive Attack धोरण

म्हणतात. अमेरिकेची इराकवरील लष्करी कारवाई या धोरणावर आधारित होती.


सध्या इस्त्रालयकडून पॅलेस्टाईन विरूद्ध या धोरणाचा सर्वाधिक वापर केला जातो. भारतानेही असे धोरण पाकव्याप्त काश्मीरमधील भारताविरोधी कारवाया करणाऱ्या दहशतवादी संघटनांविरूद्ध वापरावे. याविषयी देशांतर्गत दबाव शासनावर वाढत आहे.

## २.७ बहुध्रुवीय विश्वरचना (Multi – Polar World Order)

बहुध्रुवीय विश्वरचना म्हणजे अशी विश्वरचना, ज्यामध्ये सत्तेची केंद्रे अनेक असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व कोणत्याही एका राष्ट्राकडे नसून अनेक राष्ट्रांमध्ये यासाठी स्पर्धा असते या व्यवस्थेत कोणतेही एक राष्ट्र शक्तिशाली नसते तर अनेक राष्टांचे सत्तासामर्थ्य कमी-अधिक प्रमाणात समान असते. त्यामुळे कोणत्याही एका राष्ट्राची दादागिरी, मक्तेदारी निर्माण होण्याची शक्यता नसते. राष्ट्रांमध्ये स्पर्धा असली तरी समान राष्ट्रीय हितसंबंधाच्या रक्षणासाठी युती होण्याची शक्यता असते.

उदा. १९९१ च्या खाडी युद्धाच्या वेळी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकविरूद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत लष्करी कारवाई करण्यात आली. या कारवाईला रशिया, चीन, जपान या महासत्तांचे समर्थन होते.

### २.७.१ बहुध्रुवीय विश्वरचनेची प्रमुख वैशिष्टये




**१) बहुसत्ताकेंद्री विश्वरचना -**

या व्यवस्थेत सत्तेची केंद्रे अनेक असतात.

**२) सामर्थ्यांमध्ये समानता –**

बहुध्रुवीय विश्वरचनेत राष्ट्रांचे सामर्थ्य कमी-अधिक प्रमाणात समान असते.

**३) सामूहिक नेतृत्व –**

बहुध्रुवीय विश्वरचना सामूहिक नेतृत्वाच्या (Collective Leadership) तत्वावर आधारित आहे. आंततरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व एका राष्ट्राकडे नसून अनेक राष्ट्र सामूहिकपणे हे कार्य पार पाडतात.

**४) सत्तासमतोलावर आधारित व्यवस्था –**

बहुध्रुवीय विश्वरचना ही १९ व्या शतकात युरोपात अस्तित्वात असलेल्या सत्तासमतोलाच्या व्यवस्थेवर आधारित व्यवस्था आहे. या व्यवस्थेत इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, नेदरलॅण्ड, बेल्जिअम यासारखी सत्तेची अनेक केंद्रे होती. या राष्ट्रांमध्ये आशिया – आफ्रिका खंडात वसाहती निर्माण करण्यासाठी तीव्र स्पर्धा होती.

**५) राज्यकांचा नवीन सत्ताकेंद्रे म्हणून उदय –**

बहुध्रुवीय विश्वरचनेत राष्ट्रांबरोबरच राज्यके (Non States Actors) उदा. बहुराष्ट्रीय कंपन्या, NGO, व्यापार संघ इ. सत्तेची केंद्रे बनली आहे. उदा. ASEAN या व्यापारसंघाचा आर्थिक व्यापारी सत्तेचा केंद्र म्हणून उदय झाला असून अनेक मोठी राष्ट्रे ASEAN चे सदस्यत्व मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**६) आर्थिक व्यापारी स्वरूपाची स्पर्धा –**

बहुध्रुवीय विश्वरचनेतील राष्ट्रांमधील स्पर्धा ही प्रामुख्याने आर्थिक – व्यापारी स्वरूपाची आहे. आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी व्यापारी सवलती मिळविण्यासाठी राष्ट्रांमध्ये चढाओढ आहे. त्यासाठी आर्थिक राजनयाचा वापर केला जातो.

**७) समान हितसंबंधाच्या रक्षणासाठी राष्ट्रांमध्ये युती –**

बहुध्रुवीय विश्वरचनेत समान हितसंबंधांच्या रक्षणासाठी राष्ट्रांमध्ये युती – प्रतियुती निर्माण केल्या जातात.

### २.७.२ शीतयुद्धोत्तर काळातील बहुध्रुवीय विश्वरचना –

शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही बहुध्रुवीय व्यवस्था असल्याचे काही अभ्यासक मानतात. शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक नवीन सत्ताकेंद्राचा उदय झालेला दिसतो.

भारत, रशिया, चीन, जर्मनी, फ्रान्स या राष्ट्रांचे बहुध्रुवीय विश्वरचनेच्या निर्मितीला समर्थन आहे. शीतयुद्धोत्तर काळात अमेरिका ही एकमेव महासत्ता नाही. अमेरिकेचे लष्करी सामर्थ्य निर्विवाद असले तरी आर्थिक आघाडीवर अमेरिकेला जपान, जर्मनी, भारत, चीन, दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्र, युरोपीयन युनियन इ. बरोबर तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. शिस्तबद्ध आणि योजनापूर्वक रीतीने आर्थिक विकासाच्या जोरावर जपान, चीन, भारत व काही दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रे (थायलंड, सिंगापूर) महासत्तेच्या रांगेत जाऊन बसली आहे. परिणामी शीतयुद्धोत्तर विश्वरचनेला अमेरिकेची एकाधिकारशाही असलेली एकध्रुवीय

विश्वरचना संबोधणे चुकीचे ठरते. जागतिक राजकारणाचे नेतृत्व केवळ अमेरिका करीत नसून अमेरिका, चीन, जपान, जर्मनी, भारत इ. चे सामूहिक नेतृत्व निर्माण झाले आहे.

## २.७.३ शीतयुद्धोत्तर काळातील नवीन विश्वरचनेची वैशिष्टये

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर निर्माण झालेल्या नवीन विश्वरचनेचे सकारात्मक आणि नकारात्मक अशी दोन्ही प्रकारची वैशिष्टये आहेत.

- **नवीन विश्वरचनेची सकारात्मक वैशिष्टये**

**१) आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य –**

शीतयुद्धोत्तर काळातील महत्वाची घटना म्हणजे राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधांना मिळालेले प्राधान्य होय. शीतयुद्धाच्या काळात विचारसरणीवर आधारित राजकारण, राजकीय हितसंबंधांना महत्व होते. त्यासाठी आर्थिक, हितसंबंधाचा बळी दिला जात असे. साम्यवादाच्या प्रतिरोधनासाठी अमेरिकेने अनेक राष्ट्रांना आर्थिक सहाय्य – सवलती दिल्या गेल्या. त्याची झळ अमेरिकी अर्थव्यवस्थेला बसली.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर विचारसरणीच्या अस्तित्वासाठी अशा स्वरूपाची मदत कालबाह्य ठरली. शीतयुद्धाच्या अंतानंतर पहिले नवनिर्वाचित अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य देण्याचे नवे धोरण घोषीत केले. अनेक राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारून जागतिक बाजारपेठेत आर्थिक व्यापारी हितसंबंध जोपासण्याच्या धोरणाला प्राधान्य दिले त्यासाठी आर्थिक राजनयाचा वापर केला.

**२) आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे महत्व वाढले.**

शीतयुद्धानंतरचा काळ हा आशिया खंडाचा काळ म्हणून ओळखला जातो. शीतयुद्धाच्या काळात युरोप खंड केंद्रस्थानी असल्याने या काळात युरोपियन राष्ट्रांचे महत्व वाढले होते. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्र आशिया खंडात स्थलांतरित झाले. सिंगापूर, मलेशिया, भारत, जपान, चीन या राष्ट्रांनी झपाट्याने आर्थिक प्रगती केली असून. आंतरराष्ट्रीय राजकारणातील त्यांची भूमिका वाढली आहे.

ASEAN सारख्या व्यापारसंघाच्या सदस्यत्वासाठी युरोपियन राष्ट्रे प्रयत्नशील आहेत. आशियाई राष्ट्रांच्या आर्थिंक गुंतवणुकीसाठी पश्चिमी MNC मध्ये चढाओढ निर्माण झाली आहे.

**३) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ**

शीतयुद्धोत्तर काळात राष्ट्रांराष्ट्रांमधील राजकीय – आर्थिक – व्यापारी – सांस्कृतिक, विज्ञान – तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच द्विपक्षीय – विभागीय पातळीवरील बहुपक्षीय सहकार्यात वाढ झाली आहे. शीतयुद्धाच्या

राजकारणामुळे अमेरिका – रशिया, अमेरिका – चीन, पूर्व – पश्चिम युरोप यांच्यातील संघर्षामुळे सहकार्यात बाधा निर्माण झाली होती. लष्करी करार – संघटनांमुळे राष्ट्रांची विभागणी गटांमध्ये झाली होती. आंतरराष्ट्रीय राजकारणात भीती, संशयाचे वातावरण निर्माण झाले होते.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर शांतता आणि सहकार्याच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय विभागीय व द्विपक्षीय संघर्ष सोडविण्याकडे राष्ट्रांचा कल वाढलेला दिसतो. तसेच UNO ची भूमिकाही संघर्ष निवारणासाठी महत्वाची ठरली.

विभागीय व्यापारसंघाची वाढती संख्या व भूमिकेमुळे विभागीय आर्थिक – व्यापारी सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. ASEAN, NAFTA – North American Free Trade Agreement, APEC – Asia Pacific Economic Co-Operation या व्यापारसंघाची भूमिका शीतयुद्धोत्तर काळात वाढली. ASEAN च्या सदस्य राष्ट्रे मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, सिंगापूर इ. राष्ट्रांना Asian Tigers असे म्हटले जाते.

विभागीय व्यापार संघामुळे राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा घटक मागे पडून विभागीय सार्वभौमत्वाला महत्व प्राप्त होत आहे. आर्थिक सहकार्याबरोबरच वांशिक – धार्मिक मूलतत्ववादी संघर्षाचे निवारणही शांततेच्या माध्यमातून केले जात आहे.

**४) UNO ची भूमिका बदलली –**

शीतयुद्धाच्या काळात महासत्तांमधील राजकारणांमुळे UNO च्या भूमिकेवर मर्यादा पडल्या. महासत्तांनी UNO च्या व्यासपीठाचा वापर आपपासातील संघर्षाच्या कारणासाठी केला. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे नि:शस्त्रीकरण पर्यावरणाचे संरक्षण, मानवी हक्कांचे संरक्षण या महत्वाच्या प्रश्नांमध्ये UNO भरीव कामगिरी करू शकली नाही.

शीतयुद्धोत्तर काळात UNO ची भूमिका बदलून ती व्यापक बनली. याचे प्रतिबिंब १९९१ मध्ये मिळाले. UNo चे तत्कालीन सरचिटणीस जेव्हिएर - दी – कुलर यांनी ‘UN Agenda for 21$^{st}$ Century’ हा अहवाल प्रसिद्ध करून भविष्यातील UNO च्या भूमिकेवर शिक्कामोर्तब केले. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी UNO प्रयत्नशील असून शीतयुद्धोत्तर काळात UNO च्या शांतिसेनेचे कार्यक्षेत्र वाढलेले दिसते. राजकीय स्थैर्यासाठी लोकशाही पद्धतीने निवडणुका घेणे, शांतता कराराची अंमलबजावणी करणे, नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा पुरवणे इ. कार्ये शांतिसेना करताना दिसते.

रवांडा, सोमालियातील वांशिक संघर्षात UNO ने हस्तक्षेप करून शांतीप्रस्थापनेचे कार्य केले.

### ५) लोकशाहीचा प्रसार –

शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाहीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली आहे. सोवियत रशियाच्या विघटनाबरोबरच हंगेरी, बल्गेरिया, रूमानिया सारख्या पूर्व युरोपीयन राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. लोकशाहीच्या प्रसारासाठी प्रयत्न करणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नेपाळ, भूतानसारख्या राष्ट्रांमध्ये संसदीय लोकशाही आकाराला येत आहे.

### ६) नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली

शीतयुद्धोत्तर काळात नि:शास्त्रीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली. शीतयुद्धाच्या काळात १९७९ च्या दशकापर्यंत अमेरिका, सोवियत रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन या पाच राष्ट्रांकडे अण्वस्त्रे होती. पण पुढे भारत – पाकिस्तान, उत्तर – दक्षिण कोरीया, या राष्ट्रानी अण्वस्त्र क्षमता प्राप्त केली. अण्वस्त्राच्या वाढत्या प्रसाराबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली. यावर उपाय म्हणून UNO ने संपूर्ण नि:शस्त्रीकरणाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले. १९९१ मध्ये अमेरिका आणि रशियाने सामरिक शस्त्रास्त्र कपात करार (START – Strategic Arms Reduction Treaty) करार केला. १९९५ मध्ये NPT – Nuclear Non Proliteration Treaty करारला मुदतवाढ देण्यात आली. १९९९ मध्ये सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार (Comprehensive Test Ban Treaty - CTBT) मंजूर करण्यात आला.

### ७) मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयीच्या संवेदनशीलतेत वाढ –

UNO ने १९४८ मध्ये मानवाधिकारांचा जाहिरानामा प्रसिद्ध केला. परंतु शीतयुद्धाच्या राजकारणामुळे मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयी आंतरराष्ट्रीय जनमत गतिशील बनविण्यात UNO ला अपयश आले. शीतयुद्धोत्तर काळात मानवाधिकारांची जाणीव वैश्विक बनविण्यात UNO, ॲमेन्स्टी इंटरनॅशनल, HUman Rights Watch या NGO ची भूमिका महत्वाची आहे.

वाढत्या वांशिक हिंसाचारांमधून मानवाधिकारांचे संरक्षण करण्यासाठी UNO च्या शांतीसेनेने काही राष्ट्रांत लष्करी हस्तक्षेप केले. अनेक राष्ट्रांमधून मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी कायदेशीर तरतूद करण्यात आल्या.

उदा. भारतात १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क कायदा मंजूर करण्यात आला. त्यातंर्गत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग व राज्य मानवाधिकार आयोगाची निर्मिती करण्यात आली.

**८) पर्यावरण संरक्षणाची वैश्विक जाणीव**

पर्यावरण प्रदूषणाची समस्या विशिष्ट राष्ट्रापुरती मर्यादित नसून ती आंतरराष्ट्रीय स्वरूपाची समस्या आहे. त्याकरिता सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याची जाणीव शीतयुद्धोत्तर काळात विकसित झाली. या जाणीवेचे पहिले प्रतिबिंब १९९२ च्या ब्राझीलमधील रिओ - दि – जानिरो येथील वसुंधरा परिषदेत पडले. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाचा जाहिरनामा तयार करण्यात आला. १९९७ मध्ये जपानमधील क्योटो शहरात झालेल्या पर्यावरण संरक्षण परिषदेत पर्यावरण संरक्षणाचा मसुदा (Kyoto Protocol) तयार करण्यात आला.

**९) व्यापारसंघाची वाढती भूमिका –**

शीतयुद्धोत्तर काळात शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांची जागा विभागीय व्यापारसंघांनी घेतली. विभागीय पातळीवरील आर्थिक विकासासाठी नवीन व्यापारसंघ अस्तित्वात आले. विभागीय आर्थिक विकास (Regional Economic Development) आणि विभागीय आर्थिक एकिकरणाच्या (Regional Economic Integration) प्रक्रियेत व्यापारसंघ महत्वाची भूमिका बजावत आहेत. अनेक राष्ट्रांच्या आर्थिक विकासात विभागीय व्यापार संघाची भूमिका महत्वाची आहे.

उदा. ASEAN, SAARC, NAFTA, AU – Atircan Union

**१०) जागतिकीकरणाची प्रक्रिया तीव्र बनली –**

जागतिकीकरण ही वैश्विक प्रक्रिया असून कोणतेही राष्ट्र त्यापासून अलिप्त राहू शकत नाही. भांडवलशाहीचा जागतिक पातळीवर झालेला प्रसार, आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया, MNC चे वाढते जाळे यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. जागतिकीकरण ही विश्वपातळीवर राष्ट्रांमधील आर्थिक – सामाजिक – सांस्कृतिक संबंध घनिष्ठ करून एक परस्परावलंबी विश्वाची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. तिचे उद्दिष्ट एक एकिकृत विश्व बाजारपेठ (Intergrated World Market) ची निर्मिती करणे आहे. १९९५ मध्ये WTO च्या स्थापनेबरोबरच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली आहे.

**नकारात्मक वैशिष्ट्ये**

**१) वांशिकवाद आणि वांशिक हिंसाचारात वाढ –**

शीतयुद्धोत्तर काळात अमेरिका – सोवियत रशिया यांच्यातील संघर्ष संपुष्टात आला असला तरी विभागीय पातळीवरील संघर्षाचे अस्तित्व कायम आहे. अनेक राष्ट्रांमध्ये वांशिक भेदभावातून हिंसाचार घडून आला आहे.

उदा. बोस्निया, क्रोयोशिया, रवांडा, अफगाणिस्तान, श्रीलंका, सोमालिया, ईस्ट तिमोर इ. या वांशिक हिंसाचारात अनेक निष्पाप नागरिक ठार झाले आहे.

आफ्रिकेतील रवांडा मध्ये हुतु आणि तुत्सी या वांशिक गटांच्या संघर्षात एका वर्षात पाच लाख लोक मारले गेले.

वांशिक संघर्षातून मानवाधिकारांचे उल्लंघन होत असून. विभागीय पातळीवरील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे.

## २) धार्मिक मूलतत्ववादी चळवळी –

शीतयुद्धोत्तर काळात जगामध्ये धार्मिक मूलतत्त्वादी चळवळींनी जोर पकडला आहे. त्यातून दहशतवाद, वांशिक हिंसाचाराला चालना मिळत आहे. धार्मिक श्रेष्ठत्वाची भावना जोपासण्यासाठी धर्माचे अस्तित्व किंवा स्वतंत्र ओळख टिकविण्यासाठी धर्माच्या आधारावर लोकांना संघटित करण्यासाठी धार्मिक मूलतत्ववादी चळवळी सक्रिय झाल्या आहेत.

उदा. अल्जेरिया, अफगाणिस्तान, इराण इ. राष्ट्रे धार्मिक मूलतत्ववादाला बळी पडली आहे. १९७९ मध्ये इराणमध्ये आयातोल्ला खोमेणी यांच्या नेतृत्वाखाली झालेली धार्मिक क्रांती. १९९६ मध्ये अफगाणिस्तानात प्रस्थापित झालेले तालिबान शासन धार्मिक मूलतत्ववादाने प्रभावित झाले होते.

## ३) आंतरराष्ट्रीय दहशतवादाची समस्या

शीतयुद्धानंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाने उग्र रूप धारण केले असून, अमेरिका, रशिया, चीन, भारत, इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांच्या सुरक्षेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. हा दहशतवाद धार्मिक – वांशिक भावनेने प्रभावित झाला असून, त्याचे मूळ धार्मिक मूलतत्ववादी चळवळीत आहे.

बॉम्बस्फोट, गोळीबार, अपहरण, राजकिय नेत्यांचे खून इ. साधनांचा वापर करून दहशतवादी हिंसाचार घडवून आणतात.

दहशतवादी कारवायांबरोबर अमली पदार्थांचा व्यापारही वाढला आहे. त्यातून आलेला पैसा दहशतवादी संघटनांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी वापरला जातो. ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेवरील हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या वाढत्या सामर्थ्यांची साक्ष जगाला पटली.

## ४) मानवी सुरक्षेचा प्रश्न

नवीन विश्वरचनेत मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानवी सुरक्षा म्हणजे हिंसाचार, भीती, असुरक्षिततेपासून व्यक्तीची मुक्तता. शीतयुद्धकालीन तणाव, परस्पर अविश्वास संशय – भीतीच्या वातावरणामुळे मानवी असुरक्षितता

वाढली. शीतयुद्धोत्तर काळातही परिस्थिती मध्ये फारसा बदल न होता. विविध संघर्षामुळे मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला. राजकिय कारणांमुळे अंतर्गत यादवी युद्धे, वांशिक हिंसाचार, धार्मिक मूलतत्ववादी चळवळी, अण्वस्त्रांचा प्रसार इ. कारणामुळे मानवी सुरक्षितता धोक्यात आली.

**५) युद्ध गुन्ह्यांचे (War Crimes) वाढते प्रमाण**

समकाळात विविध प्रकारच्या संघर्षातून युद्धविषयक नियमांचे पालन होताना दिसत नाही. त्यामुळे युद्ध गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. युद्ध कैद्यांना अमानवी वागणूक देणे, युद्धादरम्यान सामान्य नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी हल्ले करणे हे प्रकार वाढत आहेत.

उदा. १९९२ च्या बोस्निया मधील वांशिक संघर्ष, १९९५ मधील सर्बियामधील संघर्ष, अमेरिकेची इराक – अफगाणिस्तानमधील लष्करी कारवाई दरम्यान युद्धविषयक नियमांचे सर्रास उल्लंघन झाले. इराकी युद्ध कैद्यांना अमेरिकी सैन्यांकडून मिळत असलेल्या अमानवीय वागणुकीची छायाचित्रे 'वॉशिंगटन पोस्ट', 'न्यूयॉर्क टाईम्स' ने प्रसिद्ध केली.

## २.८ विद्यापीठीय प्रश्न

१) शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय व्यस्थेचे सविस्तर वर्णन करा.

२) शीतुयद्धोत्तर विश्वरचना एकध्रुवीय आहे की बहुध्रुवीय आहे? सविस्तर चर्चा करा.

३) 'शीतयुद्धोत्तर जगात एकध्रुवीय व्यवस्थेचे अस्तित्व जाणवते' या विधानाची चर्चा करा.

**संदर्भग्रंथ**

१) समकालीन जागतिक राजकारण – शैलेंद्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२) आंतरराष्ट्रीय संबंध – शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण – अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, ओरिएंट ब्लैकस्वान, ओरिएंट ब्लॅक स्वान प्रा. लि. मुंबई

३) आंतरराष्ट्रीय संबंध – शांताराम भोगले.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# संघर्ष, शांतता, आणि सुरक्षा

**घटक रचना**


३.१ उद्दिष्टे

३.२ विषय विवेचन : संघर्ष

३.३ संघर्ष : अर्थ व व्याख्या

३.४ संघर्ष : वर्गीकरण

३.५ संघर्षाचे प्रकार

३.६ संघर्षाचे बदलते स्वरूप

३.७ विषय विवेचन : शांतता

३.८ निःशस्त्रीकरण

३.९ शस्त्रास्त्र नियंत्रण

३.१० सामूहिक सुरक्षितता

३.११ विषय विवेचन : सुरक्षा

३.१२ राष्ट्रीय सुरक्षा

३.१३ मानवी सुरक्षा

३.१४ विद्यापीठीय प्रश्न


## ३.१ उद्दिष्टे:

१. संघर्ष, शांतता, सुरक्षा या संकल्पना आणि त्यासंदर्भातील आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वाटचालीचा आढावा अभ्यासणे.

२. बदलत्या काळानुसार या संकल्पनांचे मूल्यमापन करणे.

३. नि:शस्त्रीकरण, शस्त्रास्त्र नियंत्रण या संकल्पनाची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

४. राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील २१ व्या शतकातील आव्हानांचा आढावा घेणे.

## ३.२ विषय विवेचन : संघर्ष

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये शांतता आणि सुरक्षिततेच्या निर्मितीला प्राधान्य असते. अशी शांततेची निर्मिती करत असताना देखील राष्ट्रांमधील परस्पर संबंधांमध्ये संघर्ष ही एक अटळ अशी बाब आहे. म्हणजेच दोन किंवा अधिक राष्ट्रात परस्पर संबंध प्रस्थापित करण्यासाठी

सहकार्य ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे; तसेच संघर्ष ही देखील एक अपरिहार्य बाब आहे. आंतरराष्ट्रीय संबंधामधील सहकार्याचे जसे विविध कांगोरे दिसून येतात त्याच प्रकारे आंतरराष्ट्रीय संबंधांमधील विविध प्रकारचे संघर्ष अस्तित्वात असल्याचे सुद्धा दिसून येते. अशा विविध प्रकारच्या संघर्षाचे अवलोकन करणे, विश्लेषण करणे व त्या संघर्षावर तोडगा काढणे, संघर्षाची सोडवणूक करणे यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासक प्रयत्न करत असतात. जसे संघर्षाचे विविध प्रकार असतात तसेच संघर्ष सोडवण्याच्या देखील विविध पद्धती असतात. आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण, राष्ट्राराष्ट्रांतील संघर्षाची सोडवणूक, परस्पर सहकार्य, शांतता या सर्वच बाबींना दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. या अभ्यासाअंती आंतरराष्ट्रीय संबंधात संघर्ष अटळ असल्याचेही दिसून येते. आंतरराष्ट्रीय संबंध मुळातच आपल्या राष्ट्राचे हितसंबंध जोपासणे या दृष्टीने निर्माण केले जातात. त्यामुळेच जोपर्यंत राष्ट्राच्या विशिष्ट हितसंबंधाचे अस्तित्व आहे तोपर्यंत संघर्षाचेही अस्तित्व राहणे स्वाभाविक आहे. संघर्ष हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

## ३.३ संघर्ष : अर्थ व व्याख्या

आंतरराष्ट्रीय व्यवस्था प्रस्थापित होत असताना प्रत्येक राष्ट्राची एका विशिष्ट प्रकारची प्रतिमा निर्माण होत असते. ही राष्ट्राची प्रतिमा त्या राष्ट्राचे हितसंबंध व आर्थिक आणि राजकीय ध्येय यांवर अवलंबून असते. जेव्हा एकाच प्रकारच्या गोष्टीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांचे हितसंबंध गुंतलेले असतात, अशावेळी संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. उदाहरणार्थ, भारत आणि पाकिस्तान मधील काश्मीर च्या मुद्द्यावरून चालू असणारा संघर्ष, भारत आणि चीन मधील सीमावाद, युक्रेन आणि रशिया संघर्ष इ. म्हणजेच ज्या राष्ट्रांचे हितसंबंध परस्परपूरक असतात त्या राष्ट्रांमध्ये सहकार्याचे संबंध प्रस्थापित होतात. याउलट ज्या राष्ट्रांचे हितसंबंध परस्पर विरोधी असतात त्या राष्ट्रांमध्ये मात्र संघर्ष निर्माण होतात. हे संघर्ष द्विराष्ट्रीय स्वरूपाचे असतात. काही वेळा समान हितसंबंध असणारी राष्ट्रे आपापसात गट निर्माण करून सामूहिक दबाव निर्माण करून आपले ईप्सित ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करतात. संघर्ष हा गतिमान असतो. संघर्षाचे मूळ हितसंबंधात आहे, असे आपण ज्यावेळी म्हणतो; त्यावेळी आपणाजवळ असणारी संसाधने मर्यादित असणे, सत्ता संबंध ही वैशिष्ट्ये त्यात अनुस्यूत असतात.

अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ हेरॉल्ड लास्वेल (Harold Lasswell) संघर्षाची व्याख्या करताना, संघर्ष ही जाणीवपूर्वक केलेली स्पर्धा असून अनन्य मूल्याच्या (Exclusive value) प्राप्तीसाठी होणाऱ्या प्रयत्नांमधून संघर्षाची निर्मिती होते.

उपरोक्त व्याख्येवरून संघर्षाविषयी काही गोष्टी स्पष्टपणे दिसून येतात. पहिली म्हणजे संघर्ष ही जाणीवपूर्वक करण्यात आलेली स्पर्धात्मक कृती आहे, तो जाणीवपूर्वक निवडलेला मार्ग आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ही स्पर्धा आपल्या राष्ट्राच्या हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी केली जाते. राष्ट्रांतील हितसंबंध विरोधी असतील तर त्यातून संघर्षाची निर्मिती होत असते. विविध राष्ट्रांमधील हितसंबंधाचे स्वरूप भिन्न असते, त्यामुळे त्यांना प्राप्त करावयाची उद्दिष्ट्ये देखील भिन्न असतात; परिणामी राष्ट्रांमधील संघर्षाचे स्वरूप देखील भिन्न असते. संघर्ष हे हितसंबंधांवर आधारलेले असतात. व प्रत्येक राष्ट्राचे कालपरत्वे हितसंबंध बदलत असतात.

त्यामुळे संघर्षाचे स्वरूप देखील बदलत राहते. एका ठराविक संघर्षावर तोडगा काढला की त्याची जागा दुसरा संघर्ष घेतो. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी अशा संघर्षाचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते. कारण संघर्षातून तणाव वाढतो. एकाच प्रकारचा संघर्ष अधिक कालावधीपर्यंत टिकून राहिल्यास त्याचे रूपांतरण हिंसेत होते अशा वेळी काही प्रसंगी हिंसेचे युद्धात देखील रूपांतरण होते. राष्ट्रीय विकासात संघर्ष हा खूप मोठा अडथळा आहे. तरीही संघर्ष हे वास्तव नाकारता येत नाही.

## ३.४ संघर्ष : वर्गीकरण

संघर्षाचे वर्गीकरण हिंसक संघर्ष व अहिंसक संघर्ष असे करता येते. हे अगदीच ढोबळ व मूलभूत स्वरूपाचे असे वर्गीकरण असले तरी खोलवर विचार केल्यास त्यातील तथ्यांश दिसू लागतो. जेव्हा शांततापूर्ण वाटाघाटीच्या माध्यमातून हितसंबंध जोपासणे अशक्य होऊन जाते तेव्हा देशांतर्गत सत्ता हिंसेचा मार्ग चोखळते. भौतिक नुकसान म्हणजेच वित्तहानी, जीवितहानी ही अशा हिंसक संघर्षाची काही प्राथमिक वैशिष्ट्ये आहेत. अशा हिंसक संघर्षाचा व्यक्ती व नागरी समाजाच्या जडणघडणीवर निरातिशय व दीर्घकालीन परिणाम होतो.

याउलट अहिंसक संघर्षात मात्र हिंसेचा अभाव हे वैशिष्ट्य दिसून येते. हितसंबंधाचा संघर्ष हिंसेचा वापर न करताही केला जाऊ शकतो. या प्रकारच्या संघर्षात दोन किंवा दोन पेक्षा अधिक राष्ट्रे युद्ध वा हिंसे शिवाय इतर अनेक मार्गांचा अवलंब करतात. प्रत्यक्ष हिंसेचा वापर केला जात नसला तरी हिंसेचा वापर करण्याचा धाक दाखवला जातो. चर्चा परिसंवाद या माध्यमांद्वारे आपले अधिकाधिक हितसंबंध रेटले जातात. दबावतंत्राचा वापर केला जातो. आर्थिक सवलती, व्यापारी करार, निर्बंध इ तंत्राचा वापर केला जातो. समान हितसंबंध असणाऱ्या राष्ट्रांना व्यापारात व आंतरराष्ट्रीय धोरणात सवलती दिल्या जातात.

## ३.५ संघर्षाचे प्रकार :

जेव्हा दोन किंवा अधिक राष्ट्रांची उद्दिष्टे एकमेकास अनुरूप नसतात तेव्हा संघर्षाची परिस्थिती निर्माण होते संघर्षाचे प्रकार समजून घेतल्याशिवाय संघर्षाचे व्यवस्थापन शक्य होणार नाही. संघर्षाचे ढोबळ वर्गीकरण वरील प्रमाणे केले जात असले तरी संघर्षाचे विविध प्रकार खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

**१. भूप्रदेश व सीमावाद:**

नवनवीन भूप्रदेशांवर ताबा मिळवणे व त्यावर सत्ता प्रस्थापित करणे, या उद्देशाने आजवर सर्वाधिक संघर्ष निर्माण झाले आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या ठराविक भूभाग आपला असल्याचा दावा प्रतिस्पर्धी राष्ट्रंकडून केला जातो. प्रत्येक वेळी हा फक्त भूभागाचा ताबा नसतो तर बऱ्याचदा समान संस्कृती असणाऱ्या देशालगतच्या भूभागाचा ताबा मिळवण्याचा देखील प्रयत्न केला जातो. सद्यस्थितीतील बहुतांश भूप्रदेश व सीमांविषयीचे वाद हे ऐतिहासिक दाव्यांच्या आधारे होताना दिसत आहेत. यामध्ये प्रत्यक्ष विभाजनाची रेषा स्पष्ट नसल्याने तसेच ठराविक राष्ट्रीय विभाजनाच्या रेषेला मान्यता देत नसल्याने असे वाद उफाळून येत आहेत. उदाहरणार्थ भारत व पाकिस्तान या देशांमधील काश्मीरचा प्रश्न, रशियाचे युक्रेनवरील आक्रमण. भूप्रदेश हा

आर्थिक प्रगती साधण्याचे आणि देशाच्या विकासाची गती वाढवण्याचे प्रमुख साधन आहे. त्याचबरोबर भूप्रदेश हे संपन्नतेचे देखील प्रतीक आहे. त्यामुळे बहुतांश राष्ट्रांच्या हितसंबंधांच्या यादीत भूप्रदेश या गोष्टीचा सर्वात वरचा क्रमांक असतो. भूप्रदेश व सीमावाद यांचे राजकारण दहशतवाद, अन्याय, वांशिक भेद, दडपणूक इत्यादी नावाखाली केले जाते.

**२. अल्पसंख्यांक, वांशिकता व शासन-सत्ता यांच्याशी निगडित संघर्ष:**

अल्पसंख्यांकाचे संघर्ष हे प्रत्येक वेळी वांशिक किंवा धार्मिक गटाशी संबंधित असतीलच असे नाही. काही वेळा सामाजिक अल्पसंख्य गट किंवा भाषिक अल्पसंख्य गट यांचेही संघर्ष दिसून येतात. उदाहरणार्थ श्रीलंकेतील तामिळ भाषिकांचा प्रश्न. तरीही धार्मिक अल्पसंख्याकांचे संघर्ष हे या प्रकारातील प्रमुख गणले जातात. शेजारील प्रतिस्पर्धी राष्ट्रीय अशा अल्पसंख्या गटांच्या माध्यमातून स्वराष्ट्राची चांगली प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा प्रकारच्या प्रतिमा चा वापर स्वतःच्या राष्ट्राचे हितसंबंध व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करता येतो. धार्मिक व वांशिक अल्पसंख्यांक गटांचे संघर्ष मुख्यत्वे आपल्या राष्ट्राकडून पुरेशी विश्वासार्हता प्राप्त न झाल्याने घडून येतात. याचा परिणाम होऊन हा अल्पसंख्याक गट शासन सत्तेशी झगडा करून स्वतःच्या वेगळ्या अस्तित्वाची व विशिष्ट दर्जाची मागणी करू लागतो. राजकीय अभ्यासकांच्या मते सत्ताकांक्षी राष्ट्रे अशा अल्पसंख्य गटांचा वापर करून व त्यांच्या धार्मिक भावनांना डिवचून प्रतिस्पर्धी राष्ट्रांकडून आपल्या हिताची धोरणे आखून घेतात.

**३. संसाधनांवर ताबा मिळवण्यासाठीचे संघर्ष:**

या प्रकारच्या संघर्षामध्ये महत्त्वाच्या संसाधनांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा उद्देश असतो. नैसर्गिक संसाधने मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. अशावेळी विकास व वृद्धी साध्य करण्यासाठी अधिकाधिक संसाधने मालकीची असणे किंवा त्यावर ताबा अथवा नियंत्रण असणे क्रमप्राप्त असते. संसाधनावर आधारित संघर्ष हे मुख्यत्वे टंचाईची तीव्रता, संसाधनाची उपलब्धता आणि त्या संसाधनाचे नियंत्रण मिळवण्यात असलेले धोके यांचा अभ्यास करून निर्माण केले जातात.

## ३.७ संघर्षाचे बदलते स्वरूप:

राज्यशास्त्रातील सत्ता, हितसंबंध, युद्ध आणि शांतता यांच्याप्रमाणेच संघर्ष ही देखील एक केंद्रीभूत संकल्पना आहे. सर्व संघर्ष हे अडचणीचे नसतात. काही संघर्ष निव्वळ व्यापारी स्पर्धेचा भाग या स्वरूपाचे देखील असतात. संघर्षाच्या परिस्थितीत राष्ट्रे तडजोडीच्या व परिसंवादाच्या माध्यमातून हिंसेशिवाय अधिकाधिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न करतात. हिंसक वळण घेतलेल्या संघर्षांना चर्चेच्या पातळीवर आणण्यासाठी जागतिक स्वरूपाच्या संघटना कार्यरत असतात. हल्ली नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधामुळे संघर्षाचे स्वरूप देखील बदलले आहे. आताच्या युगात माहिती (Data) हे सर्वाधिक मोठे संसाधन मानले जाते. आंतरजालावर उपलब्ध असणाऱ्या बिग डेटा चे मालकी हक्क व नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वच विकसित व विकसनशील राष्ट्रीय प्रयत्न करत आहेत. अवकाश याने, उपग्रह यांच्या

मदतीने अधिकाधिक माहिती घेतली जाते. तशीच माहिती संप्रेषणाचीदेखील आधुनिक साधने वापरली जातात. ह्या माहितीच्या आधारे व्यापारी सत्ता प्रस्थापित करता येऊ शकते. उदाहरणार्थ चीनने काही मोबाईल वरील ॲप्स च्या माध्यमातून जागतिक बाजारपेठांची माहिती करून घेतली व ग्राहकांच्या मागणीनुसार वस्तू बाजारपेठेत उपलब्ध करून दिल्या.

संघर्षाचे स्वरूप हल्ली बदलत आहे, असे दिसत असले तरीही मूलभूत संघर्ष हे उपरोक्त तीन प्रकारांतीलच दिसून येतात. राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक हे संघर्ष शांततामय रीतीने सोडवण्याच्या कामी प्रयत्न करत असतात. काही संघर्ष युद्धात परावर्तित होऊ नयेत यासाठी देखील जागतिक संघटना व अभ्यासक प्रयत्न करत असतात. संघर्ष हे अपरिहार्य व अटळ स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्यावर एकच एक असा कायमस्वरूपी इलाज करणे शक्य नसते. तरीही संघर्ष निर्माण होऊ नयेत म्हणून काळजी घेणे व उपस्थित असणारे संघर्ष शांततामय पद्धतीने कसे सोडवता येतील हे पाहणे, हीच पर्यायी व्यवस्था आहे.

## ३.७ शांतता: विषय विवेचन

वरील विश्लेषणात संघर्षाची अपरिहार्यता याविषयी विवेचन आलेच आहे. मग असा संघर्ष जर अटळ असेल तर शांतता प्रस्थापित करण्यासाठी काही उपाययोजना करणे क्रमप्राप्त आहे. चर्चा, परिसंवाद, शिखर परिषदा, बैठका, राजनय यांचा वापर अशावेळी केला जातो. परंतु एवढ्यावरच न थांबता संघर्षाने प्रत्यक्षात हिंसक वळण घेतल्यास करावयाच्या कारवाईचा देखील विचार केला जातो. सध्या जागतिकीकरणाचा काळ आहे. कोणत्याही दोन राष्ट्रातला संघर्ष विकोपाला गेला तर त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागू शकतात. उदाहरणार्थ रशिया व युक्रेन यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेलाचा भाव वाढल्याचे उदाहरण अगदीच ताजे आहे. राष्ट्रा - राष्ट्रात सहकार्याचे संबंध प्रस्थापित करावयाचे असतील तर शांतता हे महत्त्वाचे मूल्य राष्ट्रांना पटवून द्यावे लागते. शांतता प्रस्थापनेचे आवश्यक प्रयत्न जागतिक संघटनेच्या माध्यमातून होत असतात. तरीही सत्ताकांक्षी राष्ट्रे जेव्हा हव्यासापोटी संघर्ष टोकाला घेऊन जाण्याची भूमिका स्वीकारतात; त्यावेळी काही ठोस उपायांची गरज भासते. ह्या ठोस उपाययोजनांमध्ये शस्त्रास्त्र नियंत्रण व निःशस्त्रीकरण तसेच सामूहिक सुरक्षितता अशा त्रिस्तरीय उपायोजनांचा समावेश केला जातो. याव्यतिरिक्तही व्यापारी सवलती, आर्थिक निर्बंध, बहिष्कार हे उपाय केले जातात. परंतु प्रस्तुत प्रकरणात आपण निः शस्त्रीकरण, शस्त्रास्त्र नियंत्रण व सामूहिक सुरक्षितता या दृष्टिकोनांचा विचार करणार आहोत.

तंत्रज्ञानातील प्रगतीचा गैरवापर शस्त्रास्त्रांवरील संशोधनासाठी केला जात असल्याचे सध्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. संख्यात्मक व गुणात्मक रित्या शस्त्रास्त्रांचा वापर कमी करणे तसेच त्यावरील संशोधन खर्च मर्यादित करणे ही आजच्या काळाची गरज आहे. परस्पर सहकार्य व शांततेच्या प्रस्थापनेसाठी हे गरजेचे उपाय मानले जातात. वास्तववादी विचारवंत हॅन्स मॉर्गेन्थ्यू आपल्या 'पॉलिटिक्स अमंग नेशन्स' (Politics Among Nations) या पुस्तकात संघर्ष हे वास्तव मान्य करतात. राष्ट्रा राष्ट्रात असणारे संबंध समजून घेताना त्यांच्या संस्कृतीमध्ये कार्यरत असणारे 'बल' निगडित घटक ओळखणे व समजून घेणे; आणि दुसरे त्या घटकांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात व आंतरराष्ट्रीय संस्थांवर कसा परिणाम होईल हे समजून घेणे शांतता प्रस्थापनेसाठी उपयोगी पडणारी पहिली पायरी आहे, असे हॅन्स मॉर्गेन्थ्यू

यांनी अभ्यासाअंती आपल्या पुस्तकात नोंदवले आहे. शांततेच्या निर्मितीसाठी जाणीवपूर्वक आणि विशिष्ट पद्धतीने प्रयत्न खालील उल्लेख केलेल्या दृष्टिकोनांच्याद्वारे केले जातात. राष्ट्राच्या हितसंबंधांची पूर्तता व्हावयाची असेल तर शांतता निर्माण करणे गरजेचे असते. शांतता प्रस्थापित करण्याचे दृष्टिकोन आपण खालील प्रमाणे समजावून घेऊ शकतो. आपल्या पदरी शस्त्रास्त्र असतील तर ती वापरण्याचा मोह कुणाही राज्यकर्त्यांना होणे स्वाभाविक असते, असे मानून ही शक्यता टाळण्यासाठी निःशस्त्रीकरण ही उपाययोजना अगदी अलीकडे म्हणजे विसाव्या शतकात उदयास आली. क्युबामधील अण्वस्त्र अरिष्टानंतर (Cuban Missile Crisis) म्हणजे १९६२ नंतर जगासमोरील अण्वस्त्रधारी युद्धाची भीती शिगेला पोचली. जागतिक भीती व अणुयुद्धाचे तोटे लक्षात घेऊन सोव्हिएत रशिया (USSR) व अमेरिकेची संयुक्त संस्थाने (USA) या देशांनी निःशस्त्रीकरणासारखा आदर्शवादी उपाय टाळून शस्त्रास्त्र नियंत्रणासारखा व्यवहार्य उपाय निवडला.

## ३.८ निःशस्त्रीकरण

हॅन्स मॉर्गेन्थ्यू निःशस्त्रीकरणावर टिप्पणी करताना, अशी कोणतीही शस्त्रास्त्र कपात करण्याची किंवा त्यांना नष्ट करण्याची कृती की ज्याचा अंतिम उद्देश शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करून शस्त्रांचा निःपात करण्याचा असतो ती म्हणजे निःशस्त्रीकरण होय; असे नमूद करतात. निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत शस्त्रास्त्र कपात, शस्त्रास्त्र निःपात, संरक्षण व युद्ध खर्चात कपात तसेच शक्य असेल तेथे लष्करी केंद्रांचा निःपात, युद्धसामग्री वरील तंत्रज्ञान व संशोधन खर्चात कपात इ सर्व गोष्टींचा समावेश असतो. निःशस्त्रीकरणाचा साधा सरळ अर्थ म्हणजे एखाद्या राष्ट्रास युद्ध सामग्री व मानवी संहार करणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीपासून रोखणे होय.

ही स्थल व कालपरत्वे बदलणारी प्रक्रिया असून ही स्वेच्छाआधारित किंवा काही वेळा सक्ती करून घडवून आणली जाते. नि:शस्त्रीकरणाचे प्रमुख प्रकार आपणाला खालील प्रमाणे विषद करता येतील.

अ. **सार्वत्रिक व स्थानिक नि:शस्त्रीकरण -** जागतिक राजकारणात महासत्ता असलेली राष्ट्रे अशा सार्वत्रिक नि:शस्त्रीकरणाच्या कार्यक्रमात पुढाकार घेऊन इतर लहान मोठ्या राष्ट्रांना करारात भाग घेण्यासाठी उद्युक्त करतात. ही पूर्णतः ऐच्छिक प्रक्रिया असते म्हणजे करारात भाग घ्यावा म्हणून कोणत्याही राष्ट्रावर दबाव आणला जात नाही. जेव्हा ठराविक प्रदेशातील काही राष्ट्रे एकत्र येऊन शांतता प्रस्थापनेसाठी अशा पद्धतीचे करार करतात तेव्हा त्यास स्थानिक नि:शस्त्रीकरण असे संबोधले जाते.

ब. **गुणात्मक व संख्यात्मक नि:शस्त्रीकरण -** गुणात्मक नि:शस्त्रीकरण अधिक विनाशकारी अशा ठराविक युद्ध सामग्रीच्या बंदीची, त्यांचा निःपात करण्याची किंवा त्यामध्ये कपात करण्याची भूमिका घेते. तर संख्यात्मक नि:शस्त्रीकरण सर्वच प्रकारच्या विनाशकारी शस्त्रास्त्रांचा निःपात करण्याची म्हणजे त्यांना नष्ट करण्याची किंवा त्यांमध्ये लक्षणीय कपात करण्याची भूमिका घेते.

क. **व्यापक व सर्वसमावेशक नि:शस्त्रीकरण -** नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत अस्तित्वात असणाऱ्या सर्वच शस्त्रास्त्रांचा बिमोड करणे गृहीत धरले जाते. सर्व प्रकारचे युद्ध

सामग्रीवर होणारे खर्च पूर्णतः ठप्प करून सर्वसमावेशक नि:शस्त्रीकरण हे व्यापक ध्येय बाळगले जाते. हा एक आदर्शवादी विचार असून या विचाराची व्यवहार्यता अगदीच नगण्य आहे.

नि:शस्त्रीकरणाची गरज पुढील मुद्द्यांच्या आधारे थोडक्यात सांगता येईल.

अ. युद्धाचा धोका टाळून शांतता प्रस्थापित करणे.

ब. अण्वस्त्र युद्ध व अणुशक्तीचा वापर संहार करण्यासाठी न करणे.

क. शस्त्रास्त्र, युद्ध सामग्री त्यावरील संशोधन यांच्यावरील खर्चास आळा घालून तो हिस्सा आर्थिक विकासासाठी वापरणे.

ड. शस्त्रीकरणाच्या खर्चात कपात करून तो हिस्सा गरिबी, उपासमारी, सामाजिक मागासलेपण, आरोग्य इत्यादी समाजोपयोगी गोष्टींसाठी वापरणे.

इ. लष्करीकरण लोकशाही व्यवस्थेला मारक असून त्यामुळे शांतता व सहकार्यपूर्ण प्रगती या लोकशाहीच्या अंतर्भूत मूल्यास त्यामुळे काळीमा फासली जाते.

नि:शस्त्रीकरण ही सर्वसमावेशक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची व आग्रहाची प्रक्रिया असूनही तीस अपयशास सामोरे जावे लागले. राष्ट्रा राष्ट्रात परस्परांविषयी असणारा अविश्वास, वाढते संघर्ष, शस्त्रास्त्र विक्रीची भली मोठी बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय राजकारणात असणारे कायम संघर्षमय वातावरण इत्यादी कारणांमुळे नि:शस्त्रीकरण हे अपयशी ठरले.

## ३.९ शस्त्रास्त्र नियंत्रण

जग भीषण महायुद्धांच्या छायेखाली वावरत असताना जागतिक इतिहासकारांना तसेच विचारवंतांना शस्त्रास्त्र बंदी करणे ही काळाची गरज वाटू लागली होती. निःशस्त्रीकरण ही संकल्पना आदर्शवादी चिंतनातून उदयास आली. वास्तववादी विचारवंतांनी त्यावर टीका करताना निःशस्त्रीकरण ऐवजी शस्त्रास्त्र नियंत्रण हा मार्ग योग्य असल्याचे सांगितले. सध्याची जागतिक परिस्थिती पाहता शस्त्रास्त्र नियंत्रण याचा अर्थ काही राष्ट्रांमध्ये स्वतःचे उपद्रव मूल्य वाढवण्यासाठी व प्रतिस्पर्धी राष्ट्रांना धाक दाखवण्यासाठी शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाली आहे, अशा माणुसकीला विनाशकारी स्पर्धेपासून राष्ट्रांना परावृत्त करणे तसेच मानवी संहार करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या व अण्वस्त्राच्या निर्मितीपासून राष्ट्रांना परावृत्त करणे यासाठी शस्त्रास्त्र नियंत्रण केले जाते. नि:शस्त्रीकरण या दृष्टिकोनात राष्ट्रे अण्वस्त्रधारी, शस्त्रास्त्र संपन्न आहेत म्हणून राष्ट्रा-राष्ट्रात अतिरेकी संघर्ष माजले आहेत असे गृहीतक आहे. याउलट शस्त्रास्त्र नियंत्रण या दृष्टिकोनातून राष्ट्रा-राष्ट्रात संघर्ष आहेत म्हणून राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा व पर्यायाने राष्ट्रांची अण्वस्त्र सज्जता आहे असे गृहीत धरले जाते. राष्ट्रांमध्ये शांतता व स्थिरता निर्माण व्हावी म्हणून शस्त्रास्त्र स्पर्धेचे नियमन करणे व शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर व संशोधनावर नियंत्रण ठेवणे हा उद्देश बाळगला जातो. शस्त्रास्त्र नियंत्रणाचे एक प्रमुख आयुध म्हणजे दोन किंवा अधिक राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर मर्यादा घालणे व शस्त्रास्त्र स्पर्धेचे नियमन करण्याच्या उद्देशाने करार घडवून आणणे हे होय. शस्त्रास्त्र नियंत्रणाचे तत्व काही गृहितके मान्य करून त्यावर उपाययोजना करण्याची कृती करते. या गृहितकांमध्ये

राष्ट्रा राष्ट्रांमधील संघर्ष अटळ असणे तसेच कोणत्याही परिस्थितीत शस्त्रास्त्र पूर्णतः नष्ट न करता येणे यांसारख्या वास्तववादी गोष्टींचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्ष कमी करणे, शस्त्रास्त्र स्पर्धेचे नियमन करणे, शांततेची प्रस्थापना करणे, स्थैर्य प्रस्थापित करून राष्ट्रांना आर्थिक उन्नतीची संधी प्राप्त करवून देणे इत्यादी उद्देशांच्या पूर्ततेसाठी शस्त्रास्त्र नियंत्रण केले जाते. काही आंतरराष्ट्रीय करारान्वये शस्त्रास्त्रांची संख्या मर्यादित केली जाते तसेच अधिक शस्त्रास्त्र असतील तर त्यांत कपात केली जाते. ह्या दोन प्रकारे शस्त्रास्त्र नियंत्रण केले जाते.

नि:शस्त्रीकरण व शस्त्रास्त्र नियंत्रण विषयक काही महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय करार खालीलप्रमाणे आहेत. (टीप: करारांसमोर नमूद केलेले साल कराराचे वर्ष दर्शवित नसून करार लागू झाल्याचे वर्ष दर्शवित आहे.)

१. २६ देशांनी पारित केलेला अंटार्टिका करार १९६२.

२. अंशतः अणु चाचणी बंदी करार (Partial Test Ban Treaty - PTBT) १९६३.

३. ८३ देशांनी मान्य केलेला आउटर स्पेस करार १९८७.

४. लॅटिन अमेरिकन फ्री झोन करार १९६७.

५. आण्विक प्रसार विरोधी करार (Nuclear Non-proliferation Treaty - NPT) १९७०.

६. क्षेपणास्त्र विरोधक संरचना निर्मितीस बंदी घालण्याचा करार (Anti-Ballistic Missile Treaty - ABM) १९७२.

७. व्यूहरचनात्मक शस्त्रास्त्र नियमन करण्यासंबंधी वाटाघाटी (Strategic Arms Limitation Talks - SALT) – SALT 1- १९७२; SALT 2 १९७९.

८. जमिनीवरील अणुचाचणी बंदी करार (Threshold Test Ban Treaty - TTBT) १९७४.

९. शांततापूर्ण अणू स्फोट करार १९९०.

१०. व्यूहरचनात्मक शस्त्रास्त्रांची कपात करण्यासंबंधीच्या वाटाघाटी (Strategic Arms Reduction Talks - START) START 1- १९७२, START 2- १९७९.

११. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार १९९६.

१२. जैविक आणि विखारी अस्त्र परिषद १९७५.

१३. जैविक शस्त्रास्त्र बंदी करार १९७५.

अण्वस्त्रांचा पुर्णार्थाने नायनाट करणे ह्या आदर्शवादी धोरणातील फोलपणा लक्षात आल्यामुळे नि:शस्त्रीकरणाच्या ऐवजी शस्त्रास्त्र नियंत्रण या वास्तववादी व संपूर्ण प्रयत्न केल्यास बऱ्याच अंशी यशस्वीता प्राप्त होऊ शकते; याची जाणीव जगाचे नेतृत्व करणाऱ्या ठराविक देशांना झाल्याने त्यांनी पुढाकार घेऊन इतर गरीब व विकसनशील देशांना शस्त्रास्त्र नियंत्रणाच्या कार्यक्रमात सामील करून घेतले आहे.

## ३.१० सामूहिक सुरक्षितता

सामूहिक सुरक्षितता ही काही राष्ट्रांचे मैत्रीचे करार किंवा काही राष्ट्रांमधील शांततेचे करार यापेक्षा अधिक महत्त्वाकांक्षी प्रणाली आहे. जगातील कोणत्याही पीडित राष्ट्राच्या सुरक्षेचा प्रश्न हा आपल्या स्वतःच्या देखील राष्ट्राच्या सुरक्षेचा प्रश्न आहे असे मानून जगातील सर्वच राष्ट्रे मैत्र भावनेने त्या राष्ट्राच्या समर्थनार्थ उभी राहतात. आक्रमक राष्ट्र कितीही बलाढ्य असली तरीही सर्व राष्ट्रे संघटित होऊन, एकत्र येऊन त्या आक्रमक राष्ट्राची युद्धपिपासू वृत्ती ठेचून टाकू शकतात. राष्ट्रे संकट काळात एकमेकांसाठी गरज असेल त्या स्वरूपाची मदत करायला तयार होतात. सर्व राष्ट्रे सामुहिकरीत्या आक्रमक राष्ट्राच्या विरोधात फळी निर्माण करतात. सामूहिक सुरक्षितता ही जाणीवपूर्वक तयार करण्यात आलेली व्यवस्था असून ती युद्ध आणि आक्रमण टाळून प्रत्येक देशाचे स्वातंत्र्य आणि प्रादेशिक ऐक्य कायम राखणारी व्यवस्था असल्याचे राज्यशास्त्र शब्दकोशात नमूद आहे.

सामूहिक सुरक्षितता ही संस्थात्मक स्वरूपाची स्थिर संरचना असून ती सर्व राष्ट्रांच्या समान सहभागावर अवमवलंबून असते. सामूहिक सुरक्षिततेची काही प्रमुख अंगभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ. सामूहिक सुरक्षितता ही यंत्रणा आक्रमक व युद्धखोर राष्ट्रांच्या नियमनासाठी मुख्यत्वे तयार केली गेली.

ब. सामूहिक सुरक्षिततेच्या तंत्रात सर्व सहभागी राष्ट्रे एकमेकांच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी बांधील असतात.

क. राष्ट्रांच्या खासगी गरजांपेक्षा आंतरराष्ट्रीय हितसंबंध प्राधान्याने जपले जातात.

ड. कोणत्याही राष्ट्रावर आलेली आपत्ती ही सामूहिक सुरक्षिततेसाठी धोका मानून सर्व राष्ट्रांनी मदत करणे अपेक्षित असते, अशा वेळी सहभागी राष्ट्रे निष्क्रिय भूमिका स्वीकारू शकत नाहीत.

इ. संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती याच सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत करण्यात आली आहे.

सामूहिक सुरक्षिततेखातीर महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात काही करार पार पडले उदा. परस्पर सहकार्य करार (१९२१) इत्यादी. तरीही संयुक्त राष्ट्रसंघाकडे स्वतःचे सैन्यबळ नसणे, अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राने या संघापासून अलिप्त राहणे यांसारख्या कारणांनी हे सामूहिक सुरक्षिततेचे तत्त्व दुसरे महायुध्द थोपवू शकले नाही.

महायुद्धोत्तर कालावधीमध्ये मात्र सामूहिक सुरक्षितता या व्यवस्थेने स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणत शांतता प्रस्थापित करण्याची नवीन तंत्रे विकसित केली. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेची स्थापना करून त्यांना अधिकार बहाल केले तसेच प्ररोधन (Deterrence) ही सामूहिक कृती विकसित केली. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रे आणि सामूहिक सुरक्षितता यांमधील एकवाक्यता वाढीस लागावी यादृष्टीने प्रयत्न केले. शांतीसेना

मिळवण्यासाठीचा करार इत्यादी उपाय व तंत्रे वापरून सामूहिक सुरक्षितता ही प्रणाली आपली विश्वासार्हता कायम राखून आहे.

## ३.११ विषय विवेचन : सुरक्षा

सुरक्षा हा राजकारणाचाच एक भाग आहे. सुरक्षेचे सर्व मुद्दे हे एका अर्थाने राजकीय मुद्दे असतात. सुरक्षा हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासातील केंद्रीय विषय आहे. संघर्षाकडे पाहण्याचे वास्तववाद, उदारमतवाद, आणि रचनावाद असे विविध दृष्टिकोण आहेत. सुरक्षाच्या मुद्द्यामध्ये राष्ट्राच्या सुरक्षेपासून, समूहांची तसेच व्यक्तीची सुरक्षा हे घटकही समाविष्ट होतात. 'राज्य' किंवा 'राष्ट्रीय' सुरक्षेची कल्पना केवळ बाह्य धोक्यांपासून राज्यांच्या सीमांचे संरक्षण म्हणून चुकीची व्याख्या केली जाते. याउलट, आजच्या धोक्यांचे बदलते स्वरूप लक्षात घेता, ती प्रामुख्याने आपल्या नागरिकांचे संरक्षण, कायद्याचे राज्य आणि मानवी सुरक्षेशी संबंधित आहे. राष्ट्रीय संरक्षण. नागरिकांची सुरक्षा, अर्थव्यवस्था व संस्थांची सुरक्षा हे सरकारचे कर्तव्य मानले जाते. १९९४ च्या मानव विकास अहवालानंतर 'मानवी सुरक्षा' ही संकल्पना जोमाने आंतरराष्ट्रीय संबंधात पुढे आली. यामध्ये आर्थिक, पर्यावरण, आरोग्य, अन्न आणि राजकीय समस्यांचे स्वतंत्रपणे निराकरण करण्यासाठी तसेच व्यक्तींपुढील हिंसक धोक्यांवर लक्ष केंद्रित करून मानवी सुरक्षेची व्याख्या अरुंद पद्धतीने करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. 2001 साली जेव्हा अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला करण्यात आला, तेव्हा शस्त्रास्त्र - सज्जतेपलीकडे सुरक्षा सुनिश्चित करण्याचा मुद्दा आहे हे समोर आले. मानवी सुरक्षिततेत गुंतवणूक करणे तितकेच महत्वाचे आहे.

## ३.१२ राष्ट्रीय सुरक्षा :

राष्ट्रीय सुरक्षा ही गतिशील संकल्पना आहे. आपल्याला असे दिसून येईल की जशी जशी मानवी संस्कृती आणि सभ्यतेची प्रगती होत गेली तशी उदा. विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील विकासाबरोबर राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना उत्क्रांत होत गेलेली आहे. प्राय: राष्ट्रीय सुरक्षा ही एखाद्या राष्ट्राला परकीय स्त्रोतांकडून काय धोका आहे याबाबत वापरली जाते. मात्र, त्यानंतर तिचा विचार परकीय तसेच अंतर्गत असे दोन्ही धोके आणि एखादे राष्ट्र आपला विकास अडथळ्याशिवाय चालू ठेवण्यास किती समर्थ आहे या संदर्भात केला जाऊ लागला. दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ, शीतयुद्धाचा काळ, शीतयुद्धोत्तर काळ या काळात राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना वेगवेगळ्या अंगाने विकसित होत गेली. एकविसाव्या शतकातील नवीन आव्हाने पेलण्यासाठी आजच्या संदर्भात या संकल्पनेकडे पाहता येईल. कारण सद्यकाळात राष्ट्र-राज्य संकल्पनेतही बदल झालेले दिसतात. मात्र आजही राजकीय विश्वात राष्ट्र हा घटकच केंद्रस्थानी असल्यामुळे पर्यायाने राष्ट्रीय सुरक्षा आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये महत्वाची आहे.

राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या व्होल्टर लिपमन (Walter Lippmann) पुढीलप्रमाणे करतात.

''एखादे राष्ट्र किती सुरक्षित आहे हे पुढील दोन निकषांवरून ठरवता येते. जर त्या राष्ट्राने युद्ध टाळायचे म्हटले तर त्याकरता त्यास राष्ट्राची मूलभूत मूल्ये त्यागावी लागणार नाहीत. किंवा त्या मूल्यांना आव्हान दिल्यावर ते राष्ट्र युद्धात विजय मिळवून मूल्यांचे रक्षण करू शकेल.''

शीतयुद्धाच्या काळात राष्ट्रीय सुरक्षा वाढवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर भर देण्यात आला. अण्वस्त्र व इतर युद्धसामग्री निर्माण करण्यात गुंतवणूक करण्यात आली. तर शीतयुद्धानंतरच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेसाठी लष्करी सामग्रीपेक्षा आर्थिक विकासावर भर देण्यात आला. राष्ट्रीय सुरक्षेची चर्चा मुख्यत्वे संरक्षण खर्च, आण्विक सामग्री आणि लष्करी सामर्थ्य याभोवती फिरत असली तरी व्यापक अर्थाने त्यात राष्ट्राची समृद्धी, सामाजिक विकास याचाही समावेश करायला हवा. आर्थिक, औद्योगिक व तंत्रज्ञान प्रगती तसेच सामाजिक, सांस्कृतिक एकता आणि राजकीय व्यवस्थेची लवचिकता व स्थिरता या गोष्टी व्यापक अर्थाने राष्ट्रीय सुरक्षेमध्ये येतात.

## ३.१३ मानवी सुरक्षा :

१९९४चा संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) आणि मानव विकास अहवाल (HDR) मध्ये "मानवी सुरक्षा" हा शब्द प्रथम वापरला गेला. सुरक्षेच्या या नवीन दृष्टीकोनाने राज्यांमधील संघर्ष, राज्यांच्या सीमांचे संरक्षण आणि लष्करी उपायांवर पारंपारिक दृष्टीकोनाने जे लक्ष केंद्रित केले होते त्यापलीकडे जात सुरक्षा या संकल्पनेमध्ये आर्थिक सुरक्षा, अन्न सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, वैयक्तिक सुरक्षा, सामुदायिक सुरक्षा आणि राजकीय सुरक्षा यांचा समावेश असलेल्या मानवी सुरक्षेची व्यापक, बहुआयामी संकल्पना प्रस्तावित केली. तेव्हापासून सशस्त्र संघर्ष, मानवी हक्कांचे उल्लंघन, पर्यावरणीय आव्हाने आणि संसाधनांची वंचितता यासह मानवी असुरक्षिततेच्या अनेक कारणांना संबोधित करून, मानवी सुरक्षा ही वैयक्तिक (राज्याऐवजी) स्तरावर सुरक्षिततेची सर्वसमावेशक मुक्ती संकल्पना बनली आहे.

२००४ मध्ये, मानवतावादी व्यवहारांच्या समन्वयासाठी संयुक्त राष्ट्र सचिवालयात एक मानवी सुरक्षा युनिट तयार करण्यात आले. मानवी सुरक्षेच्या संकल्पनेने गेल्या दोन दशकांत आपली उपयुक्तता निश्चितपणे सिद्ध केली आहे. विविध राज्ये, एजन्सी आणि स्वयंसेवी संस्था यासाठी एकत्र येऊ शकल्या आहेत. मानवी संकल्पनेतील मुख्य धोके पुढीलप्रमाणे आहेत. उत्पन्न गमावणे, उपासमारीचा धोका, रोगांचा धोका, नैसर्गिक आपत्तींचा धोका आणि नागरी स्वातंत्र्याला धोका.

मानवी सुरक्षेचा अर्थ वैयक्तिक सुरक्षेचे संरक्षण आणि हिंसाचाराच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष धमक्यांपासून स्वातंत्र्य असा होतो. मानवी सुरक्षेच्या संदर्भात संघर्षांचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. सीरिया, येमेन, अफगाणिस्तान आणि युक्रेनमध्ये झालेले सीमेलगतचे व अंतर्गत संघर्ष हे याचे उदाहरण आहे. नागरी संघर्ष, दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारी हे मानवी सुरक्षेसाठीचे मुख्य धोके आहेत. देशांतर्गत अर्थाने राज्याद्वारे प्रदान केलेली राष्ट्रीय सुरक्षा केवळ लोकांच्या संरक्षणाशी सुसंगतच नाही तर दुर्बल देशांमध्ये दीर्घकालीन स्थिरता प्राप्त करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे मानवी सुरक्षेच्या चौकटीत त्याला सैद्धांतिक आणि व्यावहारिकदृष्ट्या प्राधान्य दिले पाहिजे.

राज्याची संस्थात्मक क्षमता कमकुवत झाल्यास अशा प्रदेशात मानवी सुरक्षेसाठी धोका अधिक प्रबळ होतो. तेथे राज्यबाह्य घटक प्रभावी होतात. देशाच्या सीमा कमकुवत झाल्यामुळे अंतर्गत आणि बाह्य धोके निर्माण होतात. कमकुवत सीमांचे उदाहरण १९९६-१९९७ मधील

कॉंगोमधील पहिल्या गृहयुद्धात आढळू शकते, ज्यामध्ये राज्यांच्या सीमांच्या अकार्यक्षमतेमुळे 'रवांडा आणि बुरुंडीमधील संघर्ष' झाला. त्यामुळे मानवी सुरक्षेच्या मुद्द्यासाठी राष्ट्रीय स्तरावर उपाययोजनांना प्राधान्य दिले पाहिजे. कमकुवत संस्था असलेल्या राज्यांतील नागरिक धोक्यांना अधिक प्रभावित होतात. अशा पद्धतीने मानवी सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा एकमेकांशी संबंधित आहेत.

## ३.१४ विद्यापीठीय प्रश्न

१) संघर्ष अर्थ आणि बदलते स्वरूप स्पष्ट करा.

२) संघर्षाचे प्रकार सांगून संघर्षाचे बदलते स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

३) तंत्रज्ञानातील प्रगतीचा गैरव्यापार शस्त्रास्त्रांवरील संशोधनासाठी केला जातो हे स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणातील शस्त्रास्त्रनियंत्रण व नि:शस्त्रीकरण संकल्पना स्पष्ट करा.

५) सामुहिक सुरक्षितता संकल्पना सोदाहरणासहित स्पष्ट करा.

६) सामुहिक सुरक्षिततेची संकल्पना स्पष्ट करा.

७) राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना स्पष्ट करा.

८) राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी सुरक्षा यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करा.

❄❄❄❄❄❄❄

# ४

# ब्रेटनवुडस् संस्था

# (Brettonwoods Institutions)

**घटक रचना**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ ब्रेटनवुडस संस्था (Brettonwoods Institution)

४.३.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund-IMF)

४.३.२ जागतिक बँक (World Bank- WB)

४.३.३ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization-WTO)

४.४ क्षेत्रीय आर्थिक संघटनः युरोपियन युनियन

४.५ जागतिकीकरण

४.६ समारोप

४.७ विदयपीठीय प्रश्न

४.८ संदर्भ


## ४.१ उद्दिष्टे

- ब्रेटनवूडस संस्थांचा इतिहास समजून घेणे
- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांची कार्यपद्धती समजून घेणे
- युरोपियन युनियनचे कार्य समजून घेणे
- जागतिकीकरण ही संकल्पना समजून घेणे

## ४.२ प्रस्तावना

जुलै १९४४ मध्ये ब्रेटनवूड्स, न्यू हॅम्पशायर येथील माउंट वॉशिंग्टन हॉटेलमध्ये युनायटेड नेशन्स मॉनेटरी अँड फायनान्शियल कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली. चाळीसहून अधिक देशांतील प्रतिनिधींचा सहभाग असलेल्या या परिषदेत ब्रेटनवूड्स प्रणाली या नावाने प्रचलित एक नवीन आंतरराष्ट्रीय चलन प्रणाली तयार केली. मागील सुवर्ण मानकपद्धतीतील दोष आणि आर्थिक महामंदीचा अनुभव पाहता युद्धानंतरच्या काळात आर्थिक पुनर्रचना करणे हा या परिषदेचा चर्चाविषय होता. प्रचलित आंतरराष्ट्रीय चलन प्रणालीची ताठरता कमी करीत त्या प्रणालीतील देशांमध्ये सहकार्य वाढीस लावणे हेही तितकेच आवश्यक होते.

वस्तुतः पहिल्या महायुद्धानंतर सुवर्ण मानकपद्धती सोडण्यात आली होती. मात्र दोन महायुद्धांदरम्यानच्या कालावधीत युरोपियन राष्ट्रांनी स्पर्धात्मक अवमूल्यन आणि प्रतिबंधात्मक व्यापार धोरणे स्विकारल्याने जगभरात महामंदीची स्थिती उद्भवली होती.

अशावेळी ब्रेटनवूड्स परिषदेत स्पर्धात्मक अवमूल्यन टाळत, आर्थिक वाढीस प्रोत्साहन देईल तसेच विनिमय दरात स्थिरता आणू शकेल अशा आंतरराष्ट्रीय चलन प्रणालीची कल्पना करण्यात आली. या परिषदेत सहभागी राष्ट्रांनी नवीन प्रणालीच्या उद्दिष्टांवर आपली सहमती दर्शविली असली तरी अंमलबजावणीबाबत मात्र त्यांचे एकमत होत नव्हते. चर्चांसाठी असंख्य द्विपक्षीय आणि बहुपक्षीय बैठका घेण्यात आल्या. शेवटी आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणाची प्रमुख जबाबदारी अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी हेन्री मॉर्गन्थॉ, त्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार हॅरी डेक्सटर व्हाईट आणि ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स या तिघांकडे सोपविण्यात आली. यातूनच ब्रेटनवूडस संस्थांचा उगम झाला.

जागतिक बँक (WB) आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) या ब्रेटनवूड्स संस्था या नावाने प्रसिद्ध आहेत. मूळ ब्रेटनवूड्स करारामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (ITO) च्या स्थापनेचाही विचार करण्यात आला होता. मात्र १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस जागतिक व्यापार संघटना (WTO) तयार होईपर्यंत ही योजना सुप्त राहिली.

## ४.३ ब्रेटनवुडस् संस्था

### ४.३.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund-IMF)

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ही १९० सदस्य देशांची एक वित्तीय संघटना आहे. IMF ची संकल्पना ब्रेटनवूड्स परिषदेत स्वीकारण्यात आली. या परिषदेतील ४४ देशांनी १९३०च्या महामंदीला कारणीभूत असलेल्या स्पर्धात्मक अवमूल्यनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच परस्पर आर्थिक सहकार्यासाठी एक आकृतिबंध तयार करण्याचा प्रयत्न केला. यानुसार प्रत्येक सदस्य राष्ट्राला IMF च्या कार्यकारी मंडळावर त्याच्या आर्थिक क्षमतेच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. ज्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्वात शक्तिशाली देशांना सर्वाधिक मतदानाचा अधिकार आहे. सुरवातीला IMF चे सदस्य असल्याशिवाय देश इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट (IBRD) मध्ये सदस्यत्वासाठी पात्र नव्हते. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी ब्रेटनवूड्स करारानुसार IMF ने निश्चित विनिमय दरांवर परिवर्तनीय चलनांची प्रणाली सुरू केली आणि अधिकृत राखीव ठेवीसाठी सोन्याला यूएस डॉलरमध्ये ($३५ प्रति औंस दराने) बदलले. २७ डिसेंबर १९४५ रोजी IMF २९सदस्य देशांसह कार्यान्वित झाली आणि १ मार्च १९४७ रोजी त्याचे प्रत्यक्ष आर्थिक कामकाज सुरू झाले.

**IMF चा इतिहास**

१९७१ मध्ये अमेरिकेने अमेरिकन डॉलरला (आणि इतर सरकारांकडे असलेले डॉलर रिझर्व्ह) सोन्यात परावर्तित करण्यास नकार देताच (याला निक्सन शॉक असे म्हणतात) ब्रेटनवूड्सची विनिमय दर प्रणाली कोलमडली. त्यानंतर IMF ने तरल विनियम दर व्यवस्थेला (Floating Exchange Rate System) प्रोत्साहन दिले. यानुसार देश आपली

विनिमय व्यवस्था निवडण्यास स्वतंत्र असून, बाजार शक्ती एकमेकांच्या सापेक्ष चलनांचे मूल्य निर्धारित करु शकतात. ही व्यवस्था आजही कायम आहे

यानंतर सर्वप्रथम १९७३ च्या तेलाच्या संकटादरम्यान IMF ने अंदाज लावला की १०० तेल-आयात करणाऱ्या विकसनशील देशांचे विदेशी कर्ज १९७३ ते १९७७ दरम्यान १५०% ने वाढले असून ते जागतिक स्तरावर फ्लोटिंग एक्स्चेंज रेटमध्ये बदलल्यामुळे आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. यावर उपाय म्हणून IMF ने १९७४ ते १९७६ या कालावधीत तेल सुविधा नावाचा एक नवीन कर्ज कार्यक्रम सुरु केला.

त्यानंतर १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर, IMF ने पूर्वीच्या सोव्हिएत गटातील देशांना केंद्रीय नियोजनातून बाजार-चालित अर्थव्यवस्थांमध्ये संक्रमण करण्यात मदत करण्यात मध्यवर्ती भूमिका बजावली. १९९८-२००२ या कालावधीत आर्थिक संकटातून जात असलेल्या अनेक देशांना IMF ने कर्ज आणि बेलआउट पॅकेज प्रदान केले. तर २००८ च्या आर्थिक महामंदीला सक्षमपणे प्रतिसाद देण्यासाठी IMF ने मोठे उपक्रम हाती घेतले. या उपक्रमांमध्ये स्पिल-ओव्हर्स (जेव्हा एका देशातील आर्थिक धोरणे इतरांवर परिणाम करू शकतात). पाळत ठेवण्यासाठी कायदेशीर चौकटीत सुधारणा करणे, जोखीम आणि वित्तीय प्रणालींचे सखोल विश्लेषण करणे, सदस्यांच्या बाह्य स्थितीचे मूल्यांकन वाढवणे आणि चिंतांना अधिक तत्परतेने प्रतिसाद देणे यासारख्या उपक्रमांचा समावेश करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेतील प्रमुख संस्थांपैकी IMF ही एक संस्था असून IMF मुळे आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीच्या पुनर्बांधणीत राष्ट्रीय आर्थिक सार्वभौमत्व आणि मानवी कल्याणाचा समतोल साधता आला आहे.

**IMF ची उद्दिष्टे-**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ही ब्रेटनवुडस संघटना असून तिची ठळक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- जागतिक आर्थिक सहकार्य वाढवणे
- सुरक्षित आर्थिक स्थिरता
- आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ करणे
- उच्च रोजगार आणि शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देणे आणि जगभरातील गरिबी कमी करणे
- स्थूल आर्थिक वाढ घडवून आणणे
- विकसनशील देशांसाठी धोरण सल्ला आणि वित्तपुरवठा करणे
- विनिमय दर स्थिरता आणि आंतरराष्ट्रीय पेमेंट सिस्टमला प्रोत्साहन देणे

**IMF चे कार्य आणि जबाबदाऱ्या**

IMF मुख्यत्वे सदस्य देशांना क्रेडिट प्रदान करण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेवर देखरेख करण्यावर लक्ष केंद्रित करते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची कार्ये तीन प्रकारांमध्ये विभागली जातात.

१. **नियामक कार्ये :** IMF एक नियामक संस्था म्हणून कार्य करते. करारातील कलमांच्या नियमांनुसार ते विनिमय दर धोरणांसाठी आवश्यक आचारसंहिता आणि चालू खात्यातील व्यवहारांसाठी देयकांवर निर्बंध लागू करण्यावर लक्ष ठेवते. केंद्रीय बँक कर आकारणीपासून ते स्थूल अर्थशास्त्रीय तथ्य अहवाल प्रसिद्ध करणे हे IMF चे प्रारंभिक अधिकारक्षेत्र आहे. याशिवाय IMF ही केंद्रीय बँका, वित्त मंत्रालये, महसूल प्रशासन आणि वित्तीय क्षेत्रातील पर्यवेक्षी संस्थांसह सरकारांना तांत्रिक सहाय्य आणि प्रशिक्षण प्रदान करते. अशा प्रकारचे प्रशिक्षण देशांना उत्पन्न असमानता, लैंगिक समानता, भ्रष्टाचार आणि हवामान बदल यासारख्या समस्यांना सामोरे जाण्यास मदत करते.

२. **आर्थिक कार्ये :** IMF सदस्य देशांना अल्प तसेच मध्यम मुदतीच्या व्यवहारतोलातील (BOP) असमतोल दूर करण्यासाठी करण्यासाठी अर्थसहाय्य आणि संसाधने प्रदान करते. यात आणीबाणीच्या कर्जासह राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय साठा पुनर्बांधणी करणे, त्यांची चलने स्थिर करणे, आयातीसाठी पैसे देणे सुरू ठेवणे आणि मूलभूत समस्या दुरुस्त करताना मजबूत आर्थिक वाढीसाठी परिस्थिती पुनर्संचयित करणे याचाही समावेश होतो.

३. **सल्लागार कार्ये :** IMF हे सदस्य देशांसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचे केंद्र आहे. हे सल्ला आणि तांत्रिक सहाय्याचे स्त्रोत म्हणून देखील कार्य करते. आर्थिक जोखीम ओळखण्यासाठी तसेच वाढ आणि आर्थिक स्थिरतेसाठी धोरणांची शिफारस करण्यासाठी IMF नियमितपणे आंतरराष्ट्रीय चलन प्रणाली आणि जागतिक आर्थिक घडामोडींचे निरीक्षण करत असते. IMF त्याच्या १९० सदस्य देशांच्या आर्थिक धोरणांची नियमित तपासणीदेखील करते. याव्यतिरिक्त IMF त्याच्या सदस्य देशांच्या आर्थिक स्थिरतेसाठी संभाव्य धोके ओळखत त्यांच्या सरकारांना संभाव्य धोरण समायोजनांबद्दल सल्ला देते.

### ४.३.२ जागतिक बँक (World Bank- WB)

जगातील सर्वात मोठी बहुपक्षीय कर्जदार संस्था म्हणून जागतिक बँकेकडे पाहिले जाते. सदस्य देशांच्या आर्थिक विकासास हातभार लावणाऱ्या प्रकल्पांना वित्तपुरवठा करणारी जागतिक बँक ही संयुक्त राष्ट्र (UN) संघटनेशी संलग्न संस्था आहे. जागतिक बँक संयुक्त राष्ट्रांशी संबंधित असली तरी ती आमसभा किंवा सुरक्षा परिषदेला जबाबदार नाही. बँकेच्या १८० पेक्षा जास्त सदस्य राज्यांपैकी प्रत्येकाचे बोर्ड ऑफ गव्हर्नर्सवर प्रतिनिधित्व केले जाते, जे वर्षातून एकदा भेटतात. गव्हर्नर हे सहसा त्यांच्या देशांचे अर्थमंत्री किंवा मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर असतात. IBRD धोरणांवर गव्हर्नर मंडळाचा काही प्रभाव असला तरी वास्तविक निर्णय घेण्याची शक्ती मोठ्या प्रमाणावर बँकेच्या २५ कार्यकारी संचालकांकडे असते. अमेरिका, जपान, जर्मनी, युनायटेड किंगडम आणि फ्रान्स हे पाच प्रमुख देश त्यांचे स्वतःचे कार्यकारी संचालक नियुक्त करतात. इतर देशांना विभागांमध्ये विभागण्यात आले असून या प्रत्येक विभागातून एक कार्यकारी संचालक निवडला जातो. संचालक मंडळातील मतदानाची शक्ती ही देशाच्या भांडवली ठेवीवर आधारित असते. श्रीमंत आणि अधिक विकसित देश हे अधिक भांडवली ठेवीमुळे बँकेचे प्रमुख भागधारक असल्याने त्यांचा निर्णयक्षमतेत अधिक प्रभाव जाणवतो. जागतिक बँक ही आपल्या सदस्य देशांच्या भांडवली ठेवी, भांडवली बाजारातील बाँड तरलता आणि IBRD आणि IFC कर्जावरील व्याज पेमेंटमधून जमा

झालेल्या निव्वळ कमाईतून निधी मिळवते. सदस्यत्व स्विकारलेल्या देशांच्या भांडवलाचा अंदाजे एक दशांश थेट बँकेला दिला जातो.

जागतिक बँक ही इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट (IBRD), इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन (IDA), इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन (IFC), मल्टीलेटरल इन्व्हेस्टमेंट गॅरंटी एजन्सी (MIGA), आणि इंटरनॅशनल सेंटर फॉर सेटलमेंट ऑफ इन्व्हेस्टमेंट डिस्प्युट (ICSID) या पाच घटक संस्थांचा समुच्चय आहे. यापैकी IBRD ही मध्यम-उत्पन्न असलेल्या विकसनशील देशांना तसेच अल्पउत्पन्न देशांना बाजार व्याजदराने कर्ज पुरवते. १९६० मध्ये स्थापन झालेली IDA, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकास यासारख्या क्षेत्रांमध्ये कमी उत्पन्न असलेल्या विकसनशील देशांना व्याजमुक्त दीर्घकालीन कर्ज, तांत्रिक सहाय्य आणि धोरण सल्ला प्रदान करते. IBRD आपला बहुतांश निधी जगातील भांडवली बाजारांवर उभा करत असताना मात्र IDA च्या कर्ज ऑपरेशनला विकसित देशांच्या योगदानाद्वारे वित्तपुरवठा केला जातो. IFC ही खाजगी गुंतवणूकदारांच्या भागीदारीत कार्यरत असून विकसनशील देशांमधील व्यवसाय उपक्रमांना कर्ज आणि इक्विटी वित्तपुरवठा प्रदान करते. विकसनशील देशांमधील गैर-व्यावसायिक जोखमींमुळे होणाऱ्या नुकसानाविरूद्ध विदेशी गुंतवणूकदारांना कर्ज हमी आणि विमा MIGA द्वारे प्रदान केला जातो. शेवटी, ICSID जे IBRD पासून स्वतंत्रपणे कार्य करते, परकीय गुंतवणूकदार आणि त्यांचे यजमान विकसनशील देश यांच्यातील गुंतवणूक विवादांचे सामंजस्य किंवा लवादाद्वारे तोडगा काढण्यासाठी जबाबदार आहे.

जागतिक बँक हा विकसनशील देशांकरीता आर्थिक मदतीचा सर्वात मोठा स्त्रोत असून, आंतरराष्ट्रीय कर्जदारांच्या वतीने बँकेमार्फत मुक्त बाजारपेठ अंमलात आणण्यासाठी तांत्रिक सहाय्य, धोरण सल्ला आणि पर्यवेक्षण देखील प्रदान केले जाते. आर्थिक धोरणांवर देखरेख, विकसनशील देशांमधील सार्वजनिक संस्थांमध्ये सुधारणा करणे आणि आंतरराष्ट्रीय स्थुल अर्थशास्त्रीय धोरण निश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक व्यापार संघटनेसोबत जागतिक बँक मध्यवर्ती भूमिका बजावते.

१९८० च्या दशकाच्या सुरुवातीस जागतिक अर्थव्यवस्थेतील मंदी, उच्च व्याजदर, वस्तूंच्या किमतीत झालेली घसरण आणि तेलाच्या किमतीतील व्यापक चढउतार यामुळे अनेक विकसनशील देश त्यांच्या कर्जाची परतफेड करु शकले नाही. अशावेळी जागतिक बँकेने कर्जबाजारी विकसनशील देशांमध्ये आर्थिक आणि सामाजिक धोरणे ठरवण्यात महत्वाची भूमिका बजावली. अशावेळी जागतिक बँकेने आपल्या रचनात्मक सुधारणा कार्यक्रमांच्या माध्यमातून आरोग्य आणि शिक्षणक्षेत्रात खर्चकपात, किंमत नियंत्रणांचे उच्चाटन, व्यापाराचे उदारीकरण, आर्थिक क्षेत्र नियंत्रणमुक्त करणे आणि सरकारी उद्योगांचे खाजगीकरण यासारखी पाऊले उचलली. आर्थिक स्थैर्य स्थापित करण्यासाठी जरी या सुधारणा कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली असली तरी त्यामुळे गरिबीची पातळी तसेच बेरोजगारी वाढली.

कर्जाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेने रस्ते, बंदर सुविधा, शाळा आणि रुग्णालये यांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य देण्यावर आपले प्रयत्न केंद्रित केले. जगातील अल्पविकसित देशांसाठी गरिबी निर्मूलन आणि कर्जमुक्तीवर

भर दिला जात असला तरी बँकेने आर्थिक स्थिरीकरण धोरणांसाठी आपली वचनबद्धता कायम ठेवली आहे.१९८० आणि ९० च्या दशकात साम्यवादाच्या पतनानंतर पूर्व आणि मध्य युरोपमध्ये मुक्त-मार्केट सुधारणांवर देखरेख करण्यासाठी जागतिक बँक आणि IMF ने मध्यवर्ती भूमिका बजावली.

### ४.३.३ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization-WTO)

जागतिक व्यापार संघटना (WTO) ही जागतिक व्यापाराचे देखरेख आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेस अधिक उदारीकरणाचे स्वरुप देण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय संस्था आहे. WTO ही जकात आणि व्यापारविषयक सामान्य सहमती (GATT) या कराराचे अपत्य मानली जाते. १९४७ मध्ये जेव्हा GATT स्विकारण्यात आला तेव्हा या कराराचे स्वरुप हे अस्थायी होते. नजीकच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेसारखी (ITO) संघटना या कराराची जागा घेईल असे अपेक्षित होते. मात्र ITO कधीच प्रत्यक्षात येऊ शकले नाही. त्यामुळे नंतरच्या काळात GATT द्वारे जागतिक व्यापारात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण सादर करण्यात आले. ITO ची कल्पना सुरुवातीला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँकेसह, द्वितीय विश्वयुद्धानंतरच्या पुनर्रचना आणि आर्थिक विकासाच्या प्रमुख स्तंभांपैकी एक म्हणून करण्यात आली होती. हवाना येथे १९४८ मध्ये व्यापार आणि रोजगारावरील UN परिषदेने ITO साठी एक मसुदा चार्टर काढण्यात आला. याला 'हवाना चार्टर' असेही म्हणतात. हवाना चार्टरमध्ये व्यापार, गुंतवणूक, सेवा आणि व्यवसाय आणि रोजगार पद्धती नियंत्रित करणारे विस्तृत नियम तयार करण्यात आले होते. मात्र, अमेरिकेने या कराराला मान्यता देण्यास नकार दिला. दरम्यान, १९४७ मध्ये जिनिव्हा येथे २३ देशांनी वाटाघाटी करून आयात कोट्याचा वापर टप्याटप्याने समाप्त करण्याचा आणि व्यापारी व्यापारावरील शुल्क कमी करण्याचा करार GATT म्हणून १ जानेवारी १९४८ रोजी अंमलात आला. जरी GATT चे स्वरुप अस्थायी होते तरी WTO ची निर्मिती होईपर्यंत GATT हा आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करणारा एकमेव मोठा करार होता. GATT प्रणालीत सुरवातीच्या ४७ वर्षांत तब्बल १३० देश सामील झाले. या देशांत GATT मुळे विविध वाटाघाटींच्या फेऱ्या घडून आल्या व आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक अनेक पूरक संधी, तह, करार घडून आले.

१९८० नंतर विशेषतः आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेख ठेवण्यासाठी आणि व्यापारविषयक विवादांचे निराकरण करण्यासाठी स्थिर संघटनेची मागणी होऊ लागली. यातूनच GATT च्या उरुग्वे फेरीनंतर (१९८६-९४) १ जानेवारी १९९५ रोजी WTO ची स्थापना करण्यात आली. उरुग्वे फेरीतील वाटाघाटीदरम्यान मूळ GATT आणि उरुग्वे फेरीच्या आधी सादर करण्यात आलेल्या सर्व बदलांना GATT १९४७ असे नामकरण करण्यात आले. कराराचा हा संच GATT १९९४ पेक्षा वेगळा करण्यात आला. WTO ची स्थापना करणारा GATT करार १९९४ हा अविभाज्य भाग मानला जातो. GATT १९९४ मध्ये वस्तू तसेच व्यापाराशी निगडीत इतरही अनेक बहुपक्षीय करार समाविष्ट होते. ज्यामध्ये सेवाविषयक व्यापारातील समान सहमती करार (GATS), बौद्धिक संपदा अधिकारांच्या व्यापार-संबंधित पैलूंवर करार (TRIPS) यांसारख्या सहमती करारांचा समावेश होता.

**WTO ची प्रमुख उद्दिष्टे**

जागतिक व्यापार संघटना ही पुढील प्रमुख उद्दिष्टांसाठी प्रयत्नरत आहे.

१. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी नियम निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे
२. पुढील व्यापार उदारीकरणासाठी वाटाघाटी आणि देखरेखीसाठी एक मंच प्रदान करणे
३. राष्ट्रा-राष्ट्रातील व्यापारविषयक वादविवाद सोडविणे.
४. पारदर्शकता वाढवणे. निर्णय घेण्याची प्रक्रिया
५. जागतिक आर्थिक व्यवस्थापनात सामील असलेल्या इतर प्रमुख आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांना सहकार्य करणे
६. विकसनशील देशांना जागतिक व्यापार प्रणालीचा पूर्ण फायदा होण्यास मदत करणे.

या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी WTO ने अधिक व्यापकपणे पाठपुरावा केला असून सर्व वस्तू, सेवा आणि बौद्धिक संपदा, तसेच काही गुंतवणूक धोरणे यांचाही समावेश केला आहे.

## ४.४ क्षेत्रिय आर्थिक संघटनः युरोपियन युनियन

युरोपियन युनियन (EU) ही युरोपियन देशांचा समावेश असलेली एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. या संस्थेतील सदस्य देशांचे सार्वभौमत्व अबाधित राखत राजकीय आणि आर्थिक निर्णय घेतले जातात. युरोपियन युनियनचे स्वरुप हे काहीसे फेडरेशन किंवा कॉन्फेडरेशनच्या स्वरूपाचे मानले जाते. त्यामुळे युरोपियन युनियनचे सर्व नियम आणि निर्णय सदस्य देशांकरीता बांधील ठरतात.

युरोपियन युनियनचे सदस्यत्व मिळवतांना सदस्य राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या युरोपियन कन्व्हेन्शनचा स्वीकार करणे तसेच युरोप कौन्सिलमधील सदस्यत्व मिळवणे गरजेचे असते. युरोपियन युनियन सदस्य राष्ट्रांसाठी समान परराष्ट्र तसेच सुरक्षा धोरण निर्धारित करते. ज्यामुळे सदस्य राष्ट्रांच्या किमान समान राजकीय तसेच सुरक्षाविषयक हितसंबंधांची पूर्तता करणे शक्य होते.

आर्थिक बाबतींत युरोपियन युनियनने युरोपियन समान बाजारपेठ (European Single Market) विकसित केले आहे. या समान बाजारपेठव्यवस्थेमुळे वस्तू, सेवा आणि भांडवलाचे मुक्त वहन शक्य होते. याशिवाय बाह्य व्यापार, शेती, मत्स्यपालन आणि प्रादेशिक विकास यांच्या विकासासाठीही स्वतंत्र धोरणे विकसीत करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे युरोपियन युनियनअंतर्गत युरो हे समान चलन (Common Currency) तयार करण्यात आले असून त्याचा वापर युरोपच्या बहुतांश क्षेत्रात होतांना दिसतो.

दुसऱ्या महायुद्धाचे कारण ठरलेल्या आत्यंतिक राष्ट्रवादास आळा घालता यावा या दृष्टीने प्रमुख युरोपियन नेत्यांनी युरोपच्या एकत्रीकरणाची योजना मांडली होती. विन्स्टन चर्चिल यांनी पुढे जाऊन युनायटेड स्टेट्स ऑफ युरोपच्या उदयाचा पुरस्कार केला. यानंतर १९४८ च्या हेग कॉंग्रेसद्वारे टप्याटप्याने का होईना युरोपियन युनियनच्या पूर्वज मानल्या जाणाऱ्या वेस्टर्न युनियन, युरोपियन कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC) आणि युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी (EEC) संघटनांची स्थापना झाली. फ्रान्स, इटली, नेदरलँड,

बेल्जियम, पश्चिम जर्मनी आणि लक्झेंबर्ग हे या युरोपियन कम्युनिटीचे संस्थापक सदस्य देश होते.

युरोपियन युनियनची स्थापना १९९३ मध्ये करण्यात आली. मास्ट्रिच करार ज्याला युरोपियन युनियनचा करार असेही म्हणतात; या करारावर २८ देशांनी १९९३ मध्ये स्वाक्षरी करण्यात आली. ॲम्सटरडॅमचा करार (१९९७), ट्रिटी ऑफ नाइस (२००१) आणि लिस्बनचा तह (२००७) या सुधारणांतून मास्ट्रिच करारात सुधारणा करण्यात आली. वर्तमानकाळात युरोपियन युनियनचे महत्वाचे निर्णय युरोपियन संसद, युरोपियन कौन्सिल, युरोपियन कमिशन, युरोपियन युनियन परिषद, युरोपियन युनियनचे न्यायालय, युरोपियन सेंट्रल बँक आणि युरोपियन कोर्ट ऑफ ऑडिटर्स या घटकांकडून घेतले जातात.

युरोपियन युनियनची उद्दिष्टे

१. सदस्य राष्ट्रांत राजकीय, आर्थिक, व्यापारी, सामाजिक सहकार्य वाढवणे
२. एका चलनव्यवस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करून आर्थिक एकात्मता वाढवणे.
३. समान सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी प्रयत्न करणे.
४. संपूर्ण नागरिकत्वासाठी एकासमान नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे.
५. न्यायपालिका आणि आश्रय या क्षेत्रांमध्ये वर्धित सहकार्य.

**युरोपियन युनियन आणि आर्थिक एकीकरण -**

आर्थिक एकीकरण ही राष्ट्रा-राष्ट्रांमधील व्यापारातील अडथळे कमी करणे किंवा दूर करणे आणि आर्थिक आणि वित्तीय धोरणांचे समन्वय साधणे यासाठी निर्माण करण्यात येणारी एक व्यवस्था आहे. आर्थिक एकीकरणाचे उद्दिष्ट ग्राहक आणि उत्पादक दोघांसाठी खर्च कमी करणे आणि करारामध्ये सामील असलेल्या देशांमधील व्यापार वाढवणे आहे. आर्थिक एकीकरण बहुतेक वेळा शेजारील राष्ट्रांमध्ये होत असल्याने त्याला प्रादेशिक एकात्मता असेही संबोधले जाते.

युरोपियन युनियनचा आर्थिक गाभा हा समान बाजारपेठ व्यवस्था हा आहे. वस्तू, सेवा, श्रम आणि भांडवल यांच्या मुक्त संचारातून  ही व्यवस्था उदयास आली आहे. सुरवातीला सीमाशुल्क युनियनमधून विकसित झाल्यानंतर समान बाजारपेठ व्यवस्थेने जकात आणि कोटा यांसारख्या अडचणींवर मात केली. युरोपियन युनियनमध्ये समान बाजारपेठ व्यवस्था विकसित करण्यात युरोपियन कोर्ट ऑफ जस्टिसची भूमिका महत्वाची ठरली.

समान बाजारपेठ व्यवस्थेप्रमाणे युरोची निर्मिती हादेखील युरोपियनचा युनियनच्या आर्थिक एकत्रीकरणाचा महत्वाचा भाग सांगता येईल.  समान चलनाची मागणी ही १९६० पासून जोर धरत होती. परंतु युरोपियन युनियन आणि प्रादेशिक आर्थिक एकीकरण अशी दुहेरी उद्दिष्टे कशी साध्य करावयाची याबाबत मतभेद असल्याने ही मागणी मागे पडली होती. विशेषतः सुरक्षा आणि चलनव्यवस्था या देशांच्या सार्वभौमत्वाशी जोडलेल्या संकल्पना असल्याने या अडचणी वाढल्या होत्या.

यानंतर १९७० च्या सुरुवातीच्या काळात तेलाच्या किमती वाढू लागल्याने मर्यादित आर्थिक सहकार्य मागे पडले. अशावेळी योम किप्पूर युद्धाच्या पार्श्वभूमीवर अधिक व्यापक युरोपीय

चलन प्रणाली १९७९ मध्ये सादर करण्यात आली. यामुळे विनिमय दर स्थिर करण्यात काहीसे यश आले व समान चलन निर्मितीचा मार्ग मोकळा झाला. युरो या समान चलनाचा स्वीकार १९९५ मध्ये करण्यात आला. या चलनाचा वापर युरोपियन युनियनच्या २७ सदस्य राष्ट्रांपैकी १९ देशांद्वारे केला जातो.

## ४.५ जागतिकीकरण

जागतिकीकरण ही सीमाविरहित जग या विचारावर आधारित संकल्पना आहे. जागतिक खेडे किंवा हे विश्वची माझे घर यासारख्या संकल्पनांत जागतिकीकरणाचा वापर होतांना दिसतो. जागतिकीकरण ही लोकशाही आणि भांडवलशाही या दोन घटकांतून निर्माण झालेली उत्पत्ती आहे. मुक्त व्यापार आणि भांडवल आणि श्रम यांच्या आंतरराष्ट्रीय हालचालींद्वारे या जागतिकीकरणाचा प्रसार झाला. राजकीयदृष्ट्या जागतिकीकरण हे संदर्भ आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे जागतिक शासन वाढवणे किंवा राष्ट्रीय धोरणांचे तादात्मिकरण साधण्याशी निगडीत आहे. मुक्त-बाजार भांडवलशाही आणि उदारमतवादी लोकशाही हा समाज संघटित करण्याचा सर्वोत्तम मार्ग होता या विचाराचाही जागतिकीकरणाशी संबंध जोडला जातो.

जागतिकीकणास डिजीटल क्रांती, आंतरर्रराष्ट्रीय आर्थिक एकीकरण, सामाजिक-सांस्कृतिक संयोग, जागतिक शिक्षणपद्धतीचा उदय, सीमापार राजकीय प्रभाव, वित्तीय उदारीकरण, तीव्र स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढ यासारखी कारणे महत्वाची मानली जातात.

जागतिकीकरण म्हणजे 'मुक्त', 'सीमाविरहीत', जागतिक अर्थव्यवस्था' निर्माण करण्यासाठी देशांमधील हालचालींवर सरकारने लादलेले निर्बंध काढून टाकण्याची प्रक्रिया. अशा प्रकारे जागतिकीकरणाला शक्तिशाली आर्थिक, राजकीय आणि सामाजिक परिमाण आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय सीमांना मर्यादा आहेत. त्यामुळे जागतिकीकृत अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय सीमा मोठ्या प्रमाणात अप्रासंगिक बनल्या आहेत. जागतिकीकृत अर्थव्यवस्थेत राष्ट्राचे सार्वभौमत्व खालील भू-वास्तवांद्वारे संरक्षित केले जाऊ शकते.

अनेक समीक्षकांनी एखाद्या राष्ट्रात जागतिकीकरणाची सुरुवात करणे हे राष्ट्रीय सार्वभौमत्व बहुराष्ट्रीय कंपनीच्या स्वाधीन करण्यासारखे मानले आहे. भारतात जागतिकीकृत अर्थव्यवस्था समाजवादी पायावर बांधली गेली आहे. गरिबी, निरक्षरता आणि असमानतेच्या संदर्भात उदारीकृत अर्थव्यवस्थेचा परिचय मोठ्या प्रमाणावर विरोध आणि कामगार अशांततेला कारणीभूत ठरु शकतो याची जाणीव भारतातील शासकांना आहे. राष्ट्राच्या सार्वभौमत्वाने IMF आणि WB सारख्या अतिराष्ट्रीय आणि अतिरिक्त-प्रादेशिक शासनाच्या संकल्पनांना मार्ग दिला आहे. पुढे हे बदल आंतरराष्ट्रीय करार आणि राष्ट्रीय धोरणांद्वारे वैध केले जात आहेत. दुसरीकडे मानवाधिकारांचे रक्षक आणि हमीदार असलेल्या राज्याच्या भूमिकेतही लक्षणीय बदल झाला आहे. या संदर्भात राज्याचे अधिकार अंशत: मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरनाम्याच्या चष्म्यातून तपासले जात आहेत. मानवाधिकारांच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांमुळे पोलिस आणि न्यायालये यांसारख्या राष्ट्रीय संस्थांच्या अधिकारावर घाला घातला जातांना दिसत आहे.

थोडक्यात, जागतिकीकरण ही गतिमान आणि सर्वव्यापी प्रक्रिया आहे. मात्र या प्रक्रियेतून राष्ट्रीय सार्वभौमत्वासारख्या कल्पनांवर आघात होतांना दिसत आहे.

## ४.६ समारोप

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक अर्थव्यवस्था कोलमडली होती. जग हे द्विधृवीय बनत असतांनाच जागतिक अर्थव्यवस्थेस चालना देणे गरजेचे आहे याची जाणीव प्रमुख युरोपियन देश आणि अमेरिका यांना होती. यातूनच ब्रेटनवूडस संस्थांचा उगम झाला. या संस्थांचा उद्देश जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्थेस गतिमान करणे हा आहे.

दुसरीकडे युरोपियन युनियनसारख्या संस्था आर्थिक ऐक्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडत असून क्षेत्रीय आर्थिक सहकार्याचा नवीन मापदंड यातून विकसीत होत आहे. जागतिकीकरणासारख्या घटकांचा शीतयुद्धोत्तर काळात मानवी जीवनावर दीर्घकालीन परिणाम झाले असून या प्रक्रियेस अटकाव घालणे आता अशक्य आहे.

## ४.७ विदयपीठीय प्रश्न

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संघटनेचा इतिहास आणि कार्ये स्पष्ट करा.
- जागतिक बँकेची संरचना स्पष्ट करा
- जागतिक व्यापार संघटनेची स्थापना आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.
- टिपा लिहा
    - युरोपियन युनियन
    - जागतिकीकरण

## ४.८ संदर्भ

- The Globalization of World Politics - An Introduction to International Relations (Baylis and Smith)
  International Relations (Joshua S. Goldstein)

❄❄❄❄❄❄❄

# १

# संकल्पना आणि दृष्टिकोन

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण

१.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी दृष्टिकोन

१.५ नववास्तववाद

१.६ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा उदारमतवादी दृष्टिकोन

१.७ सत्तेची संकल्पना

१.८ राष्ट्रीय हित

१.९ सत्तासंतुलन / सत्तासमतोल

१.१० विद्यापीठीय प्रश्न

## १.१ उद्दिष्टे

१) आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यातील फरक, स्वरूप, व्याप्ती समजून घेणे.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे प्रमुख दृष्टिकोन (वास्तववाद - नववास्तववाद, उदारमतवाद - नवउदारमतवाद) समजून घेणे

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाला आकार देणाऱ्या, त्यावर प्रभाव पाडणाऱ्या प्रमुख संकल्पनांचा अभ्यास करणे.

## १.२ प्रस्तावना

विश्व हे व्यापक आणि गुंतागुंतीचे आहे. यात राष्ट्रांमध्ये अनेक प्रकारच्या आणि विविध पातळ्यांवर क्रिया-प्रतिक्रिया चालू असतात, या क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये होतो. आंतरराष्ट्रीय संबंध हे जगातील लोकांशी व त्यांच्या संस्कृतीशी संबंधित आहे. राष्ट्रांमधील संबंधाची प्रक्रिया गुंतागुंतीची आणि परस्परपूरक असते. हे संबंध केवळ इतर राष्ट्रांशीच नसून आंतरराष्ट्रीय संघटना, बहुराष्ट्रीय संस्था, व्यक्तिशी असल्याने व आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पातळीवर असल्याने अधिक गुंतागुंतीची बनली आहे. आज २१ व्या शतकातही आंतरराष्ट्रीय समुदायातील सार्वभौम राष्ट्रांची संख्या सतत वाढत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य असणाऱ्या सार्वभौम राष्ट्राची संख्या १८० हून अधिक आहे. बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्रांमधील परस्पर संबंध, आंतरराष्ट्रीय प्रश्न,

समस्यांचे स्वरूपही बदलत आहे. आंतरराष्ट्रीय समुदायात काढणे कोणतेही राष्ट्र स्वयंपूर्ण नाही. राष्ट्रांना आपल्या गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. वैश्विकरणाच्या प्रक्रियेबरोबरच राष्ट्रा-राष्ट्रांतील परस्परावलंबित्व अधिक वाढले आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचे महत्त्वदेखील वाढले आहे.

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचा संबंध केवळ शासनाशी किंवा परराष्ट्र धोरणनिर्मिती प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या घटकांशी नाही. हा विषय आपल्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे. युद्धांचे नकारात्मक परिणाम सामान्य व्यक्तिला भोगावे लागतात. तसेच शांततेचे अनेक फायदेही आपल्याला मिळतात.

## १.३ आंतरराष्ट्रीय संबंध : अर्थ आणि व्याप्ती

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचा अर्थ स्पष्ट करणे ही एक कठीण गोष्ट आहे. हा एक आंतरशाखीय विषय (Interdisciplinary Subject) असून, याचा संबंध राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र तसेच इतर काही सामाजिक शास्त्रांशी आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाला भारतात आणि भारताबाहेरही बहुतांश विदयापीठांमधून राज्यशास्त्र या विषयाचा एक भाग म्हणूनच गृहित धरले जाते.

राष्ट्रांमधील संबंधात अनेक गोष्टींचा समावेश होतो. उदा. युद्ध, राजनय, युती, व्यापार, आंतरराष्ट्रीय संघटनांचे सदस्यत्व, सांस्कृतिक क्षेत्रातील देवाणघेवाण या गोष्टींशी संबंधित अनेक मुद्दे असतात.

उदा. - सीमावाद, एखादया भौगोलिक क्षेत्रावर मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष भारत आणि चीनमधील सीमावाद, भारत आणि पाकिस्तानमध्ये काश्मीर प्रश्नावरून असलेला संघर्ष, इस्त्रायल आणि पॅलेस्टाइनमध्ये जेरूसलेम या शहराच्या विभागणीवरून चाललेला संघर्ष हे आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासविषय आहेत..

### १.३.१ आंतरराष्ट्रीय संबंध- व्याख्या-

**१) पेडेल फोर्ड आणि लिंकन –**

"बदलत्या सत्ता संबंधांच्या समीकरणात राष्ट्रांमधील क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध होय."

या क्रिया-प्रतिक्रियांचा प्रमुख उद्देश राष्ट्रीय हितसंबंधांची पूर्तता हा असतो.

**२) मॉर्गेन्थ्यू -**

"आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्रांमध्ये चाललेला संघर्ष."

**३) फ्रँकेल –**

"आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण, राष्ट्रांमधील परस्पर तसेच आंतरराष्ट्रीय व्यवस्था, संघटनांबरोबरच्या क्रिया-प्रतिक्रिया, आंतरराष्ट्रीय व्यवस्थेची कार्यप्रणाली, राष्ट्रांमधील अंतर्गत राजकारण यांचा अभ्यास होय."

**४) मार्गारेट स्प्राउट –**

“आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे सार्वभौम, राजकीय समुदायामधील क्रिया-प्रतिक्रियांच्या अशा घटकांचा अभ्यास ज्यात राष्ट्रीय हितसंबंधांमधील संघर्ष अंतर्भूत आहे.”

**५) पामर आणि पार्किन्स-**

“आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रा-राष्ट्रांमधील विविध पातळ्यांवरील बदलत्या संबंधांचा (Transitional Relations) अभ्यास केला जातो.”

विविध विचारवंतांच्या वरील व्याख्यांवरून या विषयाची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) आंतरराष्ट्रीय संबंध हा एक आंतरशाखीय विषय असून याचा संबंध इतर सामाजिक शास्त्रांशी आहे.

२) यामध्ये सार्वभौम राष्ट्रांमधील सर्व प्रकारच्या संबंधांचा, क्रिया-प्रक्रियांचा परस्परांविषयी राष्ट्रांनी घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास केला जातो.

३) आंतरराष्ट्रीय व्यवस्था, तिचे घटक, स्वरूप, कार्यप्रणालीचा अभ्यास या विषयात केला जातो.

४) सार्वभौम राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय संघटना यांच्यातील परस्पर संबंध आणि परिणामांचा विचार यात होतो.

५) राष्ट्रांमधील केवळ अस्तित्वात असणाऱ्याच नाही, तर बदलत्या संबंधांचादेखील अभ्यास या विषयाअंतर्गत केला जातो.

६) सत्ता हा आंतरराष्ट्रीय संबंधांचा केंद्रबिंदू आहे. सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्रांमध्ये सदैव चढाओढ, स्पर्धा असते. या स्पर्धेचा अभ्यास, आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

७) राष्ट्रीय हितसंबंधांच्या पूर्ती व वृद्धीसाठी सत्तेचा वापर होत असतो. हितसंबंध साधण्यामध्ये संघर्ष अटळ आहे. राष्ट्रे आपले परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा वापर हितसंबंध साधण्यासाठी करत असतात.

८) राष्ट्रांमधील संघर्षामुळे हितसंबंधांच्या पूर्ततेत अडथळा निर्माण होऊन संघर्ष टाळून शांतता निर्मितीसाठी जे प्रयत्न होतात त्यांचा विचार आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो.

९) राष्ट्रांमधील संबंध कायमस्वरूपी नसतात, तर त्यात सतत बदल होत असून बदलत्या संबंधांचा अभ्यास या संबंधात होतो.

### १.३.२ आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप –

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या स्वरूप व व्याप्तीत अनेक बदल घडून आले आहेत. ते खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतात.

**१) स्वतंत्र संघटित ज्ञानशाखा -**

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाला एक स्वतंत्र परिपूर्ण आणि संघटित ज्ञानशाखा म्हणावे की नाही याविषयी विचारवंतांमध्ये मतभेद आहेत.

**२) वर्तनवादी दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय घटनांचे विश्लेषण**

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडींचे वर्तनवादी दृष्टिकोनातून विश्लेषण केले जाते. एखादया राष्ट्राने इतर राष्ट्रांसंबंधी घेतलेला विशिष्ट निर्णय कोणत्या परिस्थितीमध्ये घेतला गेला, निर्णय निर्मितीच्या प्रक्रियेत समाविष्ट होणाऱ्या घटकांची मानसिकता यांचे विश्लेषण आंतरराष्ट्रीय संबंधात केले जाते. विशिष्ट परिस्थितीला राष्ट्रांनी दिलेल्या प्रतिसादाचा वर्तनवादी दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास भविष्यात ते धोरण कसे असेल याचा अंदाज लावणे शक्य आहे.

आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या वर्तनाचे अध्ययन आंतरराष्ट्रीय संबंधात होते. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी आवश्यक परिस्थितीचा विकास किंवा निर्मिती कशी केली जावी याचा विचार आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

**३) स्वतंत्र आणि वेगळे अस्तित्व**

आंतरराष्ट्रीय संबंधाची निर्मिती आणि विकास हा इतिहास व राज्यशास्त्र या दोन सामाजिक शास्त्रांतून झाला आहे. या दोन्ही सामाजिक शास्त्रांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय संबंधावर होता. झिमरन, वेबस्टर, इ. एच. कार इ. इतिहासकारांनी आंतरराष्ट्रीय संबंधांचे अस्तित्व भूतकाळातील राजनयीक घडामोडींचे वर्णन एवढयापुरतेच मर्यादित मानले. विविध सामाजिक शास्त्रांच्या प्रभावाने आंतरराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप आंतरशाखीय बनले.

इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांच्या अभ्यासासाठी जे दृष्टिकोन वापरले जायचे त्यांचाच अवलंब आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनासाठी केला जात असे.

दुसऱ्या महायुद्धानंतर सन १९५०-१९६० च्या दशकातील वर्तनवादी क्रांतीनंतर या परिस्थितीत बदल घडून आला. आधुनिक तंत्रावर आधारित नवीन शास्त्रशुद्ध पद्धती व दृष्टिकोनाचा अवलंब आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनासाठी केला गेला. एक स्वतंत्र व इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा वेगळे अस्तित्व असणारा विषय म्हणून हा विषय पुढे आला. इतर सामाजिक शास्त्रांपेक्षा भिन्न आशय, तंत्रे व कौशल्याच्या आधारावर आंतरराष्ट्रीय संबंधाने वेगळी ओळख बनवली आहे.

**४) भविष्यातील घटनांविषयी अंदाज बांधण्याच्या क्षमतेचा विकास-**

आकडेवारी व परिस्थितीचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करून भविष्यात घडणाऱ्या घटनांविषयी अंदाज बांधण्याची क्षमता मर्यादित स्वरूपात आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विकसीत झाली.

राष्ट्रांच्या वर्तमानकाळातील धोरण व निर्णयांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. अभ्यासकांनी भविष्यातील घटनांविषयी बांधलेला अंदाज चुकीचे ठरतात. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत यामध्ये होणाऱ्या बदलांमुळे भविष्यकथन करणारी एखादी शास्त्रशुद्ध चौकट किंवा तंत्र आंतरराष्ट्रीय संबंधात अद्याप विकसीत होऊ शकलेले नाही.

### १.३.३ आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील फरक

आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पनांचा एकाच अर्थाने होत असलेला वापर यामुळे हा विषय, अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. या दोन्ही संकल्पनांचा अर्थ भिन्न आहे.

या संकल्पना परस्पर निगडित असल्या तरी त्यांच्यात मूलभूत फरक आहे.

ते खालील मुद्दयांद्वारे स्पष्ट करता येईल.

१) आंतरराष्ट्रीय राजकारण या संकल्पनेचा वापर मर्यादित अर्थाने केला जातो. या संकल्पनेचा संबंध आंतरराष्ट्रीय समुदायाच्या राजकारणाशी असून यात राजनय, राष्ट्रांतील परस्पर संबंधांच्या अभ्यासावर भर दिला जातो.

आंतरराष्ट्रीय संबंध या संकल्पनेचा वापर व्यापक अर्थाने करून राष्ट्रांच्या, जनतेच्या, आंतराष्ट्रीय संघटना, संस्थांच्या पातळीवरील परस्पर संबंधांचा अभ्यास केला जातो.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे उद्दिष्टय राष्ट्रांमधील राजकीय संबंधाचा अभ्यास करणे हा आहे तर आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रांमधील केवळ राजकीय संबंधांचाच नाही तर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, विज्ञान तंत्रज्ञान इ. विविध पातळ्यांवरील संबंधांचा अभ्यास होतो.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात दोन राष्ट्रांतील शासनाच्या अधिकृत संबंधांचा अभ्यास होतो. या संबंधात शासनाबरोबर राष्ट्रांतील इतर संस्था व लोकांमधील अनधिकृत खाजगी, अनौपचारिक संबंधांचादेखील अभ्यास होतो.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती मर्यादित आहे. तर आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती व्यापक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांमधील युद्ध, तह, करार, राजनय शांतता इ. गोष्टींच्या अभ्यासावर भर दिला जातो. आंतरराष्ट्रीय संबंधात राजकीय संबंधांबरोबरच, अराजकीय संबंधांवर, आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था, बिगर शासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय व्यवस्था राज्यके इ. गोष्टींच्या अभ्यासावर तसेच राष्ट्रे व त्यांच्यातील परस्पर संबंधांवर भर दिला जातो.

५) आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध या दोन्हीं संकल्पनांच्या अध्ययन पद्धतीत देखील फरक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनासाठी ऐतिहासीक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब केला जातो, तर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनासाठी आधुनिक व शास्त्रीय दृष्टिकोनांचा अवलंब केला जातो. यामध्ये वर्तनवादी, निर्णय निर्मिती प्रक्रिया, कायदा दृष्टिकोनांचा समावेश होतो.

६) आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांमधील संघर्षाचा व विरोधात्मक संबंधांच्या अभ्यासावर भर दिला जातो तर आंतरराष्ट्रीय संबंधांत राष्ट्रांतील सहकार्यात्मक संबंधांवर भर दिला जातो.

### १.३.४ आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याप्ती

आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाच्या अभ्यासात खालील प्रमुख गोष्टींचा समावेश होतो.

**१) सार्वभौम राष्ट्रांतील विविध पातळ्यांवरील संबंधांचा अभ्यास**

आंतरराष्ट्रीय संबंधांत १७ व्या शतकापासून सार्वभौम राष्ट्रांतील संबंधांचा अभ्यास केला जातो. सुरुवातीला राष्ट्रांतील राजकीय संबंधांना प्राधान्य होते. दुसऱ्या महायुद्धानंतर राजकीय संबंधांबरोबरच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संबंधांच्या अभ्यासाला महत्व प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय समुदायात सर्व राष्ट्रे एक प्रकारची नसून भौगोलिक रचना, आर्थिक, लष्करी सामर्थ्य यांच्या आधारावर राष्ट्रांमध्ये भेद आहेत. अमेरिका हे लष्करी व भौगोलिकदृष्ट्या मोठे राष्ट्र आहे. तर जपान हे आकाराने लहान राष्ट्र आहे. १९५० पासून दोन्ही देशांमधें आर्थिक, संरक्षण विषयक संबंध आहेत.

राष्ट्रांमध्ये सहकार्याचे, संघर्षांचे संबंध असतात.

उदा - भारत, पाकिस्तान या दोन शेजारी राष्ट्रांच्या निर्मितीपासून विविध कारणांवरून संघर्षांचे संबंध अहेत. दुसरीकडे भारत आणि सोविएट रशियाचे संबंध सहकार्याचे आहेत.

**२) राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास -**

सार्वभौम राष्ट्रे हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी परराष्ट्र धोरणाचा साधन म्हणून वापर करतात. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रे इतर राष्ट्रांबरोबर संबंध प्रस्थापित करतात. राष्ट्रांमधील क्रिया-प्रतिक्रिया सहकार्यात्मक व विरोधात्मक संबंध परराष्ट्र धोरणात प्रतिबिंबित होतात. परराष्ट्र धोरणाचाच नाही, तर परराष्ट्र धोरण निर्णय निर्मिती प्रक्रियेत सहभागी घटकांचा देखील अभ्यास होतो.

उदा. - भारतात परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रियेत पंतप्रधान, मंत्रिमंडळ, परराष्ट्र मंत्रालय, विरोधी पक्ष, गुप्तहेर संघटना, दबावगट, प्रसार माध्यमे, लोकमत इ. घटकांचा समावेश असतो. २००४ ला भारताने इराकमध्ये अमेरिकेच्या मदतीसाठी शांतिसैन्य पाठवावे की नाही याविषयी संसदेत चर्चा झाली. विरोधी पक्षांच्या विरोधाने भारताने शांतिसैन्य पाठविण्यास नकार दिला.

अमेरिका इस्त्रायल-पॅलेस्टिनी संघर्षात इस्त्रायलला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत करत आहे. इस्त्रायलविषयी अमेरिकेच्या सकारात्मक धोरणामागे अमेरिकेच्या देशांतर्गत राजकारणातील ज्यू लोकांच्या दबावगटाचा प्रभाव कारणीभूत आहे.

परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रियेचे नेपोलियन बोनापार्टपासून सद्दाम हुसेनपर्यंत लष्करी हुकूमशहांच्या आक्रमक व युद्धखोर धोरणामागे प्रमुख कारण त्यांना वाटणारी मानसिक असुरक्षितता होती. या मानसिकतेचे विश्लेषण आंतरराष्ट्रीय संबंधात शासन प्रमुख निर्णय कसा घेतात, कोणत्या परिस्थितीत घेतात, याचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो.

### ३) राजनय, युद्ध आणि शांततेचा अभ्यास-

राजनय, युद्ध व शांततेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला या विषयावर इतिहासकारांचा प्रभाव असल्याने राष्ट्रांतील राजनयीक संबंध, युद्ध, लष्करी करार शांततेच्या निर्मितीसाठीचे प्रयत्न इ. गोष्टींच्या वर्णनाला महत्त्व होते. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्रांतील राजनयीक संबंधांचा इतिहास होय असाच अर्थ या विषयाला प्राप्त झाला.

दुसऱ्या महायुद्धामध्ये झालेल्या जीवित, वित्तहानीनंतर युद्ध व शांततेचा शास्त्रशुद्ध, पद्धतशीर अध्ययनावर भर दिला गेला. राष्ट्रे युद्धासाठी का प्रवृत्त होतात, युद्धखोर नेत्यांच्या मानसिकतेचे वर्तनवादी दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यात येऊन शांततानिर्मितीचे मार्ग शोधायचा प्रयत्न झाला. १९८० च्या दशकात शांतता अध्ययन कार्यक्रम ही एक नवी शाखा आंतरराष्ट्रीय संबंधात निर्माण झाली.

युद्ध आणि शांततेच्या अध्ययनासाठी आंतरराष्ट्रीय संबंधात आंतरशाखीय दृष्टिकोनाचा विश्लेषणाचा अवलंब होत आहे. शीतयुद्धाच्या काळात विकसित झालेल्या प्ररोधन युद्ध टाळण्याचा Detente शांतता निर्मितीच्या तंत्रांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

### ४) विचारसणीचे अध्ययन -

आंतरराष्ट्रीय संबंधाला राज्यशास्त्र विषयाचा एक भाग मानला जातो. ज्याप्रमाणे राज्यशास्त्रात विचारसरणींच्या देशांतर्गत राजकारणावरील प्रभावाचे अध्ययन केले जाते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रांच्या परस्पर संबंधांवर परिणाम करणाऱ्या विचारसरणींचा अभ्यास केला जातो.

२० व्या शतकात परस्परविरोधी विचारसरणींचा विकास घडून आला. उदा. साम्यवाद, भांडवलवाद, समाजवाद, उदारमतवाद, फॅसिवाद, नाझिवाद. या विचारसरणींनी आंतरराष्ट्रीय संबंधांना प्रभावित केले. २० व्या शतकातील विभागीय आंतराष्ट्रीय संघर्ष विशिष्ट विचारसरणीवर आधारित आहेत. महायुद्धानंतर अमेरिका, सोविएट रशियामधील शीतयुद्धाचे राजकारण साम्यवाद व भांडवलशाही दोन परस्परविरोधी विचारसरणींच्या संघर्षावर अवलंबून होते. पश्चिम व पूर्व यूरोपची विभागणी या दोन विचारसरणींच्या आधारावर झाली होती. १९९० च्या दशकात धार्मिक मूलतत्त्ववादाची विचारसरणी आंतरराष्ट्रीय संबंधांत प्रभावशाली बनली.

### ५) सत्ता आणि राष्ट्रीय हितसंबंधांचा अभ्यास-

सत्ता व राष्ट्रीय हितसंबंधांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधांच्या केंद्रस्थानी आहे. हॅन्स मॉर्गेन्थूसारखे वास्तववादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करणारे विचारवंत आंतरराष्ट्रीय संबंधांना राष्ट्रांमधील सत्तासंघर्ष म्हणून संबोधतात. राष्ट्रे सत्ताप्राप्तीसाठी व सत्ता वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. सत्ताप्राप्तीसाठी चाललेल्या या स्पर्धेत संघर्ष अटळ असतो. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी सत्तेवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. सत्ता समतोल, सामूहिक सुरक्षितता या सत्तेवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यवस्था आहे. या व्यवस्थांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. सत्तेप्रमाणेच राष्ट्रीय हितसंबंधांचादेखील विचार आंतरराष्ट्रीय संबंधात होतो. राष्ट्रांचे शत्रू किंवा मित्र कायमस्वरूपी नसतात, तर हितसंबंध कायमस्वरूपी असतात.

हार्टमनच्या मते, राष्ट्रे राष्ट्रीय उद्दिष्टये हितसंबंध साधण्यासाठी ज्या प्रक्रियांचा अवलंब करतात. त्याचा समावेश आंतरराष्ट्रीय संबंधात होतो.

### ६) आंतरराष्ट्रीय संघटना -

आंतरराष्ट्रीय संबंधात आंतरराष्ट्रीय-विभागीय संघटना, संस्था, बिनशासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या स्वरूपाचा, भूमिकेचा व राष्ट्रांवर होणाऱ्या त्यांच्या परिणामांचादेखील अभ्यास केला जातो.

दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेमुळे आंतरराष्ट्रीय संघटनांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका वाढली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध संस्था आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य, कामगार कल्याण, विज्ञान तंत्रज्ञान, निःशस्त्रीकरण इ. क्षेत्रांत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

शीतयुद्धाच्या काळात विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या आर्थिक स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय संस्था विभागीय स्वरूपाच्या संघटना निर्माण झाल्या. यात नाटो, वॉर्सा, पॉप सिराटो, सेन्टो सारख्या लष्करी संघटनांचा समावेश होतो.

### ७) आंतरराष्ट्रीय संघर्षाचे व्यवस्थापन आणि सोडवणूक –

विश्व राजकारणात संघर्ष हा अटळ आहे. राष्ट्रांना उद्दिष्टये साधण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेची आवश्यकता असते. परिणामी संघर्षावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न आंतरराष्ट्रीय राजकारणात सदैव चालू असतात. संघर्ष कायमस्वरूपी सोडवणे शक्य नसले तरी संघर्षाचे व्यवस्थापन करून त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य असते. संघर्षाचे व्यवस्थापन विविध मार्गाने केले जाते. या मार्गाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधात केला जातो. आज अनेक आंतरराष्ट्रीय संघटना आणि शांतता निर्मितीसाठी कार्य करणाऱ्या संस्था संघर्षाचे नियंत्रण करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करीत आहेत. आंतराष्ट्रीय संबंधात वर्तनवादी दृष्टिकोनातून संघर्षाचे विश्लेषण केले जाते आणि त्याच्या व्यवस्थापनाच्या पद्धती शोधल्या जातात.

**८) शस्त्रास्त्र स्पर्धा, शस्त्रास्त्र नियंत्रण व निःशस्त्रीकरण –**

या तिन्ही संकल्पनांना आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनात महत्त्वाचे स्थान आहे. या संकल्पना परस्पर निगडित आहेत. राष्ट्रांतील परस्पर तणाव, अविश्वास व संशयाचे वातावरण शस्त्रास्त्र स्पर्धेला जन्म देते व या शस्त्रास्त्र स्पर्धेतून युद्ध होतात. शस्त्रास्त्र स्पर्धेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या निर्मितीवर बंधने घालण्यासाठी व शस्त्रास्त्रांना पूर्णपणे नष्ट करण्यासाठी शस्त्रास्त्र नियंत्रण व निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रिया वापरल्या जातात.

उदा - दुसऱ्या महायुद्धानंतर शस्त्रास्त्र नियंत्रण व निशस्त्रीकरणाची गरज वाढली. अमेरिका, सोवियत रशिया, इंग्लंड, संयुक्त राष्ट्र संघटना यांच्या पुढाकाराने अनेक द्विपक्षीय तसेच बहुपक्षीय निःशस्त्रीकरण करार गेल्या पन्नास वर्षांमध्ये करण्यात आले आहेत.

उदा - अण्वस्त्र प्रसारबंदी करार (Nuclear Non-proliferation Treaty - NPT), सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार (Comprehensive Test Ban treaty), डावपेचात्मक शस्त्रास्त्रांच्या संख्येवर मर्यादा व कपात करण्याविषयांचा करार (Strategic Arms Limitation/Reduction Talks - SALT, START).

**९) क्षेत्रीय अध्ययन**

क्षेत्रीय अध्ययन हा आंतरराष्ट्रीय संबंधांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. एकोणविसाव्या शतकापर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारण प्रामुख्याने युरोपपुरते मर्यादित होते. २० व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप व्यापक बनले आणि आशिया, आफ्रिका खंडांना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त झाले.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाची व्यापकता, निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेतून आशिया, आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रांना मिळालेले राजकीय स्वातंत्र्य, आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती व त्यांची वाढती सदस्य संख्या, शीतयुद्धाचे राजकारण, माहिती तंत्रज्ञानात घडून आलेली क्रांती, अलिप्ततावादी राष्ट्रांची चळवळ आशिया खंडातील राष्ट्रांची आर्थिक प्रगती, अण्वस्त्रांचा झालेला प्रसार इ. कारणांनी आशिया-आफ्रिका खंडातील विकसनशील राष्ट्रांचे महत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढले आहेत. परिणामी आंतरराष्ट्रीय संबंधात गेल्या काही दशकांपासून क्षेत्रीय अध्ययनाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

उदा- अमेरिकन स्टडिज, युरोपियन स्टडिज, चायनीज स्टडिज, रशियन स्टडिज, आफ्रिकन स्टडिज, साउथ एशियन स्टडिज इ.

### १.३.५ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्व.

- आंतरराष्ट्रीय संबंधांमुळे आपले दैनंदिन जीवन प्रभावित होते. आपण प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय संबंधांत सहभागी होत असतो.

- आंतरराष्ट्रीय संबंध ही राज्यशास्त्राची शाखा असून, या विषयाचा संबंध प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय सुरक्षा घडामोडी व आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थशास्त्र यांच्या राजकीय परिणामांचे स्पष्टीकरण करण्याशी आहे.
- राष्ट्रांशिवाय, आंतरराष्ट्रीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या, बिगर शासकीय संघटना, संस्था आंतरराष्ट्रीय संबंधांवर मोठा प्रभाव पाडतात.
- आंतरराष्ट्रीय संबंध, हा एक आंतरशाखीय विषय असून, त्याचा संबंध अनेक सामाजिक शास्त्रांशी आहे.
- या विषयाचा स्वतंत्र असा आशय आहे. विश्लेषणात्मक अध्ययन पद्धती आहेत. अध्ययनाचे स्वतंत्र तंत्र व कौशल्ये विकसित झाली आहेत. यामुळे भविष्यातील घटनांविषयी अंदाज बांधण्याची क्षमता या विषयात विकसित झाली आहे.
- आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पना परस्परांशी निगडित असल्या आणि अनेकदा या संकल्पनांचा वापर एकाच अर्थाने होत असला, तरी त्यांच्यात मूलभूत फरक आहे. आंतरराष्ट्रीय संबंध ही आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या विविध पैलूंचा सविस्तर अभ्यास करणारी एक प्रक्रिया आहे, तर आंतरराष्ट्रीय राजकारण या प्रक्रियेचा एक भाग आहे. ज्यात राष्ट्रांमधील राजकीय संबंधांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो.
- आंतरराष्ट्रीय संबंध हा एक सर्वसमावेशक विषय असून यात सार्वभौम राष्ट्रांमधील सर्व प्रकारच्या विविध पातळ्यांवरील संबंधांचा, राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा, राजनय, युद्ध व शांततेचा, विचारसरणींचा, सत्ता व राष्ट्रीय हितसंबंधांचा, आंतरराष्ट्रीय संघटनांचा, संघर्षाचे व्यवस्थापन आणि सोडवणुकीचा, शस्त्रास्त्र स्पर्धा, शस्त्रास्त्र नियंत्रण आणि निःशस्त्रीकरणाचा अभ्यास होतो.

## १.४ वास्तववाद

२० व्या शतकात आंतरराष्ट्रीय संबंधावरील पाश्चिमात्य निर्वचनाला (Interpreation) सर्वाधिक प्रभावित करणारा आणि आंतरराष्ट्रीय संबंधातील आधुनिक सिद्धांतांना व दृष्टिकोनांना जन्म देणारा सिद्धांत म्हणजे वास्तववाद होय. १९१४ ते १९४५ दरम्यान आंतरराष्ट्रीय राजकारणावर भाष्य करण्यासाठी तसेच शीतयुद्ध काळात अमेरिका सोवियत रशिया च्या परराष्ट्र धोरणांच्या समर्थनार्थ वास्तववादी दृष्टिकोन वापरला गेला. हा सिद्धांत जुना असून, त्याच्या पुनरुज्जीवनाचे श्रेय हॅन्स मॉर्गेन्थ्यू, ई. एच. कार, केनेथ थॉम्पसन, जॉर्ज केनन, हेन्री किसिंजर या विचारवंतांना दिले जाते.

राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंधात सत्ता हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. मॅकियाव्हॅली, थॉमस हॉब्ज यासारखे पाश्चात्य विचारवंत आणि कौटिल्यासारखा भारतीय विचारवंतही राजकारणातील सत्तेचे स्थान मान्य करतो.

आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले ध्येय साध्य करण्यासाठी आदर्श, स्वप्नांचा आधार न घेता वास्तवता लक्षात घेतली पाहिजे. त्यासाठी सत्तेचा, बळाचा वापर केला पाहिजे, असे या सिद्धांताचे मुख्य मुल्य आहे. म्हणून या दृष्टिकोनाला वास्तववादी / सत्तेचा किंवा शक्ति दृष्टिकोन म्हटले जाते.

हॅन्स मॉर्गेन्थ्यूने आपल्या 'Politics Among Nation' या ग्रंथात वास्तववादी दृष्टिकोनाचा पुरस्कार केला आहे.

**वास्तववादी सिद्धांत -**

वास्तववादी सिद्धांत हा सत्ता आणि सुरक्षा या घटकाशी निगडित आहे. परस्पर भीती व असुरक्षिततेमुळे व्यक्ती आणि राष्ट्रे सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्नशील असतात. सत्तेच्या या स्पर्धेत संघर्ष अपरिहार्य असतो. तो कायमस्वरूपी असून कोणत्यातरी स्वरुपात अस्तित्वात असतो. आंतरराष्ट्रीय संघटना किंवा कायदा यावर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ आहे. वास्तववादी दृष्टिकोनातून सत्तास्पर्धा ही सार्वत्रिक असून, ती शाश्वत असते. सत्ता ही साध्य व साधन ही असते. सत्तेच्या साधनाने राष्ट्रीय हित साध्य होते. यादृष्टीने सत्ता हे साध्य देखील ठरते. या गृहितकावर वास्तववादी सिद्धांत आधारित आहे. वास्तववादी नैतिक मूल्यांचे अस्तित्व पूर्णपणे अमान्य करीत नसले तरी त्यांचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावतात.

**वास्तववादी सिद्धांताची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१) वास्तववादात विचारांपेक्षा ऐतिहासिक घटनांवर अधिक भर दिला जातो. ऐतिहासिक घटनांच्याआधारे वास्तववादी आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेला केंद्र स्थानी मानतात.

२) वास्तववादात व्यक्ती आणि राष्ट्राचे वर्तन समान मानले जाते. ज्या प्रेरणा व्यक्तीच्या वर्तनाला प्रभावित करतात त्याच प्रेरणा राष्ट्राच्या वर्तनालाही प्रभावित करतात.

३) वास्तववादी सिद्धांत एकल विचार नसून, वैश्विक दृष्टिकोन आहे. तो परस्पर गृहितत्वांवर आधारित आहे. ही गृहितत्वे व्यक्तीचे वर्तन, व्यक्तीच्या प्रेरणा, व्यक्ति व सभोवतालची परिस्थिती यांच्यातील परस्पर संबंधांशी व्यक्तीच्या उत्तरजीवित्वाशी निगडित आहे.

४) आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही राष्ट्रकेंद्रित व्यवस्था असून, भविष्यातही ती तशीच राहील, असे वास्तववाद मानतो.

५) आंतराराष्ट्रीय राजकारणाच्या आखाड्यात अराजकता आणि संघर्षाची स्थिती कायमस्वरूपी असते, राष्ट्रे सत्ताप्राप्तीसाठी परस्परांशी संघर्ष करतात.

६) वास्तववादी विचारवंतांच्या मते, राष्ट्रांमध्ये सत्तास्थान आणि क्षमतेनुसार अधिकारश्रेणी असते.

७) सत्तेच्या आधारावर अधिकारश्रेणी असली तरी कायदयाच्या पातळीवर सर्व राष्ट्रे समान असतात. त्याला वास्तववादी सार्वभौम स्वातंत्र्य म्हणतात.

### १.४.१ वास्तववादी सिद्धांनाची मूलभूत तत्त्वे

वास्तववादी सिद्धांताची एकूण सहा मूलभूत तत्त्वे आहेत.

**१) सत्ता, उत्तरजीवित्व, सत्ता समतोलाला केंद्रस्थान-**

वास्तववादी सिद्धांतात सत्ता, सत्तासमतोल, व्यक्ती व राष्ट्राचे उत्तरजीवित्व या संकल्पना केंद्रस्थानी आहेत. वास्तववादी हष्टिकोन सत्तेला साध्य व साधन मानतात. सत्ता व्यक्ती आणि राष्ट्राच्या उत्तरजीवित्वासाठी आवश्यक असते. राष्ट्रांना वाटणाऱ्या असुरक्षिततेतून राष्ट्रे सत्ताप्राप्तीकडे वळतात. त्यासाठी कोणत्याही नैतिक-अनैतिक मार्गांचा वापर केला जातो. सत्तेसाठी चालणाऱ्या या स्पर्धेत संघर्ष अटळ आहे. संघर्ष नियंत्रणासाठी सत्ता संतुलनाचे मार्ग अवलंबले जातात. संघर्षात नैतिक मूल्यांना स्थान नाही.

**२) संघर्षाची अपरिहार्यता –**

सत्ता आणि सुरक्षा हा वास्तववादाचा आधार असून, या संघर्षाचे मूळ व्यक्ति - राष्ट्राला वाटणाऱ्या असुरक्षिततेत आहे. आत्मरक्षणासाठी राष्ट्रे सत्ताप्राप्ती व ती वाढवण्याचा प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय कायदा हा संघर्ष थांबवू शकत नाही.

मुत्सद्देगिरी आणि राजनयाच्या आधारे संघर्षावर नियंत्रण ठेवणे शक्य आहे. त्यासाठी मॉर्गेन्थ्यूने तीन उपाय सांगितले आहे -

- सत्ता समतोल, सामूहिक सुरक्षितता, नि:शस्त्रीकरन
- राष्ट्रीय शासनाकडून आंतरराष्ट्रीय शासनाकडे सत्तेचे हस्तांतरण, म्हणजेच विश्व राज्याची निर्मिती
- मुत्सद्देगिरी आणि राजनयाच्या आधारे सत्तेच्या वापरावर मर्यादा.

**३) मानवी स्वभाव –**

मनुष्याच्या चांगुलपणावर वास्तववादयांचा विश्वास नाही. त्यांच्या मते, मनुष्य हा निसर्गत: स्वार्थी प्राणी असून, त्याला वाटणाऱ्या भीती, असुरक्षिततेने त्याला संशयी - अविश्वासी बनवले आहे. इतरांवर प्रभाव पाडून सत्ता गाजविण्याची नैसर्गिक वृत्ती मनुष्यात आहे. मानवाची हीच प्रवृत्ती संघर्षाला जन्म देते.

**४) राष्ट्रीय हितसंबंधांना सर्वोच्च प्राधान्य**

वास्तववादी विचारवंत राष्ट्रीय हितसंबंधांना आंतरराष्ट्रीय राजकारणात सर्वोच्च स्थान देतात. राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण- संवर्धन हे प्रत्येक राष्ट्राचे आद्य कर्तव्य

असून, त्यासाठी परराष्ट्र धोरण व राजनयाचा साधन म्हणून वापर केला जातो. राष्ट्रीय हितसंबंधांसाठी राष्ट्राराष्ट्रांत स्पर्धा असते. राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनासाठी राष्ट्रांनी नैतिक-अनैतिकतेचा विचार करू नये. म्हणूनच राष्ट्रीय हित साध्य करणे हेच देशाच्या परराष्ट्र धोरणाचे सार असले पाहिजे.

**५) राष्ट्रीय हितसंबंधातील बदल –**

राष्ट्रीय हितसंबंध आणि सत्ता ही वास्तववादाची मूळ तत्त्वे असली तरी बदलत्या परिस्थितीनुसार राष्ट्रीय हितसंबधात बदल आवश्यक ठरतो. राष्ट्रीय हितसंबंध कायमस्वरूपी सदासर्वकाळ असत नाही.

मॉर्गेन्थ्युच्या मते, राजकीय कृती निश्चित करणाऱ्या हितसंबंधांना आकार देण्यासाठी परिस्थितीचा प्रभाव महत्वाचा असतो.

**६) आंतरराष्ट्रीय नीतिमत्तेला महत्व नाही –**

वास्तववादात नीतिमत्ता आणि नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान नाही. राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण हे नैतिक मूल्यांच्या नाही, तर राष्ट्रीय हित संबंधाच्या आधारावर असावे या मताचा वास्तववादी पुरस्कार करतात. त्यांच्या मते, सत्ता हे एक नैतिक मूल्य असून, जेव्हा राष्ट्रे सत्ताप्राप्ती व ती वाढविण्यासाठी प्रयत्न करतात तेव्हा ते नैतिकतेला धरूनच केलेले कार्य असते.

## १.४.२ हॅन्स मॉर्गेन्थ्यूचा वास्तववाद –

२० व्या शतकात वास्तववादी सिद्धांताच्या पुनरुज्जीवनाचे श्रेय हॅन्स मॉर्गेन्थ्यू या अमेरिकन विचारवंताला जाते. ‘Politics Amang Nations’ या ग्रंथात त्याने वास्तववादाविषयी आपले विचार मांडले आहेत.

वास्तववादी सिद्धांताची तीन मूलतत्वे आहे. ती खालीलप्रमाणे

१) राष्ट्रीय हिताचा पाठपुरावा करण्याची राजकारण्यांची महत्वाकांक्षा असते.

२) प्रत्येक राष्ट्राला आपला प्रादेशिक राजकीय - सांस्कृतिक प्रभाव वाढवण्यात रस असतो.

३) आपले राष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक राष्ट्र सत्तेचा उपयोग करते.

मॉर्गेन्थ्यूचा वास्तववाद पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) व्यक्तिनिरपेक्ष नियम-**

मनुष्यस्वभाव हे राजकीय नियमांचे उगमस्थान आहे. या नियमांचे अस्तित्व कायमस्वरूपी असून त्यापासून व्यक्ती - राष्ट्राला मुक्तता नाही. जगात परस्परविरोधी हितसंबंध आहेत आणि त्यात संघर्ष होत असतो. स्वार्थ आणि सत्तेची लालसा हे

व्यक्तीला प्रभावित करणारे घटक राष्ट्रालाही प्रभावित करतात. म्हणूनच राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू सत्तेची लालसा आहे.

### २) राष्ट्रीय हितसंबंध –

राष्ट्रीय हितसंबंध साधणे हे विश्व राजकारणातील प्रत्येक राष्ट्राचे सर्वोच्च ध्येय असते. त्यादृष्टीने राष्ट्रे आपल्या परराष्ट्र धोरण व राजकारणाची आखणी करतात. राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणजे सत्ता. परिणामी प्रत्येक राष्ट्र सत्तेचा व्यावहारिक दृष्टिकोनातून विचार करते.

### ३) राष्ट्रीय हितसंबंधाची गतिशीलता –

राष्ट्रीय हितसंबंधांचे स्वरूप कायम नसते. स्थळ-काळ- परिस्थिती नुसार त्यात बदल होत असतात. एखादे अविकसित राष्ट्र विकसनशील राष्ट्रांच्या गटात सामील होते. किंवा एखादे विकसनशील राष्ट्र आपल्या आर्थिक प्रगतीच्या आधारावर विकसित राष्ट्रांच्या गटात सामील होते. राष्ट्रीय हितसंबंधांच्या परिवर्तनाबरोबरच राष्ट्रांच्या सत्ता स्थानामध्ये बदल होत असतात.

### ४) आंतरराष्ट्रीय नैतिकता अवास्तविक –

आदर्शवादी विचारवंतानी पुरस्कारलेले आंतरराष्ट्रीय नैतिकतेचे तत्व, मूल्ये मार्गेन्थ्यू अवास्तविक मानतो. त्याच्या मते, नैतिक मूल्ये राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा आधार बनू  शकत नाही. व्यक्तीच्या चांगुलपणावर वास्तववाद्यांचा विश्वास नाही. व्यक्तीचा स्वार्थ, भीती, उत्तरजीवित्वाची चिंता, सत्तेचे आकर्षण या व्यक्तीला प्रेरित करणाऱ्या प्रेरणा राष्ट्रालाही प्रभावित करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय हितसंबंधांचा बळी देणे शक्य नाही.

संघर्षानंतर शांतताप्रस्थापनेसाठी मॉर्गेन्थ्यूने तीन उपाय सुचवले आहेत.

१) नि:शस्त्रीकरण, सामूहिक सुरक्षा, आंतरराष्ट्रीय शासन, या मार्गाने सत्तेच्या वापरावर मर्यादा घालणे.

२) राजमर्यादा घालून शांतता निर्मिती

३) सत्तेचे राष्ट्रीय पातळीवरून आंत. पातळीवर हस्तांतरण

### ५) वैश्विक नैतिक कायदे राष्ट्रांना लागू नाही

वास्तववाद्यांच्या मते, वैश्विक नैतिक कायदे राष्ट्रांना लागू पडत नाही. राष्ट्रांची नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यात फरक आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नैतिक नियम, कायदे राष्ट्रीय वर्तनाला नियंत्रित करू शकत नाही. सार्वभौम राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्वायत्त घटक असून, सत्तेच्या आधारे राष्ट्रीय हितसंबंध, जोपासण्याचा प्रयत्न राष्ट्रांकडून होत असतो. राष्ट्राचे हे कृत्य राष्ट्रीय नैतिकतेला धरून आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नैतिकतेचे नियम त्यांच्यावर बंधनकारक नसतात.

**६) राजकीय क्षेत्राची स्वायत्तता –**

वास्तववादी राजकीय क्षेत्राला स्वायत्त क्षेत्र मानतात. राजकीय क्षेत्र हे शक्तीसामर्थ्यावर आधारित आहे. राजकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान नाही. राजकीय क्षेत्रात राष्ट्रीय हितसंबंधांना गृहित धरून निर्णय घेतले जातात.

### १.४.३ मॉर्गेन्थ्यूच्या वास्तववादी सिद्धांतावरील टीका –

१) वास्तववाद्यांच्या मते, सत्ता संघर्ष हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अटळ भाग आहे. परंतु राज्यांचे परस्पर सहकार्य, मैत्री, परस्परावलंबित्व हे महत्त्वाचे पैलू असून, मॉर्गेन्थ्यूने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

२) मॉर्गेन्थ्यूने वास्तववादात सत्तेला अनन्य साधारण महत्व दिले असून, समाजात सहभाग, समूहाचा विचार या प्रेरणाही महत्वाच्या असतात. सत्ता ही एकमेव मानवाची प्रेरणा असू शकत नाही. याकडे हा दृष्टिकोन दुर्लक्ष करतो.

३) स्टॅन्ले हॉफमनच्या मते, सत्तेशिवाय लोकमत, लोकांची अधिमान्यता, शासनाचे स्वरूप, नैतिक मूल्ये, राजकीय नेतृत्वाची प्रवृत्ती इ. घटकांचा मॉर्गेन्थ्यूने विचार केलेला नाही. त्याने वास्तववादी दृष्टिकोनाला सत्तेचा एकात्मवाद (Power monism) असे म्हटले आहे.

४) जरी सत्तेवर आधारित वास्तववादाचे विश्लेषण असले तरी बहुतेक राष्ट्रांना सत्तासंघर्षात स्वारस्य नाही. उदा. भारत, स्वित्झर्लण्डसारखी राष्ट्रे विश्व संघर्षापासून अलिप्त राहू इच्छितात.

५) मॉर्गेन्थ्यू व्यक्तीला स्वार्थी प्राणी म्हणतो. परंतु व्यक्तीत चांगले गुण असू शकतो याकडे तो दुर्लक्ष करतो.

६) मॉर्गेन्थ्यूने १८ व १९ व्या शतकातील आंतरराष्ट्रीय संबंधाच्या आधारे आपला विचार मांडला. तुलनेने आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. म्हणूनच सत्तेच्या संदर्भातील राष्ट्रीय हितसंबंधाची कल्पना अस्पष्ट दिसते.

या दृष्टिकोनावर टीका करण्यात आली असली तरी आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारणाच्या अभ्यासात त्याचे महत्व उल्लेखनीय आहे. हॅन्स मॉर्गेन्थ्यूचे नाव या अभ्यासात प्रमुख सैद्धांतिक म्हणून मान्यता पावलेले आहे.

प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे तीन संप्रदायात विभाजन केले जाते.

१) २० व्या शतकाचा प्रारंभ ते १९४० पर्यंत आदर्शवाद्यांचा कालखंड

२) दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेला १९६० पर्यंत अस्तित्वातील वास्तववादी कालखंड

३) आधुनिक कालखंड → व्यवस्थावादी कालखंड.

मॉर्गेन्थ्यूने राजकारणात नैतिकतेचे अवास्तव महत्व सांगणाऱ्या आदर्शवाद्यांना वास्तवतेच्या पातळीवर आणण्याचे महत्वाचे कार्य केले. आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे आकलन व सोडवणूक नैतिक सिद्धांताची शिकवण देऊन होत नाही तर त्यासाठी आंतरराष्ट्रीय घटनाचे योग्य विश्लेषण आवश्यक आहे हे त्याने दाखवून दिले.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी विचार शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडण्याचे श्रेय त्याला जाते.

त्याच्या विचाराच्या आधारे व्यवस्थावादाचा नव्याने उदय झाला. त्याचा विचार आदर्शवाद आणि व्यवस्थावादाला जोडणारा दुवा आहे. म्हणूनच त्याच्या विचाराचे मूल्य आजही महत्वाचे आहे.

## १.५ नववास्तववाद

१९७९ मध्ये सोव्हियत रशियाने अफगणिस्तानवर हल्ला केला व शीतयुद्धाचे पुनरुज्जीवन झाले. त्याच सुमारास नववास्तववादाची मांडणी करणारे केनेथ वाल्डझ् यांचे 'Theory of International politics' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. हा सिद्धांत म्हणजे अभिजात वास्तववादावरील उदारमतवादी आणि वर्तनवादी आक्षेपांची दखल घेऊन केलेली वास्तववादाची मांडणी होती. त्यावर शास्त्रीय पद्धतीचा प्रभाव होता. १९८० च्या दशकात विश्व राजकारणावर नववास्तववादाचा प्रभाव पडला.

वास्तववादानुसार राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये राष्ट्रीय हिताच्या संवर्धनावरून संघर्ष होतो. परंतु वॉल्ट्झ यांच्या मते, संघर्षाचे मूळ कारण म्हणजे सदोष आंतरराष्ट्रीय संरचना होय. वास्तववादानुसार, सत्तासंपादन हे राज्याचे कर्तव्य होय. वॉल्ट्झ यांच्या मते, सत्तेच्या / क्षमतेच्या निकषावर राष्ट्र राज्ये एकमेकांहून भिन्न असतात. सत्ता अथवा क्षमता हे अराजकी आंतरराष्ट्रीय संरचनेतून निर्माण होणाऱ्या असुरक्षेवर मात करण्याचे राष्ट्रांचे साधन असते. संरक्षनेतील असुरक्षेमुळे राष्ट्र-राज्ये आपल्या तौलनिक क्षमतेविषयी संवेदनशील असतात. संरचनेतील आपल्या स्थानाला धक्का लागणार नाही, याविषयी ते जागरुक असतात. नववास्तववादानुसार हेच राज्या-राज्यातील संघर्षाचे प्रमुख कारण आहे.

संघर्ष नियंत्रणाचे मुख्य कार्य सत्तासंतुलनामुळे शक्य होते. प्रतिस्पर्धी राज्याशी सत्तासमतोल राखल्यास आक्रमणाचा धोका कमी होतो, असे अभिजात वास्तववाद मानतो. मॉर्गेन्थ्यूच्या वास्तववादात बहुध्रुवीय सत्तासंतुलन ही आदर्श व्यवस्था असते. नववास्तववाद्यांच्या मते, द्विध्रुवीय सत्तासंतुलन हे अधिक स्थिर व सुरक्षित असते.

थॉमस शेलिंग यांनी सामरिक वास्तववाद मांडला आहे. त्यात लष्करी सामर्थ्याचा राजनयात उपयोग कसा करावा ? यावर ते भर देतात. बळाचा पाशवी वापर आणि दमनशक्तीचा चतुरपणे केलेला वापर यात ते फरक करतात. जे हवे ते बळकावून घेणे आणि दुसऱ्याला ते द्यायला भाग पाडणे यात फरक आहे. बळ वापरले तर यशस्वी होते तर हानी पोहोचवण्याची क्षमता राखून ठेवल्यास यशस्वी होते.

शेलिंग यांच्या मते, या सूक्ष्म फरकाचा राजनयात चतुरपणे वापर करता येतो. प्रत्यक्षात बळाचा वापर करणे हे प्रत्यक्षात कठीण अधिक धोकादायक व कमी उपयुक्त असते. त्याऐवजी दुसऱ्या

राष्ट्रास हानी पोहोचण्याची क्षमता बाळगणे परंतु ती प्रत्यक्षात न वापरता राखून ठेवणे, हे अधिक उपयुक्त ठरते. कारण त्यामुळे शत्रूला वाटाघाटींच्या टेबलावर आणता येते आणि आपल्याला जे हवे आहे ते शत्रूवर न लादल्यासारखे न वाटता करवून घेता येते. अर्थात हानी पोहोचण्याची धमकी वापरताना शत्रूराष्ट्रासमोर त्याला सुसह्य पर्याय असणे आवश्यक आहे. सर्वनाशाची धमकी शत्रूसमोरील शहाणपणाचे सर्व पर्याय बंद करून त्यालाच प्रथम हल्ला करण्यास भाग पाडू शकतो.

थोडक्यात, शेलिंग यांच्या मते, प्रत्यक्ष युद्धापेक्षा युद्धाच्या शक्यतेची भीती अधिक प्रभावी असते. लष्करी सामर्थ्य हे युद्ध करण्याकरिता नव्हे तर राजनय, वाटाघाटीना पाठबळ म्हणून बाळगणे अधिक शहाणपणाचे असते.

## १.६ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा उदारमतवादी दृष्टिकोन-

एक स्वतंत्र विषय म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास होऊ लागला त्याकाळात म्हणजेच पहिल्या महायुद्धानंतरच्या काही वर्षात उदारमतवादाचे प्राबल्य होते. मुख्यतः अमेरिका आणि ब्रिटनमध्ये या विद्याशाखेचा विकास होऊ लागल्याने तेथील उदारमतवादाचा प्रभाव जागतिक राजकारणावर पडलेला जाणवतो. १७ व्या शतकातील ब्रिटिश तत्वज्ञ जॉन लॉकच्या मानवी स्वभाव आणि निसर्गावस्था याविषयीच्या विचारांमध्ये उदारमतवादाची मुळे दडलेली आहेत. १८ व्या शतकाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेल्या जर्मन विचारवंत इम्युनल कांट यांच्या ‘Perpetual Peace’ या ग्रंथातील विचारांचाही त्यावर प्रभाव आहे.

मनुष्यप्राणी विवेकी असतो, आपल्या व इतरांच्याही भल्याबुऱ्याचा सारासार विचार तो करू शकतो. आपल्याप्रमाणेच इतरांचेही भले व्हावे यासाठी एकमेकांशी सहकार्य करण्याची प्रवृत्ती त्यांच्यात असते. यामुळेच त्यांनी विविध सामाजिक संघटना निर्माण केल्या, राज्य व कायदा निर्माण केले आणि परस्परांच्या भल्यासाठी परस्पर सहकार्याने राहता येईल, अशी व्यवस्था निर्माण केली. अशाच तऱ्हेने कायदा आणि संघटना यावर आधारित जागतिक व्यवस्था निर्माण करणे शक्य आहे, हा उदारमतवादी विचारांचा गाभा आहे. उदारमतवादी सिद्धांत राष्ट्र-राज्ये नष्ट करू पाहत नाही, तर केवळ त्यांच्या वर्तनाचे कायद्याने नियमन करू पाहतो, या अर्थाने तो राज्यकेंद्री सिद्धांत आहे.

सुरुवातीच्या काळात मुख्यतः पहिल्या महायुद्धाच्या काळात अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन आणि नॉर्मन एंजेल्स यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाची उदारमतवादी मांडणी केली. व्हर्सायच्या तहाच्या वेळेस विल्सन यांनी शांततेच्या अजेंड्यावरील १४ मुद्दे यादृष्टीने महत्वाचे आहेत. या १४ मुद्द्यांना विल्सन यांची ‘१४ कलमी योजना’ असेही म्हटले जाते. त्यातील काही महत्वाचे मुद्दे म्हणजे -

- गुप्त करार आणि गुप्त राजनयाची पद्धत बंद करणे
- मुक्त व्यापारावरील बंधने उठवणे
- सर्व राष्ट्रांना नौवहनाचे संपूर्ण स्वातंत्र्य देणे.
- सर्व राष्ट्रांनी शस्त्रकपात करून फक्त अंतर्गत सुरक्षेसाठी आवश्यक शस्त्रास्त्रे बाळगणे.

- वसाहतीचे प्रश्न आणि भौगोलिक सीमांचे वाद सोडविण्यासाठी स्वयंनिर्णयाच्या तत्वांचा वापर करणे. इ.

विल्सन यांच्या विचारातील दोन गोष्टींच्या पायावर उदारमतवादाची चौकट सर्वसाधारणपणे उभी आहे-

१) लोकशाहीचा प्रसार

२) सशक्त आंतरराष्ट्रीय संघटनांची गरज

विल्सन यांना लोकशाहीचा प्रसार अत्यंत महत्वाचा वाटतो कारण लोकशाही राष्ट्रे बहुतांशी शांतताप्रिय असतात आणि त्यांच्यात आपसात युद्धे क्वचितच होतात, असा त्यांचा विश्वास होता.

त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय संघटना आणि आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे जागतिक संबंधाचे नियमन करून राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष सोडविता येतात. सत्तासंतुलनापेक्षा संघटना व कायदा ही आंतरराष्ट्रीय सुरक्षेची अधिक विश्वसनीय साधने आहे. विल्सन यांच्या विचारांत 'उदारमतवादी आदर्शवाद' (Liberal Idealism) असेही म्हटले जाते.

२०व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात नॉर्मन एंजल यांचे 'The Great Illusion' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांनी असे म्हटले आहे की, युद्ध हे उपयुक्त असते आणि युद्धामुळे जेत्या राष्ट्रास भरपूर फायदा होतो ही मोठी गैरसमजूत आहे. आधुनिक काळात दुसऱ्या राष्ट्रांचा प्रदेश जिंकून घेण्याची जबर किंमत जेत्या राष्ट्रालाही मोजावी लागते. शिवाय युद्धामुळे आंतराराष्ट्रीय व्यापार उदिमावर विपरित परिणाम होऊन नुकसान होते.

एंजेल यांच्या या विचारांवरून पुढील काळातील उदारमतवाद्यांनी असा विचार मांडला की, राष्ट्राराष्ट्रांच्या वाढत्या आर्थिक व्यापारी परास्परावलंबित्वामुळे युद्धाची उपयुक्तता आपोआप कमी होत जाईल आणि आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे व संघटनांचे महत्व वाढेल.

या उदारमतवादी विचारातून १९२० च्या दशकातील सुधारणेचा आदर्शवादी कार्यक्रम तयार झाला. राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. राष्ट्रसंघाच्या माध्यमातून सामूहिक सुरक्षेच्या तत्वाचा पुरस्कार करण्यात आला. १९२१ मध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली. १९२८ च्या केलॉग- ब्रिआंद कराराने युद्ध बेकायदेशीर ठरविण्यात आले. स्वयंनिर्णयाच्या तत्वाच्या आधारे ऑटोमन, जर्मन, रशियन आणि ऑस्ट्रो- हंगेरियन साम्राज्यांतील प्रदेशांची पुनर्रचना करण्यात आली आणि नवीन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्यात आली. या राष्ट्रांमध्ये लोकशाही व्यवस्था राबविण्यात आली. १९३० च्या दशकातील घटनांमुळे हा अजेंडा मागे पडत गेला आणि हळूहळू युरोप पुन्हा शस्त्रस्पर्धा आणि सत्तासंतुलनाकडे वळला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंतप्रधान नेहरूंनी मुख्यत: उदारमतवादी तत्वांच्या आधारे भारतीय परराष्ट्र धोरणाची उभारणी केली. गटनिरपेक्ष घोरणांचा अवलंब असो की, आंतरराष्ट्रीय संघटनांना दिलेले महत्व असो, त्यामागे नेहरूंचा उदारमतवादी विचार होता.

**नवउदारमतवाद (New Liberalism):**

साठ आणि सत्तरच्या दशकात विशेषतः पाश्चात्य जगातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडींमुळे पुन्हा एकदा उदारमतवादी विश्लेषणास चालना मिळाली. उदारमतवादाच्या ज्या वेगवेगळ्या शाखा या काळात विकसित झाल्या, त्या सर्वांना एकत्रितयपणे नव-उदारमतवाद असे म्हटले जाते. या सिद्धांताचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते आदर्शवादी नव्हते. तसेच त्यांच्या अभ्यासपद्धतीवर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभाव पडलेला होता.

या काळातील पश्चिम युरोपातील क्षेत्रीय सहकार्याचा आणि आर्थिक एकात्मीकरणाचा कार्ल डॉईश आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैज्ञानिक अभ्यास केला. डॉईश यांनी असा विचार मांडला की, स्वतंत्र राष्ट्रांदरम्यान सातत्याने चालणाऱ्या विशेषतः आर्थिक-व्यापारी देवाण-घेवाणीमुळे त्या राष्ट्रांतील नागरिकांमध्ये सामायिक ओळख (Identity) आणि सामायिक मूल्यव्यवस्था विकसित होण्यास मदत होते. यामुळे शांतता आणि सहकार्य वाढीस लागते.

सर्वसाधारणपणे नव-उदारमतवादी सिद्धांताचा अभ्यास करताना खालील तीन सिद्धांताचा अभ्यास करावा लागतो-

१) उदारमतवादी परस्परावलंबित्वाचा सिद्धांत (रॉबर्ट कोहेन व जोजफ नाय)

२) नवउदारमतावादी संस्थावाद (ओरान यंग)


३) लोकशाहीजन्य शांततेचा सिद्धांत (मायकल डॉयल)

**१) उदारमतवादी परास्परावलंबित्वाचा सिद्धांत –**

रॉबर्ट कोहेन आणि जोजफ नाय यांच्या मतानुसार, पाश्चिमात्य जगातील देशांमध्ये गुंतागुंतीचे परस्परावलंबित्व निर्माण झाले आहे. परस्परावलंबित्व हे दोन देशांच्या शासनातील संबंधापुरतेच मर्यादित नसून, जनतेच्या पातळीवरील सामाजिक संबंध, उदयोगधंदयांचे सीमापार अस्तित्व आणि त्याअनुषंगाने येणारे संबंध असा त्याचा विस्तार झाला आहे. लष्करी सामर्थ्य हे परराष्ट्रधोरणाचे प्रमुख साधन राहिलेले नाही. यामुळे पाश्चिमात्य देशांदरम्यान संघर्षाची आणि युद्धाची शक्यता अगदीच नगण्य झाली आहे.

**२) नव-उदारमतवादी संस्थावाद (Neo-liberal institutionalism)**

विचारवंत ओरान यंग यांनी आंतरराष्ट्रीय संस्थांचे महत्व विशद केले. संस्था दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना (International organisations) आणि दुसरे म्हणजे आंतरराष्ट्रीय नियमव्यवस्था (International Regims).



संस्थांच्या वाढत्या जाळ्यांमुळे राजकीय आणि सामरिक नव्हे तर आर्थिक-सामाजिक विषयांवरील आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढले आहे. या सिद्धांताला नव-उदारमतवादी संस्थावाद असे म्हटले जाते.

**३) लोकशाहीजन्य शांततेचा सिद्धांत –**

मायकल डॉयल यांनी लोकशाहीजन्य शांततेची (Democratic peace) कल्पना मांडली. राष्ट्राराष्ट्रातील विवादांची शांततामय मार्गाने सोडवणूक, सामायिक मूल्यव्यवस्था आणि आर्थिक सहकार्य या तीन गोष्टींमुळे लोकशाही देशांदरम्यान युद्धे कमी होतात आणि शांतता नांदते, असे त्यांनी म्हटले आहे. या सिद्धांताच्या समर्थकांच्या म्हणण्यानुसार, जगात लोकशाहीचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशी युद्धाची शक्यता कमी होऊन शांततेचे क्षेत्र विस्तारत जाईल. शीतयुद्ध संपल्यानंतरच्या काळात नवउदारमतवादाचा प्रभाव पुन्हा एकदा वाढल्याचे दिसते. विशेषत: नवउदारमतवादी संस्थावाद आणि लोकशाहीजन्य शांततेचा सिद्धांत अभ्यासकांमध्ये अधिक लोकप्रिय बनले आहे.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही सार्वभौम राष्ट्र-राज्यांचीच व्यवस्था असली तरी त्यात संघर्ष अटळ नसून, राष्ट्र राज्यांचे एकमेकांशी सहकार्य शक्य असते, हे उदारमतवादाचे प्रमुख गृहितक आहे. ज्याप्रमाणे व्यक्ती विवेकाने विचार करून व्यवस्था आणि सुरक्षा प्रस्थापित करू शकते, त्याचप्रमाणे राष्ट्र-राज्येही व्यवस्था आणि सुरक्षा प्रस्थापित करू शकतात, असे उदारमतवाद मानतो. अभिजात उदारमतवादामध्ये सामूहिक सुरक्षेची कल्पना हे सुरक्षेचे प्रमुख साधन मानले आहे. नव-उदारमतवादी परास्परावलंबित्वाचा सिद्धांत आर्थिक तसेच इतर पातळ्यांवरील परास्परावलंबित्व जसे वाढते तशी परस्पर सहकार्याची प्रवृत्ती वाढते, असे मानतो. नव-उदारमतवादी संस्थावादामध्ये विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्य वाढते, असे मानले आहे तर लोकशाहीजन्य शांततेच्या सिद्धांतात लोकशाहीचा प्रचार-प्रसार हेच सुरक्षेचे आणि सहकार्य करण्याचे साधन मानले आहे.

## १.७ सत्ता

सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्रातील प्रमुख संकल्पना आहे. सत्ता हाच सर्व राजकीय घडामोडींचा केंद्रबिंदू आहे. राष्ट्रीय राजकारणापासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत सत्ता या संकल्पनेला महत्वाचे स्थान आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वास्तववादी दृष्टिकोनाचा केंद्रबिंदू सत्ता आहे. तसेच राष्ट्रीय सुरक्षा आणि हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणून सत्तेकडे पाहिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राचा दर्जा हा त्या राष्ट्राच्या सामर्थ्यावर, सत्तेवर अवलंबून असतो. परिणामी प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता, सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्रा - राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरू असते. त्यावरच राष्ट्राचे अस्तित्त्व, राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण, राष्ट्रीय हितसंबंध अवलंबून असतात.

हॅन्स मॉर्गेन्थ्यूच्या मते, सत्तेसाठी चाललेला संघर्ष हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील निरपवाद आणि सर्वकालीन सत्य असून, राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण आणि राजनयाचे अंतिम उद्दिष्ट राष्ट्रीय सामर्थ्याच्या आधारावर आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करण्याचा असतो.

### १.७.१ सत्तेचा अर्थ आणि स्वरूप –

सत्ता ही एक गुंतागुंतीची संकल्पना असून, अनेक अभ्यासकांनी सत्तेच्या व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्वसाधारणपणे सत्ता म्हणजे एकाची दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता होय. एखादी व्यक्ती, समूह, राज्य जी गोष्ट एरव्ही करणार नाही ती गोष्ट त्यास करायला लावण्याची दुसऱ्या व्यक्ती, समूह, राज्याची क्षमता म्हणजे सत्ता होय.

सत्तेच्या व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) जॉर्ज श्वेन बर्जर –**

“आपली इच्छा दुसऱ्यावर थोपवण्यासाठी आणि इतरांनी विरोध केला तर तो विरोध मोडून काढून आपली इच्छा लादण्याची परिणामकारक शक्ती म्हणजे सत्ता होय.”

**२) हॅन्स मॉर्गेन्थ्यू –**

“सत्ता म्हणजे एखाद्या व्यक्तीचे असलेले प्रभूत्व”

**३) रॉबर्ट ढाल –**

“सत्ता म्हणजे एखाद्यावर प्रभाव पाडून त्याच्याकडून काम करवून घेण्याची क्षमता असणे.”

**४) ड्युचेक –**

“मला अपेक्षित अशी इतरांना वागण्यास लावण्यासाठी वापरलेली क्षमता म्हणजेच सत्ता”

सत्तेच्या वरील व्याख्यांवरून सत्तेची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील.

- सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू असून, आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्नशील असते. सामर्थ्यवान राष्ट्रे आपल्या सामर्थ्याच्या जोरावर दुर्बल कमकुवत राष्ट्रांवर दबाव टाकून आपली इच्छा लादण्याचा प्रयत्न करतात.
- प्रत्येक संस्था, संघटना, राष्ट्र इ. मध्ये तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ताप्राप्तीसाठी संघर्ष सुरू असतो. सत्ता साधन आणि साध्य म्हणूनही कार्य करते.
- राष्ट्राचे हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन म्हणजे सत्ता होय.

- सत्ता ही सापेक्ष आणि परिवर्तनीय संकल्पना आहे. स्थळ-काळ परिस्थितीनुसार सत्तेत बदल होत असतात.
- राष्ट्राच्या सत्तेतून राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रावर प्रभाव पडण्याची क्षमता व्यक्त होते त्यावरून त्या राष्ट्राच्या सामर्थ्याचा अंदाज लावता येतो.
- सत्ता अनेक परस्परावलंबी, परिवर्तनीय अशा घटकांवर अवलंबून असते, त्यामुळे सत्तेचे मोजमाप करणे अवघड आहे. सत्तेच्या काही घटकांचे परिणामीकरण उदा. देशात उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्ती, आर्थिक प्रगती, लष्करी सामर्थ्य इ. करता येते, तर काही घटकांचे परिमाणीकरण करता येत नाही उदा. राजकीय नेतृत्व, नोकरशाही, शासन प्रणाली इ.

### १.७.२ राष्ट्रीय सत्तेचे घटक –

सत्ता हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा आणि प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण निर्मितीचा महत्वाचा घटक आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सर्वच राजकीय विचारवंतांनी सत्ता या घटकाला आपल्या विचारांमध्ये आणि साहित्यात केंद्रस्थान दिले आहे सत्ता या घटकाचा प्रभाव व्यक्ती, व्यक्तीसमूह, त्यांच्याशी निगडित राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच घटकांवर पडत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारण हे तर पूर्णपणे सत्तेभोवतीच फिरताना दिसते.

सत्तेचा अर्थ आणि स्वरुपाचा अभ्यास केल्यानंतर सत्तेच्या प्रमुख घटकांची माहिती आपण घेणार आहोत. सर्वसाधारणपणे एखाद्या राज्याची सत्ता म्हणजेच त्याचे लष्करी सामर्थ्य, असे समजले जाते. परंतु लष्करी सामर्थ्य हा सत्तेचा एक महत्वाचा घटक आहे. राज्याच्या सत्तेच्या घटकांची स्थायी / परिमाणीकरण करता येणारे घटक आणि अस्थायी / परिमाणीकरण करता न येणारे घटक अशा दोन घटकांत विभागणी केली जाते. हे दोन्ही गटातील घटक परस्परावलंबी आणि परिवर्तनीय आहेत. राष्ट्राचे भौगोलिक स्थान, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, तंत्रज्ञान, आर्थिक विकास, लष्करी सामर्थ्य हे स्थायी / परिमाणीकरण करता येणारे घटक आहे तर, राजकीय नेतृत्व, नोकरशाही, शासन प्रणाली, जनतेचे मनोबल हे अस्थायी / परिमाणीकरण करता न येणारे घटक आहेत.

#### १) राष्ट्राचे भौगोलिक स्थान –

राष्ट्राचे सामर्थ्य त्याच्या भौगोलिक स्थानावर अवलंबून असते. राष्ट्राचे भौगोलिक स्थान, विस्तार, हवामान, क्षेत्रफळ, सीमारेषा यांचा आणि त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थान, राष्ट्रीय सामर्थ्य यांचा घनिष्ठ संबंध आहे.

राष्ट्रांचा भौगोलिक आकार, क्षेत्रफळ, विस्तार जितका मोठा तितके त्याचे सामर्थ्य अधिक समजले जाते. भारत आणि चीन या उभरत्या महासत्तांच्या बाबतीत हे तत्त्व पूर्णत: लागू पडते. या राष्ट्रांनी आपला सलग भूभाग, विशाल आणि खंडप्राय भूमीचा उपयोग आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्यासाठी केला आहे. राष्ट्राच्या भौगोलिक स्थानावरच राष्ट्राचे परराष्ट्र धोरण, राजनय, युद्धनीती या गोष्टी अवलंबून असतात.

एखाद्या राष्ट्राचे स्थान शत्रूराष्ट्रांदरम्यान असेल तर, त्या राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण ठरविताना काळजी घ्यावी लागते.

उदा. भारत. भारताचे स्थान पाकिस्तान आणि चीन या दोन शत्रूराष्ट्रांदरम्यान असल्याने भारताला आपले परराष्ट्र धोरण विचारपूर्वक आखावे लागते.

भौगोलिक स्थानाबरोबरच देशातील हवामान, खनिज संपत्ती या घटकांचाही राष्ट्राच्या सामर्थ्यावर परिणाम होत असतो. प्रतिकूल हवामानाचा राष्ट्रीय सामर्थ्यावर नकारात्मक परिणाम होतो, मध्यम हवामान असलेल्या राष्ट्रांचा विकास जलद गतीने झाला आहे.

सीमारेषा आणि सत्तेचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रांच्या सीमारेषांची आखणी व्यवास्थित केलेली असेल तर शेजारील राष्ट्रांबरोबर शांतता प्रस्थापित करण्यास मदत होते. परिणामी संरक्षणात्मक खर्च वाचतो. परंतु सीमारेखांवरून राष्ट्रांमध्ये संघर्ष असेल तर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते.

उदा. भारत-चीन सीमावाद

**२) लोकसंख्या**

राष्ट्राची लोकसंख्या किंवा मनुष्यबळ हे राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. राष्ट्र उपलब्ध मानवी साधन संपत्तीचा उपयोग राष्ट्रविकासासाठी योग्य रीतीने करीत असेल तर जास्त लोकसंख्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने वरदान ठरते. परंतु अतिरिक्त लोकसंख्येमुळे राष्ट्रांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात.

राष्ट्राच्या लोकसंख्येइतकीच मनुष्य बळाची गुणवत्ता ही महत्वाची ठरते. लोकसंख्या आणि आर्थिक विकास यांचाही जवळचा संबंध आहे. उच्च गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ असलेल्या राष्ट्रांचा विकास लवकर घडून येतो.

उदा. जपानची लोकसंख्या भारत आणि चीनपेक्षा कितीतरी कमी आहे परंतु आज जपान हे जगातील एक श्रीमंत राष्ट्र म्हणून ओळखले जाते. जपानी माणूस हा कार्यक्षम, कष्टाळू म्हणून ओळखला जातो. परिणामी दुसऱ्या विश्वयुद्धातील प्रचंड संहारानंतरही जपानने आपला आर्थिक विकास साधला.

**३) नैसर्गिक साधनसंपत्ती -**

नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिजसंपत्ती हेही सत्तेचे प्रमुख घटक आहे. राष्ट्रात नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील राष्ट्र मोठी औद्योगिक व आर्थिक प्रगती साधू शकते. परंतु नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यासाठी राष्ट्राकडे आवश्यक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ, भांडवलाची आवश्यकता असते.

उदा. पश्चिम आशियामध्ये तेलासारख्या खनिजाच्या उपलब्धतेवर आखाती राष्ट्रे जगावर आपले वर्चस्व गाजवतात. परंतु या तेलखाणीतून खनिजतेल खणून वर काढण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान त्यांना पाश्चात्य राष्ट्रांकडून मिळवावे लागते. तंत्रज्ञान

आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची सांगड घातल्यानंतर तेल उत्पादन व निर्यात वाढली. त्याच्या आधारावर ही राष्ट्रे आज श्रीमंत व प्रभावशाली बनली आहेत.

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर आशियाई - आफ्रिका खंडातील राष्ट्रांनी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जोरावर आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.

**४) आर्थिक विकास**

राष्ट्राची सत्ता आर्थिक विकासावरही अवलंबून असते. आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेले जपान, जर्मनी, अमेरिका सारखी प्रबळ राष्ट्रे आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर जगावर प्रभूत्व गाजविण्याचा प्रयत्न करतात. विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांना मदत करून आपल्या प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न करतात.

उदा. युरोपातील साम्राज्यवादापासून रोखण्यासाठी सोवियत रशियाने भारताला प्रचंड आर्थिक व तांत्रिक मदत केली.

**५) लष्करी सामर्थ्य -**

लष्करी सामर्थ्य हा राज्याच्या सत्तेचा प्रमुख घटक आहे. लष्करी सामर्थ्यत सैन्यातील लढाऊ सैनिकांची संख्या, शस्त्रांस्त्रांची संख्या आणि गुणवत्ता, अत्याधुनिक संरक्षणात्मक तंत्रज्ञान या घटकांचा समावेश होतो.

उदा. पहिल्या आणि दुसऱ्या विश्वयुद्धात आधुनिक शस्त्रास्त्रे आणि संरक्षण पद्धतीचा वापर करणारी, इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया सारखी राष्ट्रे विजयी झाले. १९४५ मध्ये जपानवर अमेरिकेने टाकलेल्या दोन अणुबॉम्ब नंतर जपानने तात्काळ शरणागती पत्करली.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका - सोवियत राशिया या महासत्तांनी शीतयुद्धात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्रे, बॉम्ब, लढाऊ विमाने, युद्धनौका, पाणबुड्या इ. ची साधनांची निर्मिती करून एकमेकांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला.

**६) जनतेचे मनोबल**

देशातील जनतेचे मनोबल हा राष्ट्रीय सत्तेच्या दृष्टीने महत्वाचा घटक आहे. राष्ट्रीय मनोबल म्हणजे राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे नितांत प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थत्याग करण्याची, राष्ट्रासाठी कष्ट घेण्याची तयारी होय.

जनतेचे मनोबल ही एक अशी कार्यशक्ती आहे, जी नागरिकांना राष्ट्रीय प्रगती, उन्नतीसाठी कार्य करण्यास प्रवृत्त करते. संकटकालीन परिस्थितीमध्ये संघटित शक्ती बनून राज्याच्या पाठीशी उभी राहते. धर्म, जात, भाषा, प्रदेश इ.ची बंधने बाजूला सारून जनता राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवते.

दुसऱ्या महायुद्धात आर्थिक झळ सहन केलेल्या जपानने नागरिकांचा स्वार्थत्याग, परिश्रमातून आर्थिक प्रगती घडवून आणली.

## ७) राष्ट्रीय चरित्र –

वास्तववादी सिद्धांताचे पुरस्कर्ते राष्ट्रीय चरित्र्याला सत्तेचा महत्वाचा घटक मानतात. राष्ट्रीय चारित्र्य आणि राष्ट्रीय मनोबल या दोन्ही घटकांचा जवळचा संबंध आहे. राष्ट्रीय चारित्र्य जनतेच्या मनोबलाचा महत्वाचा घटक आहे. मनोबल हे राष्ट्रीय चारित्र्यावर अवलंबून असते.

राष्ट्रीय चारित्र्याच्या आधारे विशिष्ट राष्ट्रामधील जनतेसंबंधी विशेषणे वापरतो. उदा जर्मन माणूस म्हणजे कणखर, शिस्तप्रिय, कार्यकुशल तर रशियन माणूस चिवट असतो.

राष्ट्रीय चरित्र्य हा घटक परिवर्तनीय आहे. विशिष्ट परिस्थिती मध्ये जनतेच्या प्रतिसादाचा राष्ट्रीय चारित्र्यात समावेश होतो. परिस्थिती बदलली की, प्रतिसादात बदल होऊ शकतो.

## ८) राजकीय नेतृत्व -

राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्यात देशाचे राजकीय नेतृत्व महत्वाची भूमिका बजावतो. राष्ट्राची प्रगती, प्रगतीला योग्य दिशा देण्याचे कार्य राष्ट्रीय नेतृत्व करीत असते. युद्धकालीन परिस्थितीत सूज्ञ, विचारी, कणखर, प्रभावी निर्णयक्षमता असलेले नेतृत्व राष्ट्राला विजय मिळवून देते. तसेच शांततेच्या काळात देशातील नैसर्गिक - मानवी साधनसंपत्तीचा विकासात्मक कार्यासाठी उपयोग करून घेण्यात राजकीय नेतृत्वाचा कार्यभाग महत्वाचा असतो.

उदा. तुर्कस्तानमधील मुस्तफा केमालपाशा, भारताच्या पंडित नेहरूंचे नेतृत्व, इजिप्तमधील कर्नल नासेरचे नेतृत्व इ. नेतृत्व कणखर, सकारात्मक होते. परंतु युरोपमध्ये पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी-इटलीत उदयाला आलेल्या हिटलर- व मुसोलिनीच्या आक्रमक नेतृत्वाने दोन्ही राष्ट्रांना युद्धाच्या खाईत लोटले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लंडमधील विस्टन चर्चिल, अमेरिकेचे रुझवेल्ट आणि सोवियत रशियाच्या स्टॅलिनच्या कणखर नेतृत्वाने दोस्त राष्ट्रांना विजय मिळवून दिला.

राजकीय नेतृत्वाकडून जनतेचे मनोबल वाढविण्याचे, त्यात सातत्य ठेवण्याचे प्रयत्न केले जातात. त्यासाठी विचारधारा, प्रचारतंत्रे, प्रतिके इ. चा वापर केला जातो.

उदा. नाझी जर्मनीतील हिटलरचे नेतृत्व.

दिव्यवलयांकित नेतृत्वात जनतेत चैतन्य निर्माण करण्याची अलौकिक शक्ती असते. अशा नेतृत्वामुळे लोकांना प्रेरणा मिळून ते प्रभावित होतात.

उदा. महात्मा गांधींचे नेतृत्व.


### ९) नोकरशाही –

राज्यकर्त्यांबरोबरच देशातील प्रशासकीय नेतृत्वही राष्ट्राचे सामर्थ्य वाढवण्यास कारणीभूत ठरते. नोकरशाहीच्या गुणवत्तेवर देशाचे सामर्थ्य अवलंबून असते. अचूक माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण, कार्यक्षमता यातून नोकरशाही राजकीय नेतृत्वाला पूरक कार्य करते.

राष्ट्राची सत्ता ही वरील घटकांवर अवलंबून असते. यातील कोणत्याही एका घटकांच्या परिस्थितीत बदल झाला की, देशाच्या सामर्थ्यावरही त्याचा कमी-अधिक प्रमाणात परिणाम होत असतो.

## १.७.३ सत्तेचे प्रकार

सत्तेचे खालील प्रकार पडतात.




### १. भौतिक सत्ता

भौतिक सत्ता ही राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यावर आधारित असते. लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान राष्ट्रांचा इतर राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याची क्षमता तुलनेने जास्त असते.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोवियत रशिया या दोन महासत्तांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला प्रभाव वाढवण्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर केला. लष्करी सामर्थ्य वाढवण्यातून शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली आणि त्यामुळे हजारो अण्वस्त्रांची निर्मिती करण्यात आली.

आजही विश्वातील अमेरिका, चीन, भारत, इस्त्राईल, पाकिस्तान यासारखी राष्ट्रे आपले भौतिक सामर्थ्य वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. असे असले तरी शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर भौतिक सामर्थ्यापेक्षा आर्थिक सामर्थ्य वाढविण्यावर राष्ट्र भर देत असल्याने सत्तेचा हा प्रकार मागे पडला आहे.

### २) मानसशास्त्रीय सत्ता

परराष्ट्रीय धोरणासाठी, महत्वाच्या आंतरराष्ट्रीय निर्णयासाठी राज्यकर्ते जनतेची अधिमान्यता मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशी अधिमान्यता मिळविण्यासाठी मानसशास्त्रीय सत्तेचा वापर केला जातो. त्यासाठी विविध प्रचारतंत्रांचा आधार घेतला जातो. प्रामुख्याने मानसशास्त्रीय सामर्थ्याचा वापर राष्ट्रांतर्गत आणि देशाबाहेरील जनमताला प्रभावित करण्यासाठी केला जातो.

देशाच्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करून जनतेमध्ये राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम जागृत केले जाते, हाही मानसशास्त्रीय सत्तेचाच वापर आहे.

जनतेत मानसशास्त्रीय सत्तेचा प्रभाव पाडण्यात प्रसारमाध्यमे महत्वाची भूमिका बजावतात.

उदा. अमेरिकेच्या धोरणांना अनुकूल जागतिक लोकमत बनावे म्हणून सीएनएन ही दूरचित्रवाहिनी, रेडिओ अमेरिका ही आकाशवाणी सतत प्रयत्नशील असतात.

**३) आर्थिक सत्ता-**

एखादे श्रीमंत, विकसित राष्ट्र आपल्या आर्थिक विकासाच्या बळावर इतर गरीब, विकसनशील राष्ट्रांवर प्रभाव पाडून आपली सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्याला आर्थिक सत्ता असे म्हणतात. कर्ज, आर्थिक मदत, आयात-निर्यात करांमध्ये सवलत, परकीय विकासनिधी ही सत्तेची प्रमुख साधने आहेत.

उदा. अमेरिकेसारखे श्रीमंत राष्ट्र आपल्या इच्छा विकसनशील, अविकसित राष्ट्रांवर लादण्याचा प्रयत्न करीत असते.

शीतयुद्धाच्या काळात राष्ट्रांच्या भौतिक सत्तेला महत्व होते. शीतयुद्धाच्या अंतानंतर भौतिक सत्तेची जागा आर्थिक सत्तेने घेतली आहे. त्यातून प्रादेशिक पातळीवर विविध व्यापार संघ निर्माण झाले आहे.

उदा. युरोपियन युनियन, आसियान. इ.

जपानसारखे लहान राष्ट्र आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर आंतरराष्ट्रीय राजकारणावर आपला प्रभाव पाडत आहे. १९९७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्य पदासाठी झालेल्या निवडणुकीत जपानने भारताचा आपल्या आर्थिक सत्तेच्या जोरावर पराभव केला.

### १.७.४ सत्तेची साधने किंवा सत्ता वापरण्याच्या पद्धती

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रे आपल्या सत्तेच्या जोरावर परस्परांवर प्रभाव पाडण्याचा, त्याद्वारे आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी विविध साधनांचा वापर केला जातो. सत्तेची साधने खालीलप्रमाणे –

**१) मन वळवणे / मताचा आग्रह किंवा पाठपुरावा**

सत्तेद्वारे प्रभाव पाडण्याचे हे महत्वाचे साधन असून त्याचा वापर दुसऱ्या राष्ट्राचे मन वळवून, आपल्या मताचा आग्रह धरून त्याच्या धोरणात अपेक्षित बदल घडवून आणता येतो. या साधनाचा वापर विविध विभागीय - आंतरराष्ट्रीय संघटनांच्या व्यासपीठावरील चर्चेच्या प्रसंगी केला जातो. यातून राष्ट्रांची सौदेबाजीची क्षमता व्यक्त होते.

उदा. काश्मीर प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तानने नेहमीच आपली बाजू योग्य कशी आहे हे UNO च्या व्यासपीठावरून आंतरराष्ट्रीय समुदायाला पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

शीतयुद्धाच्या काळात नवस्वतंत्र आशियाई-आफ्रिकी -राष्ट्रांच्या मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी नाम संघटनेने महत्वाची भूमिका पार पाडली.

**२) बक्षीस देणे-**

बक्षीस हे सत्तेचे दुसरे महत्वाचे साधन आहे. राष्ट्रांना आर्थिक मदत, कर्ज, निधी, लष्करी - संरक्षणात्मक मदत, राजकीय समर्थन अशा स्वरूपात दिले जाते. बक्षिसे देऊन राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याचा प्रयोग आंतरराष्ट्रीय राजकारणात पूर्वीपासून केला जातो.

बक्षीसाचे तीन प्रकार आहेत ते म्हणजे आर्थिक - राजकीय- लष्करी / संरक्षणात्मक

- आर्थिक प्रकार- यामध्ये राष्ट्रांना कर्ज, निधी आर्थिक मदत केली जाते.
- लष्करी प्रकार - सामर्थ्यवान राष्ट्र इतर राष्ट्रांना शस्त्रास्त्र – पुरवणे, शस्त्रास्त्र खरेदीसाठी मदत, शस्त्रास्त्र निर्मितीचे तंत्रज्ञान पुरवते
- राजकीय प्रकार- यात राजकीय मुद्दयांवर पाठिंबा दिला जातो. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका – सोवियत रशिया या महासत्तांनी राष्ट्रांना अशा प्रकारची मदत देऊन आपल्या गटात ओढण्याचा प्रयत्न केला होता.
- काश्मीर प्रश्नावरून अमेरिकेने पाकिस्तानला तर सोवियत रशियाने भारताला पाठींबा दिला.

**३) शिक्षा देणे-**

अनेकदा शिक्षा देऊन किंवा शिक्षेची भीती दाखवून सामर्थ्यवान राष्ट्र दुर्बल राष्ट्रांवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करते. अशी शिक्षा बक्षिसे नाकारून, आर्थिक बंधने लादून, आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडून, लष्करी करार अमान्य करून दिली जाते.

उदा. भारताने जेव्हा १९७४ व १९९८ मध्ये पोखरण अणुचाचण्या केल्या तेव्हा भारतावर अमेरिकेने आर्थिक निर्बंध लादले.

१९९१ मध्ये इराकने कुवैतवर आक्रमण केल्याबद्दल इराकला यूनोने आर्थिक नाकेबंदीची शिक्षा दिली.

**४) सक्ती किंवा प्रत्यक्ष बळाचा अथवा दमनाचा वापर-**

सक्ती किंवा प्रत्यक्ष बाळाचा वापर ही शिक्षेची पुढची पायरी असून तिचा वापर शेवटचा पर्याय म्हणून केला जातो. यामध्ये युद्ध किंवा लष्करी कारवाई या साधनांचा वापर केला जातो. बळाचा वापर प्रत्यक्षात केला नाही तरी तसे करण्याची धमकी देण्याचे तंत्र वापरले जाते.

उदा. २००१ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तानवर केलेली लष्करी कारवाई, २००३ मध्ये अमेरिकेने इराकमधील सद्दाम हुसेनची राजवट बरखास्त करण्यासाठी सक्तीचा वापर केला.

### १.७.५. सत्तेचा वापर किंवा उपयोग

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचा वापर राष्ट्रे विविध उद्दिष्टांसाठी करीत असतात.

**१) राष्ट्रीय सुरक्षा -**

राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे प्रत्येक राष्ट्राचे आद्य कर्तव्य मानले जाते. राष्ट्राची राष्ट्रीय सुरक्षा, हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते. त्यामुळे आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढविण्यासाठी राष्ट्रे जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. त्यासाठी अण्वस्त्रे निर्मिती, लष्करी सामर्थ्यात वाढ, असे उपाय राष्ट्रांकडून योजिले जातात.

**२) प्रस्थापित व्यवस्थेचे संरक्षण**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रस्थापित सत्ता विभागणीची, सत्ता समतोलाची व्यवस्था टिकवणे आवश्यक असते. या व्यवस्थेच्या रक्षणासाठी सत्तेचा वापर केला जातो.

उदा. युरोपात वॉटर लूच्या युद्धात नेपोलियन बोनापार्टाच्या पाडावानंतर १८१५ मध्ये युरोपियन राष्ट्रांची व्हिएन्ना परिषद झाली. यावेळी झालेल्या करारातून निर्माण झालेल्या सत्ता समतोलाची व्यवस्थेच्या रक्षणासाठी इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांनी प्रयत्न केले.

पश्चिम आशियातील विभागीय सत्तासमतोल टिकविण्यासाठी २००३ मध्ये अमेरिकेने इराकवर लष्करी कारवाई करून सद्दाम हुसेनची हुकुमशाही नष्ट केली.

**३) प्रस्थापित व्यवस्थेत बदल घडवून आणणे-**

काही राष्ट्रे सत्तेचा वापर प्रस्थापित राजकीय व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी करतात. दोन परस्परविरोधी उद्दिष्टे असणाऱ्या राष्ट्रांच्या गटांतील संघर्षातून जगात युद्धे घडून येतात.

उदा. भारत-चीन या दोन राष्ट्रात गेल्या अनेक वर्षापासून सीमावाद सुरु आहे. भारताच्या अरुणाचल प्रदेश, सिक्कीम या दोन राज्यांवर चीन आपला हक्क सांगत आहे कारण चीनला प्रस्थापित व्यवस्थेत बदल हवा आहे. त्यासाठी चीनने लष्करी सामर्थ्याचा अवलंब करून भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे. यातुनच १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले.

**४) आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा –**

अनेकदा राष्ट्रांकडून सत्तेचा वापर जागतिक राजकारणात आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी एक साधन म्हणून केला जातो. राष्ट्रे आपल्या आर्थिक- लष्करी सत्तेचे प्रदर्शन करून इतरांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर अण्वस्त्र संपन्नता प्राप्त करणे हे आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठेचे मानले जात.

२६ जानेवारीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळविण्याच्या दृष्टीने भारताकडून नवी दिल्ली येथे पार पडणाऱ्या संचलनात लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन केले जाते. मित्र आणि शेजारील राष्ट्रामध्ये आदर, शत्रू राष्ट्रांमध्ये भीती निर्माण व्हावी, हा या प्रदर्शनामागील उद्देश असतो. अशा प्रकारे सत्तेचा वापर विविध उदिष्टांसाठी केला जातो.

## १.८ राष्ट्रीय हित (National Interest)

आंतरराष्ट्रीय राजकारणात शत्रू किंवा मित्र कायम नसतात, परंतु राष्ट्रीय हित किंवा हितसंबंध कायम असतात. पूर्वीपासून हे तत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा मुख्य आधार आहे. कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा आणि राजनयाचा प्रमुख उद्देश राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे हा असतो.

राष्ट्रीय हितसंबंध ही व्यापक संकल्पना असून, प्रत्येक राष्ट्राची राष्ट्रीय हितसंबंधाची कल्पना वेगळी असू शकते ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिस्थितीवर अवलंबून असू शकते. परिस्थिती बदलली की राष्ट्रीय हितसंबंध बदलतात.

हॅन्स मॉर्गेन्थ्यूने राष्ट्रीय हितासाठी वेगवेगळे शब्द वापरले आहे. जसे, सामूहिक हित, समान हित, प्राथमिक हित, दुय्यम हित, अल्पकालीन-दीर्घकालीन हित. राष्ट्रीय हित कोण ठरवते? यावरही त्याचा अर्थ-स्वरूप अवलंबून असते. निर्णय घेणाऱ्याचा / शासकाचा स्वभाव आणि शासनाचे स्वरूप यांचाही राष्ट्रीय हितसंबंधावर परिणाम होत असतो. म्हणजेच राष्ट्रीय हितसंबंधाचा अर्थ, स्वरूप सातत्याने बदलत असते.

### १.८.१. राष्ट्रीय हितसंबंधाच्या व्याख्या

राष्ट्रीय हितसंबंधाचा अर्थ स्पष्ट करणे कठीण असले तरी अभ्यासकांनी त्याच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहे.

**१) डाईक –**

"राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे असे हितसंबंध जे प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्रांच्या तुलनेत जोपासण्याचा प्रयत्न करीत असते."

**२) चार्लस लेर्च आणि अबूल सैद –**

"दीर्घ मुदतीचे आणि सातत्यपूर्ण सर्वसामान्य उदिष्टे जी राष्ट्रे आणि शासनाच्या दृष्टीने फायद्याची असतात आणि ज्याच्या जपणुकीसाठी राष्ट्रे प्रयत्नशील असतात. त्याला राष्ट्रीय हित असे म्हटले जाते."

**३) जोसेफ कँडेल –**

"कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा पाया म्हणजे राष्ट्रीय हितसंबंध होय."

वरील व्याख्यांवरून राष्ट्रीय हितसंबंधांची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील-

१) राष्ट्रीय हितसंबंध ही व्यापक आणि परिवर्तनीय संकल्पना असून, देशांतर्गत-आंतरराष्ट्रीय परिस्थितीत बदल घडून आला की, राष्ट्रीय हितसंबंधात बदल घडून येतो.

२) राष्ट्रीय हितसंबंधाची यादी बनवणे अवघड असले तरी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे रक्षण करणे, राष्ट्राची प्रगती साधणे, राष्ट्राची अखंडता टिकविणे हे सर्वसामान्य आणि कायमस्वरूपी हितसंबंध असतात.

३) परराष्ट्र धोरण आणि राजनयाचा प्रमुख उद्देश म्हणजे राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे म्हणून हितसंबंध परराष्ट्र धोरणाचा पाया मानला जातो.

४) आंतरराष्ट्रीय संबंधात कोणत्याही दोन राष्ट्रांचे हितसंबंध समान नसतात.

५) राष्ट्रीय हितसंबंधामध्ये शासनकर्ता किंवा निर्णय घेणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव, राजकीय व्यवस्थेचे स्वरूप, जनमत इ. चे प्रतिबिंब पडत असते.

६) प्रामुख्याने अल्पमुदतीचे- दीर्घमुदतीचे, मूलभूत किंवा दुय्यम, राजकीय किंवा अराजकीय अशी राष्ट्रीय हितसंबधाची विभागणी करता येते.

### १.८.२ राष्ट्रीय हितसंबंधाचे प्रकार –

राष्ट्रीय हितसंबधाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी राष्ट्रीय हितसंबंधाचे प्रकार समजून घेणे आवश्यक आहे.

थॉमस रॉबिन्सन या अभ्यासकाने राष्ट्रीय हितसंबंधाचे एकूण सहा प्रकार सांगितले आहे.

१) प्राथमिक हितसंबंध

२) दुय्यम हितसंबंध

३) कायमस्वरूपी हितसंबंधी

४) परिस्थिती सापेक्ष हितसंबंध

५) सामान्य हितसंबंध

६) विशेष हितसंबंध

७) राष्ट्रीय हितसंबंध

**१) प्राथमिक हितसंबंध -**

राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण करणे, राष्ट्राची प्रादेशिक एकात्मता-अखंडत्व टिकविणे, राष्ट्राची प्रगती घडवून आणणे हे राष्ट्राची प्राथमिक हितसंबंध असतात. त्यासाठी राष्ट्रे प्रयत्नशील असतात.

**२) दुय्यम हितसंबंध –**

यात परदेशात वास्तव्य करणाऱ्या आपल्या देशातील नागरिक – राजदूतांची सुरक्षितता करणे यासाठी राष्ट्राकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा समावेश होतो.

**३) कायमस्वरूपी हितसंबंध –**

यात अशा स्वरुपाच्या हितसंबंधाचा समावेश होतो जे कायमस्वरूपी आहेत आणि ज्यात सातत्य आहे.

उदा. भारतातील काश्मीरबद्दलचे धोरण. काश्मीर राज्य भारतात कायदेशीररीत्या विलीन झाले असून, ते भारताचा अविभाज्य घटक आहे. भारताची ही भूमिका गेल्या ५० वर्षापासून कायम आहे. हा भारताच्या कायमस्वरूपी हितसंबंधाचा भाग आहे. गेल्या काही शतकांपासून समूद्धि मार्गाचे संरक्षण हा इंग्लंडच्या कायमस्वरूपी हितसंबंधाचा भाग होता.

**४) परिस्थितीसापेक्ष हितसंबंध –**

हे परिवर्तनीय हितसंबंध असतात. देशांतर्गत - आंतरराष्ट्रीय परिस्थितीत परिवर्तन घडून आले की असे हितसंबंध बदलतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत राशिया दरम्यान सुरू झालेल्या शीतयुद्धाच्या राजकारणात साम्यवादाच्या प्रसाराला आळा घालणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. पण सन १९९० च्या दशकात शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर हे उद्दिष्ट कालबाह्य झाले. आता अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधाच्या जपणुकीला प्राधान्य देण्यात आले आहे.

**५) सामान्य हितसंबंध-**

यात राष्ट्राची आर्थिक प्रगती व्हावी, व्यापार वाढावा, इतर राष्ट्रांना बाजारपेठेमध्ये प्रवेश मिळावा यासाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण करणे, त्यासाठी प्रयत्नशील राहणे, अशा उद्दिष्टांचा समावेश होतो. यासाठी मोठी राष्ट्रे सत्तासंतुलनाचे राजकारण खेळत असतात.

**६) विशेष हितसंबंध-**

परिस्थिती आणि वेळेनुसार असे हितसंबंध निर्धारित केले जातात. उदा. आंतरराष्ट्रीय दहशतवादाची समस्या आज अनेक लोकशाहीवादी राष्ट्रांना सतावत आहे. भारत, अमेरिका, रशिया, चीन सारख्या राष्ट्रांना दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. सप्टेंबर, ११, २००१ च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवादाचे निर्मूलन हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतानेही अमेरिका आणि रशियाच्या मदतीने दहशतवादविरोधी संयुक्त मोहीम उघडली आहे.

### १.८.३ राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनाचे मार्ग –

राष्ट्रीय हितसंबंधांच्या जपणुकीसाठी तसेच संवर्धनासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते. त्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला जातो. जसे जबरदस्तीचा मार्ग किंवा दमनशक्तीचा मार्ग (coercive measures), इतर राष्ट्रांशी युती करणे (Alliances), राजनयाचा मार्ग (Diplomacy), आर्थिक मदत आणि प्रचार, सामूहिक सुरक्षितता (Collective Security) अशा अनेक - मार्गाने राष्ट्रे आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करतात.

**१) जबरदस्ती किंवा दमनशक्तीचा मार्ग -**

जबरदस्ती किंवा दमनशक्तीच्या मार्गात प्रत्यक्ष लष्करी सामर्थ्याचा वापर, आर्थिक बहिष्कार, राजनैतिक संबंध तोडणे, विशिष्ट राष्ट्राला कोंडित पकडण्याचा प्रयत्न करणे, आक्रमणाचा प्रतिकार करणे या मार्गाचा समावेश होतो.

उदा. शीतयुद्धोत्तर राजकारणादरम्यान अमेरिकेचे इराक, उत्तर कोरिया, अफगाणिस्तान या राष्ट्रांविषयीचे धोरण. १९९१ च्या खाडी युद्धानंतर (इराक - कुवैत युद्ध) इराककडे अण्वस्त्रे, रासायनिक अस्त्रे असल्याच्या संशयावरून इराकवर आर्थिक बहिष्कार टाकण्यात आला. ११ सप्टें, २००१ च्या अमेरिकेवरील दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सूत्रधार ओसामा-बिन-लादेनला अफगाणिस्तानातील तालिबान शासनाने आश्रय दिल्याच्या संशयावरून अफगाणिस्तानविरुद्ध केलेली लष्करी कारवाई.

सन, १९९८ मध्ये भारत पाकिस्तानने केलेल्या अणुचाचण्यानंतर अमेरिकने दोन्ही राष्ट्रविरोधी आर्थिक बंदीचे अस्त्र वापरले.

**२) दोन किंवा अधिक राष्ट्रांची युती –**

समान राष्ट्रीय हितसंबंधाच्या संरक्षणासाठी अनेकदा दोन किंवा अधिक राष्ट्रांच्या युती प्रस्थापित होतात. विशिष्ट उद्दिष्टपूर्ती हा अशा युतींचा आधार असतो. उद्दिष्टपूर्तीनंतर अशा युती लयाला जातात.

उदा. पहिल्या व दुसऱ्या विश्वयुद्धाच्या काळात अमेरिका - इंग्लंड- फ्रान्स- सोवियत रशिया या मित्र राष्ट्रांची युती तयार झाली. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर ही युती लोकशाही - भांडवलशाही आणि साम्यवादी राष्ट्रांमध्ये विभागली गेली.

इराकचा कुवैतवरील हल्ला परतवून लावण्यासाठी १९९१ मध्ये आणि २००१ मध्ये दहशतवादाच्या निर्मूलनासाठी अफगाणिस्तानमधील तालिबान शासनाविरुद्ध अमेरिका व मित्र राष्ट्रांची युती समान आर्थिक संबंधाच्या संरक्षणासाठी स्थापन झालेले आसियान, एपेक, युरोपियन युनियन यासारख्या विभागीय संघटनांची निर्मिती.

**३) राजनय –**

राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी राजनयाचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. हॅन्स मॉर्गेन्थ्यूसारखे वास्तववादी विचारवंत राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणुकीसाठी राजनयाचा सर्वात महत्वाचा मार्ग मानतात. राजनयाचा दर्जा, गुणवत्ता इ. वर राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण-संवर्धन अवलंबून असते. संबंधित राष्ट्रांचे हितसंबंध परस्परपूरक असतात तेव्हाच राजनयाचा मार्ग (राजनैतिक वाटाघाटी) यशस्वी होतो.

उदा. भारत - पाकिस्तान, इस्त्राईल-पॅलेस्टाईन, श्रीलंका सरकार आणि लिट्टेसारखी श्रीलंकेतील तमिळांच्या संरक्षणासाठी लढणारी संघटना यांचे हितसंबंध परस्पर पूरक नसल्याने त्यांच्यात अनेकदा राजनैतिक चर्चा, वाटाघाटीचे प्रयत्न झाले; परंतु त्याला यश आले नाही.

**४) विकसनशील राष्ट्रांना आर्थिक मदत –**

विकसित - श्रीमंत राष्ट्रे अनेकदा गरीब, विकसनशील राष्ट्रांना आर्थिक मदत, निधी देऊन आपल्या हितसंबंधाचे संवर्धन करतात. अमेरिका या मार्गाचा वापर शीतयुद्धाच्या काळापासून करीत आहे. शीतयुद्धाच्या काळात साम्यवादाचा प्रचार-प्रसारापासून पश्चिम युरोपियन राष्ट्रांना वाचविण्यासाठी, अमेरिकेचा प्रभाव वाढविण्यासाठी मार्शल योजनेअंतर्गत अनेक राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यात आली.

शीतयुद्धोत्तर काळात लोकशाहीचा प्रचार-प्रसार, आर्थिक उदारीकरण, आयातीवरील बंधने दूर करून मुक्त बाजारपेठांचा अवलंब विकसनशील राष्ट्रांनी करावा यासाठी अमेरिका प्रयत्नशील आहे. त्यासाठी अमेरिका विश्वबँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संस्थांचा बुद्धिबळातील प्यादी म्हणून वापर करीत आहे.

## १.९ सत्तासंतुलन / सत्तासमतोल (Balance of power)

सत्ता समतोल ही आंतरराष्ट्रीय संबंधातील जुनी आणि संदिग्ध संकल्पना आहे. युद्ध टाळण्याचा किंवा युद्धाला नियंत्रित करण्याचा प्रभावी मार्ग म्हणून सत्तासमतोलाचा वापर केला जातो. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षिततेसाठी सत्ता समतोलाची निर्मिती आणि त्याचे संरक्षण हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सत्तासमतोलाची व्यवस्था म्हणजे राष्ट्रांच्या राजकीय वर्तवणुकीला नियंत्रित करणारा वैश्विक कायदा होय. यात सत्तेचे समान वितरण करून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात, या संकल्पनेचा संबंध सत्ता आणि सत्तेच्या व्यवस्थापनाशी आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधात शांतता आणि सुरक्षिततेच्या निर्मितीला प्राधान्य असते. त्याकरिता राष्ट्रीय सत्ता व सामर्थ्यावर नियंत्रण ठेवणे, त्याला मर्यादा घालणे आवश्यक असते. राष्ट्रीय सत्तेचा वापर सकारात्मक (शांतता-सुरक्षिततेचे रक्षण) आणि नकारात्मक कार्यासाठी ही केला जातो. उदा. अनेकदा राष्ट्रे आपली इच्छा इतरांवर लादण्याचा प्रयत्न करतात. एखादे राष्ट्र अनियंत्रित सत्तेचा वापर करून आक्रमक धोरणाचा स्वीकार करते तेव्हा इतर राष्ट्रांकडून त्याचा सामूहिक प्रतिकार केला जातो. हेच सत्ता समतोलाचे प्रमुख तत्त्व आहे.

जेव्हा आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्षाचे वातावरण निर्माण होते तेव्हा दोन परस्परविरोधी गटांची निर्मिती होऊन सत्तासमतोल प्रस्थापित होतो. अशा परिस्थितीत दोन्ही गटांना परस्परांच्या क्षमतेची आणि युद्ध झाल्यास त्याच्या परिणामांची कल्पना असल्याने युद्धाचा धोका टळतो.

थोडक्यात, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी राष्ट्रीय सत्तेवर नियंत्रण आवश्यक असून, असे नियंत्रण प्रस्थापित करणारी व्यवस्था म्हणजे सत्ता समतोल होय.

**सत्ता समतोलाचा संक्षिप्त इतिहास –**

सतराव्या शतकांत राष्ट्र- राज्यांच्या निर्मितीबरोबरच सत्तासमतोलाची व्यवस्था संघटित आणि सूत्रबद्ध रुपात अस्तित्वात आली. १६४८ च्या वेस्ट फेलियाच्या कराराद्वारे राष्ट्र-राज्यांची निर्मिती झाली. त्यातूनच युरोपच्या राजकारणात शांतता आणि स्थिरता निर्माण करण्यासाठी सत्ता समतोलाची सूत्रबद्ध, व्यापक व्यवस्था बनविण्यात आली. ती १९ व्या शतकापर्यंत टिकली.

पाश्चात्य राजकीय विचारवंत बर्नाडो रुसोलिएन आणि मॅकियाव्हॅली (१४६७-१५२७) यांनी राष्ट्रराज्यांची निर्मितीपूर्वी सत्ता नियंत्रणासाठी अशा व्यवस्थेच्या निर्मितीची आवश्यकता सांगितली

फ्रान्सच्या १४ व्या लुईने युरोपातील प्रस्थापित सतासमतोलाच्या व्यवस्थेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला तेव्हा इंग्लंड आणि नेदरलॅण्डच्या संयुक्त प्रयत्नाने लुईच्या महत्वाकांक्षेला नियंत्रित केले. १७१४ च्या युट्रेश तहाने सत्ता समतोलाची व्यवस्था अधिक बळकट केली गेली. म्हणूनच १८ व्या शतकाचा पूर्वार्ध हा सत्तासमतोलाच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्सच्या नेपोलियन बोनापार्टने युरोपातील सत्तासमतोलाची व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा इंग्लंडच्या नेतृत्वाखाली युरोपियन राष्ट्रांनी वॉटर्लूच्या युद्धात त्याचा पराभव केला. १८१५च्या व्हिएन्ना काँग्रेसमध्ये बहुपक्षीय करार करून सत्ता समतोलाची नवी व्यवस्था निर्माण करण्यात आली.

१९ व्या शतकात सत्तासमतोलाची व्यवस्था युरोपपुरती मर्यादित न राहता तिला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. १७ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत युरोपातील सत्तासमतोलाची व्यवस्था टिकवण्यात इंग्लंडची भूमिका महत्वाची होती. इंग्लंडची आर्थिक – औद्योगिक प्रगती, जगभर पसरलेले साम्राज्यामुळे युरोपियन राजकारणाचे नेतृत्व इंग्लंडकडे आले. या काळातील इंग्लंडची भूमिका सत्तासमतोलकाची होती.

पहिल्या महायुद्धानंतर युरोपच्या राजकारणात नवा सत्तासमतोल आकाराला आला. अमेरिका, सोवियत  रशियाचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रवेश व ब्रिटिश साम्राज्याला लागलेली उतरती कळा यामुळे नवीन सत्ता समतोलाच्या निर्मितीला चालना मिळाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर विश्व राजकारणाचे चित्र बदलले. अमेरिका आणि सोवियत रशियात शीतयुद्धाचे राजकारण पेटले. त्यामुळे जगातील राष्ट्रांचे ध्रुवीकरण होण्यास सुरुवात झाली. जगाची विभागणी दोन गटात झाली. त्यालाच द्विध्रुवीय सत्तासमतोल म्हणतात.

### १.९.१. सत्तासमतोल - अर्थ, स्वरूप, व्याख्या

सत्तासमतोल ही संदिग्ध संकल्पना असून, तिची सर्वसमावेशक व्याख्या करणे अवघड आहे.

**१) पार्मर आणि पर्कीन्स**

"सत्ता समतोलात परस्परविरोधी दबावाची एक प्रक्रिया निर्माण केली जाते. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट राष्ट्राला किंवा राष्ट्रांच्या गटाला इतरांच्या तुलनेत शक्तिशाली बनवण्यापासून परावृत्त केले जाते."

**२) हार्टमन –**

"सत्ता समतोलामुळे गट – प्रतिगट निर्मितीची एक शृंखला तयार होते. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थिरता निर्माण होऊन युद्धाचा धोका टळतो.

**३) प्रा. क्विन्सी राईट –**

"सत्ता समतोल म्हणजे अशी व्यवस्था की, ज्यात राष्ट्रे सामूहिक प्रतिकाराच्या भीतीमुळे आक्रमक कृत्यापासून परावृत्त होतात."

थोडक्यात वरील व्याख्यांवरून सत्ता समतोलाचे स्वरूप स्पष्ट होते.

- सत्तासमतोल म्हणजे अशी परिस्थिती ज्यात राष्ट्रांमधील सत्तासंबंध सामान्यतः समान असतात, कोणतेही राष्ट्र आपली इच्छा इतरांवर लादण्याचा प्रयत्न करीत नाही.
- सत्ता समतोल ही सत्तेच्या समान विभागणीची आणि सत्तेत समतोल साधणारी व्यवस्था आहे.
- सत्ता समतोलामुळे राष्ट्रांमधील सत्ताप्राप्तीसाठीची व ती वाढविण्याची स्पर्धा कमी होते. सत्तेच्या नियंत्रणासाठी सत्तेचे समान वितरण आवश्यक आहे, ते सत्ता समतोलाद्वारे साधले जाते. सत्ता समतोलामुळे विश्वशांती व सुरक्षितता निर्माण होण्यास मदत होते.
- सत्तासमतोलामुळे कोणतेही राष्ट्र इतरावर आक्रमण करण्याचे धाडस करीत नाही. कारण त्याला दुसरे राष्ट्र किंवा गटाकडून होणाऱ्या प्रतिकाराची जाणीव असते.
- सत्तानियंत्रणाचा एक मार्ग म्हणजे सत्तासमतोल होय.

## १.९.२ सत्ता समतोलाची वैशिष्ट्ये

### १) परिवर्तनीयता

सत्तासमतोल ही परिवर्तनीय अवस्था आहे. संतुलनाकडून असंतुलनाकडे आणि पुन्हा असंतुलनाकडून संतुलनाकडे असा बदल या व्यवस्थेत होत राहतात. त्यासाठी बहुपक्षीय पातळीवर करार केले जातात.

उदा. वेस्टफेलिया करारातून सत्तासंतुलनाची व्यवस्था निर्माण केली गेली. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात नेपोलियनने तिला आव्हान दिले. त्यातून निर्माण झालेल्या असंतुलनातून युरोपात युद्धे घडून आली. नेपोलियनच्या पराभवानंतर १८१५ च्या व्हिएन्ना काँग्रेसद्वारे पुन्हा सत्तासंतुलनाचा प्रयत्न झाला. ते पहिल्या विश्वयुद्धापर्यंत टिकले. सत्ता असंतुलनातून दुसरे विश्वयुद्ध घडून आले. व्हर्सायच्या तहाद्वारे सत्तासंतुलन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अशा प्रकारे सत्ता समतोलाची शृंखला संतुलन आणि असंतुलनाच्या माध्यमातून अखंड सुरु असते.

### २) कृत्रिम अवस्था –

सत्ता समतोलाची व्यवस्था राष्ट्रांच्या सक्रिय हस्तक्षेपातून निर्माण झालेली कृत्रिम व्यवस्था आहे. ती दैवी देणगी नसून, राष्ट्रांमध्ये झालेल्या बहुपक्षीय करारांचा परिणाम आहे. एखादे राष्ट्र जेव्हा सत्ता आणि बळाचा अधिक वापर करते तेव्हा इतर राष्ट्र त्याला सामूहिकरीत्या शह देण्याचा प्रयत्न करतात. आक्रमक राष्ट्रांविरुद्ध त्यांची युती प्रस्थापित होते.
उदा. १९९१ मध्ये अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकविरुद्ध निर्माण करण्यात आलेली युती, तिने इराकचे कुवैतवरील आक्रमण परतवून लावले.

### ३) स्थितीवादी व्यवस्था –

सत्तासमतोलाच्या व्यवस्थेत विश्व राजकारणातील जैसे थे परिस्थिती टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. प्रस्थापित रचना टिकवून धरण्यातच मोठ्या राष्ट्रांचे हितसंबंध गुंतलेले असतात. जुना सत्तासमतोल टिकविण्यात इंग्लंडचे योगदान महत्वाचे होते.

### ४) खऱ्या स्वरुपाचा सत्तासमतोल अवघड –

खऱ्या सत्ता समतोलाची निर्मिती अवघड आहे. युद्ध ही सत्तासमतोलाची चाचणी असून, युद्ध टाळण्यात सत्तासमतोल यशस्वी झाल्यास खऱ्या स्वरुपाचा सत्तासमतोल अस्तित्वात येतो.

### ५) मोठ्या राष्ट्रांचा खेळ –

सत्ता समतोलाची व्यवस्था हा मोठ्या राष्ट्रांचा खेळ असून, त्यात छोटया राष्ट्रांची भूमिका नगण्य असते. त्यांचा वापर मोठी राष्ट्रे बुद्धिबळातील प्याद्यांप्रमाणे करतात.

मोठी राष्ट्रे आपले श्रेष्ठत्व टिकवण्यासाठी, हितसंबंध जोपासण्यासाठी, सत्ता वाढवण्यासाठी सत्ता समतोलाची व्यवस्था निर्माण करतात.

**६) सत्तासमतोलकाची भूमिका –**

सत्तासमतोलाची व्यवस्था यशस्वी होण्यासाठी एका सत्तासमतोलकाची आवश्यकता असते. सत्तासमतोलाच्या रक्षण आणि अंमलबजावणीसाठी सत्तासमतोलक महत्वाची भूमिका पार पाडतो.

जुन्या सत्तासमतोलात ही भूमिका इंग्लंडने पार पाडली. म्हणूनच हा समतोल एकेरी सत्तासमतोल म्हणून ओळखला जातो.

दुसऱ्या महायुद्धानंतर द्विध्रुवीय सत्तासमतोलामध्ये ही भूमिका अमेरिका – सोवियत रशियाने पार पाडली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर सत्तासमतोलकाची भूमिका अमेरिकेकडे आली आहे.

### १.९.३ सत्तासंतुलन साधण्याचे मार्ग / सत्तासमतोल निर्मितीचे तंत्र

सत्ता समतोल ही कृत्रिम व्यवस्था असून, ती व्यक्ती किंवा राष्ट्रांच्या सक्रिय हस्तक्षेपाद्वारे निर्माण करावी लागते. या व्यवस्थेच्या निर्मितीसाठी अनेक तंत्राचा वापर केला जातो.

**१) युती-प्रतियुतीची निर्मिती -**

सत्तासमतोलाची व्यवस्था निर्माण करण्याचे हे सर्वात जुने आणि प्रसिद्ध तंत्र आहे. युती म्हणजे विशिष्ट उद्देशपूर्तीसाठी राष्ट्रांनी एकत्र येऊन स्थापन केलेला गट किंवा संघ होय. प्रतिपक्षाविरुद्ध आपली बाजू बळकट करण्यासाठी राष्ट्रे मित्रराष्ट्रांच्या युती स्थापन करतात. हा सामूहिक प्रतिकाराचा मार्ग असून, एखादे राष्ट्र प्रबळ प्रतिपक्षाचा सामना करू शकत नाही तेव्हा आत्मरक्षणासाठी ते युतीत प्रवेश करते. उद्देश सफल झाल्यानंतर अशा युती अनेकदा तुटतात. युतीचे स्वरूप आक्रमक किंवा बचावात्मक असते. आक्रमक युती प्रस्थापित सत्तासमतोलाची व्यवस्था नष्ट करून आपल्या हितसंबंधांना सोईस्कर नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. तर बचावात्मक युती प्रस्थापित सत्तासमतोलाची व्यवस्था टिकविण्याचा प्रयत्न करतात. युती-प्रतियुतीतील शह-प्रतिशहाच्या राजकारणाचे रूपांतर युद्धात होऊ शकते.

**२) मोबदला –**

सत्ता समतोल टिकविण्यासाठी भूप्रदेशाची मोबदला म्हणून वाटणी करणे हे सत्तासमतोलाचे जुने तंत्र आहे. १९ व्या शतकात युरोपातील सत्तासमतोल टिकवण्यासाठी या तंत्राचा वापर केला गेला.

युद्धात पराभूत राष्ट्राच्या ताब्यातील प्रदेशाची विजयी राष्ट्रे विभागणी करून त्याची इतर राष्ट्रांमध्ये समान वाटणी केली जाते. त्यामुळे पराभूत राष्ट्राचे भौगोलिक खच्चीकरण होऊन सत्तासमतोलाला आव्हान देण्याचे धाडस करीत नाही.

उदा. पहिल्या महायुद्धानंतर विजयी राष्ट्रांनी जर्मनीविषयी या तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला.

**३) फाळणी –**

सत्तासमतोल टिकविण्याचे एक तंत्र म्हणून फाळणीचा वापर पूर्वीपासून केला जातो. यात युद्धखोर किंवा आक्रमक राष्ट्राची फाळणी अशाप्रकारे केली जाते की पुन्हा त्या राष्ट्राकडून युद्धाचे धाडस होणार नाही. या तंत्राचा वापर बऱ्याचदा युद्ध समाप्तीनंतर केला जातो. विजयी राष्ट्रांकडून सक्तीचा वापर करून ती पराभूत राष्ट्रांवर लादली जाते.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची करण्यात आलेली फाळणी, १८ व्या शतकात पोलंडची तीनदा फाळणी करण्यात आली. पोलंडचा भूप्रदेश प्रशिया, रशिया, हंगेरीने आपसात वाटून घेतला.

**४) शस्त्रीकरण आणि नि:शस्त्रीकरण –**

प्रत्येक राष्ट्राला आपल्या सुरक्षेसाठी शस्त्रास्त्रे बाळगण्याचा अधिकार आहे. राष्ट्र सुरक्षेसाठी भौतिक / लष्करी सामर्थ्य वाढविण्यावर भर देतात. यातूनच राष्ट्रा-राष्ट्रांमधे शस्त्रास्त्र स्पर्धा वाढीस लागते. राष्ट्रांच्या लष्करी सामर्थ्यात संतुलन निर्माण होते तेव्हा समतोल साधला जातो.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका- सोवियत रशियात शस्त्रास्त्रस्पर्धा समतोल टिकविण्यास सहायक ठरते.

शस्त्रीकरणामुळे सत्ता समतोलाची व्यवस्था जशी टिकवली जाते, तशी ती नष्टही होऊ शकते. शस्त्रीकरणाप्रमाणे निःशस्त्रीकरण ही सत्तासमतोल टिकविण्यास कारणीभूत अथवा नष्ट करण्यास कारणीभूत ठरते. लष्करी समर्थ्यात संतुलन प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रे शस्त्रास्त्रनियंत्रण - निःशस्त्रीकरणासाठी तयार होतात. त्यासाठी विविध करार केले जातात.

उदा. SALT – १ व SALT- २ करार, अण्वस्त्र प्रसार बंदी करार

**५) हस्तक्षेप आणि युद्ध –**

सत्तासमतोल टिकविण्याचा अंतिम पर्याय म्हणून हस्तक्षेप व युद्ध या तंत्राचा वापर केला जातो. हस्तक्षेप तंत्रांतर्गत एखादे मोठे राष्ट्र लहान राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करून आपली इच्छा त्या राष्ट्रावर लादण्याचा प्रयत्न करते. बऱ्याचदा हस्तक्षेप युतीतील राष्ट्रे फुटुन बाहेर जाऊ नये म्हणूनही केले जातात.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका-सोवियत रशियाने राजकीय अस्थिरतेच्या नावाखाली अनेक राष्ट्रांच्या, कारभारात हस्तक्षेप केला. अमेरिकेने क्युबा, लेबनॉन,

लाओस मध्ये तर सोवियत रशियाने उत्तर कोरीया, उत्तर व्हिएतनाम, अफगाणिस्तानात हस्तक्षेप केले. या हस्तक्षेपातून युद्धेही घडून आली. उदा. १९५० चे कोरियन युद्ध, १९६५ चे व्हिएतनाम युद्ध.

१९८७ मध्ये मालदीव मधील बंड मोडण्यासाठी भारताने तेथे हस्तक्षेप केला. १९९१ मध्ये इराकने कुवैतवर आक्रमण केल्यानंतर अमेरिकेने हस्तक्षेप करून कुवैतला मुक्त केले आणि पश्चिम आशियातील बिघडलेले संतुलन दुरुस्त केले.

**६) फोडा आणि राज्य करा –**

सत्तासमतोलाच्या या तंत्रातंर्गत प्रतिपक्षाची भौगोलिक विभागणी करून त्याच्या सामर्थ्याचे खच्चीकरण केले जाते. मित्रराष्ट्रे जोडून स्वतःची ताकद वाढवून संतुलन साधता येते. तसेच प्रतिस्पर्धी राष्ट्रांचे मित्र पळवूनही संतुलन साधले जाते.

रोमन साम्राज्याने विखुरलेल्या साम्राज्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी या तंत्राचा अनेकदा वापर केला. फ्रान्सने जर्मनीला कमकुवत करण्यासाठी या तंत्राचा वापर पहिल्या महायुद्धापर्यंत केला.

अशाप्रकारे सत्तासमतोलामुळे शांतता, स्थिरता निर्माण होते. राष्ट्रांच्या एकाधिकारशाहीला आळा बसतो आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण होते.

## १.१० विद्यापीठीय प्रश्न

१) आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याख्या दया आणि त्यांची व्याप्ती विशद करा.

२) आंतरराष्ट्रीय संबंध आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यातील फरक स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय संबंधांची व्याख्या द्या आणि त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या वास्तववादी दृष्टिकोनाची चर्चा करा

५) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या उदारमतवादी दृष्टिकोनाची चर्चा करा.

६) सत्ता म्हणजे काय? सत्तेचे विविध घटक स्पष्ट करा.

७) राष्ट्रीय हित म्हणजे काय? ते सांगून राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनाचे मार्ग सांगा

८) सत्तासमतोल म्हणजे काय? सत्तासमतोल निर्मितीचे तंत्र स्पष्ट करा.

**संदर्भग्रंथ**


१) आंतरराष्ट्रीय संबंध-शैलेंद्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२) आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण - अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, ओरियंट ब्लॅकस्वान, ओरिएंट ब्लॅकस्वान प्रा. लि., मुंबई


❄❄❄❄❄❄❄

# २

# विश्वरचना

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टये

२.२ प्रस्तावना

२.३ शीतयुद्ध – अर्थ

२.४ शीतयुद्धाची पार्श्वभूमी

२.५ शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय विश्वरचना

२.६ शीतयुद्धोत्तर काळातील नवीन विश्वरचना – एकध्रुवीय विश्वरचना

२.७ बहुध्रुवीय विश्वरचना

२.८ विद्यापीठीय प्रश्न

## २.२ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धानंतरचा सन १९४५ ते १९९० हा कालखंड शीतयुद्धाचा काळ मानला जातो. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत रशियाचा महासत्ता म्हणून उदय झाला. महायुद्धानंतर जागतिक नेतृत्वासाठी अमेरिका- सोवियत रशिया यांच्यात तीव्र स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेतून निर्माण झालेले लष्करी गट – प्रतिगट, करार, शस्त्रास्त्रस्पर्धा, शह-प्रतिशहाचे राजकारण यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात तणाव निर्माण झाला. या तणावाचे वर्णन करण्यासाठी शीतयुद्ध (Cold War) ही संकल्पना वापरली जाते. शीतयुद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला मोठया प्रमाणात प्रभावित केले.

## २.३ शीतयुद्ध – अर्थ

शीतयुद्ध म्हणजे अशी स्थिती ज्यात पूर्णकालीन शांतीही नसते परंतु वास्तवात युद्धही होत नाही. शांती व युद्ध यामधील अस्थिरता असते. शीतयुद्ध म्हणजे अशी स्थिती, ज्यात युद्धाकरिता वातावरणनिर्मिती केली जाते.

वॉटर लिपमन यांनी शीतयुद्ध (Cold War) हा शब्द पहिल्यांदा वापरला.

ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार शीतयुद्ध म्हणजे हिंसेचा वापर न करता धमकी, अडवणूक व प्रसाराच्या माध्यमातून कटूता व कलहाची स्थिती उत्पन्न करणे होय.''

पं. जवाहरलाल नेहरू यांनी शीतयुद्ध म्हणजे असे युद्ध होय जे युद्धक्षेत्रात नव्हे तर मनुष्याच्या डोक्यात लढले जाते. शीतयुद्ध प्रत्यक्षात कधीच होत नाही तर विशिष्ट विचार मूल्ये, संस्कृती, जीवनपद्धती यावरून लढले जाते.

## २.४ शीतयुद्धाची पार्श्वभूमी

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका- सोवियत रशिया या महासत्तांचा उदय झाला. दोन्ही महासत्ता परस्परविरोधी विचारसरणीच्या (अमेरिका भांडवलशाही विचारधारेची, तर सोवियत रशिया साम्यवादी विचारधारा) पुरस्कर्त्या होत्या. त्यामुळे शीतयुद्धाला दोन भिन्न विचारसरणीतील संघर्ष म्हणूनही ओळखला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप व आशिया खंडामध्ये साम्यवादाचा वाढता प्रचार-प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने साम्यवादाच्या प्रतिरोधणाचे धोरण स्वीकारले. त्याअंतर्गत युरोप आणि आशिया खंडातील अनेक राष्ट्रांसमवेत लष्करी करार करून नाटो, सिएटो, सेन्टो सारख्या लष्करी संघटनांची निर्मिती केली गेली. या संघटनेच्या सदस्यांच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेने घेतली. सदस्यराष्ट्रांना साम्यवादाच्या विरोधासाठी लष्करी-आर्थिक मदत केली. सोवियत रशियाही या स्पर्धेत मागे नव्हता. पूर्व युरोपातील राष्ट्रांबरोबर सोवियत रशियाने 'वार्सा पॅक्ट' हा लष्करी करार करून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी उचलली. परिणामी जगाची विभागणी भांडवलशाही विरुद्ध साम्यवादी अशा दोन गटात झाली. म्हणूनच शीतयुद्धकालीन जग द्विध्रुवीय व्यवस्थेवर आधारित असल्याचे बोलले जाते.

लष्करी करारांमुळे महासत्तांना सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली. त्यामुळे स्थानिक पातळीवरील छोटे-मोठे संघर्ष चिघळून त्यांना वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. उदा. काश्मीर प्रश्न, अफगाणिस्तानचा प्रश्न इ.

## २.५ शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय विश्वरचना (Bi – Polar System)

दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ (१९४५-१९९०) हा शीतयुद्धाचा काळ मानला जातो. या काळात जागतिक नेतृत्वासाठी अमेरिका-सोव्हियत रशियामध्ये तीव्र स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेत निर्माण झालेले लष्करी गट – प्रतिगट, शह-प्रतिशहाच्या राजकारणातून विश्व राजकारणात मोठा तणाव निर्माण झाला. या तणावाच्या वर्णनासाठी शीतयुद्ध ही संकल्पना वापरली जाते. सोवियत रशियातील संघर्ष राजनयिक पातळीवरचा होता. या संघर्षात स्पर्धा, चढाओढ होती, परंतु संघर्षाचे रूपांतर प्रत्यस युद्धांत झाले नाही.

अमेरिका – सोवियत रशियातील शीतयुद्धाच्या राजकारणातंर्गत काही संकल्पना – सिद्धांत आंतरराष्ट्रीय राजकारणात विकसित झाले.

१) प्ररोधन
२) दहशतीचा समतोल
३) परस्पर विनाशाची खात्री
४) तणाव शैथिल्य / देतांत
५) नव शीतुयद्ध
६) संरक्षणाची डावपेचात्मक योजना (Strategic Defence Initiative)


### २.५.१ द्विध्रुवीय विश्वरचना –

द्विध्रुवीय विश्वरचना ही दोन राष्ट्रांभोवती केंद्रित असणारी विश्वरचना आहे. यामध्ये सत्तेची केंद्रे दोन राष्ट्रे असून, जागतिक नेतृत्वाची धुरा त्या राष्ट्रांकडे असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता नेतृत्वासाठी त्या राष्ट्रांमध्ये स्पर्धा, चढाओढ असते. शह-प्रतिशहांचे राजकारण, गट-प्रतिगटांचे राजकारण यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात तणाव निर्माण होतो.

उदा. शीतयुद्ध कालीन विश्वरचना ही द्विध्रुवीय विश्वरचनेवर आधारित व्यवस्था होती.

**द्विध्रुवीय विश्वरचनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

**१) सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित व्यवस्था –**




१) द्विध्रुवीय विश्वरचना ही सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित व्यवस्था असते तसेच सत्ता ही दोन राष्ट्रांच्या किंवा राष्ट्रगटांच्या हातात असते.

उदा. शीतयुद्धाच्या काळात जगाची विभागणी अमेरिका आणि सोवियत रशिया या दोन महासत्तांमध्ये झाली.

**२) दोन्ही राष्ट्रे अधिक शक्तिशाली –**

द्विध्रुवीय विश्वरचनेत जगाचे नेतृत्व करणारे दोन्ही राष्ट्रे आर्थिक, भौतिक दृष्टया कमी-अधिक प्रमाणात शक्तिशाली असतात. एक राष्ट्राची कृती, दुसऱ्या राष्ट्राच्या प्रतिकृतीला जन्म देते.

उदा. शीतयुद्धात अमेरिका – सोवियत रशिया या दोन्ही महासत्ता आण्विक, भौतिकदृष्टया बलशाही होत्या.

**३) जागतिक नेतृत्वासाठी संघर्ष –**

द्विध्रुवीय विश्वरचनेत सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या दोन्ही राष्ट्रांमध्ये जागतिक नेतृत्वासाठी संघर्ष असतो. त्यासाठी दोन्ही राष्ट्र प्रयत्नशील असतात.

उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी अमेरिका प्रणित भांडवलशाही आणि सोवियत रशिया प्रणित साम्यवाद अशा दोन विचारधारांच्या आधारावर झाली. जागतिक नेतृत्वाच्या स्पर्धेतून शीतयुद्धाचा उदय झाला.

**४) युती-प्रतियुतीची निर्मिती –**

द्विध्रुवीय रचनेत दोन्ही राष्ट्रे जगातील इतर राष्ट्रांना आपापल्या गटात ओढण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याकरिता आपापल्या मित्र राष्ट्रांसमवेत करार करून युती-प्रतियुती निर्माण केल्या जातात.

उदा. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोवियत रशियाने आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर लष्करी करार करून त्यांना लष्करी – आर्थिक मदत पुरवली. परिणामी स्थानिक विभागीय पातळीवर शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. अमेरिकेने NATO तर सोवियत रशियाने वॉर्सा पॅक्ट या लष्करी संघटनांची सामूहिक सुरक्षेच्या तत्वावर आधारित निर्मिती केली.

**५) दोन राष्ट्रांच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था –**

द्विध्रुवीय विश्वरचना ही दोन राष्ट्रांच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था असते.

उदा. शीतयुद्धाच्या राजकारणाने स्वरूप वैश्विक होते. त्यात युरोप, आशिया, आफ्रीका खंडातील बहुसंख्य राष्ट्रे ओढली गेली.

### २.५.२ द्विध्रुवीय विश्वरचनेच्या समर्थनार्थ मुद्दे –

सन १९४५ ते १९९१ हा शीतयुद्धाचा काळ मानला जातो. या काळातील प्रमुख घडामोडी खालीलप्रमाणे आहे.

**१) पॅरिस शांतता परिषद (१९४६)**

जर्मनी, इटली, जपानच्या पराभवानंतर १९४६ मध्ये दोस्त राष्ट्रांनी युद्धोत्तर युरोपच्या पुनर्रचनेसाठी पॅरिस येथे परिषद घेतली. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाचे पहिले पडसाद या परिषदेत उमटले. परिषदेत घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे अमेरिका–सोवियत रशिया मधील दरी वाढण्यास सुरूवात झाली.

**२) ट्रूमन तत्व (१९४७)**

दुसऱ्या महायुद्धाच्या आर्थिक दुष्परिणामांना बळी पडलेल्या युरोपातील राष्ट्रांना आर्थिक मदतीसाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रमन यांनी १२ मार्च, १९४७ रोजी एका योजनेची घोषणा केली. आर्थिक दुरावस्थेमुळे युरोपातील काही राष्ट्रांमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. या राजकीय अस्थिरतेचे भांडवल सोवियत रशिया साम्यवादाच्या प्रसारासाठी करेल, अशी भीती अमेरिकेला होती.

तेव्हा अशा राष्ट्रांना आर्थिक मदत देऊन त्या राष्ट्रांमधील लोकशाही व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करून देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद या योजनेत होती.

### ३) मार्शल योजना (१९४७)

अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जॉर्ज मार्शल यांनी ५ जून १९४७ ला युरोपीय राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यासाठी एका योजनेची घोषणा केली. त्यामागील हेतु दुसऱ्या महायुद्धानंतर विविध आर्थिक समस्यांशी झुंजणाऱ्या युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदत करण्याचा होता. १६ एप्रिल १९४८ ला स्थापन झालेली OECD – (Organisation for European Economic Co – Operation) संघटना मार्शल योजनेवर आधारित होती.

### ४) लष्करी संघटनांची निर्मिती –

सामूहिक सुरक्षेच्या तत्त्वावर आधारित लष्करी संघटनांची निर्मिती हे शीतयुद्धाचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे. परस्पर दबाव वाढविण्यासाठी शीतयुद्धाच्या राजकारणाचा भाग म्हणून अमेरिका आणि सोवियत रशियाकडून आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर लष्करी करार केले. अमेरिकेने NATO, SEATO, CENTO या सारख्या लष्करी संघटना निर्माण केल्या. युरोप-आशियातील साम्यवादाच्या वाढत्या प्रसाराला आळा घालणे आणि सोवियत रशियापासून मित्र राष्ट्रांचे संरक्षण करणे हा अमेरिका प्रणीत लष्करी संघटनांचा उद्देश होता.

या लष्करी करारांमुळे शीतयुद्धांचे राजकारण वैश्विक बनले. शस्त्रास्त्रस्पर्धा वाढली. अमेरिका – सोवियत रशियाच्या सदस्य राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारातील हस्तक्षेप, सदस्य राष्ट्रांना आर्थिक-लष्करी मदत यातून विभागीय सत्तासमतोल अस्थिर बनला.

### ५) इराणचा प्रश्न

दुसऱ्या विश्वयुद्धादरम्यान सोवियत रशियाचे सैन्य इराणमध्ये घुसले. हे सैन्य काढून घेण्यास सोवियत रशिया तयार नव्हता. त्याचबरोबर सोवियत रशियाचा इराणच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप वाढला. त्याविरूद्ध इराणने UNO कडे तक्रार केली. अमेरिकेने इराणची तक्रार उचलून धरली. सोवियत रशियाने आपले सैन्य इराणमधून काढून घ्यावे, असा ठराव सुरक्षा परिषदेने पास केला.

### ६) बर्लिनचा पेचप्रसंग

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर पूर्व जर्मनीवर सोवियत फौजांचा तर पश्चिम जर्मनीवर दोस्त राष्ट्रांच्या फौजांचा ताबा होता. सोवियत रशियाने १९४८ मध्ये वाहतुक व व्यापारावर कडक बंधने घालून दोस्त राष्ट्रांच्या फौजांची कोंडी केली. या कोंडीमुळे पश्चिम बर्लिन मध्ये जनतेसाठी जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. अमेरिका व मित्र राष्ट्रांनी पश्चिम जर्मनीला हवाई मार्गाने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला. पुढे UNOच्या हस्तक्षेपानंतर ही कोंडी सुटण्यास मदत झाली.

### ७) हंगेरीचा प्रश्न

१९५६ मध्ये हंगेरीतील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन सोवियत रशियाने आपल्या फौजा हंगेरीत घुसवल्या. रशियाचा हंगेरीतील लष्करी हस्तक्षेप आणि रशियन समर्थकांचे पाठिंबा असलेले साम्यवादी आंदोलनातून तेथे मूलभूत हक्कांची पायमल्ली होत असल्याचा आरोप अमेरिका व मित्र राष्ट्रांनी केला. 'हंगेरी वॉर्सा' कराराचा सदस्य असल्याने त्याला लष्करी मदत पुरवण्यासाठी सोवियत रशिया बांधील असल्याची भूमिका रशियाने घेतली.

### ८) क्युबातील क्षेपणास्त्र प्रसंग

अमेरिकेच्या दक्षिणेला १४५ किमी वर असलेले क्युबा हे छोटेसे राष्ट्र होय. १९६२ मध्ये सोवियत रशियाने क्युबामध्ये मध्यम पल्ल्याची अण्वस्त्रे ठेवण्याचा निर्णय घेतला. हे अमेरिकेच्या संरक्षणासाठी आव्हान होते. अमेरिकेने रशियाविरूद्ध लष्करी कारवाई करण्याची धमकी दिली. त्यावरून महासत्तांमध्ये तणाव निर्माण झाला. त्याचे रूपांतर अणुयुद्धांत होण्याची शक्यता होती. रशियाने क्युबात अण्वस्त्रे ठेवण्याचा निर्णय रद्द केल्याने क्युबाचा पेचप्रसंग सुटला.

### ९) देतांत –

शीतयुद्धाच्या काळातील १९६९ ते १९७९ आणि १९८५ ते १९९० हा काळ देतांत किंवा तणाव शैथिल्याचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात अमेरिका – सोवियत रशिया, अमेरिका, चीन यांच्यातील तणाव कमी झाला. अमेरिका – सोवियत रशियातील मैत्री व सहकार्य वाढले. दोन्ही राष्ट्रादरम्यान १९७३ मध्ये आर्थिक सहकार्य आणि व्यापारवृद्धीसाठी करार झाले. नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली. १९७२ च्या डावपेचात्मक शस्त्रास्त्र नियंत्रण करारावर महासत्तांनी स्वाक्षरी केली.

अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी फेब्रुवारी १९७२ मध्ये चीनला भेट दिली. या भेटीने अमेरिका – चीन देतांतची प्रक्रिया सुरू झाली. दोन्ही राष्ट्रांनी वादग्रस्त मुद्दे बाजुला ठेवून आर्थिक – व्यापारी – सांस्कृतिक संबंध सुधारण्याचे ठरविले. अमेरिकेने चीनला सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता दिली. परिणामी चीनचा UNO तील प्रवेश सुकर झाला.

### १०) व्हिएतनाम युद्ध (१९६५ – ७०)

हा शीतयुद्धाच्या काळातील महत्वाचा संघर्ष होय. अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आणि अंतर्गत राजकारणात क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणणारा हा संघर्ष होय. १९५४ पासून फ्रान्सने व्हिएतनाममधून लष्कर काढून घेण्यास सुरूवात केली. १९५४ नंतर व्हिएतनामची विभागणी सोवियत रशियाच्या आणि साम्यवादाच्या प्रभावाखालील उत्तर व्हिएतनाम आणि अमेरिकेच्या प्रभावाखालील दक्षिण व्हिएतनाम अशी झाली. १९६१ मध्ये उत्तर व्हिएतनामने दक्षिण व्हिएतनामवर आक्रमण केले. १९६५ पासून अमेरिकन सैन्य उत्तर व्हिएतनाम विरुद्ध प्रत्यक्ष युद्धात उतरले. राष्ट्राध्यक्ष जॉन्सन

यांच्या काळात सुरू झालेले युद्ध पाच वर्षे चालले. युद्धात अमेरिकेचा पराभव झाला. दक्षिण व्हिएतनामवर नियंत्रण प्रस्थापित करण्यात यश मिळाले. १९६९ पासून अमेरिकेने दक्षिण व्हिएतनाममधील आपले सैन्य काढून घ्यायला सुरूवात झाली. युद्धात हजारो सैनिक मारले गेल. युद्धानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र आणि संरक्षणाविषयक धोरणात अमेरिकन काँग्रेसची भूमिका वाढली.

**११) अफगाणिस्तानमधील युद्ध –**

सोवियत रशियाच्या १९७९ मध्ये अफगाणिस्तान मधील लष्करी हस्तक्षेपाने शीतयुद्धातील तणाव शिथिलीकरणाची प्रक्रिया मागे पडून नवशीतयुद्धाला प्रारंभ झाला. १९७८ मध्ये अफगाणिस्तानात लष्करी उठाव होऊन साम्यवादी राजवट (Peoples Democratics Party of Afaganistan) प्रस्थापित झाली. सोवियत रशियाच्या हस्तक्षेपानंतर अफगाणिस्तान मध्ये रशियन सैन्याचे पाठबळ असणारे अफगाण सैन्य आणि पाकिस्तान – अमेरिकेचे पाठबळ असणारे अफगाण मुजाहिद्दीन बंडखोर यांच्यात युद्ध झाले. अशा प्रकारे अमेरिका–सोवियत रशिया पुन्हा समोरासमोर आले.

१९८९ मध्ये रशियाचे तत्कालीन अध्यक्ष मिखाईल ग्रोर्बाचेव्ह यांनी अफगणिस्तानमधील रशियन सैन्य काढून घेईपर्यंत हा संघर्ष सुरू होता.

शीतयुद्धाच्या काळात UNOच्या व्यासपीठावर नि:शस्त्रीकरणाच्या राजकारणात शीतयुद्धकालीन ध्रुवीकरण स्पष्टपणे जाणवत होते. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे अनेक स्थानिक प्रश्नांना गुंतागुंतीचे स्वरूप प्राप्त झाले. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतरही हे प्रश्न सुटलेले नाही.

उदा. काश्मीर प्रश्न, अरब-इस्त्राइल संघर्ष

### २.५.३ शीतयुद्धकालीन द्विध्रुवी विश्वरचनेच्या समाप्तीची कारणे

१९९० च्या दशकाच्या पूर्वार्धात सोवियत रशियाचे विघटन झाले. त्यामुळे शीतयुद्धाने निर्माण केलेली द्विध्रुवीकरणाची व्यवस्था कोलमडली. त्यामागील कारणे खालील प्रमाणे –

१) शीतयुद्धाने एका जीवघेण्या शस्त्रास्त्र स्पर्धेला जन्म दिला. ही शस्त्रास्त्र स्पर्धा प्रचंड खर्चिक होती. अमेरिका – सोवियत रशियाच्या अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण पडला. ही शस्त्रास्त्र स्पर्धा अधिक काळ टिकविणे दोन्ही महासत्तांसाठी अवघड बनले.

२) शीतयुद्धकालीन अमेरिका – सोवियत रशिया यांच्या परस्परांवर प्रभाव पाडण्याच्या आणि इतर राष्ट्रांना आपल्या गटात खेचण्याच्या तीव्र स्पर्धेमुळे तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांवर मोठा अन्याय झाला. राष्ट्रवादी भावनेची मोठी लाट शीतयुद्धाच्या राजकारणाची प्रतिक्रिया म्हणून काही राष्ट्रांमधून निर्माण झाली. त्याचे चटके महासत्तांना सोसावे लागले.

उदा. व्हिएतनाममध्ये अमेरिकेची झालेली कोंडी अफगाणिस्तानातील रशियाचा फसलेला डाव

३) शीतयुद्धाच्या राजकारणातील साम्यवादी आणि भांडवलशाही अशा दोन्ही स्पर्धक गटांमध्ये अंतर्गत फूट पडायला सुरुवात झाली. रशिया-चीन मतभेदामुळे साम्यवादी राष्ट्रांच्या एकतेला तडा गेला तर अमेरिका आणि तिच्या इतर पश्चिमी युरोपीय सहकारी राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या मतभेदांमुळे नाटो संघटनेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

४) शीतयुद्धाच्या काळात अमेरिका – सोवियत रशिया यांचा संरक्षण खर्च वाढत असताना दुसरीकडे जपान आणि काही अंशी आग्नेय आशियाई राष्ट्रांचा आर्थिक विकास घडून येत होता. जपान, सिंगापूर, थायलंड, मलेशिया यांच्या आर्थिक विकासामुळे शीतयुद्धाच्या राजकारणाचा निरर्थकपणा महासत्तांच्या लक्षात आला. परिणामी १९८० च्या दशकापासून दोन्ही महासत्तांनी आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य देण्यास सुरुवात केली.

५) १९८० च्या दशकातील नवशीतयुद्धाच्या राजकारणांतर्गत अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी सुरू केलेल्या शस्त्रास्त्रस्पर्धेत रशियाचा टिकाव लागला नाही.

६) रशियाचे कोलमडलेली अर्थव्यवस्था आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यात रशियातील प्रशासन अपयशी ठरले.

## २.६ शीतयुद्धानंतरच्या काळातील नवीन विश्वरचना

१९९१ मध्ये सोवियत रशियाच्या विघटनाबरोबरच अमेरिका सोवियत रशियातील शीतयुद्धाचे राजकारण संपुष्टात आले. द्विध्रुवीकरणावर आधारित शीतयुद्धकालीन सत्ता समतोलाची व्यवस्था कोसळली. सोवियत रशियाचे विघटन होऊन १५ स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रे निर्माण झाली. पूर्व युरोपमधील अनेक राष्ट्रांमधून साम्यवादी राजवटी कोसळून लोकशाही व्यवस्था निर्माण झाली. शीतयुद्धाच्या काळातील लष्करी गट, करार (नाटो वगळून) संपुष्टात आले. लष्करी गटाची जागा विभागीय व्यापार संघांनी घेतली शीतयुद्धाच्या अंताबरोबरच अमेरिका – सोवियत रशिया पश्चिम – पूर्व युरोपातील सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. विचारसरणीपेक्षा हितसंबंध महत्वाचे बनले. अमेरिका व युरोपीय राष्ट्रांनी परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य दिले.

पश्चिम – पूर्व जर्मनीचे एकीकरण झाले.उत्तर-दक्षिण कोरियाच्या एकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. रशियाने अफगाणिस्तानमधून आपले सैन्य काढून घेतले. इराक-इराण युद्धाचा शेवट होऊन आशिया खंडात तणाव शैथिल्याची प्रक्रिया सुरू झाली.

शीतयुद्धाच्या समाप्तीबरोबरच UNO ची विश्व राजकारणातील भूमिका बदलली. शीतयुद्धाच्या काळात दोन्ही महासत्तांनी UNO च्या व्यासपीठाचा वापर संघर्षाकरिता केला. परंतु शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर UNO ने पर्यावरण संरक्षण, नि:शस्त्रीकरण मानवाधिकारांचे संरक्षण, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली.

शीतयुद्धोत्तर जग हे तणावमुक्त आहे असे नाही. महासत्तांमधील संघर्ष संपला तरी देशांतर्गत स्थानिक – विभागीय पातळीवरचे वांशिक, धार्मिक संघर्ष, धार्मिक मूलतत्ववाद, दहशतवाद यामुळे हिंसाचाराचे प्रमाण वाढत आहे. विकसीत राष्ट्राबरोबरच विकसनशील राष्ट्रांनाही दहशतवादाच्या भस्मासुराने ग्रासले आहे.

अशा प्रकारे शीतयुद्धोत्तर काळात एकीकडे शांतता, सहकार्य आणि लोकशाहीचा प्रसार घडून आला आहे तर दुसरीकडे विभागीय संघर्षाचेही अस्तित्व जाणवते. यातून परस्परविरोधी विषयांचे अस्तित्व असणारी एक नवीन विश्वरचना अस्तित्वात आली आहे.

### २.६.१ नवीन विश्वरचना : एकध्रुवी की बहुध्रुवी ?

१९९१ मध्ये शीतयुद्धांचा अस्त झाला. अमेरिका – सोवियत रशिया यांच्यातील संघर्ष मिटला. सोवियत रशियाच्या विघटनाबरोबरच द्विध्रुवी सत्तासमतोलावर आधारित विश्वरचना कोसळली आणि अमेरिकेचे वर्चस्व जगावर निर्माण झाले. अमेरिकेसारख्या महासत्तेला जगात तोडीस तोड अशी महासत्ता उरली नसल्याने अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एकध्रुवीय विश्वरचना आकाराला आली.


शीतयुद्धानंतरची आकाराला आलेल्या नवीन विश्वरचना एकध्रुवीय (Unipolar) आहे की बहुध्रुवी (Multipolar) याविषयी विचारवंतांमध्ये मतभेद आहे. वास्तविक पाहता या विश्वरचनेत एकध्रुवीय आणि बहुध्रुवीय व्यवस्थांचे सहअस्तित्व आहे. नवीन विश्वरचनेला पूर्णत: एकध्रुवीय आणि बहुध्रुवी म्हणणे चुकीचे असून, एकाच वेळी या दोन्ही व्यवस्थांची वैशिष्ट्ये नवीन विश्वरचनेत दिसून येतात.

### २.६.२ एकध्रुवीय विश्वरचना (Unipolar Wold Order)

एकध्रुवीय विश्वरचना ही एकाच राष्ट्राभोवती केंद्रित असणारी विश्वरचना असून जागतिक नेतृत्वाची धुरा त्या राष्ट्राकडे असते. विश्व राजकारणातील प्रमुख निर्णय त्या राष्ट्राच्या मर्जीने घेतले जातात. विश्वशांती आणि सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी त्या राष्ट्रावर असते. त्या राष्ट्राशी स्पर्धा करू शकेल किंवा त्यांच्या सत्तेला आव्हान देऊ शकेल अशी दूसरी सत्ता या विश्वरचनेत अस्तित्वात नसते.

शीतयुद्धोत्तर काळात अशी व्यवस्था अस्तित्वात आली असल्याचे अमेरिकन अभ्यासकांचे मत आहे ४५ वर्षे चाललेल्या स्पर्धेत अमेरिका आणि अमेरिका नेतृत्व करीत असलेल्या भांडवलशाही विचारसरणीचा स्पष्ट विजय झाला आहे.

**एकध्रुवीय विश्वरचनेची प्रमुख वैशिष्टये –**



**१) सत्तेच्या केंद्रिकरणावर आधारित**

एकध्रुवीय विश्वरचना सत्तेच्या केंद्रीकरणावर आधारित असून सत्ता ही एखादया विशिष्ट राष्ट्राच्या किंवा गटाच्या हातात केंद्रित असते.

**२) एक राष्ट्र इतरांपेक्षा अधिक शक्तिशाली –**

विशिष्ट राष्ट्रांचे किंवा राष्ट्रगटाचे आर्थिक, भौतिक सामर्थ्य हे इतर राष्ट्रांपेक्षा अधिक असते.

**३) एकाच राष्ट्राच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था**

एकध्रुवीय व्यवस्था एकाच राष्ट्राच्या अधिसत्तेवर आधारित व्यवस्था असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व सामूहिक स्वरूपाचे नसून ते एकीकृत स्वरूपाचे असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाची धुरा एका शक्तिशाली राष्ट्राकडे असते. हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या केंद्रस्थानी असते.

**४) एकाच राष्ट्राची एकाधिकारशाही**

या व्यवस्थेत एका राष्ट्राची एकाधिकारी किंवा हुकूमशाही निर्माण होण्याची शक्यता असते.

**५) शक्तिशाली राष्ट्रे सत्तासमतोलकाची भूमिका पार पाडते**

या व्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व करणारे राष्ट्र आंतरराष्ट्रीय तसेच विभागीय सत्तासमतोलात सत्तासमतोलकाची भूमिका पार पाडते.

**६) लोकशाहीविरोधी व्यवस्था –**

एकध्रुवीय व्यवस्था ही प्रामुख्याने लोकशाही विरोधी व्यवस्था असते. जगाचे नेतृत्व करणारे राष्ट्र बऱ्याचदा हुकूमशाही पद्धतीने वर्तन करते.

### २.६.३ एकध्रुवीय व्यवस्थेच्या समर्थनार्थ मुद्दे –

सोवियत रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेशी स्पर्धा करू शकेल. अशी दुसरी सत्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे नवीन विश्वरचनेवरील अमेरिकेची पकड निर्विवाद आहे.

१९९१ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनीअर) यांनी शीतयुद्धोत्तर काळातील नवीन विश्वरचनेची घोषणा केली. ही विश्वरचना अर्थातच अमेरिका केंद्रित आहे. नवीन विश्वरचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षण कर्त्यांची (Global Policeman) असेल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा सहभाग सक्रीय असेल. असा सूर या घोषणेत होता.

**जॉर्ज बुश यांची नवीन विश्वरचना ही पाच तत्वांवर आधारित होती –**

१) विश्व राजकारणाचे नेतृत्व, विश्वशांती आणि सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी अमेरिकेवर असेल.

२) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून शांतता आणि सुरक्षिततेचे उद्दिष्ट साधले जाईल.

३) विश्वरचनेत UNO ची भूमिका महत्वपूर्ण असेल.

४) आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्राविरूद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत कारवाई केली जाईल.

५) अणुचाचणी बंदी, अण्वस्त्र प्रसार बंदीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जातील.

**अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही –**

जॉर्ज बुश (सिनिअर) यांनी घोषीत केलेल्या नवीन विश्वरचनेच्या स्वरूपातून भविष्यातील अमेरिकेच्या भूमिकेची जगाला कल्पना आली. सन १९९१ ते २००९ या काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी पाहिल्या तर बुश यांनी घोषित केलेली नवीन विश्वरचना अमेरिका प्रत्यक्षात आणताना दिसते. या घडामोंडी मधून शीतयुद्धोत्तर विश्वरचना एकध्रुवी असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. या कालावधीत अमेरिकेची एकाधिकारशाही, दादागिरी वाढलेली दिसते. अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला थोपविण्यात UNOलाही अपयश आले आहे.

**१) १९९१ चे खाडी युद्ध**

सन १९९१ च्या खाडी युद्धादरम्यान अमेरिकेचा नेतृत्वाखाली UNO ने सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत इरकाविरूद्ध लष्करी कारवाई केली. त्यात अमेरिकेने दोन लाख सैन्य सौदी अरेबियात ठेवले. या लष्करी कारवाईनंतर इराकने कुवैतमधून माघार घेतली. तरीही अमेरिकेने सौदी अरेबियातून आपले सैन्य काढून घेण्यास नकार दिला.

**२) नाटोचे बॉम्बहल्ले –**

बोस्निया आणि सर्बिया राष्ट्रांमधील वांशिक हिंसाचार थांबविण्यासाठी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली NATO संघटनेने १९९५ व १९९६ मध्ये या राष्ट्रांवर हवाई हल्ले केले. या हल्ल्यांसाठी UNO च्या सुरक्षा परिषदेची सहमती नव्हती.

**३) शांतिसेनेतून माघार**

आफ्रिकेतील सोमालिया राष्ट्रातील वांशिक दंगली थांबविण्यासाठी युनोने पाठवलेल्या शांतिसेनेतून अमेरिकेने आपला सहभाग तडकाफडकी काढून घेतला. अमेरिकेचा हा निर्णय पूर्णत: एकतर्फी व युनोच्या नियमांचा भंग करणारा होता.

**४) अफगाणिस्तानवर लष्करी कारवाई**

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेचा न्यूयॉर्कमधील विश्व व्यापार केंद्र (WTC) व वॉशिंग्टन डी.सी.तील अमेरिकन संरक्षण विभाग (पेन्टागॉन) च्या कार्यालयावर दहशतवादी हल्ले झाले. या हल्ल्यात ५००० अमेरिकन नागरिक मारले गेले. हल्ल्याचा मुख्य सूत्रधार ओसामा-बिन- लादेनला अफगाणिस्तानमधील तत्कालीन तालिबान शासनाने आश्रय दिल्याचा संशय अमेरिकेला होता. त्यामुळे अमेरिकेने

तालिबान शासनाविरुद्ध लष्करी कारवाई केली. कारवाईत अफगाणिस्तानातील धार्मिक मूलतत्त्वावर आधारित तालिबानी शासन संपुष्टात आले. कारवाई दरम्यान अमेरिकेकडून युद्ध नियम धाब्यावर बसविण्यात आले. मोठ्या प्रमाणावर मानवाधिकारांचे उल्लंघन करण्यात आले.

**५) आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध अमेरिकेचे युद्ध**

सप्टेंबर ११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध युद्ध पुकारले. या युद्धात अमेरिका वापरत असलेल्या विविध तंत्रावरून अमेरिकेची एकाधिकारशाही स्पष्ट होते.

दहशतवादाच्या नावाखाली एखाद्या सार्वभौम राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणे, दहशतवादाला समर्थन देण्याच्या आरोपावरून काही राष्ट्रांविरूद्ध एकतर्फी आर्थिक बहिष्काराची – व्यापारी नाकेबंदीची घोषणा करणे. काही राष्ट्रांना दैत्य राष्ट्रे (Evil Nations) म्हणून संबोधून त्यांना विश्व राजकारणात वेगळे पाडण्याचा प्रयत्न करणे. मानवाधिकार, युद्धनियमांचे उल्लंघन करणे या तंत्रातून अमेरिकेची दादागिरी वाढत असल्याचे दिसते.

आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सामना करण्यासाठी अमेरिकेने काही राष्ट्रांबरोबर लष्करी करार केले. करारांतर्गत अमेरिका त्या राष्ट्रांना शस्त्रास्त्रपुरवठा करीत असते. यातून विभागीय पातळीवर शस्त्रास्त्र स्पर्धा जोर धरताना दिसते.

**६) इराकविरूद्ध लष्करी कारवाई –**

अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचा सर्वोच्च बिंदू म्हणजे २००४ मध्ये अमेरिकेने इराकवर लष्करी कारवाई केली. UNO च्या १५० पेक्षा जास्त सदस्य राष्ट्रांचा या कारवाईला विरोध असतानाही काही राष्ट्रांच्या सहकार्याने अमेरिकेने ही कारवाई पूर्णत्वाला नेली. अमेरिकेच्या युद्धपिपासू धोरणांना मुरड घालण्यास UNO ला आलेले हे सर्वात मोठे अपयश आहे.

इराकवरील लष्करी कारवाई दोन उद्दिष्टांसाठी करण्यात आली.

- इराकमध्ये सद्दाम हुसनेची राजवट बदलणे (Regione Change)
- नि:श्त्रीकरण

  इराकमध्ये तत्कालीन अध्यक्ष सद्दाम हुसैनच्या काळात आण्विक, रासायनिक, जैविक अस्त्रांचा विकास करण्यात आल्याचा संशय अमेरिकेला होता ही विध्वंसक शस्त्रास्त्रे (WMD – Weapons of Mass Destruction) भविष्यात दहशतवादी संघटनांकडून अमेरिके विरूद्ध वापरले जाण्याची भीती होती. या शस्त्रांचा गैरवापर होण्याअगोदरच ती नष्ट करण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.

  भविष्यात शत्रूकडून काही धोक्याची शक्यता असल्यास योग्य कारवाई करून धोक्याची शक्यता नष्ट करण्याच्या धोरणाला Preemptive Attack धोरण

म्हणतात. अमेरिकेची इराकवरील लष्करी कारवाई या धोरणावर आधारित होती.


सध्या इस्त्रालयकडून पॅलेस्टाईन विरूद्ध या धोरणाचा सर्वाधिक वापर केला जातो. भारतानेही असे धोरण पाकव्याप्त काश्मीरमधील भारताविरोधी कारवाया करणाऱ्या दहशतवादी संघटनांविरूद्ध वापरावे. याविषयी देशांतर्गत दबाव शासनावर वाढत आहे.

## २.७ बहुध्रुवीय विश्वरचना (Multi – Polar World Order)

बहुध्रुवीय विश्वरचना म्हणजे अशी विश्वरचना, ज्यामध्ये सत्तेची केंद्रे अनेक असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व कोणत्याही एका राष्ट्राकडे नसून अनेक राष्ट्रांमध्ये यासाठी स्पर्धा असते या व्यवस्थेत कोणतेही एक राष्ट्र शक्तिशाली नसते तर अनेक राष्टांचे सत्तासामर्थ्य कमी-अधिक प्रमाणात समान असते. त्यामुळे कोणत्याही एका राष्ट्राची दादागिरी, मक्तेदारी निर्माण होण्याची शक्यता नसते. राष्ट्रांमध्ये स्पर्धा असली तरी समान राष्ट्रीय हितसंबंधाच्या रक्षणासाठी युती होण्याची शक्यता असते.

उदा. १९९१ च्या खाडी युद्धाच्या वेळी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकविरूद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत लष्करी कारवाई करण्यात आली. या कारवाईला रशिया, चीन, जपान या महासत्तांचे समर्थन होते.

### २.७.१ बहुध्रुवीय विश्वरचनेची प्रमुख वैशिष्टये




**१) बहुसत्ताकेंद्री विश्वरचना -**

या व्यवस्थेत सत्तेची केंद्रे अनेक असतात.

**२) सामर्थ्यांमध्ये समानता –**

बहुध्रुवीय विश्वरचनेत राष्ट्रांचे सामर्थ्य कमी-अधिक प्रमाणात समान असते.

### ३) सामूहिक नेतृत्व –

बहुध्रुवीय विश्वरचना सामूहिक नेतृत्वाच्या (Collective Leadership) तत्वावर आधारित आहे. आंततरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्व एका राष्ट्राकडे नसून अनेक राष्ट्र सामूहिकपणे हे कार्य पार पाडतात.

### ४) सत्तासमतोलावर आधारित व्यवस्था –

बहुध्रुवीय विश्वरचना ही १९ व्या शतकात युरोपात अस्तित्वात असलेल्या सत्तासमतोलाच्या व्यवस्थेवर आधारित व्यवस्था आहे. या व्यवस्थेत इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रिया, नेदरलॅण्ड, बेल्जिअम यासारखी सत्तेची अनेक केंद्रे होती. या राष्ट्रांमध्ये आशिया – आफ्रिका खंडात वसाहती निर्माण करण्यासाठी तीव्र स्पर्धा होती.

### ५) राज्यकांचा नवीन सत्ताकेंद्रे म्हणून उदय –

बहुध्रुवीय विश्वरचनेत राष्ट्रांबरोबरच राज्यके (Non States Actors) उदा. बहुराष्ट्रीय कंपन्या, NGO, व्यापार संघ इ. सत्तेची केंद्रे बनली आहे. उदा. ASEAN या व्यापारसंघाचा आर्थिक व्यापारी सत्तेचा केंद्र म्हणून उदय झाला असून अनेक मोठी राष्ट्रे ASEAN चे सदस्यत्व मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

### ६) आर्थिक व्यापारी स्वरूपाची स्पर्धा –

बहुध्रुवीय विश्वरचनेतील राष्ट्रांमधील स्पर्धा ही प्रामुख्याने आर्थिक – व्यापारी स्वरूपाची आहे. आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी व्यापारी सवलती मिळविण्यासाठी राष्ट्रांमध्ये चढाओढ आहे. त्यासाठी आर्थिक राजनयाचा वापर केला जातो.

### ७) समान हितसंबंधाच्या रक्षणासाठी राष्ट्रांमध्ये युती –

बहुध्रुवीय विश्वरचनेत समान हितसंबंधांच्या रक्षणासाठी राष्ट्रांमध्ये युती – प्रतियुती निर्माण केल्या जातात.

## २.७.२ शीतयुद्धोत्तर काळातील बहुध्रुवीय विश्वरचना –

शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही बहुध्रुवीय व्यवस्था असल्याचे काही अभ्यासक मानतात. शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक नवीन सत्ताकेंद्राचा उदय झालेला दिसतो.

भारत, रशिया, चीन, जर्मनी, फ्रान्स या राष्ट्रांचे बहुध्रुवीय विश्वरचनेच्या निर्मितीला समर्थन आहे. शीतयुद्धोत्तर काळात अमेरिका ही एकमेव महासत्ता नाही. अमेरिकेचे लष्करी सामर्थ्य निर्विवाद असले तरी आर्थिक आघाडीवर अमेरिकेला जपान, जर्मनी, भारत, चीन, दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्र, युरोपीयन युनियन इ. बरोबर तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. शिस्तबद्ध आणि योजनापूर्वक रीतीने आर्थिक विकासाच्या जोरावर जपान, चीन, भारत व काही दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रे (थायलंड, सिंगापूर) महासत्तेच्या रांगेत जाऊन बसली आहे. परिणामी शीतयुद्धोत्तर विश्वरचनेला अमेरिकेची एकाधिकारशाही असलेली एकध्रुवीय

विश्वरचना संबोधणे चुकीचे ठरते. जागतिक राजकारणाचे नेतृत्व केवळ अमेरिका करीत नसून अमेरिका, चीन, जपान, जर्मनी, भारत इ. चे सामूहिक नेतृत्व निर्माण झाले आहे.

## २.७.३ शीतयुद्धोत्तर काळातील नवीन विश्वरचनेची वैशिष्टये

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर निर्माण झालेल्या नवीन विश्वरचनेचे सकारात्मक आणि नकारात्मक अशी दोन्ही प्रकारची वैशिष्टये आहेत.

- **नवीन विश्वरचनेची सकारात्मक वैशिष्टये**

### १) आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य –

शीतयुद्धोत्तर काळातील महत्वाची घटना म्हणजे राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक हितसंबंधांना मिळालेले प्राधान्य होय. शीतयुद्धाच्या काळात विचारसरणीवर आधारित राजकारण, राजकीय हितसंबंधांना महत्व होते. त्यासाठी आर्थिक, हितसंबंधाचा बळी दिला जात असे. साम्यवादाच्या प्रतिरोधनासाठी अमेरिकेने अनेक राष्ट्रांना आर्थिक सहाय्य – सवलती दिल्या गेल्या. त्याची झळ अमेरिकी अर्थव्यवस्थेला बसली.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर विचारसरणीच्या अस्तित्वासाठी अशा स्वरूपाची मदत कालबाह्य ठरली. शीतयुद्धाच्या अंतानंतर पहिले नवनिर्वाचित अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य देण्याचे नवे धोरण घोषीत केले. अनेक राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारून जागतिक बाजारपेठेत आर्थिक व्यापारी हितसंबंध जोपासण्याच्या धोरणाला प्राधान्य दिले त्यासाठी आर्थिक राजनयाचा वापर केला.

### २) आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे महत्व वाढले.

शीतयुद्धानंतरचा काळ हा आशिया खंडाचा काळ म्हणून ओळखला जातो. शीतयुद्धाच्या काळात युरोप खंड केंद्रस्थानी असल्याने या काळात युरोपियन राष्ट्रांचे महत्व वाढले होते. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्र आशिया खंडात स्थलांतरित झाले. सिंगापूर, मलेशिया, भारत, जपान, चीन या राष्ट्रांनी झपाट्याने आर्थिक प्रगती केली असून. आंतरराष्ट्रीय राजकारणातील त्यांची भूमिका वाढली आहे.

ASEAN सारख्या व्यापारसंघाच्या सदस्यत्वासाठी युरोपियन राष्ट्रे प्रयत्नशील आहेत. आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक गुंतवणुकीसाठी पश्चिमी MNC मध्ये चढाओढ निर्माण झाली आहे.

### ३) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ

शीतयुद्धोत्तर काळात राष्ट्रांराष्ट्रांमधील राजकीय – आर्थिक – व्यापारी – सांस्कृतिक, विज्ञान – तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच द्विपक्षीय – विभागीय पातळीवरील बहुपक्षीय सहकार्यात वाढ झाली आहे. शीतयुद्धाच्या

राजकारणामुळे अमेरिका – रशिया, अमेरिका – चीन, पूर्व – पश्चिम युरोप यांच्यातील संघर्षामुळे सहकार्यात बाधा निर्माण झाली होती. लष्करी करार – संघटनांमुळे राष्ट्रांची विभागणी गटांमध्ये झाली होती. आंतरराष्ट्रीय राजकारणात भीती, संशयाचे वातावरण निर्माण झाले होते.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर शांतता आणि सहकार्याच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय विभागीय व द्विपक्षीय संघर्ष सोडविण्याकडे राष्ट्रांचा कल वाढलेला दिसतो. तसेच UNO ची भूमिकाही संघर्ष निवारणासाठी महत्वाची ठरली.

विभागीय व्यापारसंघाची वाढती संख्या व भूमिकेमुळे विभागीय आर्थिक – व्यापारी सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. ASEAN, NAFTA – North American Free Trade Agreement, APEC – Asia Pacific Economic Co-Operation या व्यापारसंघाची भूमिका शीतयुद्धोत्तर काळात वाढली. ASEAN च्या सदस्य राष्ट्रे मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, सिंगापूर इ. राष्ट्रांना Asian Tigers असे म्हटले जाते.

विभागीय व्यापार संघामुळे राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा घटक मागे पडून विभागीय सार्वभौमत्वाला महत्व प्राप्त होत आहे. आर्थिक सहकार्याबरोबरच वांशिक – धार्मिक मूलतत्ववादी संघर्षाचे निवारणही शांततेच्या माध्यमातून केले जात आहे.

### ४) UNO ची भूमिका बदलली –

शीतयुद्धाच्या काळात महासत्तांमधील राजकारणांमुळे UNO च्या भूमिकेवर मर्यादा पडल्या. महासत्तांनी UNO च्या व्यासपीठाचा वापर आपपासातील संघर्षाच्या कारणासाठी केला. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे नि:शस्त्रीकरण पर्यावरणाचे संरक्षण, मानवी हक्कांचे संरक्षण या महत्वाच्या प्रश्नांमध्ये UNO भरीव कामगिरी करू शकली नाही.

शीतयुद्धोत्तर काळात UNO ची भूमिका बदलून ती व्यापक बनली. याचे प्रतिबिंब १९९१ मध्ये मिळाले. UNo चे तत्कालीन सरचिटणीस जेव्हिएर - दी – कुलर यांनी 'UN Agenda for 21st Century' हा अहवाल प्रसिद्ध करून भविष्यातील UNO च्या भूमिकेवर शिक्कामोर्तब केले. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी UNO प्रयत्नशील असून शीतयुद्धोत्तर काळात UNO च्या शांतिसेनेचे कार्यक्षेत्र वाढलेले दिसते. राजकीय स्थैर्यासाठी लोकशाही पद्धतीने निवडणुका घेणे, शांतता कराराची अंमलबजावणी करणे, नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा पुरवणे इ. कार्ये शांतिसेना करताना दिसते.

रवांडा, सोमालियातील वांशिक संघर्षात UNO ने हस्तक्षेप करून शांतीप्रस्थापनेचे कार्य केले.

### ५) लोकशाहीचा प्रसार –

शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाहीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली आहे. सोवियत रशियाच्या विघटनाबरोबरच हंगेरी, बल्गेरिया, रूमानिया सारख्या पूर्व युरोपीयन राष्ट्रांनी लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. लोकशाहीच्या प्रसारासाठी प्रयत्न करणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नेपाळ, भूतानसारख्या राष्ट्रांमध्ये संसदीय लोकशाही आकाराला येत आहे.

### ६) नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली

शीतयुद्धोत्तर काळात नि:शास्त्रीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली. शीतयुद्धाच्या काळात १९७९ च्या दशकापर्यंत अमेरिका, सोवियत रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन या पाच राष्ट्रांकडे अण्वस्त्रे होती. पण पुढे भारत – पाकिस्तान, उत्तर – दक्षिण कोरीया, या राष्ट्रानी अण्वस्त्र क्षमता प्राप्त केली. अण्वस्त्राच्या वाढत्या प्रसाराबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली. यावर उपाय म्हणून UNO ने संपूर्ण नि:शस्त्रीकरणाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले. १९९१ मध्ये अमेरिका आणि रशियाने सामरिक शस्त्रास्त्र कपात करार (START – Strategic Arms Reduction Treaty) करार केला. १९९५ मध्ये NPT – Nuclear Non Proliteration Treaty करारला मुदतवाढ देण्यात आली. १९९९ मध्ये सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार (Comprehensive Test Ban Treaty - CTBT) मंजूर करण्यात आला.

### ७) मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयीच्या संवेदनशीलतेत वाढ –

UNO ने १९४८ मध्ये मानवाधिकारांचा जाहिरानामा प्रसिद्ध केला. परंतु शीतयुद्धाच्या राजकारणामुळे मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयी आंतरराष्ट्रीय जनमत गतिशील बनविण्यात UNO ला अपयश आले. शीतयुद्धोत्तर काळात मानवाधिकारांची जाणीव वैश्विक बनविण्यात UNO, ॲमेन्स्टी इंटरनॅशनल, HUman Rights Watch या NGO ची भूमिका महत्वाची आहे.

वाढत्या वांशिक हिंसाचारांमधून मानवाधिकारांचे संरक्षण करण्यासाठी UNO च्या शांतीसेनेने काही राष्ट्रांत लष्करी हस्तक्षेप केले. अनेक राष्ट्रांमधून मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी कायदेशीर तरतूद करण्यात आल्या.

उदा. भारतात १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क कायदा मंजूर करण्यात आला. त्यातंर्गत राष्ट्रीय मानवाधिकार आयोग व राज्य मानवाधिकार आयोगाची निर्मिती करण्यात आली.

### ८) पर्यावरण संरक्षणाची वैश्विक जाणीव

पर्यावरण प्रदूषणाची समस्या विशिष्ट राष्ट्रापुरती मर्यादित नसून ती आंतरराष्ट्रीय स्वरूपाची समस्या आहे. त्याकरिता सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याची जाणीव शीतयुद्धोत्तर काळात विकसित झाली. या जाणीवेचे पहिले प्रतिबिंब १९९२ च्या ब्राझीलमधील रिओ - दि – जानिरो येथील वसुंधरा परिषदेत पडले. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाचा जाहिरनामा तयार करण्यात आला. १९९७ मध्ये जपानमधील क्योटो शहरात झालेल्या पर्यावरण संरक्षण परिषदेत पर्यावरण संरक्षणाचा मसुदा (Kyoto Protocol) तयार करण्यात आला.

### ९) व्यापारसंघाची वाढती भूमिका –

शीतयुद्धोत्तर काळात शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांची जागा विभागीय व्यापारसंघांनी घेतली. विभागीय पातळीवरील आर्थिक विकासासाठी नवीन व्यापारसंघ अस्तित्वात आले. विभागीय आर्थिक विकास (Regional Economic Development) आणि विभागीय आर्थिक एकिकरणाच्या (Regional Economic Integration) प्रक्रियेत व्यापारसंघ महत्वाची भूमिका बजावत आहेत. अनेक राष्ट्रांच्या आर्थिक विकासात विभागीय व्यापार संघाची भूमिका महत्वाची आहे.

उदा. ASEAN, SAARC, NAFTA, AU – Atircan Union

### १०) जागतिकीकरणाची प्रक्रिया तीव्र बनली –

जागतिकीकरण ही वैश्विक प्रक्रिया असून कोणतेही राष्ट्र त्यापासून अलिप्त राहू शकत नाही. भांडवलशाहीचा जागतिक पातळीवर झालेला प्रसार, आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया, MNC चे वाढते जाळे यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. जागतिकीकरण ही विश्वपातळीवर राष्ट्रांमधील आर्थिक – सामाजिक – सांस्कृतिक संबंध घनिष्ठ करून एक परस्परावलंबी विश्वाची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. तिचे उद्दिष्ट एक एकिकृत विश्व बाजारपेठ (Intergrated World Market) ची निर्मिती करणे आहे. १९९५ मध्ये WTO च्या स्थापनेबरोबरच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली आहे.

## नकारात्मक वैशिष्टये

### १) वांशिकवाद आणि वांशिक हिंसाचारात वाढ –

शीतयुद्धोत्तर काळात अमेरिका – सोवियत रशिया यांच्यातील संघर्ष संपुष्टात आला असला तरी विभागीय पातळीवरील संघर्षाचे अस्तित्व कायम आहे. अनेक राष्ट्रांमध्ये वांशिक भेदभावातून हिंसाचार घडून आला आहे.

उदा. बोस्निया, क्रोयोशिया, रवांडा, अफगाणिस्तान, श्रीलंका, सोमालिया, ईस्ट तिमोर इ. या वांशिक हिंसाचारात अनेक निष्पाप नागरिक ठार झाले आहे.

आफ्रिकेतील रवांडा मध्ये हुतु आणि तुत्सी या वांशिक गटांच्या संघर्षात एका वर्षात पाच लाख लोक मारले गेले.

वांशिक संघर्षातून मानवाधिकारांचे उल्लंघन होत असून. विभागीय पातळीवरील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे.

## २) धार्मिक मूलतत्ववादी चळवळी –

शीतयुद्धोत्तर काळात जगामध्ये धार्मिक मूलतत्त्वादी चळवळींनी जोर पकडला आहे. त्यातून दहशतवाद, वांशिक हिंसाचाराला चालना मिळत आहे. धार्मिक श्रेष्ठत्वाची भावना जोपासण्यासाठी धर्माचे अस्तित्व किंवा स्वतंत्र ओळख टिकविण्यासाठी धर्माच्या आधारावर लोकांना संघटित करण्यासाठी धार्मिक मूलतत्ववादी चळवळी सक्रिय झाल्या आहेत.

उदा. अल्जेरिया, अफगाणिस्तान, इराण इ. राष्ट्रे धार्मिक मूलतत्ववादाला बळी पडली आहे. १९७९ मध्ये इराणमध्ये आयातोल्ला खोमेणी यांच्या नेतृत्वाखाली झालेली धार्मिक क्रांती. १९९६ मध्ये अफगाणिस्तानात प्रस्थापित झालेले तालिबान शासन धार्मिक मूलतत्ववादाने प्रभावित झाले होते.

## ३) आंतरराष्ट्रीय दहशतवादाची समस्या

शीतयुद्धानंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाने उग्र रूप धारण केले असून, अमेरिका, रशिया, चीन, भारत, इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांच्या सुरक्षेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. हा दहशतवाद धार्मिक – वांशिक भावनेने प्रभावित झाला असून, त्याचे मूळ धार्मिक मूलतत्ववादी चळवळीत आहे.

बॉम्बस्फोट, गोळीबार, अपहरण, राजकिय नेत्यांचे खून इ. साधनांचा वापर करून दहशतवादी हिंसाचार घडवून आणतात.

दहशतवादी कारवायांबरोबर अमली पदार्थांचा व्यापारही वाढला आहे. त्यातून आलेला पैसा दहशतवादी संघटनांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी वापरला जातो. ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेवरील हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या वाढत्या सामर्थ्यांची साक्ष जगाला पटली.

## ४) मानवी सुरक्षेचा प्रश्न

नवीन विश्वरचनेत मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानवी सुरक्षा म्हणजे हिंसाचार, भीती, असुरक्षिततेपासून व्यक्तीची मुक्तता. शीतयुद्धकालीन तणाव, परस्पर अविश्वास संशय – भीतीच्या वातावरणामुळे मानवी असुरक्षितता

वाढली. शीतयुद्धोत्तर काळातही परिस्थिती मध्ये फारसा बदल न होता. विविध संघर्षामुळे मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला. राजकिय कारणांमुळे अंतर्गत यादवी युद्धे, वांशिक हिंसाचार, धार्मिक मूलतत्ववादी चळवळी, अण्वस्त्रांचा प्रसार इ. कारणामुळे मानवी सुरक्षितता धोक्यात आली.

**५) युद्ध गुन्ह्यांचे (War Crimes) वाढते प्रमाण**

समकाळात विविध प्रकारच्या संघर्षातून युद्धविषयक नियमांचे पालन होताना दिसत नाही. त्यामुळे युद्ध गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. युद्ध कैद्यांना अमानवी वागणूक देणे, युद्धादरम्यान सामान्य नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी हल्ले करणे हे प्रकार वाढत आहेत.

उदा. १९९२ च्या बोस्निया मधील वांशिक संघर्ष, १९९५ मधील सर्बियामधील संघर्ष, अमेरिकेची इराक – अफगाणिस्तानमधील लष्करी कारवाई दरम्यान युद्धविषयक नियमांचे सर्रास उल्लंघन झाले. इराकी युद्ध कैद्यांना अमेरिकी सैन्यांकडून मिळत असलेल्या अमानवीय वागणुकीची छायाचित्रे 'वॉशिंगटन पोस्ट', 'न्यूयॉर्क टाईम्स' ने प्रसिद्ध केली.

## २.८ विद्यापीठीय प्रश्न

१) शीतयुद्धकालीन द्विध्रुवीय व्यस्थेचे सविस्तर वर्णन करा.

२) शीतुयद्धोत्तर विश्वरचना एकध्रुवीय आहे की बहुध्रुवीय आहे? सविस्तर चर्चा करा.

३) 'शीतयुद्धोत्तर जगात एकध्रुवीय व्यवस्थेचे अस्तित्व जाणवते' या विधानाची चर्चा करा.

**संदर्भग्रंथ**

१) समकालीन जागतिक राजकारण – शैलेंद्र देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२) आंतरराष्ट्रीय संबंध – शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण – अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, ओरिएंट ब्लैकस्वान, ओरिएंट ब्लॅक स्वान प्रा. लि. मुंबई

३) आंतरराष्ट्रीय संबंध – शांताराम भोगले.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# संघर्ष, शांतता, आणि सुरक्षा

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ विषय विवेचन : संघर्ष

३.३ संघर्ष : अर्थ व व्याख्या

३.४ संघर्ष : वर्गीकरण

३.५ संघर्षाचे प्रकार

३.६ संघर्षाचे बदलते स्वरूप

३.७ विषय विवेचन : शांतता

३.८ निःशस्त्रीकरण

३.९ शस्त्रास्त्र नियंत्रण

३.१० सामूहिक सुरक्षितता

३.११ विषय विवेचन : सुरक्षा

३.१२ राष्ट्रीय सुरक्षा

३.१३ मानवी सुरक्षा

३.१४ विद्यापीठीय प्रश्न

## ३.१ उद्दिष्टे:

१. संघर्ष, शांतता, सुरक्षा या संकल्पना आणि त्यासंदर्भातील आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वाटचालीचा आढावा अभ्यासणे.

२. बदलत्या काळानुसार या संकल्पनांचे मूल्यमापन करणे.

३. नि:शस्त्रीकरण, शस्त्रास्त्र नियंत्रण या संकल्पनाची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

४. राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील २१ व्या शतकातील आव्हानांचा आढावा घेणे.

## ३.२ विषय विवेचन : संघर्ष

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये शांतता आणि सुरक्षिततेच्या निर्मितीला प्राधान्य असते. अशी शांततेची निर्मिती करत असताना देखील राष्ट्रांमधील परस्पर संबंधांमध्ये संघर्ष ही एक अटळ अशी बाब आहे. म्हणजेच दोन किंवा अधिक राष्ट्रात परस्पर संबंध प्रस्थापित करण्यासाठी

सहकार्य ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे; तसेच संघर्ष ही देखील एक अपरिहार्य बाब आहे. आंतरराष्ट्रीय संबंधामधील सहकार्याचे जसे विविध कांगोरे दिसून येतात त्याच प्रकारे आंतरराष्ट्रीय संबंधांमधील विविध प्रकारचे संघर्ष अस्तित्वात असल्याचे सुद्धा दिसून येते. अशा विविध प्रकारच्या संघर्षाचे अवलोकन करणे, विश्लेषण करणे व त्या संघर्षावर तोडगा काढणे, संघर्षाची सोडवणूक करणे यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासक प्रयत्न करत असतात. जसे संघर्षाचे विविध प्रकार असतात तसेच संघर्ष सोडवण्याच्या देखील विविध पद्धती असतात. आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण, राष्ट्राराष्ट्रांतील संघर्षाची सोडवणूक, परस्पर सहकार्य, शांतता या सर्वच बाबींना दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. या अभ्यासाअंती आंतरराष्ट्रीय संबंधात संघर्ष अटळ असल्याचेही दिसून येते. आंतरराष्ट्रीय संबंध मुळातच आपल्या राष्ट्राचे हितसंबंध जोपासणे या दृष्टीने निर्माण केले जातात. त्यामुळेच जोपर्यंत राष्ट्राच्या विशिष्ट हितसंबंधाचे अस्तित्व आहे तोपर्यंत संघर्षाचेही अस्तित्व राहणे स्वाभाविक आहे. संघर्ष हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

## ३.३ संघर्ष : अर्थ व व्याख्या

आंतरराष्ट्रीय व्यवस्था प्रस्थापित होत असताना प्रत्येक राष्ट्राची एका विशिष्ट प्रकारची प्रतिमा निर्माण होत असते. ही राष्ट्राची प्रतिमा त्या राष्ट्राचे हितसंबंध व आर्थिक आणि राजकीय ध्येय यांवर अवलंबून असते. जेव्हा एकाच प्रकारच्या गोष्टीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांचे हितसंबंध गुंतलेले असतात, अशावेळी संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. उदाहरणार्थ, भारत आणि पाकिस्तान मधील काश्मीर च्या मुद्द्यावरून चालू असणारा संघर्ष, भारत आणि चीन मधील सीमावाद, युक्रेन आणि रशिया संघर्ष इ. म्हणजेच ज्या राष्ट्रांचे हितसंबंध परस्परपूरक असतात त्या राष्ट्रांमध्ये सहकार्याचे संबंध प्रस्थापित होतात. याउलट ज्या राष्ट्रांचे हितसंबंध परस्पर विरोधी असतात त्या राष्ट्रांमध्ये मात्र संघर्ष निर्माण होतात. हे संघर्ष द्विराष्ट्रीय स्वरूपाचे असतात. काही वेळा समान हितसंबंध असणारी राष्ट्रे आपापसात गट निर्माण करून सामूहिक दबाव निर्माण करून आपले ईप्सित ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करतात. संघर्ष हा गतिमान असतो. संघर्षाचे मूळ हितसंबंधात आहे, असे आपण ज्यावेळी म्हणतो; त्यावेळी आपणाजवळ असणारी संसाधने मर्यादित असणे, सत्ता संबंध ही वैशिष्ट्ये त्यात अनुस्यूत असतात.

अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ हेरॉल्ड लास्वेल (Harold Lasswell) संघर्षाची व्याख्या करताना, संघर्ष ही जाणीवपूर्वक केलेली स्पर्धा असून अनन्य मूल्याच्या (Exclusive value) प्राप्तीसाठी होणाऱ्या प्रयत्नांमधून संघर्षाची निर्मिती होते.

उपरोक्त व्याख्येवरून संघर्षाविषयी काही गोष्टी स्पष्टपणे दिसून येतात. पहिली म्हणजे संघर्ष ही जाणीवपूर्वक करण्यात आलेली स्पर्धात्मक कृती आहे, तो जाणीवपूर्वक निवडलेला मार्ग आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ही स्पर्धा आपल्या राष्ट्राच्या हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी केली जाते. राष्ट्रांतील हितसंबंध विरोधी असतील तर त्यातून संघर्षाची निर्मिती होत असते. विविध राष्ट्रांमधील हितसंबंधाचे स्वरूप भिन्न असते, त्यामुळे त्यांना प्राप्त करावयाची उद्दिष्ट्ये देखील भिन्न असतात; परिणामी राष्ट्रांमधील संघर्षाचे स्वरूप देखील भिन्न असते. संघर्ष हे हितसंबंधांवर आधारलेले असतात. व प्रत्येक राष्ट्राचे कालपरत्वे हितसंबंध बदलत असतात.

त्यामुळे संघर्षाचे स्वरूप देखील बदलत राहते. एका ठराविक संघर्षावर तोडगा काढला की त्याची जागा दुसरा संघर्ष घेतो. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी अशा संघर्षाचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते. कारण संघर्षातून तणाव वाढतो. एकाच प्रकारचा संघर्ष अधिक कालावधीपर्यंत टिकून राहिल्यास त्याचे रूपांतरण हिंसेत होते अशा वेळी काही प्रसंगी हिंसेचे युद्धात देखील रूपांतरण होते. राष्ट्रीय विकासात संघर्ष हा खूप मोठा अडथळा आहे. तरीही संघर्ष हे वास्तव नाकारता येत नाही.

## ३.४ संघर्ष : वर्गीकरण

संघर्षाचे वर्गीकरण हिंसक संघर्ष व अहिंसक संघर्ष असे करता येते. हे अगदीच ढोबळ व मूलभूत स्वरूपाचे असे वर्गीकरण असले तरी खोलवर विचार केल्यास त्यातील तथ्यांश दिसू लागतो. जेव्हा शांततापूर्ण वाटाघाटीच्या माध्यमातून हितसंबंध जोपासणे अशक्य होऊन जाते तेव्हा देशांतर्गत सत्ता हिंसेचा मार्ग चोखळते. भौतिक नुकसान म्हणजेच वित्तहानी, जीवितहानी ही अशा हिंसक संघर्षाची काही प्राथमिक वैशिष्ट्ये आहेत. अशा हिंसक संघर्षाचा व्यक्ती व नागरी समाजाच्या जडणघडणीवर निरातिशय व दीर्घकालीन परिणाम होतो.

याउलट अहिंसक संघर्षात मात्र हिंसेचा अभाव हे वैशिष्ट्य दिसून येते. हितसंबंधाचा संघर्ष हिंसेचा वापर न करताही केला जाऊ शकतो. या प्रकारच्या संघर्षात दोन किंवा दोन पेक्षा अधिक राष्ट्रे युद्ध वा हिंसे शिवाय इतर अनेक मार्गांचा अवलंब करतात. प्रत्यक्ष हिंसेचा वापर केला जात नसला तरी हिंसेचा वापर करण्याचा धाक दाखवला जातो. चर्चा परिसंवाद या माध्यमांद्वारे आपले अधिकाधिक हितसंबंध रेटले जातात. दबावतंत्राचा वापर केला जातो. आर्थिक सवलती, व्यापारी करार, निर्बंध इ तंत्राचा वापर केला जातो. समान हितसंबंध असणाऱ्या राष्ट्रांना व्यापारात व आंतरराष्ट्रीय धोरणात सवलती दिल्या जातात.

## ३.५ संघर्षाचे प्रकार :

जेव्हा दोन किंवा अधिक राष्ट्रांची उद्दिष्टे एकमेकास अनुरूप नसतात तेव्हा संघर्षाची परिस्थिती निर्माण होते संघर्षाचे प्रकार समजून घेतल्याशिवाय संघर्षाचे व्यवस्थापन शक्य होणार नाही. संघर्षाचे ढोबळ वर्गीकरण वरील प्रमाणे केले जात असले तरी संघर्षाचे विविध प्रकार खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

### १. भूप्रदेश व सीमावाद:

नवनवीन भूप्रदेशांवर ताबा मिळवणे व त्यावर सत्ता प्रस्थापित करणे, या उद्देशाने आजवर सर्वाधिक संघर्ष निर्माण झाले आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या ठराविक भूभाग आपला असल्याचा दावा प्रतिस्पर्धी राष्ट्रंकडून केला जातो. प्रत्येक वेळी हा फक्त भूभागाचा ताबा नसतो तर बऱ्याचदा समान संस्कृती असणाऱ्या देशालगतच्या भूभागाचा ताबा मिळवण्याचा देखील प्रयत्न केला जातो. सद्यस्थितीतील बहुतांश भूप्रदेश व सीमांविषयीचे वाद हे ऐतिहासिक दाव्यांच्या आधारे होताना दिसत आहेत. यामध्ये प्रत्यक्ष विभाजनाची रेषा स्पष्ट नसल्याने तसेच ठराविक राष्ट्रीय विभाजनाच्या रेषेला मान्यता देत नसल्याने असे वाद उफाळून येत आहेत. उदाहरणार्थ भारत व पाकिस्तान या देशांमधील काश्मीरचा प्रश्न, रशियाचे युक्रेनवरील आक्रमण. भूप्रदेश हा

आर्थिक प्रगती साधण्याचे आणि देशाच्या विकासाची गती वाढवण्याचे प्रमुख साधन आहे. त्याचबरोबर भूप्रदेश हे संपन्नतेचे देखील प्रतीक आहे. त्यामुळे बहुतांश राष्ट्रांच्या हितसंबंधांच्या यादीत भूप्रदेश या गोष्टीचा सर्वात वरचा क्रमांक असतो. भूप्रदेश व सीमावाद यांचे राजकारण दहशतवाद, अन्याय, वांशिक भेद, दडपणूक इत्यादी नावाखाली केले जाते.

**२. अल्पसंख्यांक, वांशिकता व शासन-सत्ता यांच्याशी निगडित संघर्ष:**

अल्पसंख्यांकाचे संघर्ष हे प्रत्येक वेळी वांशिक किंवा धार्मिक गटाशी संबंधित असतीलच असे नाही. काही वेळा सामाजिक अल्पसंख्य गट किंवा भाषिक अल्पसंख्य गट यांचेही संघर्ष दिसून येतात. उदाहरणार्थ श्रीलंकेतील तामिळ भाषिकांचा प्रश्न. तरीही धार्मिक अल्पसंख्याकांचे संघर्ष हे या प्रकारातील प्रमुख गणले जातात. शेजारील प्रतिस्पर्धी राष्ट्रीय अशा अल्पसंख्या गटांच्या माध्यमातून स्वराष्ट्राची चांगली प्रतिमा उभी करण्याचा प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा प्रकारच्या प्रतिमा चा वापर स्वतःच्या राष्ट्राचे हितसंबंध व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करता येतो. धार्मिक व वांशिक अल्पसंख्यांक गटांचे संघर्ष मुख्यत्वे आपल्या राष्ट्राकडून पुरेशी विश्वासार्हता प्राप्त न झाल्याने घडून येतात. याचा परिणाम होऊन हा अल्पसंख्याक गट शासन सत्तेशी झगडा करून स्वतःच्या वेगळ्या अस्तित्वाची व विशिष्ट दर्जाची मागणी करू लागतो. राजकीय अभ्यासकांच्या मते सत्ताकांक्षी राष्ट्रे अशा अल्पसंख्य गटांचा वापर करून व त्यांच्या धार्मिक भावनांना डिवचून प्रतिस्पर्धी राष्ट्रांकडून आपल्या हिताची धोरणे आखून घेतात.

**३. संसाधनांवर ताबा मिळवण्यासाठीचे संघर्ष:**

या प्रकारच्या संघर्षामध्ये महत्त्वाच्या संसाधनांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा उद्देश असतो. नैसर्गिक संसाधने मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. अशावेळी विकास व वृद्धी साध्य करण्यासाठी अधिकाधिक संसाधने मालकीची असणे किंवा त्यावर ताबा अथवा नियंत्रण असणे क्रमप्राप्त असते. संसाधनावर आधारित संघर्ष हे मुख्यत्वे टंचाईची तीव्रता, संसाधनाची उपलब्धता आणि त्या संसाधनाचे नियंत्रण मिळवण्यात असलेले धोके यांचा अभ्यास करून निर्माण केले जातात.

## ३.७ संघर्षाचे बदलते स्वरूप:

राज्यशास्त्रातील सत्ता, हितसंबंध, युद्ध आणि शांतता यांच्याप्रमाणेच संघर्ष ही देखील एक केंद्रीभूत संकल्पना आहे. सर्व संघर्ष हे अडचणीचे नसतात. काही संघर्ष निव्वळ व्यापारी स्पर्धेचा भाग या स्वरूपाचे देखील असतात. संघर्षाच्या परिस्थितीत राष्ट्रे तडजोडीच्या व परिसंवादाच्या माध्यमातून हिंसेशिवाय अधिकाधिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न करतात. हिंसक वळण घेतलेल्या संघर्षांना चर्चेच्या पातळीवर आणण्यासाठी जागतिक स्वरूपाच्या संघटना कार्यरत असतात. हल्ली नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधामुळे संघर्षाचे स्वरूप देखील बदलले आहे. आताच्या युगात माहिती (Data) हे सर्वाधिक मोठे संसाधन मानले जाते. आंतरजालावर उपलब्ध असणाऱ्या बिग डेटा चे मालकी हक्क व नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वच विकसित व विकसनशील राष्ट्रीय प्रयत्न करत आहेत. अवकाश याने, उपग्रह यांच्या

मदतीने अधिकाधिक माहिती घेतली जाते. तशीच माहिती संप्रेषणाचीदेखील आधुनिक साधने वापरली जातात. ह्या माहितीच्या आधारे व्यापारी सत्ता प्रस्थापित करता येऊ शकते. उदाहरणार्थ चीनने काही मोबाईल वरील ॲप्स च्या माध्यमातून जागतिक बाजारपेठांची माहिती करून घेतली व ग्राहकांच्या मागणीनुसार वस्तू बाजारपेठेत उपलब्ध करून दिल्या.

संघर्षाचे स्वरूप हल्ली बदलत आहे, असे दिसत असले तरीही मूलभूत संघर्ष हे उपरोक्त तीन प्रकारांतीलच दिसून येतात. राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक हे संघर्ष शांततामय रीतीने सोडवण्याच्या कामी प्रयत्न करत असतात. काही संघर्ष युद्धात परावर्तित होऊ नयेत यासाठी देखील जागतिक संघटना व अभ्यासक प्रयत्न करत असतात. संघर्ष हे अपरिहार्य व अटळ स्वरूपाचे आहेत. त्यामुळे त्यावर एकच एक असा कायमस्वरूपी इलाज करणे शक्य नसते. तरीही संघर्ष निर्माण होऊ नयेत म्हणून काळजी घेणे व उपस्थित असणारे संघर्ष शांततामय पद्धतीने कसे सोडवता येतील हे पाहणे, हीच पर्यायी व्यवस्था आहे.

## ३.७ शांतता: विषय विवेचन

वरील विश्लेषणात संघर्षाची अपरिहार्यता याविषयी विवेचन आलेच आहे. मग असा संघर्ष जर अटळ असेल तर शांतता प्रस्थापित करण्यासाठी काही उपाययोजना करणे क्रमप्राप्त आहे. चर्चा, परिसंवाद, शिखर परिषदा, बैठका, राजनय यांचा वापर अशावेळी केला जातो. परंतु एवढ्यावरच न थांबता संघर्षाने प्रत्यक्षात हिंसक वळण घेतल्यास करावयाच्या कारवाईचा देखील विचार केला जातो. सध्या जागतिकीकरणाचा काळ आहे. कोणत्याही दोन राष्ट्रातला संघर्ष विकोपाला गेला तर त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागू शकतात. उदाहरणार्थ रशिया व युक्रेन यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेलाचा भाव वाढल्याचे उदाहरण अगदीच ताजे आहे. राष्ट्रा - राष्ट्रात सहकार्याचे संबंध प्रस्थापित करावयाचे असतील तर शांतता हे महत्त्वाचे मूल्य राष्ट्रांना पटवून द्यावे लागते. शांतता प्रस्थापनेचे आवश्यक प्रयत्न जागतिक संघटनेच्या माध्यमातून होत असतात. तरीही सत्ताकांक्षी राष्ट्रे जेव्हा हव्यासापोटी संघर्ष टोकाला घेऊन जाण्याची भूमिका स्वीकारतात; त्यावेळी काही ठोस उपायांची गरज भासते. ह्या ठोस उपाययोजनांमध्ये शस्त्रास्त्र नियंत्रण व निःशस्त्रीकरण तसेच सामूहिक सुरक्षितता अशा त्रिस्तरीय उपायोजनांचा समावेश केला जातो. याव्यतिरिक्तही व्यापारी सवलती, आर्थिक निर्बंध, बहिष्कार हे उपाय केले जातात. परंतु प्रस्तुत प्रकरणात आपण निः शस्त्रीकरण, शस्त्रास्त्र नियंत्रण व सामूहिक सुरक्षितता या दृष्टिकोनांचा विचार करणार आहोत.

तंत्रज्ञानातील प्रगतीचा गैरवापर शस्त्रास्त्रांवरील संशोधनासाठी केला जात असल्याचे सध्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे. संख्यात्मक व गुणात्मक रित्या शस्त्रास्त्रांचा वापर कमी करणे तसेच त्यावरील संशोधन खर्च मर्यादित करणे ही आजच्या काळाची गरज आहे. परस्पर सहकार्य व शांततेच्या प्रस्थापनेसाठी हे गरजेचे उपाय मानले जातात. वास्तववादी विचारवंत हॅन्स मॉर्गेन्थ्यू आपल्या 'पॉलिटिक्स अमंग नेशन्स' (Politics Among Nations) या पुस्तकात संघर्ष हे वास्तव मान्य करतात. राष्ट्रा राष्ट्रात असणारे संबंध समजून घेताना त्यांच्या संस्कृतीमध्ये कार्यरत असणारे 'बल' निगडित घटक ओळखणे व समजून घेणे; आणि दुसरे त्या घटकांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणात व आंतरराष्ट्रीय संस्थांवर कसा परिणाम होईल हे समजून घेणे शांतता प्रस्थापनेसाठी उपयोगी पडणारी पहिली पायरी आहे, असे हॅन्स मॉर्गेन्थ्यू

यांनी अभ्यासाअंती आपल्या पुस्तकात नोंदवले आहे. शांततेच्या निर्मितीसाठी जाणीवपूर्वक आणि विशिष्ट पद्धतीने प्रयत्न खालील उल्लेख केलेल्या दृष्टिकोनांच्याद्वारे केले जातात. राष्ट्राच्या हितसंबंधांची पूर्तता व्हावयाची असेल तर शांतता निर्माण करणे गरजेचे असते. शांतता प्रस्थापित करण्याचे दृष्टिकोन आपण खालील प्रमाणे समजावून घेऊ शकतो. आपल्या पदरी शस्त्रास्त्र असतील तर ती वापरण्याचा मोह कुणाही राज्यकर्त्यांना होणे स्वाभाविक असते, असे मानून ही शक्यता टाळण्यासाठी निःशस्त्रीकरण ही उपाययोजना अगदी अलीकडे म्हणजे विसाव्या शतकात उदयास आली. क्युबामधील अण्वस्त्र अरिष्टानंतर (Cuban Missile Crisis) म्हणजे १९६२ नंतर जगासमोरील अण्वस्त्रधारी युद्धाची भीती शिगेला पोचली. जागतिक भीती व अणुयुद्धाचे तोटे लक्षात घेऊन सोव्हिएत रशिया (USSR) व अमेरिकेची संयुक्त संस्थाने (USA) या देशांनी निःशस्त्रीकरणासारखा आदर्शवादी उपाय टाळून शस्त्रास्त्र नियंत्रणासारखा व्यवहार्य उपाय निवडला.

## ३.८ निःशस्त्रीकरण

हॅन्स मॉर्गेन्थ्यू निःशस्त्रीकरणावर टिप्पणी करताना, अशी कोणतीही शस्त्रास्त्र कपात करण्याची किंवा त्यांना नष्ट करण्याची कृती की ज्याचा अंतिम उद्देश शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करून शस्त्रांचा निःपात करण्याचा असतो ती म्हणजे निःशस्त्रीकरण होय; असे नमूद करतात. निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत शस्त्रास्त्र कपात, शस्त्रास्त्र निःपात, संरक्षण व युद्ध खर्चात कपात तसेच शक्य असेल तेथे लष्करी केंद्रांचा निःपात, युद्धसामग्री वरील तंत्रज्ञान व संशोधन खर्चात कपात इ सर्व गोष्टींचा समावेश असतो. निःशस्त्रीकरणाचा साधा सरळ अर्थ म्हणजे एखाद्या राष्ट्रास युद्ध सामग्री व मानवी संहार करणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीपासून रोखणे होय.

ही स्थल व कालपरत्वे बदलणारी प्रक्रिया असून ही स्वेच्छाआधारित किंवा काही वेळा सक्ती करून घडवून आणली जाते. नि:शस्त्रीकरणाचे प्रमुख प्रकार आपणाला खालील प्रमाणे विषद करता येतील.

अ. **सार्वत्रिक व स्थानिक नि:शस्त्रीकरण -** जागतिक राजकारणात महासत्ता असलेली राष्ट्रे अशा सार्वत्रिक नि:शस्त्रीकरणाच्या कार्यक्रमात पुढाकार घेऊन इतर लहान मोठ्या राष्ट्रांना करारात भाग घेण्यासाठी उद्युक्त करतात. ही पूर्णतः ऐच्छिक प्रक्रिया असते म्हणजे करारात भाग घ्यावा म्हणून कोणत्याही राष्ट्रावर दबाव आणला जात नाही. जेव्हा ठराविक प्रदेशातील काही राष्ट्रे एकत्र येऊन शांतता प्रस्थापनेसाठी अशा पद्धतीचे करार करतात तेव्हा त्यास स्थानिक नि:शस्त्रीकरण असे संबोधले जाते.

ब. **गुणात्मक व संख्यात्मक नि:शस्त्रीकरण -** गुणात्मक नि:शस्त्रीकरण अधिक विनाशकारी अशा ठराविक युद्ध सामग्रीच्या बंदीची, त्यांचा निःपात करण्याची किंवा त्यामध्ये कपात करण्याची भूमिका घेते. तर संख्यात्मक नि:शस्त्रीकरण सर्वच प्रकारच्या विनाशकारी शस्त्रास्त्रांचा निःपात करण्याची म्हणजे त्यांना नष्ट करण्याची किंवा त्यांमध्ये लक्षणीय कपात करण्याची भूमिका घेते.

क. **व्यापक व सर्वसमावेशक नि:शस्त्रीकरण -** नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत अस्तित्वात असणाऱ्या सर्वच शस्त्रास्त्रांचा बिमोड करणे गृहीत धरले जाते. सर्व प्रकारचे युद्ध

सामग्रीवर होणारे खर्च पूर्णतः ठप्प करून सर्वसमावेशक नि:शस्त्रीकरण हे व्यापक ध्येय बाळगले जाते. हा एक आदर्शवादी विचार असून या विचाराची व्यवहार्यता अगदीच नगण्य आहे.

नि:शस्त्रीकरणाची गरज पुढील मुद्द्यांच्या आधारे थोडक्यात सांगता येईल.

अ. युद्धाचा धोका टाळून शांतता प्रस्थापित करणे.

ब. अण्वस्त्र युद्ध व अणुशक्तीचा वापर संहार करण्यासाठी न करणे.

क. शस्त्रास्त्र, युद्ध सामग्री त्यावरील संशोधन यांच्यावरील खर्चास आळा घालून तो हिस्सा आर्थिक विकासासाठी वापरणे.

ड. शस्त्रीकरणाच्या खर्चात कपात करून तो हिस्सा गरिबी, उपासमारी, सामाजिक मागासलेपण, आरोग्य इत्यादी समाजोपयोगी गोष्टींसाठी वापरणे.

इ. लष्करीकरण लोकशाही व्यवस्थेला मारक असून त्यामुळे शांतता व सहकार्यपूर्ण प्रगती या लोकशाहीच्या अंतर्भूत मूल्यास त्यामुळे काळीमा फासली जाते.

नि:शस्त्रीकरण ही सर्वसमावेशक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची व आग्रहाची प्रक्रिया असूनही तीस अपयशास सामोरे जावे लागले. राष्ट्रा राष्ट्रात परस्परांविषयी असणारा अविश्वास, वाढते संघर्ष, शस्त्रास्त्र विक्रीची भली मोठी बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय राजकारणात असणारे कायम संघर्षमय वातावरण इत्यादी कारणांमुळे नि:शस्त्रीकरण हे अपयशी ठरले.

## ३.९ शस्त्रास्त्र नियंत्रण

जग भीषण महायुद्धांच्या छायेखाली वावरत असताना जागतिक इतिहासकारांना तसेच विचारवंतांना शस्त्रास्त्र बंदी करणे ही काळाची गरज वाटू लागली होती. निःशस्त्रीकरण ही संकल्पना आदर्शवादी चिंतनातून उदयास आली. वास्तववादी विचारवंतांनी त्यावर टीका करताना निःशस्त्रीकरण ऐवजी शस्त्रास्त्र नियंत्रण हा मार्ग योग्य असल्याचे सांगितले. सध्याची जागतिक परिस्थिती पाहता शस्त्रास्त्र नियंत्रण याचा अर्थ काही राष्ट्रांमध्ये स्वतःचे उपद्रव मूल्य वाढवण्यासाठी व प्रतिस्पर्धी राष्ट्रांना धाक दाखवण्यासाठी शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाली आहे, अशा माणुसकीला विनाशकारी स्पर्धेपासून राष्ट्रांना परावृत्त करणे तसेच मानवी संहार करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या व अण्वस्त्राच्या निर्मितीपासून राष्ट्रांना परावृत्त करणे यासाठी शस्त्रास्त्र नियंत्रण केले जाते. नि:शस्त्रीकरण या दृष्टिकोनात राष्ट्रे अण्वस्त्रधारी, शस्त्रास्त्र संपन्न आहेत म्हणून राष्ट्रा-राष्ट्रात अतिरेकी संघर्ष माजले आहेत असे गृहीतक आहे. याउलट शस्त्रास्त्र नियंत्रण या दृष्टिकोनातून राष्ट्रा-राष्ट्रात संघर्ष आहेत म्हणून राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा व पर्यायाने राष्ट्रांची अण्वस्त्र सज्जता आहे असे गृहीत धरले जाते. राष्ट्रांमध्ये शांतता व स्थिरता निर्माण व्हावी म्हणून शस्त्रास्त्र स्पर्धेचे नियमन करणे व शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर व संशोधनावर नियंत्रण ठेवणे हा उद्देश बाळगला जातो. शस्त्रास्त्र नियंत्रणाचे एक प्रमुख आयुध म्हणजे दोन किंवा अधिक राष्ट्रांमध्ये शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर मर्यादा घालणे व शस्त्रास्त्र स्पर्धेचे नियमन करण्याच्या उद्देशाने करार घडवून आणणे हे होय. शस्त्रास्त्र नियंत्रणाचे तत्व काही गृहितके मान्य करून त्यावर उपाययोजना करण्याची कृती करते. या गृहितकांमध्ये

राष्ट्रा राष्ट्रांमधील संघर्ष अटळ असणे तसेच कोणत्याही परिस्थितीत शस्त्रास्त्र पूर्णतः नष्ट न करता येणे यांसारख्या वास्तववादी गोष्टींचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्ष कमी करणे, शस्त्रास्त्र स्पर्धेचे नियमन करणे, शांततेची प्रस्थापना करणे, स्थैर्य प्रस्थापित करून राष्ट्रांना आर्थिक उन्नतीची संधी प्राप्त करवून देणे इत्यादी उद्देशांच्या पूर्ततेसाठी शस्त्रास्त्र नियंत्रण केले जाते. काही आंतरराष्ट्रीय करारान्वये शस्त्रास्त्रांची संख्या मर्यादित केली जाते तसेच अधिक शस्त्रास्त्र असतील तर त्यांत कपात केली जाते. ह्या दोन प्रकारे शस्त्रास्त्र नियंत्रण केले जाते.

नि:शस्त्रीकरण व शस्त्रास्त्र नियंत्रण विषयक काही महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय करार खालीलप्रमाणे आहेत. (टीप: करारांसमोर नमूद केलेले साल कराराचे वर्ष दर्शवित नसून करार लागू झाल्याचे वर्ष दर्शवित आहे.)

१. २६ देशांनी पारित केलेला अंटार्टिका करार १९६२.

२. अंशतः अणु चाचणी बंदी करार (Partial Test Ban Treaty - PTBT) १९६३.

३. ८३ देशांनी मान्य केलेला आउटर स्पेस करार १९८७.

४. लॅटिन अमेरिकन फ्री झोन करार १९६७.

५. आण्विक प्रसार विरोधी करार (Nuclear Non-proliferation Treaty - NPT) १९७०.

६. क्षेपणास्त्र विरोधक संरचना निर्मितीस बंदी घालण्याचा करार (Anti-Ballistic Missile Treaty - ABM) १९७२.

७. व्यूहरचनात्मक शस्त्रास्त्र नियमन करण्यासंबंधी वाटाघाटी (Strategic Arms Limitation Talks - SALT) – SALT 1- १९७२; SALT 2 १९७९.

८. जमिनीवरील अणुचाचणी बंदी करार (Threshold Test Ban Treaty - TTBT) १९७४.

९. शांततापूर्ण अणू स्फोट करार १९९०.

१०. व्यूहरचनात्मक शस्त्रास्त्रांची कपात करण्यासंबंधीच्या वाटाघाटी (Strategic Arms Reduction Talks - START) START 1- १९७२, START 2- १९७९.

११. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार १९९६.

१२. जैविक आणि विखारी अस्त्र परिषद १९७५.

१३. जैविक शस्त्रास्त्र बंदी करार १९७५.

अण्वस्त्रांचा पुर्णार्थाने नायनाट करणे ह्या आदर्शवादी धोरणातील फोलपणा लक्षात आल्यामुळे नि:शस्त्रीकरणाच्या ऐवजी शस्त्रास्त्र नियंत्रण या वास्तववादी व संपूर्ण प्रयत्न केल्यास बऱ्याच अंशी यशस्वीता प्राप्त होऊ शकते; याची जाणीव जगाचे नेतृत्व करणाऱ्या ठराविक देशांना झाल्याने त्यांनी पुढाकार घेऊन इतर गरीब व विकसनशील देशांना शस्त्रास्त्र नियंत्रणाच्या कार्यक्रमात सामील करून घेतले आहे.

## ३.१० सामूहिक सुरक्षितता

सामूहिक सुरक्षितता ही काही राष्ट्रांचे मैत्रीचे करार किंवा काही राष्ट्रांमधील शांततेचे करार यापेक्षा अधिक महत्त्वाकांक्षी प्रणाली आहे. जगातील कोणत्याही पीडित राष्ट्राच्या सुरक्षेचा प्रश्न हा आपल्या स्वतःच्या देखील राष्ट्राच्या सुरक्षेचा प्रश्न आहे असे मानून जगातील सर्वच राष्ट्रे मैत्र भावनेने त्या राष्ट्राच्या समर्थनार्थ उभी राहतात. आक्रमक राष्ट्र कितीही बलाढ्य असली तरीही सर्व राष्ट्रे संघटित होऊन, एकत्र येऊन त्या आक्रमक राष्ट्राची युद्धपिपासू वृत्ती ठेचून टाकू शकतात. राष्ट्रे संकट काळात एकमेकांसाठी गरज असेल त्या स्वरूपाची मदत करायला तयार होतात. सर्व राष्ट्रे सामुहिकरीत्या आक्रमक राष्ट्राच्या विरोधात फळी निर्माण करतात. सामूहिक सुरक्षितता ही जाणीवपूर्वक तयार करण्यात आलेली व्यवस्था असून ती युद्ध आणि आक्रमण टाळून प्रत्येक देशाचे स्वातंत्र्य आणि प्रादेशिक ऐक्य कायम राखणारी व्यवस्था असल्याचे राज्यशास्त्र शब्दकोशात नमूद आहे.

सामूहिक सुरक्षितता ही संस्थात्मक स्वरूपाची स्थिर संरचना असून ती सर्व राष्ट्रांच्या समान सहभागावर अवमवलंबून असते. सामूहिक सुरक्षिततेची काही प्रमुख अंगभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ. सामूहिक सुरक्षितता ही यंत्रणा आक्रमक व युद्धखोर राष्ट्रांच्या नियमनासाठी मुख्यत्वे तयार केली गेली.

ब. सामूहिक सुरक्षिततेच्या तंत्रात सर्व सहभागी राष्ट्रे एकमेकांच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी बांधील असतात.

क. राष्ट्रांच्या खासगी गरजांपेक्षा आंतरराष्ट्रीय हितसंबंध प्राधान्याने जपले जातात.

ड. कोणत्याही राष्ट्रावर आलेली आपत्ती ही सामूहिक सुरक्षिततेसाठी धोका मानून सर्व राष्ट्रांनी मदत करणे अपेक्षित असते, अशा वेळी सहभागी राष्ट्रे निष्क्रिय भूमिका स्वीकारू शकत नाहीत.

इ. संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती याच सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वांतर्गत करण्यात आली आहे.

सामूहिक सुरक्षिततेखातीर महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात काही करार पार पडले उदा. परस्पर सहकार्य करार (१९२१) इत्यादी. तरीही संयुक्त राष्ट्रसंघाकडे स्वतःचे सैन्यबळ नसणे, अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राने या संघापासून अलिप्त राहणे यांसारख्या कारणांनी हे सामूहिक सुरक्षिततेचे तत्त्व दुसरे महायुध्द थोपवू शकले नाही.

महायुद्धोत्तर कालावधीमध्ये मात्र सामूहिक सुरक्षितता या व्यवस्थेने स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणत शांतता प्रस्थापित करण्याची नवीन तंत्रे विकसित केली. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेची स्थापना करून त्यांना अधिकार बहाल केले तसेच प्ररोधन (Deterrence) ही सामूहिक कृती विकसित केली. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रे आणि सामूहिक सुरक्षितता यांमधील एकवाक्यता वाढीस लागावी यादृष्टीने प्रयत्न केले. शांतीसेना

मिळवण्यासाठीचा करार इत्यादी उपाय व तंत्रे वापरून सामूहिक सुरक्षितता ही प्रणाली आपली विश्वासार्हता कायम राखून आहे.

## ३.११ विषय विवेचन : सुरक्षा

सुरक्षा हा राजकारणाचाच एक भाग आहे. सुरक्षेचे सर्व मुद्दे हे एका अर्थाने राजकीय मुद्दे असतात. सुरक्षा हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासातील केंद्रीय विषय आहे. संघर्षाकडे पाहण्याचे वास्तववाद, उदारमतवाद, आणि रचनावाद असे विविध दृष्टिकोण आहेत. सुरक्षाच्या मुद्द्यामध्ये राष्ट्राच्या सुरक्षेपासून, समूहांची तसेच व्यक्तीची सुरक्षा हे घटकही समाविष्ट होतात. 'राज्य' किंवा 'राष्ट्रीय' सुरक्षेची कल्पना केवळ बाह्य धोक्यांपासून राज्यांच्या सीमांचे संरक्षण म्हणून चुकीची व्याख्या केली जाते. याउलट, आजच्या धोक्यांचे बदलते स्वरूप लक्षात घेता, ती प्रामुख्याने आपल्या नागरिकांचे संरक्षण, कायद्याचे राज्य आणि मानवी सुरक्षेशी संबंधित आहे. राष्ट्रीय संरक्षण. नागरिकांची सुरक्षा, अर्थव्यवस्था व संस्थांची सुरक्षा हे सरकारचे कर्तव्य मानले जाते. १९९४ च्या मानव विकास अहवालानंतर 'मानवी सुरक्षा' ही संकल्पना जोमाने आंतरराष्ट्रीय संबंधात पुढे आली. यामध्ये आर्थिक, पर्यावरण, आरोग्य, अन्न आणि राजकीय समस्यांचे स्वतंत्रपणे निराकरण करण्यासाठी तसेच व्यक्तींपुढील हिंसक धोक्यांवर लक्ष केंद्रित करून मानवी सुरक्षेची व्याख्या अरुंद पद्धतीने करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. 2001 साली जेव्हा अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला करण्यात आला, तेव्हा शस्त्रास्त्र - सज्जतेपलीकडे सुरक्षा सुनिश्चित करण्याचा मुद्दा आहे हे समोर आले. मानवी सुरक्षिततेत गुंतवणूक करणे तितकेच महत्वाचे आहे.

## ३.१२ राष्ट्रीय सुरक्षा :

राष्ट्रीय सुरक्षा ही गतिशील संकल्पना आहे. आपल्याला असे दिसून येईल की जशी जशी मानवी संस्कृती आणि सभ्यतेची प्रगती होत गेली तशी उदा. विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील विकासाबरोबर राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना उत्क्रांत होत गेलेली आहे. प्राय: राष्ट्रीय सुरक्षा ही एखाद्या राष्ट्राला परकीय स्रोतांकडून काय धोका आहे याबाबत वापरली जाते. मात्र, त्यानंतर तिचा विचार परकीय तसेच अंतर्गत असे दोन्ही धोके आणि एखादे राष्ट्र आपला विकास अडथळ्याशिवाय चालू ठेवण्यास किती समर्थ आहे या संदर्भात केला जाऊ लागला. दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ, शीतयुद्धाचा काळ, शीतयुद्धोत्तर काळ या काळात राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना वेगवेगळ्या अंगाने विकसित होत गेली. एकविसाव्या शतकातील नवीन आव्हाने पेलण्यासाठी आजच्या संदर्भात या संकल्पनेकडे पाहता येईल. कारण सद्यकाळात राष्ट्र-राज्य संकल्पनेतही बदल झालेले दिसतात. मात्र आजही राजकीय विश्वात राष्ट्र हा घटकच केंद्रस्थानी असल्यामुळे पर्यायाने राष्ट्रीय सुरक्षा आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये महत्वाची आहे.

राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या व्होल्टर लिपमन (Walter Lippmann) पुढीलप्रमाणे करतात.

''एखादे राष्ट्र किती सुरक्षित आहे हे पुढील दोन निकषांवरून ठरवता येते. जर त्या राष्ट्राने युद्ध टाळायचे म्हटले तर त्याकरता त्यास राष्ट्राची मूलभूत मूल्ये त्यागावी लागणार नाहीत. किंवा त्या मूल्यांना आव्हान दिल्यावर ते राष्ट्र युद्धात विजय मिळवून मूल्यांचे रक्षण करू शकेल.''

शीतयुद्धाच्या काळात राष्ट्रीय सुरक्षा वाढवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर भर देण्यात आला. अण्वस्त्र व इतर युद्धसामग्री निर्माण करण्यात गुंतवणूक करण्यात आली. तर शीतयुद्धानंतरच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेसाठी लष्करी सामग्रीपेक्षा आर्थिक विकासावर भर देण्यात आला. राष्ट्रीय सुरक्षेची चर्चा मुख्यत्वे संरक्षण खर्च, आण्विक सामग्री आणि लष्करी सामर्थ्य याभोवती फिरत असली तरी व्यापक अर्थाने त्यात राष्ट्राची समृद्धी, सामाजिक विकास याचाही समावेश करायला हवा. आर्थिक, औद्योगिक व तंत्रज्ञान प्रगती तसेच सामाजिक, सांस्कृतिक एकता आणि राजकीय व्यवस्थेची लवचिकता व स्थिरता या गोष्टी व्यापक अर्थाने राष्ट्रीय सुरक्षेमध्ये येतात.

## ३.१३ मानवी सुरक्षा :

१९९४चा संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) आणि मानव विकास अहवाल (HDR) मध्ये "मानवी सुरक्षा" हा शब्द प्रथम वापरला गेला. सुरक्षेच्या या नवीन दृष्टीकोनाने राज्यांमधील संघर्ष, राज्यांच्या सीमांचे संरक्षण आणि लष्करी उपायांवर पारंपारिक दृष्टीकोनाने जे लक्ष केंद्रित केले होते त्यापलीकडे जात सुरक्षा या संकल्पनेमध्ये आर्थिक सुरक्षा, अन्न सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, वैयक्तिक सुरक्षा, सामुदायिक सुरक्षा आणि राजकीय सुरक्षा यांचा समावेश असलेल्या मानवी सुरक्षेची व्यापक, बहुआयामी संकल्पना प्रस्तावित केली. तेव्हापासून सशस्त्र संघर्ष, मानवी हक्कांचे उल्लंघन, पर्यावरणीय आव्हाने आणि संसाधनांची वंचितता यासह मानवी असुरक्षिततेच्या अनेक कारणांना संबोधित करून, मानवी सुरक्षा ही वैयक्तिक (राज्याऐवजी) स्तरावर सुरक्षिततेची सर्वसमावेशक मुक्ती संकल्पना बनली आहे.

२००४ मध्ये, मानवतावादी व्यवहारांच्या समन्वयासाठी संयुक्त राष्ट्र सचिवालयात एक मानवी सुरक्षा युनिट तयार करण्यात आले. मानवी सुरक्षेच्या संकल्पनेने गेल्या दोन दशकांत आपली उपयुक्तता निश्चितपणे सिद्ध केली आहे. विविध राज्ये, एजन्सी आणि स्वयंसेवी संस्था यासाठी एकत्र येऊ शकल्या आहेत. मानवी संकल्पनेतील मुख्य धोके पुढीलप्रमाणे आहेत. उत्पन्न गमावणे, उपासमारीचा धोका, रोगांचा धोका, नैसर्गिक आपत्तींचा धोका आणि नागरी स्वातंत्र्याला धोका.

मानवी सुरक्षेचा अर्थ वैयक्तिक सुरक्षेचे संरक्षण आणि हिंसाचाराच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष धमक्यांपासून स्वातंत्र्य असा होतो. मानवी सुरक्षेच्या संदर्भात संघर्षांचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. सीरिया, येमेन, अफगाणिस्तान आणि युक्रेनमध्ये झालेले सीमेलगतचे व अंतर्गत संघर्ष हे याचे उदाहरण आहे. नागरी संघर्ष, दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारी हे मानवी सुरक्षेसाठीचे मुख्य धोके आहेत. देशांतर्गत अर्थाने राज्याद्वारे प्रदान केलेली राष्ट्रीय सुरक्षा केवळ लोकांच्या संरक्षणाशी सुसंगतच नाही तर दुर्बल देशांमध्ये दीर्घकालीन स्थिरता प्राप्त करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे मानवी सुरक्षेच्या चौकटीत त्याला सैद्धांतिक आणि व्यावहारिकदृष्ट्या प्राधान्य दिले पाहिजे.

राज्याची संस्थात्मक क्षमता कमकुवत झाल्यास अशा प्रदेशात मानवी सुरक्षेसाठी धोका अधिक प्रबळ होतो. तेथे राज्यबाह्य घटक प्रभावी होतात. देशाच्या सीमा कमकुवत झाल्यामुळे अंतर्गत आणि बाह्य धोके निर्माण होतात. कमकुवत सीमांचे उदाहरण १९९६-१९९७ मधील

कॉंगोमधील पहिल्या गृहयुद्धात आढळू शकते, ज्यामध्ये राज्यांच्या सीमांच्या अकार्यक्षमतेमुळे 'रवांडा आणि बुरुंडीमधील संघर्ष' झाला. त्यामुळे मानवी सुरक्षेच्या मुद्द्यासाठी राष्ट्रीय स्तरावर उपाययोजनांना प्राधान्य दिले पाहिजे. कमकुवत संस्था असलेल्या राज्यांतील नागरिक धोक्यांना अधिक प्रभावित होतात. अशा पद्धतीने मानवी सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा एकमेकांशी संबंधित आहेत.

## ३.१४ विद्यापीठीय प्रश्न

१) संघर्ष अर्थ आणि बदलते स्वरूप स्पष्ट करा.

२) संघर्षाचे प्रकार सांगून संघर्षाचे बदलते स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

३) तंत्रज्ञानातील प्रगतीचा गैरव्यापार शस्त्रास्त्रांवरील संशोधनासाठी केला जातो हे स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणातील शस्त्रास्त्रनियंत्रण व नि:शस्त्रीकरण संकल्पना स्पष्ट करा.

५) सामुहिक सुरक्षितता संकल्पना सोदाहरणासहित स्पष्ट करा.

६) सामुहिक सुरक्षिततेची संकल्पना स्पष्ट करा.

७) राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना स्पष्ट करा.

८) राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी सुरक्षा यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करा.

❄❄❄❄❄❄❄

# ४

# ब्रेटनवुडस् संस्था

# (Brettonwoods Institutions)

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ ब्रेटनवुडस संस्था (Brettonwoods Institution)

४.३.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund-IMF)

४.३.२ जागतिक बँक (World Bank- WB)

४.३.३ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization-WTO)

४.४ क्षेत्रीय आर्थिक संघटनः युरोपियन युनियन

४.५ जागतिकीकरण

४.६ समारोप

४.७ विदयपीठीय प्रश्न

४.८ संदर्भ

## ४.१ उद्दिष्टे

- ब्रेटनवूडस संस्थांचा इतिहास समजून घेणे
- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांची कार्यपद्धती समजून घेणे
- युरोपियन युनियनचे कार्य समजून घेणे
- जागतिकीकरण ही संकल्पना समजून घेणे

## ४.२ प्रस्तावना

जुलै १९४४ मध्ये ब्रेटनवूड्स, न्यू हॅम्पशायर येथील माउंट वॉशिंग्टन हॉटेलमध्ये युनायटेड नेशन्स मॉनेटरी अँड फायनान्शियल कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली. चाळीसहून अधिक देशांतील प्रतिनिधींचा सहभाग असलेल्या या परिषदेत ब्रेटनवूड्स प्रणाली या नावाने प्रचलित एक नवीन आंतरराष्ट्रीय चलन प्रणाली तयार केली. मागील सुवर्ण मानकपद्धतीतील दोष आणि आर्थिक महामंदीचा अनुभव पाहता युद्धानंतरच्या काळात आर्थिक पुनर्रचना करणे हा या परिषदेचा चर्चाविषय होता. प्रचलित आंतरराष्ट्रीय चलन प्रणालीची ताठरता कमी करीत त्या प्रणालीतील देशांमध्ये सहकार्य वाढीस लावणे हेही तितकेच आवश्यक होते.

वस्तुतः पहिल्या महायुद्धानंतर सुवर्ण मानकपद्धती सोडण्यात आली होती. मात्र दोन महायुद्धांदरम्यानच्या कालावधीत युरोपियन राष्ट्रांनी स्पर्धात्मक अवमूल्यन आणि प्रतिबंधात्मक व्यापार धोरणे स्विकारल्याने जगभरात महामंदीची स्थिती उद्भवली होती.

अशावेळी ब्रेटनवूड्स परिषदेत स्पर्धात्मक अवमूल्यन टाळत, आर्थिक वाढीस प्रोत्साहन देईल तसेच विनिमय दरात स्थिरता आणू शकेल अशा आंतरराष्ट्रीय चलन प्रणालीची कल्पना करण्यात आली. या परिषदेत सहभागी राष्ट्रांनी नवीन प्रणालीच्या उद्दिष्टांवर आपली सहमती दर्शविली असली तरी अंमलबजावणीबाबत मात्र त्यांचे एकमत होत नव्हते. चर्चांसाठी असंख्य द्विपक्षीय आणि बहुपक्षीय बैठका घेण्यात आल्या. शेवटी आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणाची प्रमुख जबाबदारी अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी हेन्री मॉर्गन्थॉ, त्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार हॅरी डेक्सटर व्हाईट आणि ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स या तिघांकडे सोपविण्यात आली. यातूनच ब्रेटनवूडस संस्थांचा उगम झाला.

जागतिक बँक (WB) आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) या ब्रेटनवूड्स संस्था या नावाने प्रसिद्ध आहेत. मूळ ब्रेटनवूड्स करारामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (ITO) च्या स्थापनेचाही विचार करण्यात आला होता. मात्र १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस जागतिक व्यापार संघटना (WTO) तयार होईपर्यंत ही योजना सुप्त राहिली.

## ४.३ ब्रेटनवुडस् संस्था

### ४.३.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund-IMF)

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ही १९० सदस्य देशांची एक वित्तीय संघटना आहे. IMF ची संकल्पना ब्रेटनवूड्स परिषदेत स्वीकारण्यात आली. या परिषदेतील ४४ देशांनी १९३०च्या महामंदीला कारणीभूत असलेल्या स्पर्धात्मक अवमूल्यनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच परस्पर आर्थिक सहकार्यासाठी एक आकृतिबंध तयार करण्याचा प्रयत्न केला. यानुसार प्रत्येक सदस्य राष्ट्राला IMF च्या कार्यकारी मंडळावर त्याच्या आर्थिक क्षमतेच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. ज्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेतील सर्वात शक्तिशाली देशांना सर्वाधिक मतदानाचा अधिकार आहे. सुरवातीला IMF चे सदस्य असल्याशिवाय देश इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट (IBRD) मध्ये सदस्यत्वासाठी पात्र नव्हते. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी ब्रेटनवूड्स करारानुसार IMF ने निश्चित विनिमय दरांवर परिवर्तनीय चलनांची प्रणाली सुरू केली आणि अधिकृत राखीव ठेवीसाठी सोन्याला यूएस डॉलरमध्ये ($३५ प्रति औंस दराने) बदलले. २७ डिसेंबर १९४५ रोजी IMF २९सदस्य देशांसह कार्यान्वित झाली आणि १ मार्च १९४७ रोजी त्याचे प्रत्यक्ष आर्थिक कामकाज सुरू झाले.

**IMF चा इतिहास**

१९७१ मध्ये अमेरिकेने अमेरिकन डॉलरला (आणि इतर सरकारांकडे असलेले डॉलर रिझर्व्ह) सोन्यात परावर्तित करण्यास नकार देताच (याला निक्सन शॉक असे म्हणतात) ब्रेटनवूड्सची विनिमय दर प्रणाली कोलमडली. त्यानंतर IMF ने तरल विनियम दर व्यवस्थेला (Floating Exchange Rate System) प्रोत्साहन दिले. यानुसार देश आपली

विनिमय व्यवस्था निवडण्यास स्वतंत्र असून, बाजार शक्ती एकमेकांच्या सापेक्ष चलनांचे मूल्य निर्धारित करु शकतात. ही व्यवस्था आजही कायम आहे

यानंतर सर्वप्रथम १९७३ च्या तेलाच्या संकटादरम्यान IMF ने अंदाज लावला की १०० तेल-आयात करणाऱ्या विकसनशील देशांचे विदेशी कर्ज १९७३ ते १९७७ दरम्यान १५०% ने वाढले असून ते जागतिक स्तरावर फ्लोटिंग एक्स्चेंज रेटमध्ये बदलल्यामुळे आणखी गुंतागुंतीचे झाले आहे. यावर उपाय म्हणून IMF ने १९७४ ते १९७६ या कालावधीत तेल सुविधा नावाचा एक नवीन कर्ज कार्यक्रम सुरु केला.

त्यानंतर १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर, IMF ने पूर्वीच्या सोव्हिएत गटातील देशांना केंद्रीय नियोजनातून बाजार-चालित अर्थव्यवस्थांमध्ये संक्रमण करण्यात मदत करण्यात मध्यवर्ती भूमिका बजावली. १९९८-२००२ या कालावधीत आर्थिक संकटातून जात असलेल्या अनेक देशांना IMF ने कर्ज आणि बेलआउट पॅकेज प्रदान केले. तर २००८ च्या आर्थिक महामंदीला सक्षमपणे प्रतिसाद देण्यासाठी IMF ने मोठे उपक्रम हाती घेतले. या उपक्रमांमध्ये स्पिल-ओव्हर्स (जेव्हा एका देशातील आर्थिक धोरणे इतरांवर परिणाम करू शकतात). पाळत ठेवण्यासाठी कायदेशीर चौकटीत सुधारणा करणे, जोखीम आणि वित्तीय प्रणालींचे सखोल विश्लेषण करणे, सदस्यांच्या बाह्य स्थितीचे मूल्यांकन वाढवणे आणि चिंतांना अधिक तत्परतेने प्रतिसाद देणे यासारख्या उपक्रमांचा समावेश करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेतील प्रमुख संस्थांपैकी IMF ही एक संस्था असून IMF मुळे आंतरराष्ट्रीय भांडवलशाहीच्या पुनर्बांधणीत राष्ट्रीय आर्थिक सार्वभौमत्व आणि मानवी कल्याणाचा समतोल साधता आला आहे.

**IMF ची उद्दिष्टे-**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ही ब्रेटनवुडस संघटना असून तिची ठळक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- जागतिक आर्थिक सहकार्य वाढवणे
- सुरक्षित आर्थिक स्थिरता
- आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ करणे
- उच्च रोजगार आणि शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देणे आणि जगभरातील गरिबी कमी करणे
- स्थूल आर्थिक वाढ घडवून आणणे
- विकसनशील देशांसाठी धोरण सल्ला आणि वित्तपुरवठा करणे
- विनिमय दर स्थिरता आणि आंतरराष्ट्रीय पेमेंट सिस्टमला प्रोत्साहन देणे

**IMF चे कार्य आणि जबाबदाऱ्या**

IMF मुख्यत्वे सदस्य देशांना क्रेडिट प्रदान करण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेवर देखरेख करण्यावर लक्ष केंद्रित करते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची कार्ये तीन प्रकारांमध्ये विभागली जातात.

१. **नियामक कार्ये :** IMF एक नियामक संस्था म्हणून कार्य करते. करारातील कलमांच्या नियमांनुसार ते विनिमय दर धोरणांसाठी आवश्यक आचारसंहिता आणि चालू खात्यातील व्यवहारांसाठी देयकांवर निर्बंध लागू करण्यावर लक्ष ठेवते. केंद्रीय बँक कर आकारणीपासून ते स्थूल अर्थशास्त्रीय तथ्य अहवाल प्रसिद्ध करणे हे IMF चे प्रारंभिक अधिकारक्षेत्र आहे. याशिवाय IMF ही केंद्रीय बँका, वित्त मंत्रालये, महसूल प्रशासन आणि वित्तीय क्षेत्रातील पर्यवेक्षी संस्थांसह सरकारांना तांत्रिक सहाय्य आणि प्रशिक्षण प्रदान करते. अशा प्रकारचे प्रशिक्षण देशांना उत्पन्न असमानता, लैंगिक समानता, भ्रष्टाचार आणि हवामान बदल यासारख्या समस्यांना सामोरे जाण्यास मदत करते.

२. **आर्थिक कार्ये :** IMF सदस्य देशांना अल्प तसेच मध्यम मुदतीच्या व्यवहारतोलातील (BOP) असमतोल दूर करण्यासाठी करण्यासाठी अर्थसहाय्य आणि संसाधने प्रदान करते. यात आणीबाणीच्या कर्जासह राष्ट्रांचा आंतरराष्ट्रीय साठा पुनर्बांधणी करणे, त्यांची चलने स्थिर करणे, आयातीसाठी पैसे देणे सुरू ठेवणे आणि मूलभूत समस्या दुरुस्त करताना मजबूत आर्थिक वाढीसाठी परिस्थिती पुनर्संचयित करणे याचाही समावेश होतो.

३. **सल्लागार कार्ये :** IMF हे सदस्य देशांसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचे केंद्र आहे. हे सल्ला आणि तांत्रिक सहाय्याचे स्त्रोत म्हणून देखील कार्य करते. आर्थिक जोखीम ओळखण्यासाठी तसेच वाढ आणि आर्थिक स्थिरतेसाठी धोरणांची शिफारस करण्यासाठी IMF नियमितपणे आंतरराष्ट्रीय चलन प्रणाली आणि जागतिक आर्थिक घडामोडींचे निरीक्षण करत असते. IMF त्याच्या १९० सदस्य देशांच्या आर्थिक धोरणांची नियमित तपासणीदेखील करते. याव्यतिरिक्त IMF त्याच्या सदस्य देशांच्या आर्थिक स्थिरतेसाठी संभाव्य धोके ओळखत त्यांच्या सरकारांना संभाव्य धोरण समायोजनांबद्दल सल्ला देते.

### ४.३.२ जागतिक बँक (World Bank- WB)

जगातील सर्वात मोठी बहुपक्षीय कर्जदार संस्था म्हणून जागतिक बँकेकडे पाहिले जाते. सदस्य देशांच्या आर्थिक विकासास हातभार लावणाऱ्या प्रकल्पांना वित्तपुरवठा करणारी जागतिक बँक ही संयुक्त राष्ट्र (UN) संघटनेशी संलग्न संस्था आहे. जागतिक बँक संयुक्त राष्ट्रांशी संबंधित असली तरी ती आमसभा किंवा सुरक्षा परिषदेला जबाबदार नाही. बँकेच्या १८० पेक्षा जास्त सदस्य राज्यांपैकी प्रत्येकाचे बोर्ड ऑफ गव्हर्नर्सवर प्रतिनिधित्व केले जाते, जे वर्षातून एकदा भेटतात. गव्हर्नर हे सहसा त्यांच्या देशांचे अर्थमंत्री किंवा मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर असतात. IBRD धोरणांवर गव्हर्नर मंडळाचा काही प्रभाव असला तरी वास्तविक निर्णय घेण्याची शक्ती मोठ्या प्रमाणावर बँकेच्या २५ कार्यकारी संचालकांकडे असते. अमेरिका, जपान, जर्मनी, युनायटेड किंगडम आणि फ्रान्स हे पाच प्रमुख देश त्यांचे स्वतःचे कार्यकारी संचालक नियुक्त करतात. इतर देशांना विभागांमध्ये विभागण्यात आले असून या प्रत्येक विभागातून एक कार्यकारी संचालक निवडला जातो. संचालक मंडळातील मतदानाची शक्ती ही देशाच्या भांडवली ठेवीवर आधारित असते. श्रीमंत आणि अधिक विकसित देश हे अधिक भांडवली ठेवीमुळे बँकेचे प्रमुख भागधारक असल्याने त्यांचा निर्णयक्षमतेत अधिक प्रभाव जाणवतो. जागतिक बँक ही आपल्या सदस्य देशांच्या भांडवली ठेवी, भांडवली बाजारातील बाँड तरलता आणि IBRD आणि IFC कर्जावरील व्याज पेमेंटमधून जमा

झालेल्या निव्वळ कमाईतून निधी मिळवते. सदस्यत्व स्विकारलेल्या देशांच्या भांडवलाचा अंदाजे एक दशांश थेट बँकेला दिला जातो.

जागतिक बँक ही इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट (IBRD), इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन (IDA), इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन (IFC), मल्टीलेटरल इन्व्हेस्टमेंट गॅरंटी एजन्सी (MIGA), आणि इंटरनॅशनल सेंटर फॉर सेटलमेंट ऑफ इन्व्हेस्टमेंट डिस्प्युट (ICSID) या पाच घटक संस्थांचा समुच्चय आहे. यापैकी IBRD ही मध्यम-उत्पन्न असलेल्या विकसनशील देशांना तसेच अल्पउत्पन्न देशांना बाजार व्याजदराने कर्ज पुरवते. १९६० मध्ये स्थापन झालेली IDA, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण विकास यासारख्या क्षेत्रांमध्ये कमी उत्पन्न असलेल्या विकसनशील देशांना व्याजमुक्त दीर्घकालीन कर्ज, तांत्रिक सहाय्य आणि धोरण सल्ला प्रदान करते. IBRD आपला बहुतांश निधी जगातील भांडवली बाजारांवर उभा करत असताना मात्र IDA च्या कर्ज ऑपरेशनला विकसित देशांच्या योगदानाद्वारे वित्तपुरवठा केला जातो. IFC ही खाजगी गुंतवणूकदारांच्या भागीदारीत कार्यरत असून विकसनशील देशांमधील व्यवसाय उपक्रमांना कर्ज आणि इक्विटी वित्तपुरवठा प्रदान करते. विकसनशील देशांमधील गैर-व्यावसायिक जोखमींमुळे होणाऱ्या नुकसानाविरूद्ध विदेशी गुंतवणूकदारांना कर्ज हमी आणि विमा MIGA द्वारे प्रदान केला जातो. शेवटी, ICSID जे IBRD पासून स्वतंत्रपणे कार्य करते, परकीय गुंतवणूकदार आणि त्यांचे यजमान विकसनशील देश यांच्यातील गुंतवणूक विवादांचे सामंजस्य किंवा लवादाद्वारे तोडगा काढण्यासाठी जबाबदार आहे.

जागतिक बँक हा विकसनशील देशांकरीता आर्थिक मदतीचा सर्वात मोठा स्त्रोत असून, आंतरराष्ट्रीय कर्जदारांच्या वतीने बँकेमार्फत मुक्त बाजारपेठ अंमलात आणण्यासाठी तांत्रिक सहाय्य, धोरण सल्ला आणि पर्यवेक्षण देखील प्रदान केले जाते. आर्थिक धोरणांवर देखरेख, विकसनशील देशांमधील सार्वजनिक संस्थांमध्ये सुधारणा करणे आणि आंतरराष्ट्रीय स्थुल अर्थशास्त्रीय धोरण निश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक व्यापार संघटनेसोबत जागतिक बँक मध्यवर्ती भूमिका बजावते.

१९८० च्या दशकाच्या सुरुवातीस जागतिक अर्थव्यवस्थेतील मंदी, उच्च व्याजदर, वस्तूंच्या किमतीत झालेली घसरण आणि तेलाच्या किमतीतील व्यापक चढउतार यामुळे अनेक विकसनशील देश त्यांच्या कर्जाची परतफेड करु शकले नाही. अशावेळी जागतिक बँकेने कर्जबाजारी विकसनशील देशांमध्ये आर्थिक आणि सामाजिक धोरणे ठरवण्यात महत्वाची भूमिका बजावली. अशावेळी जागतिक बँकेने आपल्या रचनात्मक सुधारणा कार्यक्रमांच्या माध्यमातून आरोग्य आणि शिक्षणक्षेत्रात खर्चकपात, किंमत नियंत्रणांचे उच्चाटन, व्यापाराचे उदारीकरण, आर्थिक क्षेत्र नियंत्रणमुक्त करणे आणि सरकारी उद्योगांचे खाजगीकरण यासारखी पाऊले उचलली. आर्थिक स्थैर्य स्थापित करण्यासाठी जरी या सुधारणा कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली असली तरी त्यामुळे गरिबीची पातळी तसेच बेरोजगारी वाढली.

कर्जाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर जागतिक बँकेने रस्ते, बंदर सुविधा, शाळा आणि रुग्णालये यांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य देण्यावर आपले प्रयत्न केंद्रित केले. जगातील अल्पविकसित देशांसाठी गरिबी निर्मूलन आणि कर्जमुक्तीवर

भर दिला जात असला तरी बँकेने आर्थिक स्थिरीकरण धोरणांसाठी आपली वचनबद्धता कायम ठेवली आहे.१९८० आणि ९० च्या दशकात साम्यवादाच्या पतनानंतर पूर्व आणि मध्य युरोपमध्ये मुक्त-मार्केट सुधारणांवर देखरेख करण्यासाठी जागतिक बँक आणि IMF ने मध्यवर्ती भूमिका बजावली.

### ४.३.३ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization-WTO)

जागतिक व्यापार संघटना (WTO) ही जागतिक व्यापाराचे देखरेख आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेस अधिक उदारीकरणाचे स्वरुप देण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय संस्था आहे. WTO ही जकात आणि व्यापारविषयक सामान्य सहमती (GATT) या कराराचे अपत्य मानली जाते. १९४७ मध्ये जेव्हा GATT स्विकारण्यात आला तेव्हा या कराराचे स्वरुप हे अस्थायी होते. नजीकच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेसारखी (ITO) संघटना या कराराची जागा घेईल असे अपेक्षित होते. मात्र ITO कधीच प्रत्यक्षात येऊ शकले नाही. त्यामुळे नंतरच्या काळात GATT द्वारे जागतिक व्यापारात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण सादर करण्यात आले. ITO ची कल्पना सुरुवातीला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँकेसह, द्वितीय विश्वयुद्धानंतरच्या पुनर्रचना आणि आर्थिक विकासाच्या प्रमुख स्तंभांपैकी एक म्हणून करण्यात आली होती. हवाना येथे १९४८ मध्ये व्यापार आणि रोजगारावरील UN परिषदेने ITO साठी एक मसुदा चार्टर काढण्यात आला. याला 'हवाना चार्टर' असेही म्हणतात. हवाना चार्टरमध्ये व्यापार, गुंतवणूक, सेवा आणि व्यवसाय आणि रोजगार पद्धती नियंत्रित करणारे विस्तृत नियम तयार करण्यात आले होते. मात्र, अमेरिकेने या कराराला मान्यता देण्यास नकार दिला. दरम्यान, १९४७ मध्ये जिनिव्हा येथे २३ देशांनी वाटाघाटी करून आयात कोट्याचा वापर टप्याटप्याने समाप्त करण्याचा आणि व्यापारी व्यापारावरील शुल्क कमी करण्याचा करार GATT म्हणून १ जानेवारी १९४८ रोजी अंमलात आला. जरी GATT चे स्वरुप अस्थायी होते तरी WTO ची निर्मिती होईपर्यंत GATT हा आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करणारा एकमेव मोठा करार होता. GATT प्रणालीत सुरवातीच्या ४७ वर्षांत तब्बल १३० देश सामील झाले. या देशांत GATT मुळे विविध वाटाघाटींच्या फेऱ्या घडून आल्या व आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक अनेक पूरक संधी, तह, करार घडून आले.

१९८० नंतर विशेषतः आंतरराष्ट्रीय व्यापारावर देखरेख ठेवण्यासाठी आणि व्यापारविषयक विवादांचे निराकरण करण्यासाठी स्थिर संघटनेची मागणी होऊ लागली. यातूनच GATT च्या उरुग्वे फेरीनंतर (१९८६-९४) १ जानेवारी १९९५ रोजी WTO ची स्थापना करण्यात आली. उरुग्वे फेरीतील वाटाघाटीदरम्यान मूळ GATT आणि उरुग्वे फेरीच्या आधी सादर करण्यात आलेल्या सर्व बदलांना GATT १९४७ असे नामकरण करण्यात आले. कराराचा हा संच GATT १९९४ पेक्षा वेगळा करण्यात आला. WTO ची स्थापना करणारा GATT करार १९९४ हा अविभाज्य भाग मानला जातो. GATT १९९४ मध्ये वस्तू तसेच व्यापाराशी निगडीत इतरही अनेक बहुपक्षीय करार समाविष्ट होते. ज्यामध्ये सेवाविषयक व्यापारातील समान सहमती करार (GATS), बौद्धिक संपदा अधिकारांच्या व्यापार-संबंधित पैलूंवर करार (TRIPS) यांसारख्या सहमती करारांचा समावेश होता.

**WTO ची प्रमुख उद्दिष्टे**

जागतिक व्यापार संघटना ही पुढील प्रमुख उद्दिष्टांसाठी प्रयत्नरत आहे.

१. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी नियम निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे
२. पुढील व्यापार उदारीकरणासाठी वाटाघाटी आणि देखरेखीसाठी एक मंच प्रदान करणे
३. राष्ट्रा-राष्ट्रातील व्यापारविषयक वादविवाद सोडविणे.
४. पारदर्शकता वाढवणे. निर्णय घेण्याची प्रक्रिया
५. जागतिक आर्थिक व्यवस्थापनात सामील असलेल्या इतर प्रमुख आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांना सहकार्य करणे
६. विकसनशील देशांना जागतिक व्यापार प्रणालीचा पूर्ण फायदा होण्यास मदत करणे.

या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी WTO ने अधिक व्यापकपणे पाठपुरावा केला असून सर्व वस्तू, सेवा आणि बौद्धिक संपदा, तसेच काही गुंतवणूक धोरणे यांचाही समावेश केला आहे.

## ४.४ क्षेत्रिय आर्थिक संघटनः युरोपियन युनियन

युरोपियन युनियन (EU) ही युरोपियन देशांचा समावेश असलेली एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. या संस्थेतील सदस्य देशांचे सार्वभौमत्व अबाधित राखत राजकीय आणि आर्थिक निर्णय घेतले जातात. युरोपियन युनियनचे स्वरुप हे काहीसे फेडरेशन किंवा कॉन्फेडरेशनच्या स्वरूपाचे मानले जाते. त्यामुळे युरोपियन युनियनचे सर्व नियम आणि निर्णय सदस्य देशांकरीता बांधील ठरतात.

युरोपियन युनियनचे सदस्यत्व मिळवतांना सदस्य राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या युरोपियन कन्व्हेन्शनचा स्वीकार करणे तसेच युरोप कौन्सिलमधील सदस्यत्व मिळवणे गरजेचे असते. युरोपियन युनियन सदस्य राष्ट्रांसाठी समान परराष्ट्र तसेच सुरक्षा धोरण निर्धारित करते. ज्यामुळे सदस्य राष्ट्रांच्या किमान समान राजकीय तसेच सुरक्षाविषयक हितसंबंधांची पूर्तता करणे शक्य होते.

आर्थिक बाबतींत युरोपियन युनियनने युरोपियन समान बाजारपेठ (European Single Market) विकसित केले आहे. या समान बाजारपेठव्यवस्थेमुळे वस्तू, सेवा आणि भांडवलाचे मुक्त वहन शक्य होते. याशिवाय बाह्य व्यापार, शेती, मत्स्यपालन आणि प्रादेशिक विकास यांच्या विकासासाठीही स्वतंत्र धोरणे विकसीत करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे युरोपियन युनियनअंतर्गत युरो हे समान चलन (Common Currency) तयार करण्यात आले असून त्याचा वापर युरोपच्या बहुतांश क्षेत्रात होतांना दिसतो.

दुसऱ्या महायुद्धाचे कारण ठरलेल्या आत्यंतिक राष्ट्रवादास आळा घालता यावा या दृष्टीने प्रमुख युरोपियन नेत्यांनी युरोपच्या एकत्रीकरणाची योजना मांडली होती. विन्स्टन चर्चिल यांनी पुढे जाऊन युनायटेड स्टेट्स ऑफ युरोपच्या उदयाचा पुरस्कार केला. यानंतर १९४८ च्या हेग कॉंग्रेसद्वारे टप्याटप्याने का होईना युरोपियन युनियनच्या पूर्वज मानल्या जाणाऱ्या वेस्टर्न युनियन, युरोपियन कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC) आणि युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी (EEC) संघटनांची स्थापना झाली. फ्रान्स, इटली, नेदरलँड,

बेल्जियम, पश्चिम जर्मनी आणि लक्झेंबर्ग हे या युरोपियन कम्युनिटीचे संस्थापक सदस्य देश होते.

युरोपियन युनियनची स्थापना १९९३ मध्ये करण्यात आली. मास्ट्रिच करार ज्याला युरोपियन युनियनचा करार असेही म्हणतात; या करारावर २८ देशांनी १९९३ मध्ये स्वाक्षरी करण्यात आली. ॲम्सटरडॅमचा करार (१९९७), ट्रिटी ऑफ नाइस (२००१) आणि लिस्बनचा तह (२००७) या सुधारणांतून मास्ट्रिच करारात सुधारणा करण्यात आली. वर्तमानकाळात युरोपियन युनियनचे महत्वाचे निर्णय युरोपियन संसद, युरोपियन कौन्सिल, युरोपियन कमिशन, युरोपियन युनियन परिषद, युरोपियन युनियनचे न्यायालय, युरोपियन सेंट्रल बँक आणि युरोपियन कोर्ट ऑफ ऑडिटर्स या घटकांकडून घेतले जातात.

युरोपियन युनियनची उद्दिष्टे

१. सदस्य राष्ट्रांत राजकीय, आर्थिक, व्यापारी, सामाजिक सहकार्य वाढवणे
२. एका चलनव्यवस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करून आर्थिक एकात्मता वाढवणे.
३. समान सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी प्रयत्न करणे.
४. संपूर्ण नागरिकत्वासाठी एकासमान नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे.
५. न्यायपालिका आणि आश्रय या क्षेत्रांमध्ये वर्धित सहकार्य.

**युरोपियन युनियन आणि आर्थिक एकीकरण -**

आर्थिक एकीकरण ही राष्ट्रा-राष्ट्रांमधील व्यापारातील अडथळे कमी करणे किंवा दूर करणे आणि आर्थिक आणि वित्तीय धोरणांचे समन्वय साधणे यासाठी निर्माण करण्यात येणारी एक व्यवस्था आहे. आर्थिक एकीकरणाचे उद्दिष्ट ग्राहक आणि उत्पादक दोघांसाठी खर्च कमी करणे आणि करारामध्ये सामील असलेल्या देशांमधील व्यापार वाढवणे आहे. आर्थिक एकीकरण बहुतेक वेळा शेजारील राष्ट्रांमध्ये होत असल्याने त्याला प्रादेशिक एकात्मता असेही संबोधले जाते.

युरोपियन युनियनचा आर्थिक गाभा हा समान बाजारपेठ व्यवस्था हा आहे. वस्तू, सेवा, श्रम आणि भांडवल यांच्या मुक्त संचारातून ही व्यवस्था उदयास आली आहे. सुरवातीला सीमाशुल्क युनियनमधून विकसित झाल्यानंतर समान बाजारपेठ व्यवस्थेने जकात आणि कोटा यांसारख्या अडचणींवर मात केली. युरोपियन युनियनमध्ये समान बाजारपेठ व्यवस्था विकसित करण्यात युरोपियन कोर्ट ऑफ जस्टिसची भूमिका महत्वाची ठरली.

समान बाजारपेठ व्यवस्थेप्रमाणे युरोची निर्मिती हादेखील युरोपियनचा युनियनच्या आर्थिक एकत्रीकरणाचा महत्वाचा भाग सांगता येईल. समान चलनाची मागणी ही १९६० पासून जोर धरत होती. परंतु युरोपियन युनियन आणि प्रादेशिक आर्थिक एकीकरण अशी दुहेरी उद्दिष्टे कशी साध्य करावयाची याबाबत मतभेद असल्याने ही मागणी मागे पडली होती. विशेषतः सुरक्षा आणि चलनव्यवस्था या देशांच्या सार्वभौमत्वाशी जोडलेल्या संकल्पना असल्याने या अडचणी वाढल्या होत्या.

यानंतर १९७० च्या सुरुवातीच्या काळात तेलाच्या किमती वाढू लागल्याने मर्यादित आर्थिक सहकार्य मागे पडले. अशावेळी योम किप्पूर युद्धाच्या पार्श्वभूमीवर अधिक व्यापक युरोपीय

चलन प्रणाली १९७९ मध्ये सादर करण्यात आली. यामुळे विनिमय दर स्थिर करण्यात काहीसे यश आले व समान चलन निर्मितीचा मार्ग मोकळा झाला. युरो या समान चलनाचा स्वीकार १९९५ मध्ये करण्यात आला. या चलनाचा वापर युरोपियन युनियनच्या २७ सदस्य राष्ट्रांपैकी १९ देशांद्वारे केला जातो.

## ४.५ जागतिकीकरण

जागतिकीकरण ही सीमाविरहित जग या विचारावर आधारित संकल्पना आहे. जागतिक खेडे किंवा हे विश्वची माझे घर यासारख्या संकल्पनांत जागतिकीकरणाचा वापर होतांना दिसतो. जागतिकीकरण ही लोकशाही आणि भांडवलशाही या दोन घटकांतून निर्माण झालेली उत्पत्ती आहे. मुक्त व्यापार आणि भांडवल आणि श्रम यांच्या आंतरराष्ट्रीय हालचालींद्वारे या जागतिकीकरणाचा प्रसार झाला. राजकीयदृष्ट्या जागतिकीकरण हे संदर्भ आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे जागतिक शासन वाढवणे किंवा राष्ट्रीय धोरणांचे तादात्मिकरण साधण्याशी निगडीत आहे. मुक्त-बाजार भांडवलशाही आणि उदारमतवादी लोकशाही हा समाज संघटित करण्याचा सर्वोत्तम मार्ग होता या विचाराचाही जागतिकीकरणाशी संबंध जोडला जातो.

जागतिकीकणास डिजीटल क्रांती, आंतरर्रराष्ट्रीय आर्थिक एकीकरण, सामाजिक-सांस्कृतिक संयोग, जागतिक शिक्षणपद्धतीचा उदय, सीमापार राजकीय प्रभाव, वित्तीय उदारीकरण, तीव्र स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढ यासारखी कारणे महत्वाची मानली जातात.

जागतिकीकरण म्हणजे 'मुक्त', 'सीमाविरहीत', जागतिक अर्थव्यवस्था' निर्माण करण्यासाठी देशांमधील हालचालींवर सरकारने लादलेले निर्बंध काढून टाकण्याची प्रक्रिया. अशा प्रकारे जागतिकीकरणाला शक्तिशाली आर्थिक, राजकीय आणि सामाजिक परिमाण आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय सीमांना मर्यादा आहेत. त्यामुळे जागतिकीकृत अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय सीमा मोठ्या प्रमाणात अप्रासंगिक बनल्या आहेत. जागतिकीकृत अर्थव्यवस्थेत राष्ट्राचे सार्वभौमत्व खालील भू-वास्तवांद्वारे संरक्षित केले जाऊ शकते.

अनेक समीक्षकांनी एखाद्या राष्ट्रात जागतिकीकरणाची सुरुवात करणे हे राष्ट्रीय सार्वभौमत्व बहुराष्ट्रीय कंपनीच्या स्वाधीन करण्यासारखे मानले आहे. भारतात जागतिकीकृत अर्थव्यवस्था समाजवादी पायावर बांधली गेली आहे. गरिबी, निरक्षरता आणि असमानतेच्या संदर्भात उदारीकृत अर्थव्यवस्थेचा परिचय मोठ्या प्रमाणावर विरोध आणि कामगार अशांततेला कारणीभूत ठरु शकतो याची जाणीव भारतातील शासकांना आहे. राष्ट्राच्या सार्वभौमत्वाने IMF आणि WB सारख्या अतिराष्ट्रीय आणि अतिरिक्त-प्रादेशिक शासनाच्या संकल्पनांना मार्ग दिला आहे. पुढे हे बदल आंतरराष्ट्रीय करार आणि राष्ट्रीय धोरणांद्वारे वैध केले जात आहेत. दुसरीकडे मानवाधिकारांचे रक्षक आणि हमीदार असलेल्या राज्याच्या भूमिकेतही लक्षणीय बदल झाला आहे. या संदर्भात राज्याचे अधिकार अंशत: मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरनाम्याच्या चष्म्यातून तपासले जात आहेत. मानवाधिकारांच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांमुळे पोलिस आणि न्यायालये यांसारख्या राष्ट्रीय संस्थांच्या अधिकारावर घाला घातला जातांना दिसत आहे.

थोडक्यात, जागतिकीकरण ही गतिमान आणि सर्वव्यापी प्रक्रिया आहे. मात्र या प्रक्रियेतून राष्ट्रीय सार्वभौमत्वासारख्या कल्पनांवर आघात होतांना दिसत आहे.

## ४.६ समारोप

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक अर्थव्यवस्था कोलमडली होती. जग हे द्विधृवीय बनत असतांनाच जागतिक अर्थव्यवस्थेस चालना देणे गरजेचे आहे याची जाणीव प्रमुख युरोपियन देश आणि अमेरिका यांना होती. यातूनच ब्रेटनवूडस संस्थांचा उगम झाला. या संस्थांचा उद्देश जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्थेस गतिमान करणे हा आहे.

दुसरीकडे युरोपियन युनियनसारख्या संस्था आर्थिक ऐक्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडत असून क्षेत्रीय आर्थिक सहकार्याचा नवीन मापदंड यातून विकसीत होत आहे. जागतिकीकरणासारख्या घटकांचा शीतयुद्धोत्तर काळात मानवी जीवनावर दीर्घकालीन परिणाम झाले असून या प्रक्रियेस अटकाव घालणे आता अशक्य आहे.

## ४.७ विदयपीठीय प्रश्न

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संघटनेचा इतिहास आणि कार्ये स्पष्ट करा.
- जागतिक बँकेची संरचना स्पष्ट करा
- जागतिक व्यापार संघटनेची स्थापना आणि उद्दिष्टे स्पष्ट करा.
- टिपा लिहा
    - युरोपियन युनियन
    - जागतिकीकरण

## ४.८ संदर्भ


- The Globalization of World Politics - An Introduction to International Relations (Baylis and Smith)
  International Relations (Joshua S. Goldstein)


❄❄❄❄❄❄❄